(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

उपसभापती : कामकाज पत्रिकेवरील पहिल्या क्रमांकाची अर्धा-तास चर्चा सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांची आहे. परंतु त्यांनी मला सदर अर्धा-तास चर्चा पुढे ढकलण्यासंबंधीचे पत्र दिलेले आहे.

श्री. अजित पवार : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांच्या मुलाचे नुकतेच लग्न झालेले आहे त्यामुळे कदाचित त्यांना आज सभागृहात येणे शक्य झाले नसावे. परंतु त्या अनुषंगाने मी सभागृहाच्या असे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी जी अर्धा-तास चर्चा दिलेली आहे ती सभागृहात जवळपास चौथ्यांदा दाखविण्यात येत आहे. दर वेळी आम्ही येतो आणि चर्चा मात्र होत नाही.

उपसभापती : ठीक आहे. आपण सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांची अर्धा-तास चर्चा पुढील अधिवेशनात घेऊ.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : रुग्णालयातील अपुऱ्या सुविधांमुळे राज्यात सामान्य जनतेच्या आरोग्याकडे होत असलेले दुर्लक्ष

मु. शी. : रुग्णालयातील अपुऱ्या सुविधांमुळे राज्यात सामान्य जनतेच्या आरोग्याकडे होत असलेले दुर्लक्ष यासंबंधी डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करते :-

"महाराष्ट्राच्या शहरी, ग्रामीण व विशेषत: ग्रामीण भागात जनतेच्या आरोग्याबाबत होत असलेली हेळसांड, रुग्णालयात डॉक्टरांची अपुरी संख्या असणे, शासकीय रुग्णालयांमध्ये आधुनिक यंत्रसामुग्रीचा असलेला अभाव, कर्मचायांची अपुरी संख्या, जनतेच्या आरोग्य सेवेसाठी अर्थसंकल्पात करण्यात येत असलेली तुटपूंजी आर्थिक तरतूद, खाजगी रुग्णालयांची फी जास्त असल्याने गरीब रुग्णांना ती परवडत नसणे, जनतेच्या आरोग्याबाबत शासनाने दाखविलेली उदासीनता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, वेगवेगळया वेळी या सभागृहात सार्वजनिक आरोग्याशी संबंधित अशा अत्यंत जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर सुटसुटीत मुद्दे घेऊन फार मोठे वादविवाद होतात आणि त्यावर ठोस उत्तराची अपेक्षा विरोधी पक्षाकडून सातत्याने ठेवली जाते. ज्या ज्या वेळी अशा महत्वाचा व वेगळया स्वरुपाच्या तीन-चार मुद्यांवर विविधमंडळात चर्चा होते त्यासंदर्भात शासनाकडून धोरणात्मक स्वरुपाच्या लॉंग टर्म आणि शॉर्ट टर्म अशा उपाययोजना अपेक्षित असतात. उदाहरणार्थ कुपोषणाच्या प्रश्नांवर आपण सातत्याने चर्चा करीत असतो परंतु सत्ताधारी पक्षातील अथवा विरोधी पक्षातील सदस्य असोत कुपोषणाच्या बाबतीत या सर्वांचे समाधान होईल असे कधी होत नाही. यासंबंधी ज्या उपाययोजना केल्या जातात त्यासंबंधीचे रिझल्ट्स बघत असताना त्याचे उत्तर सापडेल असे चित्र मात्र दिसत नाही. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत हे नेहमी रॅबिज आणि इतर औषधांचा तुटवडा अशा महत्वाच्या प्रश्नांवर नेहमीच चर्चा घडवून आणतात. तसेच सार्वजनिक आणि मोठ्या रुग्णालयांमध्ये गरीब रुग्णांच्या आरोग्याकडे कशा प्रकारे लक्ष पुरविले जाते याकडे नेहमी शासनाचे लक्ष वेधण्याचा ते प्रयत्न करीत असतात.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

महोदय, आजची ही चर्चा उपस्थित करीत असताना मी शासनाचे या गोष्टीकडे लक्ष वेधू इच्छिते की, जे आरोग्य मिशन केंद्रशासनाने सुरु केले आहे त्यातून राज्यांना चांगल्या प्रकारचा निधी दिला जातो परंतु हा पैसा किती येतो, कोठे वापरला जातो आणि किती जिल्ह्यांना त्याचा फायदा मिळतो याबद्दलचे उत्तरदायित्व स्वीकारुन अशा प्रश्नांबाबत किंवा या मिशनमार्फत येणाऱ्या निधीच्या संदर्भात तपशीलवार सभागृहात चर्चा झाल्याचे मात्र मला तरी आठवत नाही. मुळात केंद्रशासनाने हे मिशन सुरु केले याला कारण संपूर्ण जगात एक गोष्ट मान्य करण्यात आली आहे की, देशातील एकूण सामाजिक दर्जा सुधारावयाचा असेल तर महिलांचा आरोग्य विषयक दर्जा सुधारला गेला पाहिजे. यादृष्टीकोनातून स्त्री जेवढी सक्षम होईल तेवढे तिच्या आरोग्याचे प्रश्न बदलतील व त्याचा परिणाम म्हणून एकूण मनुष्यबळ प्रभावित व बळकट होईल ही भूमिका नुकतीच कैरो डाक्युमेंटच्या संदर्भात आयसीडीपीची कॉन्फरन्स झाली होती त्यावेळी घेण्यात आली. त्यानंतर सर्व देशांनी त्यासंबंधीची बांधिलकी स्वीकारली. मला कल्पना आहे की, आपल्या राज्याच्या माननीय आरोग्य मंत्री ह्या स्वत: सुविद्य डॉक्टर आहेत. आपण हे डाक्युमेंट पाहिले तर आपल्याही लक्षात येईल की, यात महिलांची भूमिका काय आहे ?

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे....

पॉप्यूलेशन कौन्सिल आणि पॉप्युलेशन पॉलिसी यामध्ये केवळ व्हॅसेक्टॉमी आणि टयूबेक्टॉमीची ऑपरेशन करुन लोकसंख्या मर्यादित करण्यापुरता हा विषय नाही. आयसीपीडीचे कैरो डॉक्यूमेंट आहे यामध्ये महिला सक्षमीकरणासाठी मोठा कार्यक्रम भारत सरकारने स्वीकारलेला आहे व हा कार्यक्रम राज्यसरकारला सुध्दा बंधनकारक आहे. 1994 पासून आता आपण 2008 सालापर्यंत पोहचलेलो आहे. आपले जे महत्वाचे अधिकारी आहेत त्यांना आपण एक एक सुटा कार्यक्रम देतो व त्यामुळे त्यांना या कार्यक्रमाच्या पाठीमागची भूमिका माहिती नसते. आरोग्य मिशन आणि ते कशा पध्दतीने राबविले जावे यासाठी माहितीचे विकेंद्रीकरण आणि सक्षमीकरण आरोग्य विभागातच करणे गरजेचे आहे. आपले काही अधिकारी भ्रष्ट असतील परंतु जे काही अधिकारी चांगले आहेत त्यांची राजकीय इच्छाशक्ती जागृत करण्याची आवश्यकता आहे. अशा अधिका-यांना चांगली कामे करण्यासाठी जोपर्यंत आपण प्रवृत्त करीत नाही तोपर्यंत तुम्ही कागदोपत्री कितीही म्हटले की, मुलीचा जन्म दर कमी आहे तो वाढवण्यासाठी प्रयत्न करीत आहोत, परंतु यासंदर्भातील रिझल्ट प्रत्यक्षात काहीच दिसत नाही. याचे मुख्य कारण म्हणजे तुम्ही लोकांना मोटीव्हेट न करणे हे आहे. वैचारिक आणि सामाजिक बांधिलकीची त्यांच्यावर काय जबाबदारी आहे हे स्पष्टपणे त्यांना सांगितली पाहिजे. आरोग्य विभागामध्ये चांगले काम करणारे सचिव मिळालेले आहेत परंतु त्यांच्या ज्ञानाचा फायदा कसा करुन घेता याबद्दल मला शंका वाटते.

दुसरा प्रश्न असा आहे की, आरोग्य विषयक फोकसमध्ये साथी संस्थेमध्ये सेहत आणि टाटा इंस्टिट्यूट यांनी जो अहवाल केलेला त्यामध्ये नॅशनल फॅमेली सर्व्हे नुसार 15 ते 49 या वयोगटातील 49 टक्के स्त्रिया ॲनिमिक आहेत. 15 ते 49 या वयोगटातील 49 टक्के या वयोगटात पुरुषांना 16.2 टक्के ॲनिमिया आहेत. स्त्रियांमध्ये अनिमियाचे प्रमाण जास्त आहे. माता जर ॲनिमिक असेल तर बालके कुपोषित आणि ॲनिमिक असणारच . त्यामुळे स्त्रियांमधील ॲनिमियाचे प्रमाण कमी करण्यासाठी आरोग्य विभागाने काय कार्यक्रम घेतलेले आहेत, ॲनिमिक संदर्भात आपण ज्या काही योजना केलेल्या आहेत त्याचा फायदा किती स्त्रियांपर्यंत पोहचला जातो की या योजनांना पाय फुटतात यासंदर्भात सुध्दा लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

तिसरा मुद्दा असा आहे की, संभाजीनगर आणि नांदेड जिल्हयामध्ये आम्ही चित्र पाहिले आहे की, मुलगी जन्माला आल्यावर आईला भेटण्यासाठी सासरचे कोणीही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे....

जात नाही. 3-3, 4-4 दिवस घरुन डबा सुध्दा येत नाही. अशा वेळेला आपण म्हणतो की, आम्ही खाजगीकरण केलेले आहे. जेवण त्यांच्या घरुन येणार. मग ती माता उपाशी असेल, तिला कोणी भेटायला जात नसेल तर मला असे सुचवावेसे वाटते की, ज्या नवजात बालकाला जन्म देणा-या माता आहेत त्यांना आहाराची व्यवस्था बाळंतीण ओली असे पर्यंत म्हणजे 3-4 दिवसांसाठी दिले पाहिजे. ज्यामधून त्या स्त्रिला वाटेल की, माझ्या सासरचे मला भेटण्यासाठी कोणी आले नाही तरी माझी काळजी घेणारे कोणी तरी आहे अशा पध्दतीने या प्रश्नाकडे पाहिले पाहिजे.

चवथा मुद्दा असा आहे की, आरोग्य मिशनमध्ये समाजाचा सहभाग वाढविण्याची आवश्यकता आहे. जे स्वास्थ्य रक्षक किंवा आरोग्य रक्षक आहेत त्यांच्या योजना आपण सर्व गुंडाळलेल्या आहेत. ब-याचशा आरोग्य रक्षकांना आर्थिक संरक्षण नाही, त्यांना आपण कोणत्याही सोयी सवलती देत नाही अशा वेळी या माणसांना आरोग्य रक्षणाचे काम करण्यासाठी कोणतीही मदत आपण दिली नाही तर ते आरोग्य रक्षक कसे काय काम करु शकणार आहेत? त्यामुळे आरोग्य रक्षक आणि त्या त्या भागातील आरोग्य केंद्राच्या जवळची महिला मंडळे यांची जशी पोलीस विभागामध्ये महिला दक्षता समिती असते तशी प्राथमिक आरोग्य केंद्राला अटॅच असणारी महिला आरोग्य दक्षता समिती तयार करावी जेनेकरुन प्राथमिक आरोग्य केंद्रात सोयी सुविधा आहेत काय याचा विचार केला जाईल. बहुतेक प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये टॉयलेटची सुविधा नसल्यामुळे स्त्रियांना उघडयावर जावे लागते. त्यामुळे अशा मुद्यांसाठी त्या त्या जिल्हयाच्या नियोजन मंडळाने आरोग्य केंद्रात स्वच्छता गृहाची कशी व्यवस्था करता येईल यासाठी लक्ष देण्याची आवश्यकता आहे. म्हणून महिला आरोग्य दक्षता समित्या प्राथमिक आरोग्य केंद्राना जोडल्या जाणे आवश्यक आहे. तसेच या महिलांना काही अधिकार असण्याची आवश्यकता आहे. जेणेकरुन या महिला सूचना त्या ठिकाणच्या पालकमंत्र्यांकडे पाठवू शकतील आणि त्यांच्या सूचनांचा विचार केला जाईल.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे..

काही जिल्हयांमध्ये स्वास्थ्य संघ स्थापन करण्यात आले आहेत परंतु ते काही जिल्हयापुरतेच मर्यादित आहेत त्या संघामध्ये माता सहभागी झालेल्या आहेत. त्याचबरोबर प्रत्येक प्राथमिक आरोग्य केन्द्रामध्ये महिला आरोग्य दक्षता समिती असली पाहिजे.अशा पध्दतीने जर व्यवस्था करण्यात आली तरच त्याचा चांगला उपयोंग होऊ शकेल असे मला वाटते. सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये मुलीचा जन्म दर कमी होत आहे आणि वृध्द महिलांची संख्या वाढत चालली आहे . राज्याचा आर्थिक सर्वेक्षण अहवाल जर आपण पाहिला तर त्यात असे म्हटले आहे की , पती - पत्नीच्या वयामध्ये सात ते आठ वर्षाचे अंतर आहे " त्याचा परिणाम असा झाला आहे की, गावामध्ये वृध्द महिलांची संख्या वाढत चालली आहे. त्यातील अनेक महिलांना मोतीबिंदू झालेला आहे किंवा गर्भाशयाचे आजार झालेले आहेत. काही महिलांना कोणाचा आधार नसेल तर त्यांना अक्षरश: गावामध्ये भीक मागावी लागत आहे.या विषयाच्या संदर्भात मी सकाळी अर्धा तास चर्चा उपस्थित करीत आहे त्या चर्चेला केवळ उत्तर देणे एवढीच माझी अपेक्षा नाही तर या संदर्भात केन्द्र सरकार कोणत्या भूमिकेतून कार्यक्रम राबवत आहेत त्या विचारांची माहिती ,त्या कार्यक्रमामध्ये महिलांचा सहभाग वाढविणे , ॲनिमिया सारखा रोग होऊ नये यासाठी कोणता ठोस कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे याची माहिती लोकापर्यंत पोहोचविणे या दृष्टीने शासनाने जरुर विचार करावा अशी माझी अपेक्षा आहे. त्याचप्रमाणे साथी संस्थेने आपल्या अहवालात ज्या शिफारशी केलेल्या आहेत त्याचा अभ्यास शासनाने करावा. साथी संस्थेतील डॉ. अनंत फडके, डॉ.श्रीजीत मिश्र, डॉ. रमेश दुग्गल, डॉ.लक्ष्मीनिंगम , डॉ. अमिता पित्रे , साथी संस्था अणि डॉ.पी . साईनाथ यांच्या बरोबर या अहवालातील शिफारशीच्या संदर्भात चर्चा करण्यात यावी त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत आणि माझ्या सारख्या काही सन्माननीय सदस्यांना देखील या चर्चेत सहभागी करुन घेतले पाहिजे. त्या संस्थेने अहवालात ज्या काही शिफारशी केलेल्या आहेत त्यास शिफारशीची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने काही ठोस कार्यक्रम आखले तर या अर्धातास चचेचे फलित झाले आहे असे म्हणता येईल. एवढे बोलून मी माझे भाषण संपविते. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विमल मुंदडा (सार्वजनिक आरोग्य मंत्री) सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी ग्रामीण वा शहरी विभागातील आरोग्याच्या संदर्भात दुर्बल घटकातील लोकांना चांगल्या सुविधा मिळाव्यात असा अत्यंत जिव्हाळयाच्या विषया बाबत अर्धा तास चर्चा उपस्थित केली आहे. त्या बद्दल मी त्यांना धन्यवाद देते . महिला सक्षमीकरण किंवा महिलांचे आरोग्य या संदर्भात सन्माननीय सदस्या सातत्याने येथे विषय मांडत असतात. योगायोगाने या विभागाच्या सचिव देखील महिला आहेत तसेच मी देखील महिला आहे. अशा प्रकारे या विभागामध्ये आम्ही दोघीही महिला असून महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने कोणत्या बाबीकडे लक्ष द्यावयाचे असते याची आम्हाला कल्पना आहे. त्या दृष्टीने अत्यंत जागरुकपणे आम्ही प्रयत्न करीत आसतो. माननीय राज्य मंत्री देखील आमच्या बरोबर आहेत. त्यांची सुध्दा आम्हाला नेहमीच साथ असते.

सभापती महोदय, आदिवासी भाग असो , ग्रामीण भाग असो वा शहरी भाग असो त्या ठिकाणी आरोग्याच्या सुविधा देण्यात आलेल्या आहेत. आपल्या राज्यामध्ये काही इनफ्रास्ट्रक्चरचे डेव्हलपमेन्ट झालेले आहे. साथी संस्था किंवा साईनाथ यांच्या अहवालाचा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केलेला आहे.त्या अहवालामध्ये करण्यात आलेला उल्लेख किंवा नॅशनल फॅमिली हेल्थ सर्व्हिसचा अहवाल किंवा अन्य अहवाल जर आपण पाहिला तर आपल्याला असे दिसून येईल की, इनफ्रास्ट्रक्चरच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य हे अग्रेसर आहे .देशामध्ये ज्या काही आरोग्याच्या सुविधा देण्यात येतात किंवा ज्या योजना राबविण्यात येतात त्यामध्ये महाराष्ट्र राज्य केरळ नंतर दुस-या क्रमांकावर आहे हे मी ठामपणे येथे सांगू इच्छिते. अर्भक मृत्यू दर पूर्वी 42 टक्के एवढा होता परंतु आता हा दर 36 टक्क्यापर्यंत कमी करण्यात आला आहे. देशामध्ये महाराष्ट्र राज्याचा दुसरा क्रमांक लागत आहे. केरळचा पहिला नंबर आहे आणि आपल्या राज्याचा दुसरा क्रमांक आहे ॲनिमियाच्या संदर्भात या ठिकाणी उल्लेख करण्यात आलेला आहे. देशामध्ये आपले पहिले राज्य असे आहे की , ज्या राज्याने डीवर्मीगचा कार्यक्रम एक मे पासून राबविण्यास सुरुवात केली आहे. दरवर्षी हा कार्यक्रम आपण राबवत असतो. त्याचप्रमाणे काही महिलांना ॲनिमिया होत असतो तेव्हा कमीत कमी महिलांना ॲनिमिया झाला पाहिजे यासाठी प्रत्येक ठिकाणी विविध पध्दतीने मेळावे घेतले असून ॲन्टी ॲनिमियाचा कार्यक्रम सगळीकडे राबविण्यात आला आहे त्यामुळे हे प्रमाण 20 टक्यापर्यन्त आपण कमी करु शकलो आहोत. राज्यात 60 टक्के महिलांमध्ये ॲनिमियाचे प्रमाण होते ते कमी करण्यामध्ये आपण निश्चितपणे यशस्वी ठरलो आहोत या ठिकाणी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विमल मुंदडा ....

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाचा उल्लेख करण्यात आला असून त्या संदर्भात मी आपल्याला सांगू इच्छिते की,आदिवासी भागात " आशा " नावाची योजना राबविण्याचे ठरविले होते त्यामध्ये 15 आदिवासी जिल्हयामध्ये 9 हजारा पैकी 7,564 व्यक्तींना आशा व्दारें प्रशिक्षण पहिल्या टप्यामध्ये देण्यात आले होते. त्याचबरोबर त्यांच्याकडे औषधाचे कीटस सुध्दा देण्यात आले असून गावा पातळीवर असलेल्या महिलांना व बालकांना त्यांनी या औषधोपचार दिला पाहिजे. आपल्याकडे प्राथमिक आरोग्य केन्द्रे, प्राथमिक आरोग्य उप केन्द्रे, ग्रामीण रुग्णालये आहेत. आपल्या राज्यामध्ये आज 1, 818 प्राथमिक आरोग्य केन्द्रे आहेत, 363 ग्रामीण रुग्णालये आहेत, 100 बेडस् आणि 50 बेडस आणि 30 बेडस् असलेली ग्रामीण रुग्णालये आहेत अशा प्रकारे आरोग्य सुविधा देण्याच्या बाबतीत स्ट्रक्चर आहे.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आणि प्राथमिक आरोग्य केंद्राचा आपण या संदर्भात विचार केला तर 30 हजार लोकसंख्येमागे एक प्रा.आ.केंद्र आपण दिलेले आहे आणि आदिवासी भागामध्ये 20 हजार लोकवस्तीमागे एक प्रा.आ.केंद्र आपण देतो. तेथेही आपल्या राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाच्या माध्यमातून पाहिले तर प्रा.आ.केंद्रापासून ते ग्रामीण भागातील जिल्हा रूग्णालय असेल वा ग्रामीण रूग्णालय असेल, सर्वत्र जिल्हा रूग्णालय समित्या या स्थापन केल्या गेल्या आहेत आणि ग्रामीण भागामध्ये रूग्णकल्याण समित्या स्थापन केल्या गेल्या आहेत. त्यामुळे आजचे आपले या क्षेत्रातील स्ट्रक्चर पाहिले, आरोग्य विभागाचे जाळे पाहिले तर आपल्याला दिसून येईल की, हे जाळे ग्राम पातळीपर्यंत पोहोचलेले आहे. ग्रामीण भागामध्ये देखील आज ग्राम आरोग्य समित्या स्थापन केल्या गेल्या आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी हे सारे एक्झिक्यूट करण्याचे काम करतात आणि जिल्हाधिकाऱ्यांचे देखील त्यावर नियंत्रण असते. तेव्हा राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाच्या माध्यमातून जे बजेट आपल्याला मिळते आहे त्याबाबत मी आपल्याला माहिती देऊ इच्छिते की, यामध्ये आपल्याला एकूण बजेट अलोकेशन 371 कोटीचे आहे त्यापैकी आपल्या राज्याला 478 कोटी मिळाले आहेत आणि त्यातून आपण ठरविले आहे की, आपल्याकडे जो काही कुटुंब कल्याणाचा कार्यक्रम राबविला जातो, ट्यूबेक्टॉमीचा कार्यक्रम राबविला जातो त्यामध्ये डिलिव्हरीसाठी येणाऱ्या महिला असतील वा ट्यूबेक्टॉमीसाठी येणाऱ्या महिला असतील, पुढील वर्षात म्हणजे 2008 आणि 2009 मध्ये त्यांची तेथे जेवणाची देखील व्यवस्था आपण करण्याचे ठरविले आहे. सभापती महोदय, कुपोषण आणि बालमृत्यूचे प्रमाण कमी करीत असताना, आरोग्य पोषण मिशनचेही काम चांगले करण्याचा आपण प्रयत्न केलेला आहे. तेथे बालविकास केंद्राचे जे आपले पाच प्रकल्प आहेत, त्यात पाच नवसंजीवनी प्रकल्प आहेत, अमरावती, ठाणे सारख्या भागामध्ये ते असतील तेथेही आपण प्रॉयॉरिटीवर बालविकास केंद्रे आपण चालविली आहेत. त्यामुळे तेथील कुपोषणाचे प्रमाण देखील आपण कमी करू शकलो आहोत. उपकेंद्राची बळकटी संबंधात मला विशेषत्वाने येथे सांगावेसे वाटते की, आम्ही मागील वर्षीपासून एक नवीन निर्णय घेतला आहे की, या क्षेत्रातील जो विभागीय असमतोल आहे तो अनुशेषही कमी केला पाहिजे. त्यासाठी आपल्या सबसेंटर्स पातळीवर की 11 हजार 892 खाटांचा जो अनुशेष आज आहे तो दूर करणे महत्त्वाचे होते. त्या दृष्टीने प्रत्येक सबसेंटरला एक डिलिव्हरी रूम आपण उपलब्ध करून देणार आहोत.

..... डी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. मुंदडा ....

कारण शेवटी सुरक्षित माता आणि सुरक्षित बालक ठेवावयाचे असेल आणि ती व तिचे बालक सुदृढ ठेवायचे असेल तर यामध्ये ज्या काही सुविधा आवश्यक आहेत त्या त्यांना तात्काळ उपलब्ध व्हाव्यात. त्यामध्ये तिचे बाळंतपण देखील सुरक्षित होण्याच्या दृष्टीकोनातून आम्ही सबसेंटरला एक डिलिव्हरी रूम आणि एक खाट अशा पद्धतीने सुविधा देण्याचा प्रयत्न करीत आहोत. त्यामुळेही बऱ्याच काही सुविधा तेथे मिळू शकत आहेत. तेव्हा पुढील वर्षभरामध्ये राज्यातील सर्व सबसेंटरच्या ठिकाणी एक डिलिव्हरी रूम आणि एक खाट उपलब्ध करून दिली जाईल. सभापती महोदय, यामध्ये सांगण्यासारखे, बोलण्यासारखे खूप काही आहे, पण मी अधिक न बोलता सांगू इच्छिते की, दुर्बल घटकांसाठी असलेली जीवनदायी योजना आपण राबवित आहोत आणि त्या योजनेतून किडणी, हार्ट ऑपरेशन आणि मज्जातंतूच्या संबंधातील कोणतेही ऑपरेशन असेल, मग ते ब्रेनचे ऑपरेशन असेल त्यांचाच अंतर्भाव या योजनेत पूर्वी होता आणि त्यासाठी 70 हजार रूपयांपर्यंतचीच पतमर्यादा होती, ती वाढवून दीड लाख रूपयांपर्यंत आपण केली आहे आणि त्यात कॅन्सर या रोगाचाही अंतर्भाव केला आहे. तसेच पूर्वी दीड लाख रूपयांपर्यंतची मंजुरी देण्याचे अधिकार हे केवळ संचालकांच्या स्तरावर होते आणि एक लाखापर्यंतची मंजुरी देण्याचे अधिकार उपसंचालक स्तरावर होते. पण आता आपण दुर्बल घटकांना तात्काळ न्याय मिळावा, त्यांच्या आजारावर तात्काळ उपचार व्हावेत, विनाविलंब त्यांना त्यासाठी पैसा उपलब्ध व्हावा म्हणून आपण जीवनदायी योजनेतून जिल्हा स्तरावर 1 ते दीड लाख रूपयांपर्यंतचा निधी सिव्हिल सर्जनच्या शिफारशीवरून तात्काळ उपलब्ध करून दिलेला आहे आणि दीड लाख रूपयांच्या मंजुरीचे अधिकार उपसंचालकांच्या पातळीवर दिलेले आहेत. सभापती महोदय, वृध्दापकाळाची काळजी घेण्याच्या दृष्टीने देखील आपण एचएलएलच्या माध्यमातून जीआरटी किट ... म्हणजे ज्यांना छोटे-मोठे आजार असतील, काही डिस्ॲबिलिटी असतील त्यांना एक व्यायाम असावा तसेच वृद्धापकाळातील जी एक मानसिकता असते की, ते स्वत:ला असुरक्षित समजत असतात, त्यांची काळजी आपण घेतली पाहिजे या दृष्टीने जीआरटी केअरचे केंद्र आपण 16 कोटी रूपये खर्च करून अंबाजोगाईमध्ये केलेले आहे. तेथील जे मेडिकल कॉलेज आहे त्याच परिसरामध्ये वृद्धापकाळातील लोकांची काळजी घेण्याच्या दृष्टीने एक केंद्र सुरू करताना तेथे एक भव्य अशी इमारत उभी करून

..... डी 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशा वृद्ध रूग्णांची व्यवस्था आपण करू शकतो आणि प्रत्येक जिल्ह्याला 10 बेडस् आपण मानसिक आरोग्य स्वास्थ्यासाठी म्हणून ठेवले आहेत, तेथे देखील अशा लोकांची व्यवस्था होऊ शकते. तसेच त्यांचे चेकअप वगैरे करायचे म्हटले तर प्रत्येक जिल्ह्याला आपण सिटी-स्कॅन मशीनदेखील उपलब्ध करून दिलेले आहे. मात्र या संदर्भात विषयतज्ज्ञांचा प्रश्न सातत्याने मांडला जातो. या संदर्भात मला येथे सत्य सांगितले पाहिजे की, विषय-तज्ज्ञांच्या सेवा या आपल्याला अपुऱ्या पडत आहेत हे नाकबूल करता येणार नाही. आपल्या प्रा.आ.केंद्रामध्ये एमबीबीएस डॉक्टर येण्याला थोडे उदासिन असतात पण ते तेथे आले पाहिजेत म्हणून त्यांना आपण खास बाब म्हणून एमपीएससीच्या परव्ह्यू मधून वगळण्याचा एक ऐतिहासिक निर्णय घेतला. ...

(यानंतर श्री.सरफरे ..... इ 1 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विमल मुंदडा...

आणि आपल्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडून त्यांची नेमणूक होईल अशाप्रकारचा निर्णय घेतला आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये एक एम.बी.बी.एस. आणि बी.ए.एम.एस. झालेले वैद्यकीय अधिकारी नेमण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचप्रमाणे विशेष तज्ज्ञांची रिक्त पदे भरण्याबाबत वैद्यकीय शिक्षण विभागाला सांगण्यात आले आहे. जे पोस्ट पेड डॉक्टर्स आहेत त्यांनी दोन वर्षे ग्रामीण भागामध्ये सेवा दिली पाहिजे याकरिता त्यांच्यावर सक्ती करण्यात येत आहे.. त्यांनी ग्रामीण भागामध्ये आपली सेवा देऊन सामाजिक बांधिलकी स्वीकारली पाहिजे. त्यामुळे संबंधित विभागाकडून पुढील वर्षीपर्यंत पोस्ट पेड डॉक्टर्स, विशेष तज्ज्ञ मिळतील अशी अपेक्षा आहे. सभापती महोदय, मराठवाडा विकास कार्यक्रमाखाली अनेक योजना घेण्यात आल्या आहेत.त्याबाबत अधिक सांगण्याची आवश्यकता नाही. महाराष्ट्रामध्ये 7 स्त्री रुग्णालये आहेत. विशेषत:: येणाऱ्या काळामध्ये विदर्भ आणि मराठवाडयामध्ये हयुमन डेव्हलपमेंट बेस चांगला झाला पाहिजे याकरिता विदर्भ आणि मराठवाडयाच्या प्रत्येक जिल्हयामध्ये स्त्री रुग्णालये उभारण्याचे शासनाने ठरविले आहे. त्या योजनेमध्ये मराठवाडयातील सर्व जिल्हे कव्हर करण्यात येणार आहेत. त्यामुळे वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे बी.ए.एम.एस. झालेल्या डॉक्टर्सची नेमणूक करुन भरण्यात आलेली आहेत. तसेच, प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी चांगल्या वैद्यकीय सुविधा देण्याचा प्रयत्न केला जात आहे. तसेच, 40 वर्षापुढील कॅन्सर झालेल्या स्त्रियांना हिस्टोपॅथॉलॉजीची सुविधा दिलेली आहे. त्या रुग्णांकरिता रेडिओ थेरपी, एन्डोस्कोपीचे युनिट सर्व जिल्हा रुग्णालयांमध्ये उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. सभापती महोदय, टेलिमेडिसीनकरिता आम्ही इस्त्रोबरोबर करार केला आहे. 22 जिल्हयांमध्ये 22 जिल्हा रुग्णालये आणि 22 उप जिल्हा रुग्णालयांच्या ठिकाणी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानामधून टेलिमेडिसीनची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे के.ई.एम. हॉस्पिटल असेल, जे.जे. हॉस्पिटल असेल अशाप्रकारचे हॉस्पिटल्स प्रत्येक जिल्हा रुग्णालयांशी जोडले जाणार आहेत. सभापती महोदय, आज आपल्याकडे आधुनिक यंत्रसामुग्री उपलब्ध आहे, परंतु मॅनपॉवरचा प्रश्न आहे. त्याकरिता राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान कार्यक्रमामार्फत हा प्रश्न सोडविण्यात येईल. त्यामुळे पुढील वर्षीपर्यंत राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानमार्फत निश्चितपणे आरोग्याची सेवा उच्च पातळीवरील आणि मजबूत झालेली आपल्याला दिसेल. त्याचप्रमाणे इंडियन पब्लिक एड स्टॅंडर्डमध्ये सुध्दा आपण 171 हॉस्पिटल्स घेतले आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ D/

डॉ. विमल मुंदडा...

त्यामुळे या सर्व आरोग्याच्या सुविधा आपण पाहिल्यातर कोणत्याही रुग्णांची आपल्या हॉस्पिटलमध्ये हेळसांड झाल्याचे किंवा दुर्लक्ष झाल्याचे आपल्याला दिसून येणार नाही.

सभापती महोदय, आज जवळपास 27 लाख बाह्य रुग्णांना तपासले गेले आहे. तसेच, 6 लाख इन पेशंट्सवर उपचार करण्यात आले आहेत. शहरी आणि ग्रामीण भागामध्ये 90 टक्के महिलांची डिलिव्हरी होते. तसेच, 65 हजार मोठया सर्जरी आणि 85 हजार लहान सर्जरी संपूर्ण महाराष्ट्रामध्ये केल्या जातात. सभापती महोदय, जननी सुरक्षा योजनेबाबत सांगावयाचे झालेतर इंस्टिटयुशनल डिलिव्हरी वाढविण्याकरिता या योजनेचा लाभ सर्वांना देण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचप्रमाणे प्रत्येक जिल्हा स्तरावर, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या स्तरावर सल्लागार समित्या नेमण्यात येणार आहेत. तेव्हा माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांचे माझ्या उत्तराने समाधान झाले असेल असे गृहीत धरुन मी माझे भाषण संपविते.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये स्वच्छतागृहे नाहीत. त्यासाठी शासनाने कोणती उपाय योजना केली आहे?

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, ज्याठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र आहे त्याठिकाणी स्वच्छतागृह उपलब्ध करण्यात आले आहे.त्याचबरोबर सब सेंटरला एक डिलिव्हरी रुम देण्यात येत असून त्याठिकाणी देखील स्वच्छतागृह बांधण्यात येत आहेत.

उपसभापती : माननीय सदस्यांनी अर्धा तास चर्चेच्या सूचनेवर विचार व्यक्त करतांना ते मुद्देसूद स्वरुपामध्ये व्यक्त करावेत. तसेच, मंत्रिमहोदयांनी देखील मुद्देसूद स्वरुपामध्ये उत्तर द्यावे अशी माझी सर्वांना विनंती आहे. आता माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी आपली अर्धा तास चर्चा उपस्थित करावी.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आपण दिलेल्या आदेशाचे आम्ही पालन करणार आहोत. परंतु एकाच दिवशी 13 अर्धा तास चर्चेच्या सूचना कार्यक्रम पत्रिकेवर दाखवणे हा आमचा दोष नाही. या सूचनांच्यावेळी अनेक मंत्री सभागृहामध्ये उपस्थित नसतात.त्यामुळे सदरची अर्धा तास चर्चा पुढे ढकलण्याबाबत विनंती केली जाते.

उपसभापती : अशाप्रकारे दोषारोप होता कामा नये. आजची पहिली अर्धा तास चर्चेची सूचना पुकारण्यात आली ती यापूर्वी तीन वेळा घेण्यात आली होती. त्या तिन्ही वेळेला मंत्रिमहोदय सभागृहात उपस्थित होते. ----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ D/

पृ.शी.: गोरेगाव येथील फिल्मसिटीची जमीन मुक्ता आर्टच्या प्रकल्पाकरिता देणे

मु.शी.: गोरेगाव येथील फिल्मसिटीची जमीन मुक्ता आर्टच्या प्रकल्पाकरिता देणे यासंबंधी श्री. मधुकर चव्हाण,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो .

"गोरेगाव येथील फिल्मसिटी या शासकीय उपक्रमाच्या जमिनीपैकी काही जमिनी मुक्ता आर्टच्या व्हीसलींग वुड्स या प्रकल्पाकरिता देणे, दुग्धविकास मंडळांच्या मालकीचे जमिनीचे सांस्कृतिक विकास मंडळाकडे हस्तांतरण केलेले नसतांनाही या मंडळाने जमीन परस्पर मुक्ता आर्टच्या नावावर हस्तांतरीत करणे, मुक्ता आर्टने या जमिनीपैकी काही जमीन व्ही.डी.इलेक्ट्रॉनिक्सला देणे,सदर जमिनीवर बेकायदेशीर बांधकाम करणे".

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : याठिकाणी पहिल्या क्रमांकावर जी अर्धा तास चर्चा दाखविण्यात आलेली आहे. ती मी पुकारली आणि ही सूचना आतापर्यंत सदनामध्ये तीन वेळा पुकारण्यात आली आहे आणि तीनही वेळेला माननीय मंत्री महोदय उपस्थित होते. परंतु सन्माननीय सदस्य उपस्थित नव्हते. तेव्हा आपण एकाच नाण्याच्या दोन बाजू आहोत. अशा वेळी कोणी कोणाला बोलावयाचे ? असा प्रश्न आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, याठिकाणी मी श्री.सुभाष घई यांच्या मुक्ता आर्टच्या व्हीसलींग वुड्स या प्रकल्पाबाबत अर्धा तास चर्चा उपस्थित करीत आहे. गेल्या वर्षभरापासून श्री.सुभाष घई आणि त्यांच्या मुक्ता आर्टच्या व्हीसलींग वुडस् यावर प्रेमाचा वर्षाव होत आहे. माननीय मंत्री महोदय, मी आपल्याला व्यक्तीगतरित्या काही बोलत नाही. कारण गेल्या चार वर्षामध्ये या सदनामध्ये कधीही आपल्यावर दोषारोप झाल्याचे मी ऐकलेले नाहीत. याचा अर्थ असा नाही की, आपण याठिकाणी कोणाला वाचविण्याचा प्रयत्न केला असेही मला म्हणावयाचे नाही. पण आता मला असे म्हणावेसे वाटते की, शासन, मी व्यक्तिगतरित्या बोलत नाही. पण आपण श्री.सुभाष घई यांना वाचविण्याचा प्रयत्न करीत असून त्यातून शासनाचे नुकसान करीत आहे. काल येथे सदनामध्ये बोलताना सांगण्यात आले की, तुम्ही मुंबई लुटली आहे. पण सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून सांगू इच्छितो की, तुम्ही मुंबई कशी लुटलेली आहे? तुम्ही गेल्या अनेक वर्षामध्ये मराठी चित्रपट सृष्टीला काही दिले नाही. गेल्या वर्षी एप्रिलमध्ये झालेल्या अर्थसंकल्पिय अधिवेशनाच्या वेळी गोरेगाव येथील फिल्मसिटीच्या बाबतीत सूचना मांडण्यात आली होती. त्यामध्ये असे म्हटलेले होते की, "गोरेगाव येथील फिल्मसिटीतील सरकारी उपक्रमाच्या 514 एकर जमिनीपैकी 22 एकर जमीन मुक्ता आर्टस्ला देण्यात आली. जॉईंट व्हेंचर करण्यात आले. जॉईंट व्हेंचरमध्ये असे ठरले की, त्याठिकाणी 20 कोटी रुपये लागतील. 20 एकर जमीन आहे आणि 20 कोटी रुपयापैकी 3 कोटी रुपये शासनाने द्यावयाचे आणि 17 कोटी रुपये मुक्ता आर्टस्ने द्यावयाचे. मुळामध्ये ही जमीन दुग्धविकास विभागाची आहे आणि ती फिल्मसिटीकडे किंवा सांस्कृतिक खात्या कडे वर्ग झालेली नाही. त्यामुळे तुम्हाला ती जमीन अशा प्रकारे देण्याचा अधिकारही नाही. मुळामध्ये हा जो व्यवहार झालेला आहे, हे ॲग्रीमेंट आहे, त्यामध्ये तुम्ही या विषयाच्या बाबतीत मंत्रिमंडळासमोर गेल्याचे कुठेही दिसून येत नाही की, मुक्ता आर्टस्ला ही जमीन देण्यासाठी असा-असा करार केला पाहिजे.

. . . .एफ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण . . . .

दुसरी गोष्ट म्हणजे या ॲग्रीमेंटमध्ये हे जॉईंट व्हेंचर किती वर्षासाठी आहे ? 20 वर्षासाठी आहे, 30 वर्षासाठी आहे, 40 वर्षासाठी आहे की 50 वर्षासाठी आहे ? याबाबतीत काहीही उल्लेख करण्यात आलेला नाही. तिसरी गोष्ट म्हणजे या माध्यमातून गेल्या दोन-तीन वर्षामध्ये तुम्हाला कवडीचा, एक रुपयाचा देखील फायदा झालेला नाही. याठिकाणी मुक्ता आर्टस्ला दिलेली जी जमीन आहे, त्याबाबतीत कॅगने 2003 मध्ये तुमच्यावर ताशेरे मारलेले आहेत. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "फिल्मसिटी ही शासनाच्या दुग्धविकास विभागाच्या मालकीची असून, या जमिनीचे हस्तांतरण आजपर्यंत चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास मंडळाकडे झालेले नसतानाही महामंडळाने मुक्ता आर्टस् या संस्थेला जमीन हस्तांतरीत करण्याचा बेकायदेशीर, नियमबाहय व्यवहार केलेला आहे." सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आज या जमिनीची किंमत बाजारभावाप्रमाणे 60 ते 70 कोटी रुपये आहे. तुम्ही 3 कोटी रुपये सुभाष घईंना, मुक्ता आर्टस्ला द्यावयास हवे होते. पण श्री.गोविंद स्वरुप यांनी काय चलाखी केली ? हा एवढा भ्रष्ट अधिकारी आहे की, तुम्ही याला तीन दिवस जेलमध्ये पाठविले. पण खरे म्हणजे या अधिकाऱ्याला खडी फोडण्यासाठी पाठवावयास हवे होते. या व्यक्तिने सांस्कृतिक खात्यामध्ये राहून महाराष्ट्र शासनाला जेवढे लुटण्याचे उद्योग केले, तेवढे कोणीही केले नव्हते. पण या माणसाने एवढे उद्योग केले की, त्याबद्दल त्याला बेडया घालून त्याची धिंड काढावयास हवी होती. मी दोन-तीन चित्रपटांचा निर्माता होतो. पण या माणसाने आपल्या पत्नीच्या नावाने नाटकी आणि काल्पनिक कंपन्या निर्माण करुन शासनाचे सगळे पैसे लाटलेले आहेत.

उपसभापती : सन्माननीय सदस्यांचे नेमके दु:ख काय आहे ?

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझे नेमके दु:ख असे आहे की, त्यांनी लुटारुंच्या पाठिमागे उभे राहून वर्षभर या भ्रष्टाचारी माणसाला अभय दिले आणि आमच्यावर आरोप करतात की, आम्ही मुंबई लुटली आहे. मी येथे मुद्दाम सांगू इच्छितो की, आपण तीन कोटी रुपये द्यावयास हवे होते. पण तुम्ही काय केले ? तुम्ही तीन कोटी रुपये दिले नाहीत तर 20 एकर जमीन त्यांना दिली. ज्याची किंमत कॅगनुसार, शासनाच्या धोरणानुसार, शासनाने दिलेल्या लिखित उत्तरानुसार 28 कोटी 30 लाख रुपये आहे. पण तुम्ही 3 कोटी रुपये देण्याऐवजी 28 कोटी 30 लाख रुपयांची जमीन त्यांना का दिली ? बाजारभावाप्रमाणे ती जमीन का दिली नाही ? सभापती महोदय, ...

. . . .एफ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण . . . .

श्री.सुभाष घई हा शासनाचा जावई आहे काय ? केवळ तुम्ही श्री.गोविंद स्वरुप यांना जेलमध्ये पाठविता कामा नये. तर तुम्ही या सर्व व्यवहारांची चौकशी केली पाहिजे. येथे अनेक वेळा उत्तरे दिली जातात की, सी.आय.डी.मार्फत चौकशी करु. त्याबाबतीत देखील मी बोलणार आहे. सभागृहामध्ये दोन-दोन, तीन-तीन वेळा चौकशीच्या बाबतीत आश्वासन दिल्यानंतरही त्याला वाटाण्याच्या अक्षता लावल्या जातात. जेव्हा विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य एखादा प्रश्न विचारतात, तेव्हा ते व्यक्तिगत स्वार्थाने प्रेरित होऊन कोणताही प्रश्न विचारत नाहीत किंवा येथे एखादा प्रश्न विचारावा आणि बाहेर आपल्या व्यक्तिगत जीवनामध्ये संबंधितांशी व्यवहार करावेत, बाहेर जाऊन भ्रष्टाचार करावा, बाहेर जाऊन माती खावी म्हणून आम्ही येथे प्रश्न विचारीत नाही. ज्याप्रमाणे तुम्ही शासन चालवताना काही निर्णय घेत असता, त्याबाबतीत कधी आम्हाला असे वाटते की, यामध्ये भ्रष्टाचार झालेला आहे. या प्रकरणाच्या बाबतीत सांगावयाचे तर श्री.सुभाष घई यांनी तुम्हाला चार आणे देखील दिलेले नाहीत. या प्रकल्पाच्या माध्यमातून शासनाला एका पैशाचाही फायदा झालेला नाही.

यानंतर कु.गायकवाड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ...

माननिय सांस्कृतिक कार्य मंत्री , श्री. अशोक चव्हाण यांनी उत्तरात असे म्हटले आहे की," 2002 वर्षाचे भारताचे महालेखापरीक्षक यांच्या वाणिज्यिक अहवालात सदरहू जमिनीचे कमी मूल्यांकन खाजगी संस्थेला अदेय फायदा, अशा प्रकारचा आक्षेप घेण्यात आला आहे. या आक्षेपाला अनुसरुन पुढील कार्यवाहीकरिता महामंडळाने सविस्तर अहवाल सादर केलेला आहे." कशाला हा अहवाल तयार करण्यात आलेला आहे ? हा अहवाल तयार करुन काय साधणार आहे ? 28 एप्रिल 2007 रोजी झालेल्या बैठकीचे मिनिट्स देखील माझ्याकडे आहेत. त्यावेळी यासंबंधी चौकशी करु असे सांगण्यात आले होते. माननीय मंत्री महोदयांनी 13/4/ 2007 रोजी तसे उत्तर दिलेले आहे. ज्यावेळी मुक्ता आर्टसचे जॉइंट व्हेंचर झाले त्यावेळी त्या जमिनीची किंमत इक्वीटी समजण्यात यावी असा पहिला मुद्दा आहे. दुसरा मुद्दा असा आहे की, या जमिनीची किंमत जास्त असून इक्वीटी 3 कोटी रुपयांची नाही. महालेखाकारांनी देखील या संबंधी आक्षेप घेतला आहे. जमिनीची किंमत 3 कोटी रुपयांपेक्षा अधिक आहे असा आक्षेप घेण्यात आला आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. प्रकरण न्यायप्रविष्ट आहे एवढे सांगून हा विषय संपला काय ? जॉइंट व्हेंचर 15 टक्के होते. 30 कोटी रुपयांचे जॉइंट व्हेंचर आहे. त्यामुळे 85 टक्के रक्कम मुक्ता आर्टसने द्यावयाला पाहिजे होती. 15 टक्के च्या हिशोबाने ही रक्कम 20 कोटी रुपये एवढीच होते काय ? ही किंमत 20 कोटी रुपये होत नाही. त्यामुळे माझे असे म्हणणे आहे की, याच्या मध्ये आणखी कोण कोण गुंतलेले आहेत हे पाहणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, शेवटचा एक मुद्दा मी येथे मांडू इच्छितो. माननिय मंत्री महोदयांनी एक उत्तर असे दिलेले आहे की, "याबाबत निर्णय नव्याने घेण्यासंबंधी कार्यवाही सुरु झालेली आहे. परंतु ते प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे प्रकरण नव्याने रिकास्ट करावे लागणार आहे. "जमिनीची किंमत 30 कोटी रुपये असेल तर त्या अनुषंगाने शासनाची इक्वीटी असली पाहिजे. मी असे विचारु इच्छितो की, आपल्या अधिकाऱ्यांनी काय दिवे लावले आहेत ? महालेखाकारांचे आक्षेप पाहता 30 कोटी रुपये गृहीत धरुन या जमिनीची कॉस्ट वाढवावयास पाहिजे होती. परंतु या संबंधी शासन कोणताही निर्णय घेऊ शकत नाही,कारण हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. माननीय मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तरात पुढे असे म्हटले आहे की, " महालेखाकारांनी जे आक्षेप घेतलेले आहेत ते मी आपणास वाचून दाखवितो सिलेक्शन प्रोसेसमध्ये अन्य निविदा मागविण्यात आल्या नव्हत्या. त्यांची

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ...

एक इंच जमीन देखील " At the sweet will of government and At the stroke of pen " देऊ शकत नाहीत. बोटाच्या टोकाएवढी देखील जमीन देता येऊ शकत नाही. जमीन द्यावयाची असेल तर त्याकरिता लिलाव करावा लागतो, टेंडर मागवावे लागते, कोटेशन काढावे लागते. नियमाप्रमाणे आपल्याला सर्व कार्यवाही करावी लागणार आहे. मग नियमाचे पालन न करता श्री. सुभाष घई यांना जमीन का देण्यात आली आहे ? शासनाने एका तरी मराठी निर्मात्याला जमीन दिलेली आहे काय ? मानीनय मंत्री महोदयांनी असे म्हटले आहे की " त्यावेळी निविदा मागविण्यात आल्या नव्हत्या. त्यामुळे त्यावेळी जे घडले आहे ते कोणतेही प्रोसिजर फॉलो न करता करण्यात आलेले आहे. आता तेथील सर्व काम पूर्ण झालेले आहे. " मी आपणास विचारु इच्छितो की, प्रकरण न्याय प्रविष्ट आहे असे आम्हाला सांगितले जाते मग श्री. सुभाष घई यांच्या मुक्ता आर्टस यांना काम पूर्ण करण्याकरिता जमीन का दिली गेली ? येथे उत्तर देताना मात्र आम्हाला न्यायप्रविष्ट प्रकरण आहे असे सांगितले जाते. परंतु काम करायला जमीन देताना ते प्रकरण न्यायप्रविष्ट होत नाही काय ? याकरिता 56 कोटी रुपये खर्च झालेले आहेत. ॲक्टींग, सिनेमॅटोग्राफी,डायरेक्शन, फील्म अँड टेलिव्हिजन इन्स्टिटयूट आदी काम तेथे सुरु झालेले आहे. सध्या तेथे 120 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यांची फी कोण घेत आहे ? श्री. सुभाष घई हे तेथील विद्यार्थ्यांकडून फीची रक्कम घेत आहेत. शासनाला या मधून चार आणे देखील उत्पन्न मिळालेले नाहीत. हा सगळा पैसा श्री. सुभाष घईंच्या तिजोरीत जात आहे. खरे तर या सर्व मुद्यांची येथे पुनरावृत्ती करुन मी सभागृहाचा वेळ धेऊ इच्छित नाही. मुक्ता आर्टसमध्ये गैरव्यवहार झालेला आहे. मग न्यायप्रविष्ट प्रकरणामध्ये ही केस शासनाने मेंशन का केली नाही ? भ्रष्टाचाराची प्रकरणे मेंशन का केली नाहीत ? जो तळे राखील तो पाणी चाखेल हे खरे आहे. परंतु तळे राखणारा सर्वच तळे चाखत असेल तर कसे काय होईल ? एवढा बेशरमपणा तरी माणसाने करु नये. गेल्या वर्षभरापासून ही केस कोर्टामध्ये आहे. या केसमध्ये असणाऱ्यांपैकी केवळ श्री.गोविंद स्वरुपांनाच घरी पाठविले गेले आहे. या गैर व्यवहारामुळे शासनाचे जे नुकसान झालेले आहे त्याचे काय होणार आहे ? मुख्य सचिवांनी बाजार भावाप्रमाणे वसुली केली नाही. तशी वसुली करता येत नसेल तर बांधकामासकट ती जमीन शासन परत घेणार आहे काय ? तसेच या प्रकरणात आणखी काही लोक गुंतलेले आहेत त्यांची देखील चौकशी करण्यात येणार आहे काय ?

यानंतर श्री. बरवड..

अशोधित प्रत / शीघ्रलिपी नाही

श्री. अशोक चव्हाण (सांस्कृतिक कार्य मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी व्हीसलींग वूड्सच्या बाबतीत या ठिकाणी काही मुद्दे या अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून उपस्थित केले आहेत. या विषयावर या सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चा झाली आणि दरवेळी या प्रकरणाची जी सद्य:स्थिती आहे ती नेहमी उत्तराच्या माध्यमातून सभागृहासमोर ठेवलेली आहे. या ठिकाणी व्हीसलींग वूड्सला 20 एकर जमीन देण्यात आली होती ही वस्तुस्थिती आहे. म्हणजे हे जॉइन्ट व्हेंचर ॲग्रीमेंट आहे. त्यांना जमीन प्रदान करण्यात आली नव्हती. हे जॉईन्ट व्हेंचर ॲग्रीमेंट आहे. व्हीसलींग वूड्स कंपनी फॉर्म झाली त्या कंपनीला ही जमीन जॉइन्ट व्हेंचरच्या माध्यमातून देण्यात आली. शासन म्हणजे फिल्मसिटी आणि मुक्ता आर्टस् असे जॉइन्ट व्हेंचर होते आणि जॉइन्ट व्हेंचरचे ॲग्रीमेंट 24.10.2000 ला करण्यात आले. मला हे स्पष्ट केले पाहिजे की, ही जमीन दुग्धविकास विभागाची नाही. सुरुवातीला ती होती परंतु शासनाने वेळोवेळी जे आदेश काढले त्याच्या तारखा माझ्याकडे आहेत, त्या आदेशाप्रमाणे ती जमीन दुग्धविकास विभागाने महसूल विभागाकडे हस्तांतरित केली आणि महसूल विभागाने ती जमीन सांस्कृतिक कार्य विभागाकडे जमा केलेली आहे. त्यामुळे ही जमीन दुग्धविकास विभागाची नसून सांस्कृतिक कार्य विभागाची आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी ज्या मुद्यावर भाष्य केले त्यामध्ये एक तर त्यांनी सुरुवातीला मराठी सिनेमाच्या बाबतीत उल्लेख केला. मराठी सिनेमाला आपण आतापर्यंत काय दिले असे सन्माननीय सदस्यांनी विचारले. मराठी सिनेमाच्या निर्मितीसाठी शासन सुरुवातीला 15 लाख रुपये अनुदान देत होते ते अनुदान आता 15 लाख रुपयांवरुन 30 लाख रुपये करण्यात आलेले आहे. मराठी चित्रपट निर्मितीसाठी मुंबईमध्ये जर चित्रपट काढावयाचा असेल तर याच दादासाहेब फाळके चित्रनगरीमध्ये फक्त 25 टक्के रक्कम म्हणजे इतरांना 100 रुपये लागत असतील तर यांना 25 रुपये आकारुन त्या ठिकाणी शुटींग करण्यासाठी परवानगी दिली जाते. श्री. सुभाष घई यांच्यावर कोणत्याही प्रकारची मेहरबानी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. मला हे नमूद केले पाहिजे की, श्री. सुभाष घई यांना त्यावेळी इतर निर्मात्यांप्रमाणे या फिल्मसिटीमध्ये ज्या सुविधा पाहिजेत, ज्या सोयी पाहिजेत, ज्या पायाभूत सुविधा निर्माण केल्या पाहिजेत यासाठी भारतातील उत्तम निर्मात्यांनी स्वत:ची गुंतवणूक करावी म्हणून त्या ठिकाणी मेमोरंडम ऑफ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण .....

अंडरस्टँडींग म्हणजे एमओयू यापूर्वी करण्यात आला होता आणि त्या एमओयूच्या अनुषंगाने शासन, फिल्मसिटी आणि मुक्ता आर्टस् अशी संयुक्त भागिदारीची कंपनी स्थापन करण्यात आली. 85 टक्के भागभांडवल या कंपनीचे असावे आणि 15 टक्के हिस्सा राज्य शासनाचा असे जॉइन्ट व्हेंचर ॲग्रीमेंट त्यावेळी करण्यात आले. मुद्दा असा आहे की, सी.ए.जी.ने जे आक्षेप नोंदविले आहेत ती वस्तुस्थिती आहे. सी.ए.जी.च्या म्हणण्यानुसार जमिनीची किंमत जी 3 कोटी रुपये दाखविण्यात आली आहे ती चुकीची आहे आणि वास्तविक त्या जमिनीची किंमत 32 कोटी रुपये असल्याचा निष्कर्ष त्यावेळी सी.ए.जी.ने काढला. ते त्यावेळी सभागृहात सांगितले होते आणि आजही आपण ते नाकारत नाही. हे सर्व प्रकरण त्यावेळी सी.ए.जी.ने तपासणीमध्ये घेतले. श्री. गोविंद स्वरुप यांचे प्रकरण आणि हे प्रकरण ही दोन्ही प्रकरणे वेगळी आहेत. श्री. गोविंद स्वरुप यांच्या बाबतीत अनेक गोष्टींचा उल्लेख झाला. त्याबाबत चौकशी झाली. ॲन्टी करप्शन ब्युरोने चौकशी केली. त्या चौकशीच्या अनुषंगाने त्यांना अटक करण्यात आली. त्यांना अटक केल्यानंतर ते बेलवर सुटले आहेत. ते प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. श्री. गोविंद स्वरुप यांना शासनाने कोणतेही संरक्षण देण्याचे काम, पाठीशी घालण्याचे काम केलेले नाही. त्यांना अटक करण्याची शासनाने परवानगी दिली. ते आय.ए.एस. अधिकारी असल्यामुळे सामान्य प्रशासन विभागाची परवानगी घेऊन त्यांना अटक करण्यासंबंधीचा निर्णय त्यावेळी झाला. त्यांना अटक करण्यात आली. ते कोर्टात गेले. कोर्टाने त्यांना बेल दिली त्यामुळे ते बेलवर आहेत. त्यांचे प्रकरण अद्यापही न्यायप्रविष्ट आहे. तेथील श्री. शुक्ला नावाचे अकाऊंटंट आहेत त्यांना नोकरीतून काढून टाकण्यात आले. त्यांनाही अटक करण्यात आली होती. ते बेलवर आहेत. तेही प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. अशा सगळ्या प्रकरणाची डिटेल चौकशी झालेली आहे. यामध्ये कोणालाही पाठीशी घालण्याचे काम शासनाने केलेले नाही. दुसरा विषय असा मांडण्यात आला की, श्री. सुभाष घई यांच्याकडून काहीही रक्कम प्राप्त झालेली नाही. ही वस्तुस्थिती आहे. हे खरे असले तरी हे सर्व प्रकरण न्यायालयामध्ये होते. न्यायालयाने सांगितले होते की, जोपर्यंत या प्रकरणाचा अंतिम निर्णय होत नाही तोपर्यंत कोणताही थर्ड पार्टी इंट्रेस्ट क्रिएट करु नका. जर थर्ड पार्टी इंट्रेस्ट क्रिएट करावयाचे नाही तर मग त्यांच्याकडून पैसे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

श्री. अशोक चव्हाण ....

घेणे म्हणजे ते क्रिएट करणे होईल की काय अशा प्रकारचे अनेक विषय समोर आहे. हे जॉइन्ट व्हेचर ॲग्रीमेंट आहे. आणि या जॉइन्ट व्हेंचरच्या प्रक्रियेलाच सी.ए.जी.ने आक्षेप घेतलेला आहे. जॉइन्ट व्हेंचर ठेवावे किंवा ते लीजमध्ये कन्व्हर्ट करुन शासनाकडे पैसे आले पाहिजे, शासनाचे त्यामध्ये नुकसान होऊ नये हा दुसरा भाग झाला. हे सर्व प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे त्यातून ॲडव्होकेट जनरलचा कायदेशीर सल्ला घेण्यात आला. तो जो कायदेशीर सल्ला प्राप्त झालेला आहे त्यामध्ये त्यांनी असा सल्ला दिलेला आहे की,

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण.....

"सध्या अस्तित्वात असलेल्या जॉईंट व्हेंचर ॲग्रीमेंटबाबत योग्य ती कायदेशीर कारवाई करुन रद्द करावे असे म्हटले आहे." त्यामुळे तो करारनामा रद्द करावा लागेल. नवा संभाव्य करारनामा न्यायप्रविष्ट असलेल्या प्रकरणांच्या अंतिम निकालाच्या अधीन राहून करावा असे त्यांनी अहवालात म्हटले आहे. परंतु अद्याप हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. न्यायालयात जो काही निर्णय होईल तो होईल. पण अहवालानुसार जुना करारनामा रद्द करावयाचा का किंवा तो लिजवर कनर्व्हट करावयाचा का ? तेथे बांधकाम झाल्यामुळे त्याबाबत निर्णय तर घ्यावाच लागेल. यासंबंधी ॲडव्होकेट जनरल यांच्याकडून दिनांक 18.2.2008 रोजी अभिप्राय आलेला आहे. प्रश्न असा विचारला आहे की, त्यांना त्या जागेवर बांधकाम का करु दिले ? मुक्ता आर्टस्‌बरोबर जॉईंट व्हेंचर झाल्यानंतर मुंबई महानगरपालिकेने दिनांक 6.5.2002 मध्ये आयओडी दिलेली आहे. त्यानंतर बांधकामास सुरुवात झाली. मुंबई महानगरपालिकेने दिनांक 18.7.2007 रोजी ओसी दिलेली आहे. त्यामुळे कोणाला सीसी द्यावयाची, आयओडी द्यावयाची, ओसी कधी द्यावयाची हया सर्व बाबी शासनाच्या अखत्यारितीमध्ये नाहीत, मुंबई महानगरपालिकेच्या संमतीने ओ.सी.दिलेली आहे. मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून सर्व रितसर कार्यवाही झालेली आहे. त्यामुळें कोणालाही संरक्षण देण्याचा प्रश्न येत नाही. त्यांची चूक आहे असे मी म्हणणार नाही, परंतु संपूर्ण प्रकरण चुकीच्या पध्दतीने हाताळले गेले असे मी म्हणेन. श्री.गोविंद स्वरुप यांचे काय व्हावयचे असेल ते होईल. देशामध्ये नामांकित निर्माते आहेत, निर्देशक आहेत. त्यांना हॅरॅसमेंट करु लागलो तर महाराष्ट्रामध्ये कोणतीही गुंतवणूक येणार नाही. महाराष्ट्रामधील किंबहूना, देशातील उत्कृष्ट फिल्म सिटीसाठी असली पाहिजे, तेथे पायाभूत सुविधा निर्माण करता आल्या पाहिजेत, अशी शासनाची भूमिका आहे. पण शासनाला बजेटची मर्यादा असल्यामुळे या सर्व बाबी खाजगीकरणातून कराव्या लागतील. गेल्या 4 वर्षामध्ये त्या फिल्म सिटीची सर्व प्रकरणे बाजूला काढले तर तेथे उत्कृष्ट काम झालेले आहे, त्याठिकाणी चांगल्या दर्जाचे शुटींग होत आहे, त्यांची संख्या वाढलेली आहे, मराठी चित्रपटांना तेथे सवलत दिली जात आहे असे दिसून येते. तेथे कोणत्याही प्रकारची भानगड होणार नाही याबाबत दक्षत घेऊन तेथे काम सुरु आहे. परंतु प्रत्येकाच्या पाठीमागे शुक्लकाष्ठ लावले तर महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यास कोणीही येणार नाही.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण....

श्री.सुभाष घईंची पाठराखण करण्याचे काही कारण नाही. राज्यामध्ये होत असलेल्या गुंतवणूकीमध्ये पारदर्शकता असावी, ती पारदर्शकता सर्वांसमोर आली पाहिजे, वस्तुस्थिती काय आहे ती कळली पाहिजे. सभागृहाच्या माध्यमातून चुकीच्या गोष्टीबाबत शासनाने केलेली कार्यवाही जनतेला समजली पाहिजे. चार्जशीट दाखल केल्यानंतर ही प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत. त्या प्रकरणासंबंधी निर्णय लागल्यावर जी काही कार्यवाही करावयाची आहे, ती शासन करु शकते. पण झालेल्या प्रकरणासंबंधी एसीबीने रिपोर्ट सादर केल्यावर न्यायालयाचा निर्णय अपेक्षित आहे. न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे शासन निश्चितपणे पुढील कारवाई करील. पण प्रत्येक प्रकरणामध्ये काही तरी आहे, अशी भूमिका घेतली तर राज्यात कोणतीही गुंतवणूक येणार नाही. सध्या जे फिल्म स्टुडिओ आहेत ते चांगल्याप्रकारे चालले पाहिजेत. ॲडव्होकेट जनरलचा अहवाल प्राप्त झाला आहे त्यानुसार लिज ॲग्रीमेंट करावयाचे की मागील ॲग्रीमेंट रद्द करायचे ? ही बाब संचालक मंडळासमोर ठेवण्यात येऊन पुढील निर्णय घेण्यात येईल.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आपल्या हेतूबद्दल शंका घेत नाही. मी गुंतवणुकीबद्दल बोललो नाही. राज्यात उद्योग वाढवेत म्हणून शासनाला लोकांना आणावयाचे आहे. मग टेंडर का मागविले नाही ? एकाच माणसाला का बोलविले ? हे घे तुला असे त्याला सांगण्यात आले आहे. हे वाण्याचे दुकान नाही, चार आणे दिले की पुडी बांधून खिशात घातली. शासनाने दिनांक 13 एप्रिल रोजी म्हटले आहे त्यानुसार त्यांच्याकडून उर्वरित पैसे का घेतले नाही ? बाजारभावाप्रमाणे त्यांच्याकडून 3 कोटी ऐवजी 27 कोटी रुपयांचे येणे आहे ते घेणार काय ? कारण ही कंपनी फायद्यामध्ये चालली आहे, त्यामुळे शासनाच्या जमिनीची किंमत त्यांच्याकडून घ्यावी.

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, मुक्ता आर्टस्ने या प्रकल्पामध्ये दिनांक 24 मार्च, 2008 पर्यंत 70 कोटींची गुंतवणूक केलेली आहे. त्यांना जमीन देत असताना त्यात पारदर्शकता ठेवावयास पाहिजे होती. त्या कंपनीबरोबर एमओयूच्या माध्यमातून शासनाने जॉईंट व्हेंचर ॲग्रीमेंट केलेले आहे. शासनाच्या जमिनीवर त्यांनी गुंतवणूक केली आहे. माननीय सदस्यांना मी आठवण करुन देऊ इच्छितो, युतीच्या काळामध्ये शासनाच्या जमिनी प्रदान करण्यात आल्या होत्या, त्याची यादी आपण तपासून घ्यावी.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांच्या उत्तरामुळे माझे समाधान झालेले नाही. मी त्यांना त्यांच्या दालनामध्ये भेटतो.

नंतर श्री.शिगम

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने तीन हजार अनधिकृत रहिवाशांची प्राधिकरणाला सादर केलेली यादी

मु. शी. : इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने तीन हजार अनधिकृत रहिवाशांची प्राधिकरणाला सादर केलेली यादी यासंबंधी श्री. मधुकर चव्हाण, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने सुमारे तीन हजार अनधिकृत रहिवाशांची एक यादी प्राधिकरणाला सादर केलेली असणे, परंतु सदर यादी गहाळ होणे, मुंबइतील सायन येथील प्रतिक्षा नगरातील म्हाडाच्या इमारतीमधील सुमारे 189 गाळे दलालांनी म्हाडाच्या अधिका-यांच्या संगनमताने दीड ते चार लाखांना विकल्याचा अहवाल म्हाडाच्या दक्षता विभागाने पाच महिन्यापूर्वी प्राधिकरणाला देणे, काही रहिवाशी अनधिकृतपणे दलालांना तीन हजार रुपये प्रती महिना भाडे देऊन रहात असणे, त्यांच्यावर होत असलेल्या कारवाईची माहिती मिळाल्याबरोबर हे अनधिकृत रहिवाशी गाळयाला कुलूप लावून निघून जाणे, अशा अनधिकृत रहिवाशांवर कारवाई न करणे, यामुळे मुंबईच्या म्हाडाच्या घरांमध्ये व संक्रमण शिबिरांमध्ये रहाणा-या गरजू भाडेकरुंच्या मनात म्हाडाच्या व्यवहाराबद्दल संताप निर्माण होणे, संबंधित अधिकारी व दलालांवर कारवाई होण्याची गरज, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना ".

सभापती महोदय, इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने सुमारे तीन हजार अनधिकृत रहिवाशंची एक यादी प्राधिकरणाला सादर केली होती. ती यादी त्यांनी गहाळ करुन टाकली. माननीय मंत्री महोदयांना असे वाटेल की मी काही तरी व्यक्तिगत आरोप करतो किंवा व्यक्तिगत राग आहे. परंतु तसे नाही. मी नम्रपणे त्यांच्या विषयी आदर ठेवून सांगू इच्छितो की, म्हाडाचे भ्रष्ट अधिकारी जे काही सांगतात त्याचीच री ओढून माननीय मंत्री महोदय सही करुन मोकळे होतात. या अनधिकृत रहिवाशांच्या संबंधी मी विचारलेल्या प्रश्नांना कशी विसंगत उत्तरे दिलेली आहेत

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर चव्हाण....)

त्याचे मी उदाहरण देतो. मुंबईमधील सायन येथील म्हाडाच्या इमारतीमध्ये साडेतीन ते 4 हजार घुसखोर आहेत अशा विषयाची मी अर्धा-तास चर्चा उपस्थित केली होती. पण मी आता एकाच संक्रमण छावणीतील उदाहरण देऊन अर्धा-तास चर्चा करु इच्छितो. सुमारे 189 गाळे दलालांनी आणि म्हाडाच्या अधिका-यांनी संगनमताने दीड ते 4 लाख रुपयांना विकले आहेत असा अहवाल दक्षता विभागाने दिलेला आहे. आता हा दक्षता विभागाने दिलेला अहवाल माननीय मंत्री महोदयांनी वाचलेला आहे की नाही हे माहीत नाही. इतकेच नाही तर तो अहवाल अधिका-यांनी माननीय मंत्री महोदयांना आणून दिलेला आहे की नाही हे माहीत नाही. माननीय मंत्री महोदयांना वाटेल की मी त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप करतो किंवा राजकीय अभिनिवेशाने बोलतो. मी व्यक्तिगत बोलत नाही. परंतु माझी अशी विनंती आहे की, जेथे सार्वजनिक हित आहे, जेथे सर्वसामान्य माणसाशी संबंधित खाते आहे जेथे सर्वसामान्य माणूस जातो, तेथे तरी तुम्ही काळजीपूर्वक राज्य केले पाहिजे. म्हाडामध्ये सर्वसामान्य माणूस जातो, तेथे धनाढ्य लोक तेथे जात नाहीत. त्या सर्वसामान्य माणसाला ट्रांझिट कॅम्पमध्ये 10x10 ची जागा त्याचे घर होईपर्यन्त पाहिजे असते. नंतर जेव्हा त्याला 300-325 चौ.फुटाची जागा मिळते त्यावेळी तो ट्रंझिट कॅम्पमधील जागा सोडून नव्या जागेत जातो. येथे अधिकारी दोन-दोन हातांनी लूटत आहेत आणि माननीय मंत्री महोदय आणि या खात्यातील सर्व उच्च अधिकारी त्यांना वाचविण्याचा प्रयत्न करतात असा लिखित आरोप मी या ठिकाणी करतो आणि त्यासंबंधातील पुरावा देखील देतो. सभापती महोदय, 5 महिन्यापूर्वी म्हाडाच्या दक्षता विभागाच्या अधिका-यांनी प्राधिकरणाला अहवाला दिला. सायनमध्ये राजकीय पक्षाचे कार्यकर्ते सुध्दा ... म्हणजे कुल खुदा का मूल बादशहा का और अमल कंपनी सरकार का , असे चाललेले आहे. म्हाडाचे गाळे दलालांच्या हातामध्ये असतात आणि तिस-यालाच भाडयाने दिले जातात, असे प्रकार तेथे चाललेले आहेत. दक्षता विभागाच्या अधिका-यांनी अहवाल दिलेला आहे. त्यासंबंधी मी विचारलेल्या एकाच प्रश्नाला दोन वेळा दिलेल्या उत्तरामध्ये विसंगती आहे. ता.प्र.क्र. 38245- सायन प्रतिक्षा नगरातील 139 गाळे दलालांनी दीड ते चार लाख रुपयांना विकल्याची बाब 25 जानेवारी 2008 रोजी उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय ? या प्रश्नाला

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर चव्हाण...)

माननीय मंत्री महोदयांनी निर्लजपणे उत्तर देऊन टाकले की, "हे खरे नाही". सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करीन की ही चर्चा संपल्यानंतर सायन ट्रांझिट कॅम्पमध्ये आपण आपले प्रतिनिधी पाठवा आणि माहिती घ्या. माननीय मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तराप्रमाणे जर तेथील वस्तुस्थिती असेल तर त्यांनी राजीनामा द्यावा नाही तर मी तरी देईन. कोणाला वाचविण्याचा प्रयत्न करता ? भ्रष्टाचारी लोकांना ? जुन्या चाळीत राहाणा-या गोरगरीब लोकांच्या घरावर गाढवाचे नांगर फिरवून जर तुम्ही हाय खाल्ली तर परमेश्वर तुम्हाला कधीही माफ करणार नाही. निदान खोटी उत्तरे या ठिकाणी देऊ नका. पहिल्या प्रश्नाला उत्तर "नाही" असे दिलेले आहे. असल्यास, म्हाडाच्या अखत्यारित गाळे विकल्याचा अहवाल दक्षता विभागाने दिलेला आहे, हे खरे आहे काय ? या प्रश्नाला "हे खरे नाही" असे उत्तर दिलेले आहे. 5 व्यक्तींकडे 6 गाळयांचे व्हेकेशन नोटीस असून 2 व्यक्तींनी गाळे विकलेले आहेत. पुन्हा नंतर असे उत्तर दिलेले आहे की, 24.7.2007 मुंबईत दक्षता सुरक्षा अधिकारी प्राधिकरण यांच्या मार्गदर्शनाखाली 27मार्च 2006.... 247 गाळयांची तपासणी केली असता 203 संक्रमण शिबिरातील गाळयांमध्ये घुसखोरी झालेली आहे. आधीच्या उत्तरामध्ये ही संख्या 2 दिलेली आहे. त्यानंतर मी 24 जुलैच्या प्रश्नामध्ये सीआयडी चौकशीची मागणी केली. त्याबाबतीत असे उत्तर दिले की, या प्रकरणाची चौकशी सीआयडी मार्फत करण्यात येईल का असा माझा प्रश्न होता. सन्माननीय गृहनिर्माण राज्यमंत्री ॲड. प्रितमकुमार शेगांवकर यांनी त्या प्रश्नाला उत्तर दिलेले आहे. त्यांच्या बद्दल मला आदर आहे. ते निष्णात वकील आहेत पण मंत्री नाहीत. त्या प्रश्नाला त्यांनी असे उत्तर दिले आहे की, "होय" चौकशी पावसाळयानंतर करण्यात येईल. ही चौकशी पावसाळयानंतर करण्याचे कारण काय? सीआयडी पोलिसांना रेनकोट दिले जात नाहीत काय ? छत्र्या दिल्या जात नाहीत काय ? पावसाळयामध्ये काम होत नाही काय ? पावसाळयामध्ये पोलीस स्टेशन बंद करुन पोलीस महाबळेश्वर सारख्या थंड हवेच्या ठिकाणी फिरायला जातात काय ?

...नंतर श्री. गिते...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

महाबळेश्वर येथे जाण्यासाठी एखाद्या पोलिसाला चार महिने रजा दिली जाते काय ? पावसाळयानंतर चौकशी करण्याचे कारण काय असा प्रश्न विचारला असता शासनाकडून असे उत्तर देण्यात आले आहे की, ही चौकशी पावसाळयानंतर करण्यात येईल. कारण चौकशी करुन घुसखोरांना बाहेर काढण्यास वेळ लागेल. घुसखोरांना पावसाळयात बाहेर काढता येत नाही काय ? विभागाकडे छत्र्या नाहीत काय ? पोलीस व्हॅन नाहीत काय ? सभापती महोदय, या मंडळाचा मी चेअरमन होतो त्यावेळी श्री. पाटील नावाच्या आय.एस.अधिका-याला आणि 23 कर्मचा-यांना जेलमध्ये पाठविले होते. त्यावेळी आम्ही म्हाडामध्ये सगळया अधिका-यांना आणि कर्मचा-यांना सरळ केले होते. म्हाडा हे सर्वसामान्य माणसाशी संबंधित आहे. म्हाडाच्या कार्यालयात कोणी रहिवाशी गेले भेटावयास गेले तर त्यांना कुत्र्यासारखी वागणूक म्हाडाच्या अधिका-यांकडून आणि कर्मचा-यांकडून दिली जाते. सायंकाळी 5.00 वाजल्यानंतर तेथील अधिकारी आणि कर्मचारी दलालाच्या अड्डयावर जाऊन दारुच्या बाटल्या फोडत बसतात. त्या ठिकाणी म्हाडांच्या सदनिकांचे सौदे करतात. एखादा गरीब माणूस त्या कार्यालयात गेला तर त्याला कर्मचारी उभे देखील करीत नाही. म्हाडातर्फे गरीब माणसांना जागा मिळत नाही. म्हणून माझे मुळात एवढेच म्हणणे आहे की, यासंदर्भात सी.आय.डी.चौकशी का केली गेली नाही ? मला जे काही सांगितले गेले ते मी रेकॉर्डवर आणतो की, ही चौकशी माननीय मुख्यमंत्र्यांनी नाकारली. माननीय मुख्यमंत्र्यांनी सी.आय.डी.चौकशी का नाकारली यासंबंधी माननीय गृहनिर्माण राज्यमंत्र्यांनी या ठिकाणी उत्तर दिले पाहिजे. सभागृहात सी.आय.डी.चौकशी मागितली गेली आहे. ही मागणी सभागृहात केल्यानंतर म्हाडाचे अधिकारी वरिष्ठांकडे गेले. याबाबतीत सी.आय.डी.चौकशी कशाला ? आपण डिपार्टमेंटल चौकशी करु. या सभागृहात जे आश्वासन दिले आहे ते का पाळले गेले नाही ? त्या ठिकाणी घुसखोरांनी तीन-तीन लाख रुपयांना गाळे विकलेले आहेत. आज मुंबई शहरात 16 हजार इमारती धोकादायक आहेत. शासनाने हौसिंग पॉलिसी जाहीर केलेली आहे. बिल्डरने त्या ठिकाणी गृहनिर्माण योजनेतून आपल्या योजना राबविण्यासाठी संक्रमण शिबिरातील गाळे घेतलेले आहेत. या विषयाची परवाची नियम 93 ची सूचना राखून ठेवलेली आहे. अनेक बिल्डरांच्या योजना पूर्ण झाल्यानंतर सुध्दा त्यांनी संक्रमण शिबिरातील गाळे म्हाडाला दिले नाही. म्हाडाने गाळे परत मागितले तर कोर्टात केस गेली आहे. यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री. नितीन

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

गडकरी यांची नियम 93 ची सूचना राखून ठेवलेली आहे. म्हाडाच्या जागा लोकांना मिळत नाहीत. दलालाचे राज्य त्या ठिकाणी चालले आहे. म्हाडाकडे 56 ट्रान्झीट कॅम्प आहेत. लिलावती हॉस्पीटलच्या समोरील एक ट्रान्झीट कॅम्प बिल्डरला दिला आहे. तो अजूनपर्यंत परतच मिळालेला नाही. तो ट्रान्झीट कॅम्प बिल्डरने पाडून टाकला आहे. त्या ठिकाणी सगळया झोपडपट्टया उभ्या राहिल्या आहेत. ॲड.प्रितमकुमार शेगांवरकर साहेब, आपण आंबेडकर चळवळीतील कार्यकर्ते आहात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी, सर्व सामान्य गरीब, पिडीत, दलित यांचा विकास व्हावा म्हणून चळवळ चालविली. म्हणून माझे असे म्हणणे आहे की, म्हाडाच्या संदर्भात सी.आय.डी. चौकशी का केली नाही यासंबंधीची माहिती आम्हाला सांगा. सी.आय.डी.चौकशी का नाकारली गेली त्याची देखील कारणे आम्हाला सांगा. यासंदर्भात माझा स्पेसिफीक प्रश्न असा आहे की, गेल्या वर्षभरात सी.आय.डी.चौकशी करुन किती घुसखोरांना आणि किती दलालांना जेलमध्ये पाठविले?

ॲड.प्रितमकुमार शेगांवकर(गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी विधान परिषदेमध्ये म्हाडाच्या संदर्भात जेवढे प्रश्न विचारले, तेवढया सर्व प्रश्नांची समर्पक उत्तरे विभागाकडून दिली गेली आहेत. ही उत्तरे देताना विभागाने काहीही हातचे राखून ठेवलेले नाही. कदाचित सन्माननीय सदस्यांना ती उत्तरे बरोबर वाटत नसतील. परंतु सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत, त्यांच्या भावनांशी मी सहमत आहे. भ्रष्टाचार निपटून काढण्यासाठी मी सातत्याने प्रयत्न करीत आहे. यासंदर्भात अनेक बैठका घेतल्या आहेत. अधिकारी तसेच कर्मचा-यांसमवेत बैठका घेतल्या. इतकेच नव्हे तर नागरिकांसमवेत बैठका घेतल्या आहेत. भ्रष्टाचार कसा निपटून काढावयाचा यासंदर्भात अधिका-यांशी मी चर्चा केली आहे. ही गोष्ट शक्य झाली नाही तर सी.आय.डी.मार्फत चौकशी करण्यात येईल अशा प्रकारचे आश्वासन शासनातर्फे सभागृहात दिले आहे. भ्रष्टाचाराच्या पूर्णपणे आम्ही विरोधात आहोत.

श्री. मधुकर चव्हाण : सी.आय.डी.चौकशी आतापर्यंत का करण्यात आली नाही ? म्हाडाच्या अधिका-यांबरोबर बैठका घेतल्या यासंबंधीची माहिती आम्हाला देऊ नका. राज्यमंत्र्यांचा दर्जा प्राप्त असलेल्या म्हाडाचा मी पाच वर्षे चेअरमन होतो. मला तेथील कारभाराची संपूर्णपणे कल्पना आहे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. प्रितमकुमार शेगांवकर : सी.आय.डी.चौकशी भ्रष्टाचार निपटून काढण्यासाठी होत असते. आपण सी.आय.डी. चौकशी करणार आहोत, परंतु त्याची पूर्णपणे पूर्व तयारी आम्हाला करावयास पाहिजे.

श्री. मधुकर चव्हाण : सी.आय.डी. चौकशी आतापर्यंत का केली नाही यासंबंधीचे उत्तर आम्हाला हवे आहे.

ॲड. प्रितमकुमार शेगांवकर : सी.आय.डी. चौकशी करण्यात येणार नाही असे मी बोललेलो नाही. सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, माझे पूर्ण उत्तर प्रथम ऐकून घ्यावे. म्हाडाच्या मुख्य दक्षता अधिका-यांनी 189 गाळयांची तपासणी केली. त्यांनी सर्व गाळयांचा अहवाल दिला नाही. फक्त 8 गाळयात अनिधिकृत आहेत, त्यात घुसखोरी झाली आहे असा अहवाल त्यांनी दिला होता. त्या 8 अनधिकृत घुसखोरांच्या विरुध्द कारवाई करण्यात आली आहे.

यानंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर .....

सभापती महोदय, म्हाडाचे 20234 गाळे आहेत. त्यापैकी रिपेअर ॲन्ड रिडेव्हलपमेंटचे 19528 गाळे आहेत. या सर्व गाळयांची तपासणी केली. यासाठी शासनाने एक महिन्याची विशेष मोहीम राबविली. विशेष मोहीम राबवून घुसखोर कोण आहेत, अनधिकृतपणे कोण राहतात किंवा व्हेकेशन नोटीस बोगस दिलेली आहे काय अशी सर्व प्रकारची चौकशी केली. त्यानंतर रेकॉर्ड तयार करण्यात आले. अधिकृतपणे वाटप केलेल्या गाळयांची संख्या 6498 इतकी आहे. अनधिकृत वापर आणि घुसखोरांनी व्यापलेल्या गाळयांची संख्या 9835 इतकी आहे. एवढया मोठया प्रमाणावर घुसखोरी होत असल्यामुळे शासनाचे नुकसान होत आहे. परंतु अपुरा कर्मचारीवर्ग आणि मॅनेजमेंट बरोबर नसल्यामुळे असे धंदे होतात,दलाल आहेत आणि राजकीय पक्षाचे लोक आहेत. इतरही कारणांमुळे एवढी मोठी घुसखोरी झालेली आहे. ही आकडेवारी आहे त्यानुसार रेकॉर्ड तयार केले पाहिजे. त्यासाठी यंत्रणा पाहिजे. या सर्व गोष्टी करुन आता रेकॉर्ड तयार करण्यात आले आहे आणि कारवाई सुरु झालेली आहे. येत्या महिनाभरात एकही घुसखोर गाळयांमध्ये राहणार नाही. शासनाला घुसखोरांविरुध्द कारवाई करावयाची आहे.....

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

उपसभापती : सन्माननीय मंत्रीमहोदयांचे उत्तर माननीय सदस्यांनी पूर्ण ऐकून घ्यावे.

ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, शासनाने घुसखोरांविरुध्द कोणती कारवाई केली आहे हे मी सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. सीआयडी चौकशी करणार म्हणून सांगितले आहे. यासंदर्भात विशेष मोहीम राबवून कारवाईला सुरुवात केलेली आहे. दक्षता पथकाच्या अधिकाऱ्यांना यासंदर्भात कोणती कारवाई करावयाची आहे याबाबत शासनाने सूचना दिलेल्या आहेत. या सर्व घुसखोरांना एक महिन्याच्या आत काढून टाकले जाईल आणि एकही घुसखोर राहणार नाही. इतकेच नाही तर त्यांच्याकडून पैसे वसूल करण्याची कारवाई आणि फौजदारी गुन्हे कसे दाखल करता येतील याचीही काळजी घेण्यात आलेली आहे. यासाठी नवीन स्टाफ नेमलेला आहे. यापुढे घुसखोरी होणार नाही याची काळजी शासन घेत आहे. एक महिनाभर वाट पहावी नाही तर सीआयडी चौकशी करु. ही सर्व प्रक्रिया पूर्ण केली नाही तर सीआयडी चौकशीसाठी कार्यवाही होणार नाही आणि घरेही खाली होणार नाहीत त्यामुळे आधी ही सर्व प्रक्रिया पूर्ण करावी लागत

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर ....

आहे. सन्माननीय सदस्यांनी शांत रहावे कारवाई होणार आहे आणि आपल्या इच्छेप्रमाणे कारवाई होणार आहे.

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी पोटतिडीकीने हा प्रश्न मांडला आहे. घुसखोरांविरुध्दची कारवाई किती दिवसात पूर्ण होणार याचा शासनाने खुलासा करावा. तसेच सीआयडी चौकशी किती कालावधीत पूर्ण होणार आहे त्याबाबत माहिती द्यावी. सन्माननीय सदस्यांचा याविषयातील प्रदीर्घ अनुभव लक्षात घेऊन जी कारवाई होणार आहे त्यासंबंधी मंत्रीमहोदयांनी आपल्या दालनात सन्माननीय सदस्यांबरोबर विचार करावा आणि मार्ग काढावा.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रीमहोदय श्री. अजित पवार यांना माझी विनंती आहे. कारण आपल्या पक्षाच्या कोटयातून ॲड. शेगांवकर यांना मंत्रीपद दिलेले आहे. त्यामुळे या पापाची जबाबदारी आपल्यावर सुध्दा आहे. मंत्रीमहोदयांनी सांगितले की, 9835 घुसखोर आहेत. माझ्या प्रश्नाचे उत्तर कौशल्याने टाळले आहे. गेल्यावर्षी पावसाळयात शासनाने आश्वासन दिले होते की याप्रकरणाची सीआयडी चौकशी करु. ती का करण्यात आली नाही ? त्याचे उत्तर मंत्रीमहोदयांनी दिलेच नाही. घुसखोरांविरुध्द कारवाई करण्यासाठी कागदपत्रे तयार करावी लागत नाहीत. आपण कोणालाही टाळे देतो त्यावेळी त्याला व्हेकेशन नोटीस देतो. रेंट कलेक्टर तेथे जाईल आणि त्याला विचारील की तुझी व्हेकेशन नोटीस दाखव . व्हेकेशन नोटीस दाखविली नाही तर लगेच पोलीस स्टेशन घरफोडीची तक्रार नोंदवायची आणि संध्याकाळी त्याला अटक करतात. यासंदर्भात म्हाडाने नोट तयार केली आहे.

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

नंतर श्री. भोगले

श्री.मधुकर चव्हाण.....

तू कसा आला? कुठून आला? तो सांगतो मी दलालाला 5 हजार रुपये दिले. मग आर्थिक गुन्हे विभागाकडे कागदपत्र पाठविल्यानंतर तिसऱ्या दिवशी अटक केली जाते. मंत्रीमहोदय याठिकाणी चुकीची माहिती देत आहेत. भ्रष्टाचाराला साथ देत आहेत.

ॲड.प्रितमकुमार शेगावकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या भावना माझ्या लक्षात आल्या आहेत. मी त्यांच्यापेक्षा अधिक कडक आहे. मी काय केले ही प्रत्येक गोष्ट सन्माननीय सदस्यांना सांगितली पाहिजे का?

उपसभापती : मंत्रीमहोदय, आपण सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांना आपल्या दालनात बोलवावे, त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घ्यावे व त्याप्रमाणे कारवाई करावी, त्यांचे समाधान करावे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : बृहन्मुंबईमधील हजारो सुशिक्षित बेरोजगारांना न नोकऱ्या मिळणे

मु. शी. : बृहन्मुंबईमधील हजारो सुशिक्षित बेरोजगारांना नोकऱ्या न मिळणे यासंबंधी डॉ.दीपक सावंत,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"बृहन्मुंबईतील हजारो सुशिक्षित बेरोजगार पदवीधरांनी त्यांना नोकऱ्या मिळाव्यात यासाठी सेवायोजन कार्यालयामध्ये केलेल्या नोंदी, सदर नोंदीत असलेले अभियंते, वाणिज्य, शास्त्र व कला विषयाचे हजारो पदवीधर यांना वर्षानुवर्षे नोंद करुनही नोकऱ्या उपलब्ध करुन देण्याबाबत सेवायोजन कार्यालयाला आलेले अपयश यावर शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही"

सभापती महोदय, बृहन्मुंबईमध्ये आज हजारो सुशिक्षित पदवीधरांनी आपल्याला नोकरी मिळावी यासाठी सेवायोजन कार्यालयात आपल्या नावाची नोंदणी केली. हजारो तरुण-तरुणी नोकरीच्या शोधात वणवण फिरत आहेत. महाराष्ट्रात साधारणपणे नोंदणी झालेले 30,29,400 सुशिक्षित बेरोजगार आहेत. आज सेवायोजन कार्यालयाची अवस्था इतकी बिकट झालेली आहे की, तेथे गेलेल्या सुशिक्षित बेरोजगारांना नोकरी मिळेल असे वाटतच नाही. मुंबईतील सुशिक्षित बेकारांना नोकरी देण्याचे आमिष शासन दाखविते. परंतु मुंबईतील सेवायोजन कार्यालयात फक्त एकच संगणक आहे. तो देखील कधीही चालू नसतो. त्यावर डाटा कसा फीड करावयाचा हे कोणाला माहिती नाही. एक खुर्ची आहे, अधिकारी बसण्यासाठी दोन कॅबीन आहेत. बाहेर रांग लावण्यासाठी एक फळकुटे आहे. तुटपुंजा कर्मचारीवर्ग तेथे उपलब्ध आहे. रोजगार व स्वयंरोजगार विभागाचे वरिष्ठ आयएएस अधिकारी प्रशासकीय इमारतीच्या 17 व्या मजल्यावर बसतात. सेवायोजन कार्यालयात गेल्यानंतर आपल्याला नोकरी मिळू शकते अशी भावना सुशिक्षित बेकारांच्या मनात निर्माण झाली पाहिजे, तसे वातावरण तेथे निर्माण झाले तर बेरोजगारांना आधार मिळू शकतो. गेल्या दोन वर्षाची आकडेवारी विचारात घेतली तर फक्त 14 हजार लोकांना राज्य शासनाने नोकरी दिली आहे. अनेक इच्छुक तरुणांनी या रोजगार नोंदवहीत आपले नाव देखील

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

नोंदविलेले नाही. त्यांना कल्पना आहे, आपल्याला या सेवायोजन कार्यालयाकडून नोकरी मिळणार नाही. परिणामी अनेक फसव्या जाहिरातींना भुलून पैसे देतात आणि त्यांची फसवणूक होते. आज मुंबईमध्ये एसएससीपेक्षा कमी शिकलेले 65 हजार, एसएससी उत्तीर्ण झालेले 72 हजार, एचएससी उत्तीर्ण झालेले 99 हजार, अभियांत्रिकी पदवीधर 6334, आयआयटी झालेले 4000, शिकावू अप्रेंटिस ट्रेंड 4900, कला, वाणिज्य व विज्ञान या तीनही विभागातील पदवीधर 57818 व पदव्युत्तर 4176 उमेदवार आहेत. राज्य शासनाकडील सुशिक्षित बेरोजगारांची एकूण आकडेवारी 2,48,543 असून लाईव्ह रजिस्ट्रेशन झालेली संख्या 3,14,052 इतकी आहे.

(नंतर श्री.खर्चे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

अमरावती शहराचे उदाहरण घेतले तर गेल्या 10 वर्षात फक्त 400 लोकांना आपण सेवायोजन कार्यालयामार्फत नोकऱ्या देऊ शकलो. सन 2007 मध्ये शासनाकडे असलेल्या रिक्त पदांची संख्या पाहिली तर 9.75 लाख एवढी असताना आपण किती लोकांना नोकऱ्या दिल्या यासंबंधीची आकडेवारी पाहता 10 टक्के लोकांना सुध्दा नोकऱ्या देऊ शकलो नाही. आज कॉल सेंटर्समध्ये पदवीधर झालेले लोक कामाला जातात. परंतु या कॉल सेंटर्सबाबत आपण वारंवार वर्तमानपत्रातून वाचत असतो की अनेक प्रकारचे गुन्हे या कॉल सेंटर्समध्ये घडतात, त्यात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या गाड्यांना ॲक्सीडेंट होतात परंतु अशा कॉल सेंटर्समध्ये देखील आता बारावी पास असलेल्या मुलांसाठी नोकऱ्या बंद केलेल्या आहेत. अशा परिस्थितीत बारावी आणि पदवीधर यामधील जो सुशिक्षीत वर्ग आहे त्याने काय करावयाचे, हा प्रश्न निर्माण होत आहे. शासन एका बाजूला स्वयंरोजगाराची मोहीम राबविण्याचा प्रयत्न करते. नुकताच एमएमआरडीएच्या वतीने प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्याचा अभिनव प्रयोग करण्यात आला. परंतु प्रत्यक्षात एमएमआरडीएने किती तरुणांना नोकऱ्या दिल्या हे पाहिले तर फक्त 142 लोकांनाच आजपर्यंत नोकऱ्या दिल्या. त्यानंतर सर्व्हिस सेक्टरमध्ये नोकऱ्या देण्यासाठी आपण सेवा सोसायट्या स्थापन केल्या परंतु यामध्ये कामे कोणती देण्यात येतात हे पाहिले तर मुंबई शहरातील इमारतींची विजेची बिले भरण्यासाठी, तसेच या इमारतींना प्लंबिंग सेवा व इतर सेवा पुरविण्याचे काम या तरुणांना देण्यात येते. या सेवा सोसायट्यांसंबंधीची आकडेवारी पाहिली तर बोटावर मोजण्याइतके लोक मुंबईत आढळून येतील आणि त्यातही बोटावर मोजण्याइतक्या लोकांनी हे काम स्वीकारले आहे. शासनाने रोजगार मेळावे भरविण्याचे ठरविले परंतु तो एक फ्लॉप शो ठरला आहे. कारण आपणही कबूल कराल की, मुंबईत किती बेरोजगार मेळावे आपण भरविले आहेत ? सर्वात जास्त सुशिक्षीत बेरोजगारांची संख्या मुंबई, ठाणे, पुणे आणि नाशिक या भागात आहे. असा एकही रोजगार मेळावा मुंबईत आतापर्यंत झालेला नाही. अशा मेळाव्यांसाठी केंद्रशासनाकडून सुध्दा मदत दिली जाते. आपल्या राज्याकडून या मेळाव्यांसाठी किती मदत केली आहे, हा प्रश्न महत्वाचा आहे.

आपण थायलंड या राष्ट्राचा विचार केला तर आपल्यापेक्षाही गरीब राष्ट्र असून सर्वात जास्त बेरोजगारी या देशात आहे. तसेच फिलीपाईन्समध्ये सुध्दा सर्वात जास्त बेरोजगारी आहे,

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

कारण तिकडची लोकसंख्या वाढत आहे. थायलंडने प्रथम काय केले तर जे बेकायदेशीर इमिग्रंट्स आहेत त्यांना पहिल्यांदा हा नियम लागू केला, त्यामुळे त्यांना यश आले. आपण हा नियम आपल्याकडे लागू करणार आहात काय ? अशा लोकांना आपण वर्क परमिट देणार काय? याचा खुलासा झाला पाहिजे. आपल्या राज्यात विशेष करुन लाखो बिल्डींग्ज बांधल्या जात आहेत, अशा ठिकाणी काम करणाऱ्यांना प्रथम आपण सहा महिन्याचे वर्क परमिट द्या व तो कालावधी संवल्यानंतर त्यांना परत पाठवा आणि जन्मापासून येथे राहणाऱ्या लोकांना न्याय द्या अशी माझी सूचना आहे. अशा प्रकारचे प्रयत्न थायलंडने केले त्या राष्ट्राने "Thai haps from the Thai Major" हे अभियान सुरु केले. अशा छोट्या राष्ट्रात हे शक्य आहे, फिलीपाईन्ससारख्या छोट्या राष्ट्राला हे शक्य आहे, जो जगाच्या पाठीवर सर्वात जास्त मागासलेला देश आहे त्या देशाने हे प्रयत्न यशस्वी केले तर आपल्याला हे का शक्य नाही ? याची माहिती द्यावी. तसेच ग्लोबल एम्प्लॉयमेंट ट्रेन्ड सेटच्या बाबतीत आपण काय करणार आहात याचाही विचार करावा लागणार आहे. जगाच्या पाठीवर काही राष्ट्र तसेच आपल्या देशातील काही राज्यांमध्ये बेरोजगारी भत्ता देण्यात येतो. माझ्याकडे एक पुस्तिका आहे, ती मी आपल्याकडे पाठवितो व त्यावरुन आपल्याला कळून येईल की, इतर राज्यांमध्ये कोणत्या प्रकारे बेरोजगारी भत्ता देण्यात येतो. आपल्या राज्यात देखील बेरोजगारी भत्ता देण्यासाठी 1200 रुपयाचे अनुदान देतो पण त्या अनुदानात किती लाभार्थी आहेत यासंबंधीची आकडेवारी आपल्या परफॉर्मन्स बजेटमध्ये नाही. तसेच बोटावर मोजता येतील इतकेच लोक हा भत्ता घेणारे दिसून येतील. अशा प्रकारचा बेरोजगारी भत्ता पदवीधरांना वेगळ्या प्रकारे देण्यात यावा. असा बेरोजगारी भत्ता वर्षानुवर्षे द्यावा असे मी म्हणणार नाही परंतु जोपर्यंत त्याला नोकरी मिळत नाही तोपर्यंत तरी तो भत्ता देण्यात यावा. त्यासाठी टाईम लिमिट द्या पण बेरोजगारी भत्ता द्यावा, अशी माझी सूचना आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

आणि हे सर्व देण्यासाठी सिंगल विंडो सिस्टीम केली तर गुन्हेगारीला सुध्दा आळा बसू शकेल. शासनाने लोकसेवा केंद्र काढलेले आहेत. परंतु मुंबईमध्ये फक्त 31 लोकसेवा केंद्र असून संपूर्ण राज्यात 211 लोकसेवा केंद्र आहेत. 2 ऑक्टोबर 1988 पासून सुशिक्षित बेरोजगारांना आर्थिक सहाय्य देण्यात येते परंतु हे आर्थिक सहाय्य फक्त पेपरवरच दिले जाते. जोपर्यंत आपण राज्याचा जीडीपी वाढवत नाही तोपर्यंत राज्यामध्ये रोजगार उपलब्ध होऊ शकत नाही याची चांगली कल्पना माननीय मंत्रीमहोदयांना आहे. माझा तिसरा मुद्दा बेरोजगारांना बेरोजगार भत्ता दिला जावा यासंदर्भात आहे. बेरोजगारांसाठी इन्श्यूरन्स योजना आहे. सेवा योजन कार्यालयामध्ये 97500 पदे रिक्त आहेत. शासकीय किंवा निमशासकीय कार्यालयातील रिक्त पदे आपण केव्हा भरणार आहात याचे उत्तर माननीय मंत्रीमहोदयांनी देण्याची आवश्यकता आहे. परप्रांतातून मुंबईमध्ये जे लोक रोजगारासाठी येतात त्यांना आपण वर्क परमिट देणार आहात काय याचीही माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील ग्रामीण भागातून बरेच सुशिक्षित बेरोजगार तरुण नोकरी शोधण्यासाठी मुंबई, पणे यासारख्या शहरामध्ये येत असतात. ज्यावेळेस महाराष्ट्रातील बेरोजगार तरुण मुंबईमध्ये नोकरीसाठी इंटरव्हयू देण्यासाठी येतो त्यावेळेस त्याला दोन-तीन दिवस राहता येईल अशी सोय नसते. त्याचे नातेवाईक मुंबईत राहत असतात परंतु त्यांची रुम 10X10 ची असल्यामुळे ते आपल्या नातेवाइकांकडे राहू शकत नाही. मुंबईमध्ये हातावर पोट भरणारे हजारो लोक आहे. त्यामुळे नाईलाजास्तव या तरुणांना हॉटेलमध्ये किंवा लॉजमध्ये दोन-तीन रहावे लागते. परंतु यातील ब-याच तरुणांना हॉटेल किंवा लॉजमध्ये राहण्यासाठी पैसे नसतात. आज राज्यशासनाकडे हजारो एकराचे भूखंड आहेत, आपण त्या भूखंडांचे श्रीखंड खाण्यामध्ये मग्न आहात त्यामुळे मला असे म्हणावयाचे आहे की, ज्यांचा महाराष्ट्रात जन्म झाला आहे, मुंबईत जन्म झालेला आहे त्यासंदर्भात मी बोलतो आहे. इंटरव्हयू देण्यासाठी जे लोक मुंबईत किंवा पुण्यामध्ये येतात त्यांच्यासाठी शासनाने असे काही भूखंड राखून ठेवण्याची आवश्यकता आहे. आपल्याकडे महिलांसाठी वसतिगृहे आहेत परंतु नोकरीच्या शोधात किंवा इंटरव्हयूसाठी जे तरुण येतात त्यांच्यासाठी अशा प्रकारची काही सोय उपलब्ध नाही. त्यामुळे येथे जे बेरोजगार तरुण येतात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

त्यांना " ना नफा ना तोटा " या तत्वावर एका रुममध्ये 3 लोक 4 दिवस राहू शकतील व त्यांना सकाळचा नास्ता, दुपारचे व संध्याकाळचे जेवनाची सोय करावी, यासाठी शासनाने त्यांच्याकडून नाममात्र शुल्क आकारावे अशा प्रकारे वसतिगृहाची सोय उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. हे वसतिगृह शहराच्या लगत असण्याची आवश्यकता आहे जेणे करुन हे तरुण एक दीड तासात आपल्या इंटरव्हयूच्या ठिकाणी पोहचू शकतील याकडेही लक्ष देण्याची आवश्यकता आहे. अशा प्रकारची सोय तरुणांना शासनाने उपलब्ध करुन दिली तर हे तरुण शासनाला दुवा देतील.

------.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ KGS/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 11.15

श्री.अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) :सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी बृहन्मुंबईतील सुशिक्षित बेरोजगारांना नोक-या मिळण्यसंबंधी जी अर्धा तास चर्चा मांडली आहे तिचे समर्थन करण्यासाठी मी येथे उभा आहे. सभापती महोदय, या अर्धा तास चर्चेचे समर्थन करण्यासाठी आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे.

सभापती महोदय, बृहन्मुंबईतील सुशिक्षित बेरोजगारांना नोक-या मिळण्यासाठी दोन गोष्टी करणे आवश्यक आहे असे मला वाटते. त्यातील पहिली गोष्ट अशी आहे की रिजनल एम्प्लायमेन्ट एक्सचेंज ॲक्ट मध्ये ज्या काही तरतुदी करण्यात आलेल्या आहेत त्या तरतुदींचे सगळीकडे उल्लंघन करण्यात येत आहे. तेव्हा या तरतुदीचे पालन योग्य प्रकारे करण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात आल्यास या सगळया प्रश्नांची उत्तरे आपल्याला मिळू शकतील. पहिली गोष्ट अशी आहे की, सर्वांची नोंद करण्यात आली पाहिजे. आज कॉल सेन्टर्समधून अनेक जणांना नोक-या मिळू शकतात त्याचबरोबर ऑन लाईनवरुन नोक-या मिळत असल्यामुळे त्या उमेदवारांची कोठेही नोंद केली जात नाही. तेव्हा सेवा योजन कार्यालयामध्ये उमेदवारांची नोंद करण्यात आली पाहिजे त्याचबरोबर दुसरी गोष्ट अशी करावयास पाहिजे की, स्थानिक लोकांना या नोक-या मिळाव्यात यासाठी त्याच्याकडे डोमिसाईल सर्टिफिकेट असले पाहिजे., त्याला मराठी भाषेचे ज्ञान असले पाहिजे अशा प्रकारची अट टाकण्यात आली असेल तरच स्थानिक भूमिपूत्राना नोक-या मिळू शकतील असे मला वाटते. सुप्रीम कोर्टाने ही मागणी अमान्य केलेली आहे परंतु राज्या राज्यामध्ये वेगळी चर्चा सुरु आहे त्यामुळे राज्यातील भूमिपूत्रांनाच नोक-या कशा मिळतील हे पाहिले पाहिजे.आज राष्ट्रवाद ते उपराष्ट्रवाद निर्माण झालेला आहे. तेव्हा स्थानिक व्यक्तिना नोक-या मिळण्यासाठी मी सांगितलेल्या तीन गोष्टी करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, खाजगी क्षेत्रातून देखील नोकर भरती केली जाते त्याचप्रमाणे रेल्वे रिक्रुटमेन्ट बोर्ड, स्टाफ सिलेक्शन कमिशन, बॅन्क रिक्रुटमेन्ट बोर्ड इत्यादी ठिकाणी नोकर भरती करण्यात येते. इन्कम टॅक्स डिपार्टमेन्टमध्ये नोकर भरती केली गेली त्यावेळी स्थानिक व्यक्तिना नोकरी दिली जात नाही. बाहेरच्या राज्यातील वर्तमानपत्रात जाहिरात देऊन बाहेरच्या राज्यातील उमेदवार आणले जातात. रेल्वेमध्ये जी नोकर भरती होते तेथेसुध्दा हाच प्रकार झालेला आहे त्यामुळे भूमिपूत्रांवर अन्याय होत आहे . सार्वजनिक उपक्रमामध्ये शासनाचा प्रतिनिधी असला

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पाहिजे अशी कायद्यात तरतूद करण्यात आली आहे परंतु दुर्देवाने या तरतुदीचे पालन केले जात नाही . त्यामुळे मी ज्या गोष्टींचा उल्लेख केलेला आहे त्याप्रमाणे जर करण्यात आले तर या भूमिपूत्रांना न्याय देता येईल असे मला वाटते.

सभापती महोदय, रेल्वे रिक्रुटमेन्ट बोर्डाच्या जाहिराती प्रसिध्द केल्या जातात परंतु त्या जाहिराती बिहार आणि उत्तर प्रदेश राज्यातील वर्तमानपत्रात प्रसिध्द केल्या जातात त्यामुळे रेल्वेमध्ये त्या त्या राज्यातील उमेदवारांची भरती होते त्यातूनच राज्या राज्याचा वाद निर्माण झालेला आहे. तेव्हा आपल्या राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांना नोकऱ्या द्यावयाच्या असतील तर सेवायोजन कार्यालयामध्ये त्यांचे नाव असले पाहिजे अशी अट टाकण्यात आले पाहिजे तसेच तो डोमिसाईल असला पाहिजे. अशा प्रकारची अट टाकण्यात आली तरच भूमिपूत्रांना न्याय मिळेल असे मला वाटते. मागच्या वेळी माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देतांना असे सांगितले होते की या प्रश्नाच्या संदर्भात माझ्याबरोबर चर्चा करण्यात येईल परंतु त्यांना चर्चा करण्यासाठी वेळ मिळाला नसेल असे मी समजतो. तेव्हा आता माननीय मंत्री महोदयांनी माझ्या बरोबर चर्चा करावी अशी मी त्यांना विनंती करतो आणि या अर्धा तास चर्चेच्या अनुषंगाने मी जे तीन चार मुद्दे मांडलेले आहेत त्याचे उत्तर द्यावे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील (रोजगार व स्वयंरोजगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी बेरोजगारांना रोजगार आणि स्वयंरोजगार देण्याच्या संदर्भात अर्धा तास चर्चा उपस्थित करुन अनेक महत्वाचे विचार येथे मांडलेले आहेत व चांगल्या सूचना केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनी देखील या चर्चेत भाग घेत असतांना चांगल्या सूचना केलेल्या आहेत . पाच दहा मिनिटांमध्ये उत्तर देऊन या चर्चेला न्याय मिळेल असे मला वाटत नाही.

सभापती महोदय, या अर्धा तास चर्चेच्या निमित्ताने मी सन्माननीय सदस्यांना आवर्जून सांगू इच्छितो की,या प्रश्नाच्या संदर्भात जी बैठक बोलाविण्याचे ठरले होते त्यानुसार येत्या दोन दिवसात बैठक निश्चितपणे घेण्यात येईल. त्याचप्रामाणे या ठिकाणी ज्या सूचना करण्यात आलेल्या आहेत त्या संदर्भात अधिका-यांबरोबर चर्चा करुन सकारात्मक निर्णय घेण्याचा प्रयत्न केला जाईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या अर्धा तास चर्चेच्या निमित्ताने जो विषय या ठिकाणी मांडलेला आहे त्याबदद्दल मला काही खुलासा करावयाचा आहे. सन्माननीय सदस्यांनी पहिला मुद्दा असा मांडला आहे की , मुंबईमध्ये सेवा योजन कार्यालय बॅरॅकमध्ये सुरु आहे त्यात सुधारणा करण्याची गरज आहे. परंतु सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे तितकी भयानक परिस्थिती त्या कार्यालयाची नाही. त्या ठिकाणी एक कॉम्प्युटर नाही तर दहा कॉम्प्युटर्स आहेत त्याचबरोबर तेथील कर्मचाऱ्यांना कॉम्प्युटरचे आणि ऑन लाईनचे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. त्याचबरोबर वेबसाईट देखील सुरु आहे. त्यामुळे या कार्यालयामध्ये भयानक परिस्थिती नाही. अर्थात त्या कार्यालयामध्ये थोडी फार सुधारणा करण्यास निश्चित वाव आहे त्या बद्दल लक्ष देण्यात येइल. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी सेवा सोसायटयांचा उल्लेख केलेला आहे मी त्यांना सांगू इच्छितो की, 279 सेवा सोसायटया असून त्यापैकी 165 कार्यालयामध्ये 3 हजार सभासद काम करीत आहेत.

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील ...

रोजगार मेळावे जे घेतले आहेत त्याबाबत मी आपल्याला सांगू इच्छितो की, मुंबई विभागामध्ये आपण असे 6 मेळावे घेतले आहेत आणि त्यामध्ये जवळपास 106 उद्योजक उपस्थित होते. तसेच त्यामधून जे इंटरव्ह्यू घेतले गेले त्यांची संख्या 5650 इतकी होती आणि उपस्थित उमेदवारांची संख्या ही 6 हजाराच्या वर होती. सभापती महोदय, या मेळाव्यांच्या माध्यमातून 600 लोकांना रोजगार उपलब्ध झालेला आहे. त्यामुळेच यापुढेही निश्चितपणे या मेळाव्यांची संख्या वाढविण्यात येईल. त्यासाठी रिटेल मार्केटिंगच्या बाबतीत प्रशिक्षण देण्याचीही सोय आपण केलेली आहे. मुंबईतच नव्हे तर जिल्ह्यांच्या ठिकाणी देखील हे काम आपण सुरू केले आहे. आता मॉलस्, रिटेल आऊटलेटस् मोठ्या प्रमाणात येत आहेत आणि त्या ठिकाणी ट्रेंड मॅनपॉवर उपलब्ध करून देण्याचे आपले प्रयत्न चालू आहेत. सभापती महोदय, बेरोजगार भत्त्याच्या बाबतीत येथे उल्लेख केला गेला. मी आपल्याला सांगू इच्छितो या संदर्भात आपण सेवा सोसायट्यांची योजना आणली आहे आणि ती योजना आणण्याचा हेतूच हा होता की, सुशिक्षित युवकांनी एकत्रित येऊन सेवा सोसायट्या स्थापन कराव्यात आणि या युवकांना बेरोजगार भत्ता देण्याऐवजी त्यांच्या या सोसायट्यांना पैसे मिळावेत जेणे करून त्यांना या सोसायट्यांसाठी जागा घेऊन तेथे कामे करता येऊ शकतील. त्याच बरोबर शासनाने असाही एक निर्णय घेतला आहे की, प्रत्येक विभागाने 5 लाखापर्यंतचेकाम या सेवा सोसायट्यांना द्यायचे. परंतु दुर्दैवाने ज्या प्रमाणात कामे मिळायला पाहिजे होती तेवढी ती मिळाली नाहीत. दर तीन वर्षांनी याचा आढावा घेण्याचेही आपण ठरविले होते आणि ती प्रक्रिया सुरू आहे. तसेच मजूर सोसायट्यांना, त्याचबरोबर जे बेरोजगार इंजिनिअर्स आहेत त्यांना कामे मिळावित म्हणून कामांची टक्केवारी ठरवून दिलेली आहेत. 15 लाखाच्या आतील जी कामे आहेत त्यापैकी 33 टक्के कामे मजूर सोसायट्यांना, 33 टक्के बेरोजगार इंजिनिअर्सना द्यायचे आणि उरलेली कामे ओपन टेंडर्स काढून देण्याचे आपण ठरविले आहे. त्यात बदल करून या सेवा सोसायट्यांना देखील त्यातून काही कामे देण्याची प्रक्रिया आपण सुरू केली आहे. सभापती महोदय, मी दोन दिवसापूर्वी या ठिकाणी सांगितल्याप्रमाणे तीन महिन्यांत या संदर्भात सकारात्मक निर्णय घेण्याचे जाहीर केलेले आहे. तसेच सिंगल विंडो योजनेतूनही आपण यामध्ये काम करीत आहोत. फिलिपाईन्समधील बेरोजगारी दूर करण्याचे जे प्रयत्न होत आहेत त्याचा उल्लेख आपण केला आणि तसे काम करण्याची सूचना केली आहे त्याबाबत मी एवढेच सांगेन की, आपण जरूर

..... क्यू 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील .....

त्याचाही अभ्यास करू. सभापती महोदय, या ठिकाणी सर्वात महत्त्वाचा मुद्दा हॉस्टेल्सच्या बाबतीत मांडला गेला आहे. या संदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, आमच्या रोजगार, स्वयंरोजगार विभागाने या बाबतीत निर्णय घेतला आहे. त्यानुसार नवी मुंबईमध्ये 10 एकराचा भूखंड सिडकोकडे मागायचा आणि त्या भागामध्ये सध्या वेगवेगळ्या विभागांची जी प्रशिक्षण केंद्रे आहेत, त्या भागातच उद्योजकता विकास प्रशिक्षण केंद्र सुरू करावयाचे आणि तेथेच एक हॉस्टेलचीही सोय करायची. जेणे करून त्या ठिकाणी मुलाखती आणि परीक्षांसाठी येणाऱ्या युवकांना ना नफा ना तोटा तत्त्वावर आपणास तात्पुरत्या स्वरूपात निवासी जागा उपलब्ध करून देता येईल. तेथे हे हॉस्टेल उभे इ ालयानंतर काही जागा या मुलांसाठीही ठेवण्यात येतील. तेव्हा मी मघाशी सांगितल्या प्रमाणे या संदर्भात दोन दिवसातच एक बैठक घेऊन त्यामध्ये सन्माननीय सदस्यांना तसेच संबंधित सर्वांना बोलावून चर्चा करण्यात येईल. मला वाटते माझ्या या खुलाशाने सन्माननीय सदस्यांचे समाधान झाले असेल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मला या निमित्ताने केवळ एकच उपप्रश्न विचारावयाचा आहे.बाहेरगावाहून मुंबईत येणाऱ्या सुशिक्षित युवकांना वर्क परमिट देण्याच्या दृष्टीने राज्य सरकार काही सोय करणार का ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, या बाबतीत देखील दोन दिवसात बोलाविण्यात येणाऱ्या बैठकीत आपण चर्चा करू.

***

..... क्यू 3 ...

अशुद्धीत प्रत / मुद्रणेपूर्वी नाही

पृ.शी. : जायकवाडी धरणाच्या उजव्या व डाव्या कालव्यांच्या दुरूस्तीवर लाखो रूपये खर्च होऊनही सिंचन क्षेत्रात वाढ न होणे.

मु.शी. : जायकवाडी धरणाच्या उजव्या व डाव्या कालव्यांच्या दुरूस्तीवर लाखो रूपये खर्च होऊनही सिंचन क्षेत्रात वाढ न होणे याबाबत श्री. श्रीकांत जोशी, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा तास चर्चा.

श्री. श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा तास चर्चा उपस्थित करतो -

" पैठण येथील जायकवाडी धरणाच्या उजव्या व डाव्या कालव्यांच्या दुरूस्तीवर लाखो रूपये खर्च होऊनही कालव्यांच्या पाणी वहन क्षमतेत अथवा सिंचन क्षेत्रात वाढ न होणे, जायकवाडी धरणाच्या अधिकारी व गुत्तेदार यांच्या संगनमताने बोगस कामे करण्यात येणे, त्यामुळे कालव्यांच्या वितरिकांवरील रेलपर्यंत पाणी न पोहोचणे, परिणामी शेतकऱ्यांच्या पिकांचे प्रचंड प्रमाणावर नुकसान होणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, अत्यंत मागास अशा तीन जिल्ह्यांचा म्हणजे जालना, परभणी आणि बीड या जिल्ह्यांचा हा प्रश्न आहे. या तिन्ही जिल्ह्यातील 1 लाख 82 हजार हेक्टर जमिनीचे सिंचन व्हायला पाहिजे होते पण प्रत्यक्षात ते केवळ 25 ते 30 टक्केच सिंचन होऊ शकते आहे. सभापती महोदय, ज्या कारणासाठी आम्ही राजकारणात आलो त्या मागास जिल्हा वा प्रांतांना ही बाहेरची मदत मिळाल्याशिवाय हे जिल्हे वा हे प्रांत स्वयंपूर्ण होऊ शकत नाहीत, तेथील नैसर्गिक साधन संपत्तीचा जागतिक स्पर्धेच्या दृष्टीने वापर आपण करू शकत नाही. मराठवाड्यातील जालना, परभणी आणि बीड हे अतिमागास असे जिल्हे आहेत. ....

(यानंतर श्री. सरफरे .... आर 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी..

हे जिल्हे डेव्हलपिंगऐवजी डेव्हलप्ड करावयाचे असतील तर ते सहजगत्या होऊ शकतात. त्याकरिता सिंचन विभागाने त्या मानसिकतेमधून आपली मनस्थिती बदलावी याकरिता मी गेली पाच वर्षे सातत्याने प्रयत्न करीत आहे. माननीय मंत्री श्री. अजितदादा पवार साहेबांनी त्याकरिता एक व्यापक बैठक घेतली. माननीय मंत्री डॉ. सुनील देशमुख साहेबांनी त्याठिकाणी दोन वेळा दौरे आयोजित केले. महत्वाच्या राजकीय घडामोडींमुळे त्या कॅनॉलवर जाण्याऐवजी ते विमानतळावरुन परत माघारी फिरले. परंतु जर ते कॅनॉलवर गेले असते तर मला याठिकाणी सांगण्याची आवश्यकता राहिली नसती. सभापती महोदय, पैठण डावा कालवा हा 208 किलोमीटरचा असून त्याखालील कमांड एरीया 1 लाख 42 हजार हेक्टर इतका आहे. त्याचा डिझाईन डिसचार्ज 3600 क्युसेस असावयास पाहिजे होता, प्रत्यक्षात आतापर्यंत 2400 क्युसेसचा डिसचार्ज साधलेला आहे. याबाबत मी सभागृहात प्रश्न विचारल्यानंतर त्या कॅनॉलवर 20 कोटी रुपये खर्च करण्यात आले. त्यानंतर डिझाईन डिसचार्ज 2400 क्युसेसवरुन 2200 क्युसेसवर आला. म्हणजे कॅनॉलचा डिसचार्ज वाढण्याऐवजी तो प्रत्यक्षात कमी झाला आहे. तेथील अभियंत्यांच्या दोषामुळे हे प्रमाण कमी होत नसून व्हिजन आणि त्यामागील सरकारची जी भूमिका असावयास पाहिजे ती दुर्दैवाने नसल्यामुळे मराठवाडयातील शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान होत आहे. प्रत्यक्षात 1 लाख 42 हजार हेक्टरपैकी किती हेक्टरवरील पिकांना पाणी मिळते?. याबाबत मायनर,सब मायनर, ब्रँच कॅनॉलवाईज आणि कॅनॉलमधून पाणी लिफ्ट केलेला डाटा मी काढलेला आहे. त्याठिकाणी 62 हजार हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्राला त्या पीएलपीसीमधून कधीही पाणी मिळाले नाही. कॅनॉल निर्मितीपासून, आणि धरण निर्मितीपासून 30 हजार हेक्टरला तर पाणीच मिळालेच नाही. तसेच, 40 हजार हेक्टरचा एरीया असा आहे की, ज्याठिकाणी पाणी मिळू शकते पण डिझाईन डिसचार्ज कॅनॉलमध्ये नसल्यामुळे आणि तो डिसचार्ज चोकअप झाल्यामुळे ते पाणी मिळाले नाही. आपण जर अडीच लाख एकरला पाणी दिले तर तेथील शेतीला अधिक पाणी मिळू शकते. तरीसुध्दा दोन्ही कॅनॉलचे मिळून पाणी शिल्लक राहते. त्यामधून जर आठ पाळया पाणी दिले तर 350 कोटींचे कृषी उत्पादन होईल. आणि शासनाला प्रोसेसिंग टॅक्सेशनमधून दरवर्षी 70 कोटींचा टॅक्स मिळेल. आणि साधारणत: 1 ते 2 लाख लोकांकरिता नवीन रोजगार निर्मिती होऊ शकेल एवढे पोटेंशिअल या जायकवाडी कॅनॉलमध्ये आहे. मी आपल्याला पीएलपीसीचे उदाहरण याकरिता देतो की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

श्री.श्रीकांत जोशी..

त्यामध्ये जवळपास 75 टक्के कमांड एरीया आहे, पीआरपीसीचा 132 कि.मी.चा कमांड एरीया असून त्यामध्ये 45 हजार हेक्टर इरिगेशन आहे. त्या पीआरपीसीमध्ये माजलगाव डॅम भरण्याची क्षमता आहे. तेथील डिझाईन डिसचार्ज 2400 क्युसेसचा आहे. डिपार्टमेंटकडून 1000 क्युसेसचा डिसचार्ज सांगितला जातो. परंतु आजही बऱ्याच ठिकाणी 600 ते 700 क्सुसेसच्या पुढे डिसचार्ज होऊ शकत नाही. सभापती महोदय, त्याठिकाणी काळया मातीचे कॅनॉल असून त्याकरिता आपण जोपर्यंत चांगल्या प्रकारचे तंत्रज्ञान वापरुन 100 टक्के कॉंक्रिट आणि त्याच्या शेजारी रस्ता करणार नाही तोपर्यंत हे कॅनॉल टिकणार नाहीत. दरवर्षी आपण कॅनॉलच्या दुरुस्तीसाठी 50, 60, 70, 80 कोटी रुपये खर्च करतो. आज कडा, औरंगाबाद डिव्हिजन यांचेकडून सिंचनची 52 कोटी रुपयांची पाणीपट्टी वसूल करण्यात आली आहे. आणि संपूर्ण मराठवाडा विभागामध्ये 80 ते 90 कोटी रुपये पाणी पट्टी वसूल झालेली आहे. दरवर्षी जायकवाडीच्या पाण्यामधून 50 ते 60 कोटी रुपये इतकी पाणी पट्टी वसूल होत आहे. यामध्ये एकदाच 400 ते 450 कोटी रुपये खर्च केले तर दरवर्षी मराठवाडयाचे कृषी उत्पादन 500 कोटींनी वाढणार आहे. आणि दरवर्षी किमान 1 ते दीड लाख लोकांना जास्त रोजगार मिळणार आहे. बरेच जण मला विचारतात की, तुम्ही पदवीधर मतदारसंघातील आमदार असतांना कॅनॉलच्या विषयावर प्रश्न कां विचारता? याचे मूळ कारण असे की,पदवीधर मतदार संघातील आमदार असल्यामुळे बेरोजगारी हे एक मोठे संकट आपल्याकडे निर्माण झाले आहे. या बेरोजगारीवर उत्तर म्हणजे नैसर्गिक साधनसंपत्ती वर्ल्ड कॉंपिटेटीव्ह करणे. त्यामुळे जर वर्ल्ड कॉंपिटेटीव्ह करावयाची असेल तर आपल्याला इरिगेशनची क्षमता वाढवून तेथील नैसर्गिक साधन संपत्ती जोपर्यंत वाढणार नाही तोपर्यंत याबाबत काहीही करुन उपयोग होणार नाही. आणि म्हणून गेली पाच वर्षे हा प्रश्न आम्ही पोटतिडिकीने मांडत आहोत. त्याच्या तांत्रिक बाबींमध्ये जाण्यापेक्षा माजलगाव डॅम भरणे, परळीच्या थर्मल पॉवर स्टेशनला पाणी मिळणे, जायकवाडी धरण परिसर हा आंतरराष्ट्रीय दर्जाचे एक टूरिझम सेंटर म्हणून डेव्हलप करणे. या सर्व गोष्टींचा विचार करण्यासाठी कधी नियम 93 ची सूचना देऊन तर कधी लक्षवेधी सूचना मांडून वेगवेगळया पध्दतीने आपण चर्चा केली आहे. मला हे समजत नाही की, एका बाजूला इरिगेशनकरिता 6 हजार कोटींचे बजेट असतांना, आणि या तीनही जिल्हयांचा बॅकलॉग काही शे कोटींचा असतांना आपण कॅनॉलच्या दुरुस्तीकरिता किरकोळ तरतूद करुन हे पैसे कां वाया

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

श्री.श्रीकांत जोशी..

घालवीत आहोत ? Whether you want to be a developed State? त्यामुळे असा वाया जाणारा पैसा जर त्यामध्ये खर्ची घातला असेल तर त्यामधून आपल्या हातामध्ये काय येणार आहे? म्हणून यामधून माझी अशी मागणी आहे की, 450 कोटी रुपयांच्या कॅनॉलच्या संपूर्ण कॉंक्रिटीकरणाला प्राधान्य दिले पाहिजे. आम्ही परवा स्वित्झर्लंडला गेलो होतो, त्याठिकाणी ज्या पध्दतीचे टनेलिंगचे आणि कॅनॉलचे झालेले काम आम्ही बघितले. एकदा जर आपण या कामामध्ये भरपूर पैसा खर्च केला तर पुढील 100 वर्षे त्या कॅनॉलचा टवका सुध्दा उडणार नाही. त्याकरिता त्यांचे स्ट्रक्चर आपल्याला दुरुस्त करावे लागतील. म्हणून माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, या पीएलपीसी आणि पीआरपीसी कॅनॉलच्या कॉंक्रिटीकरण करण्याच्या कामाला शासन प्रशासकीय मान्यता देणार आहे काय? जर आपल्याला मान्यता द्यावयाची असेल तर पीएलपीसीला प्राधान्य दिले गेले पाहिजे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KGS/ MMP/ पूर्वी श्री.सरफरे 11:30

श्री.श्रीकांत जोशी . . . .

लेफ्ट बँक कॅनॉलचे काम तातडीने करणार आहात काय ? त्याची स्ट्रक्चरल दुरुस्ती करणार आहात काय ? वरच्या भागातून पाणी सोडल्यानंतर स्ट्रक्चर बरोबर नसेल तर काय उपयोग आहे? स्ट्रक्चरमधून पाणी जेवढे जाणार आहे, तेवढेच ते पुढे जाणार आहे. मग अगोदर मागच्या बाजूला खर्च करुन काय उपयोग आहे ? म्हणून अर्धवट-अर्धवट खर्च करुन मराठवाडयातील पाण्याचे दुर्भिक्ष तसेच ठेवणे, मराठवाडयामधील मागासलेपणा तसाच ठेवणे आणि यामधून मराठवाडयाला पुढे येऊ न देणे अशा पध्दतीची शासनाची मानसिकता असण्याचे कारण नाही. म्हणून याठिकाणी अराजकीय पध्दतीचे, एक इंजिनिअर म्हणून शेमफूल वाटावे अशा पध्दतीचे काम तेथे चालू आहे. कारण तेथे विनाकारण पैसे वाया जात आहेत. मागच्या भागातील, पुढच्या भागातील दुरुस्ती झाल्याशिवाय मधल्या भागातील दुरुस्ती करुन काहीच उपयोग नाही. म्हणून मला असे सांगावयाचे आहे की, याबाबतीत मी थोडक्यामध्ये सर्व मुद्दे सांगितलेले आहेत. या विषयाच्या संदर्भातील उत्तर झाल्यानंतर मग मी 11 क्रमांकावरील अर्ध्या तासाची चर्चा उपस्थित करावी असे मला वाटते. त्यामुळे माननीय मंत्री महोदयांनी या विषयाच्या बाबतीत अगोदर उत्तर दिले तर बरे होईल एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

. . . .एस-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार (पाटबंधारे मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशीसाहेबांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे, तो त्यांनी आतापर्यंत सदनामध्ये बऱ्याच वेळेला मांडलेला आहे. खरे म्हणजे पैठण उजवा आणि पैठण डावा हे दोन्ही कॅनॉल काळया मातीतून गेलेले आहेत. त्यामुळे सुरुवातीला या कॅनॉलला लायनिंगच्या ऐवजी फरशी बसविलेली होती.नंतर ती निघाली. तसेच ज्या कपॅसिटीने कॅनॉल सुरु झाला पाहिजे, त्याची जी वहन क्षमता पाहिजे, त्या कपॅसिटीने चालत नाही. तेथे थोडेबहुत काम झाले, परंतु त्याबाबतीत म्हणावे तसे रिझल्टस् मिळाले नाहीत. हा कॅनॉल सतत सुरु रहातो. या कॅनॉलचे काम करावयाचे म्हटले तर त्याला क्लोजर दिला पाहिजे. यामध्ये काही अडचणी येत आहेत. परंतु आता आपल्या समोर नवीन टेक्निक आलेले आहे, तसेच नवीन अत्याधुनिक यंत्रणेचा वापर करुन, जोशीसाहेब, आम्ही एकदम या दोन्ही कॅनॉलचे काम हाती घेणार नाही. सन्माननीय सदस्यांचा इंटरेस्ट पैठण डावा कालवा यामध्ये असल्याचे दिसत आहे. परंतु पैठण उजव्या धरणाचे पाणी माजलगाव धरणामध्ये जाते आणि दोन्ही ठिकाणी काम केले पाहिजे. सुरुवातीला माझ्या विभागाने जे काही ठरविलेले होते, त्याच्या मताशी मी देखील होतो. परंतु 1 ते 25 आणि 26 ते 60 अशा प्रकारच्या कि.मी.मध्ये सन्माननीय सदस्य सांगत आहेत, तशा प्रकारचे फेवर लायनिंग करण्यासाठी किंवा आणखी काही मशिनरीच्या माध्यमातून लायनिंग करण्यासाठी जलसंपदा विभागामार्फत निर्णय घेऊ. तशा प्रकारे एकदा पैठण उजव्या कालव्याचे काम करुन, मधल्या भागामध्ये जी बांधकामे असतील त्यामधून देखील व्यवस्थितपणे पाणी वाहत आहे की नाही हे सर्व तपासण्यात येईल. या सर्व बाबी पैठण उजवा कालाव्याच्या बाबतीत यशस्वी झाल्या तर आम्ही पैठण डाव्या कालव्याचे काम हातामध्ये घेऊ. परंतु सन्माननीय सदस्यांची आग्रही मागणी आहे. एक गोष्ट खरी आहे की, ज्या जिल्हयातून पाणी जात आहे मग तो औरंगाबाद असेल, जालना असेल किंवा बीड जिल्हयामधील माजलगाव असेल, अशी स्थिती आहे की, जेव्हा जायकवाडी धरण भरते, त्यावेळी पाणी जास्त वाहत नसल्यामुळे जेवढया कमी वेळामध्ये माजलगाव धरण भरावयास पाहिजे, तेवढे भरले जात नाही. परंतु आपण देखील एक अडचण लक्षात घेतली पाहिजे की, या कॅनॉलला क्लोजरची मर्यादा आहे आणि ती लक्षात घेऊन त्यामध्ये मोठा कॉन्ट्रॅक्टर नेमून, सन्माननीय सदस्यांनीही असे सुचविले की, एकच मोठा कॉन्ट्रॅक्टर नेमून एकच टेंडर काढले तर तो तेथे कामासाठी जास्त मशिनरी लावू शकेल. असा विचार करुन पहिल्यांदा पैठण उजव्या कालव्या बाबतीत निर्णय घेतला जाईल. तो यशस्वी झाला तर डाव्या कालव्याच्या बाबतीत राज्य शासन ती भूमिका स्विकारील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, मला माननीय मंत्री महोदयांना एकच विनंती करावयाची आहे. माजलगावमध्ये माननीय पाटबंधारे मंत्री श्री.अजितदादा पवार आले होते. त्यावेळी त्यांनी असे सांगितले की, आम्ही राईट बँक कॅनॉलचे काम ताबडतोब करु आणि त्या भागाचा पर्यटन स्थळ म्हणून विकसित करु. याठिकाणी आता राईट बँक कॅनॉलच्या दुरुस्तीची योजना हाती घेत आहोत असे त्यांनी सांगितले. त्याबद्दल मी त्याचे आभार मानते. तसेच आम्हाला तेथे एक पर्यटन स्थळ विकसित होण्याच्या दृष्टीने लवकरात लवकर सुविधा उपलब्ध होतील अशी अपेक्षा व्यक्त करते.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, याबाबतीत सांगावयाचे तर मी मागे देखील सांगितले होते की, माजलगाव धरणाच्या शेजारीच जागा उपलब्ध आहे. चांगली साईट आहे, शहराला लागून आहे. जर आपल्याकडे बी.ओ.टी.तत्वावर काम करणारी व्यक्ती असेल तर त्याप्रमाणे देखील काम देण्याच्या बाबतीत आमची तयारी आहे. खरे तर जायकवाडी धरणाच्या शेजारी जी गार्डन आहे, त्या संदर्भात खासदार माननीय श्री.धूतसाहेबांनी पुढाकार घेतला पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी देखील त्यांच्याशी याबाबतीत बोलावे. मी देखील त्यांच्याशी बोलणार आहे. कारण ते स्वत: त्या भागातील आहेत. यामध्ये जर मोठया उद्योगपतींनी लक्ष घातले तर एक चांगल्या प्रकारे पर्यटनाच्या दृष्टीकोनातून तो परिसर विकसित होऊ शकतो.

यानंतर कु.गायकवाड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : कृष्णा मराठवाडा प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव प्रलंबित असणे

मु. शी. : कृष्णा मराठवाडा प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव प्रलंबित असण्यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी विपस यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री. श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो.

"कृष्णा मराठवाडा प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता देण्यासाठी प्रस्ताव शासनाकडे अनेक महिन्यांपासून प्रलंबित असल्यामुळे मराठवाड्याच्या हक्काचे पाणी मराठवाडयास मिळण्यास होत असलेला विलंब, यामुळे मराठवाड्यातील जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

सभापती महोदय, या अर्धातास चर्चेचा विषय हा मराठवाडयाच्या अस्मितेशी संबंधित आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या बऱ्याच भाषणामध्ये असे म्हटले आहे की, 21 टीएमसी ऐवजी सुतासकट 25 टीएमसी पाणी देण्यात येईल. परंतु त्यापैकी केवळ 19 टीएमसी पाण्याला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. त्यामुळे बीड जिल्हयाला जे उर्वरित 60 टीएमसी पाणी मिळणार आहे त्यास प्रशासकीय मान्यता कधी देण्यात येणार आहे ? कुकडी किंवा भिमा नदीमधून ग्रॅव्हीटी फोर्सने पाणी आणण्याचा अभ्यास पूर्ण झालेला आहे काय ? खरे तर लिफ्टिंगने पाणी आणणे अवघड आहे. त्यामुळे याबाबतच्या कोअल्टरनेटीव्हचा विचार आपण करावा असे मी या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो.

सभापती महोदय, 2003 -04 साली 2360 कोटी रुपयांच्या कामाला प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. या प्रकल्पाची कॉस्ट आज 5 हजार रुपयांपेक्षा अधिक आहे. परंतु सध्या केवळ 20 कोटी रुपयांची प्रोव्हीजन केलेली आहे. ज्या प्रमाणात कॉस्ट वाढत आहे त्या प्रमाणात प्रोव्हीजन वाढविण्यात आलेली नाही. त्यामुळे हा प्रकल्प 100 ते 125 वर्षामध्ये पूर्ण होईल की नाही असा प्रश्न आमच्या मनामध्ये निर्माण झालेला आहे. चौथ्या, पाचव्या पिढीला तरी या प्रकल्पाचा

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी...

फायदा मिळेल काय अशी टिका याबाबत होत आहे. मराठवाडयाच्या प्रकल्पाची टिंगल होणे योग्य नाही. ही बाब अत्यंत गंभीर आहे. या प्रश्नाच्या बाबतीत 160 टीएमसी पाणी देण्याचा निर्णय यापूर्वी लवादाने घेतला होता. त्या नुसार हे पाणी मिळणार आहे काय असे मी आपणास विचारु इच्छितो.

सभापती महोदय, कृष्णा खोरे प्रकल्पातील 560 कोटी वापरुन झालेले आहे. आता उर्वरित 60 ते 70 टीएमसी पाणी मिळण्याकरिता प्रयत्न सुरु आहे. हे पाणी मिळेल असे गृहीत धरले तरी देखील उजनी धरणामध्ये पाणी आल्या नंतर ते पाणी देण्यात येणार आहे. मराठवाडयातील प्रकल्पामधून 19 टीएमसी पाणी देण्याची टेंडरींग प्रायोरीटी झालेली आहे. उजनी धरणामध्ये ताबडतोब पंप हाऊस झाले पाहिजे तेथे पाईपलाईन लावून त्या जिल्हयातील लोकांना पाणी मिळाले पाहिजे अशी आमची मागणी आहे. सध्या केवळ दोन धरणांची उंची वाढविण्याकरिताच मंजुरी देण्यात आलेली आहे. मी माननीय मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, या धरणातील पंप हाऊस सुरु करण्याचे टेंडर देण्यात येणार आहे काय ? तसेच मराठवाडयाला उजनी धरणामधून पाणी देण्याबाबत शासनाकडून सकारात्मक भूमिका घेतली जाणार आहे काय असा माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. माननीय मंत्री महोदयांना आमची व्यथा समजलेली आहे असे मला वाटते. मराठवाडयाला भविष्यात कधी पाणी मिळणार नाही अशी चेष्टा होता कामा नये. हजार कोटी रुपयांचे इयरमार्क मराठवाडयाला मिळाले तर ज्यावेळी 2009 नंतर बॅकलॉगचे सर्व पैसे संपतील त्यावेळी हा निधी त्याठिकाणी वळविला जाईल. त्यामुळे यासंदर्भात निधीचे नियोजन करण्यात येणार आहे काय याचे देखील माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार (जलसंपदामंत्री): सभापती महोदय, लोकशाही आघाडीच्या शासनाने या संदर्भात अत्यंत महत्वाचा निर्णय घेतलेला आहे. त्याबाबत समाधान व्यक्त करावयाचे सोडून हे असे होईल काय, तसे होईल काय असे प्रश्न येथे विचारले जात आहेत. त्यामुळे चांगला निर्णय घेऊनही निगेटीव्ह विचार केला जात आहे. हे बरोबर नाही. उजनी धरणामधून पाणी उचलले जात असताना कृष्णा खोऱ्यामधील लोकांना नक्की माहिती नाही. त्यामुळे आमचे पाणी तेथे का वळविले आहे अशा प्रकारचे प्रश्न ते विचारीत आहेत. तरी दखील मराठवाडयाला 25 टीएमसी पाणी देण्याचा निर्णय लोकशाही आघाडी शासनाने घेतला आहे. माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख व माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर. पाटील यांनी हा निर्णय घेतला आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांना मी सांगू इच्छितो की, वीर आणि निरा देवधर या धरणाबाबत विचार करता दर वर्षी 30 ते 40 टीएमसी पाणी निरा नदीमधून वाहून जाते. इंदापूर जिल्हयामध्ये निरा नदीवर एक टनेल काढण्याचा विचार सुरु आहे. हा टनेल उजनी नदीच्या जवळ आहे. पावसाळयामध्ये या टनेल मधून उजनी धरणामध्ये पाणी सोडण्यात येणार आहे. तसेच उजनी धरणाचे काही पाणी सोलापूर जिल्हयाला व बॅकलॉगचे काही पाणी नगर व पुणे जिल्हयाला मिळणार आहे. या भागातही ऊसाचे क्षेत्र मोठया प्रमाणात आहे. तेथील लोकांच्या हक्काच्या पाण्यावर कोणताही परिणाम होऊ नये तसेच मराठवाडयाला मंजूर केलेले पाणी देता आले पाहिजे यासाठी कृष्णा मराठवाडा प्रकल्पाला दिनांक 23/8/2007 रोजी 2382 कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

यानंतर श्री. बरवड..

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. अजित पवार .....

यामध्ये जवळपास 92 हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आणणार आहोत. आपल्या उपसा सिंचन योजना त्या ठिकाणी कराव्या लागणार आहेत. त्यात पहिल्या टप्प्यामध्ये भूम, परांडा, कळंम, वाशीम, उस्मानाबाद या ठिकाणी 53 हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आणणार आहोत. दुसऱ्या टप्प्यातील उपसा सिंचन योजनेमध्ये त्या ठिकाणी तुळजापूर, उमरगा, लोहारा या तालुक्यातील जवळपास 38 ते 39 हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आणणार आहोत. एक गोष्ट खरी आहे की, हे पाणी नेत असताना फ्लोने पाणी नेता येत नाही. मात्र टनेलमधून निरा नदीतून उजनी धरणामध्ये पाणी जाते. टनेलने हे पाणी आल्यानंतर आम्ही पहिली उपसा सिंचन योजना त्या ठिकाणी करणार आहोत. ती साधारणत: साकत धरण आणि कुथलगिरीक्षेत्र म्हणजे उजनी जलाशयावर सिना कोळेगाव धरण आहे हे आपल्याला माहीत आहे, त्या ठिकाणी आपला पाणी वापर 11 टीएमसी आहे. धरणाची उंची, स्टेज 5 यामध्ये अश्वशक्ती मोठ्या प्रमाणावर लागते. ही गोष्ट खरी आहे की, यामध्ये लाईट बिल कोण भरणार हा प्रश्न आहे. परंतु आम्ही पहिल्यांदा सांगितले होते की, 1 रुपया 5 पैसे प्रती युनिट प्रमाणे लाईट बिल येईल आणि तसा दर आकारुन किंमत 77 कोटी रुपये आलेली होती. परंतु आता राज्य शासनाने कॅबिनेटमध्ये निर्णय घेतलेला आहे. आमच्या विभागाचा तो प्रस्ताव आता कॅबिनेटपुढे येईल आणि त्याला मान्यता दिली जाईल की, शेतकऱ्यांच्या सहकारी उपसा सिंचन योजनेला एमईआरसी जो दर लावते त्याच दरामध्ये आपल्या राज्य शासनाच्या असणाऱ्या लिफ्ट चालवावयाच्या. तसा विचार केला तर हे 77 कोटी रुपयांचे बिल 22 कोटी रुपयांवर येईल. त्या ठिकाणी बऱ्यापैकी रिलिफ आपल्याला मिळणार आहे. उपसा सिंचन योजना क्रमांक 2, भीमा सिना जोड कालवा यामध्ये सिना नदीवरुन घाटने बंधाऱ्यामधून आम्हाला उपसा करावयाचा आहे. पांधरवाडी, रामदरा या ठिकाणी आम्ही ते पाणी नेत आहोत. रामदरा साठवण तलाव आणि सोनगिरी नवीन साठवण तलाव या दोन तलावांच्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे की, मी भूमिपूजनाला येणार आहे. अधिवेशन संपल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांची तारीख घेणार आहोत. एक काम 55 कोटी रुपयांचे आहे आणि दुसरे काम 45 कोटी रुपयांचे आहे. ही दोन्ही कामे त्या ठिकाणी तातडीने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार .....

सुरु केली जातील. या दोन्ही स्टेजच्या पहिल्या तीन टप्प्यांचे सर्वेक्षण जून, 2008 पर्यंत पूर्ण होईल. उर्वरित टप्प्याचे सर्वेक्षण डिसेंबर, 2008 पर्यंत पूर्ण करण्याचे जलसंपदा विभागाचे नियोजन आहे. घाटने बॅरेज 30 कोटी रुपये आणि पांधरवाडी उंची वाढविणे ही 30 कोटीची निविदा मे, 2008 मध्ये काढण्यात येईल. जेऊर बोगद्याची किंमत 150 कोटी रुपये आहे. ती निविदा ऑगस्ट, 2008 मध्ये काढण्याचे नियोजन आहे. सन्माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे आता जरी सन 2007-08 ला 5 कोटी रुपये सर्वेक्षणाकरिता तरतूद केली असली आणि 2008-09 मध्ये 44 कोटी रुपयांची तरतूद केली असली तरी पुढच्या काळामध्ये ही कामे गतीने करण्याकरिता अधिकची तरतूद आपण वाढवू शकतो. मागच्या दोन तीन वर्षाचा अनुभव लक्षात घेता जलसंपदा विभागाला दरवर्षी मार्चच्या बजेटमध्ये जी तरतूद होते त्यानंतर देखील पुरवणी मागण्यांमध्ये नागपूरच्या अधिवेशनामध्ये तरतूद वाढविण्यात आली. पावसाळी अधिवेशनामध्ये तरतूद वाढविण्यात आली. आणि अशा प्रकारे 6 हजार कोटी रुपये देत असताना यामध्ये आणखी कामे होण्याकरिता माननीय राज्यपालांची परवानगी घेऊन आणखी वेगवेगळ्या विभागाला तरतूद वाढविण्याचा प्रयत्न राज्य शासनाच्या विचाराधीन आहे. यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीमध्ये दोन दिवसांपूर्वी बैठक झाली. ते जर झाले तर मराठवाड्याला ॲडिशनल 100 कोटी रुपये मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे या कामाला कोठे तरी निधी कमी मिळेल, 4 पिढ्या काम चालेल अशा पध्दतीने सन्माननीय सदस्यांनी नाराजीने बोलू नये. इतका निगेटिव्ह ॲप्रोच आपण ठेवू नका. हे लोकशाही आघाडीचे सरकार पॉझिटिव्ह ॲप्रोच ठेऊन चालणारे सरकार आहे. आता कोणतीही निवडणूक वगैरे नाही. नाही तर निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन कोठे तरी नारळ फोडावयाचा, भूमिपूजन करावयाचे आणि निवडणुकीमध्ये मते पदरात पाडून घ्यावयाची असेही आमचे धोरण नाही. आता लोकसभेच्या आणि विधानसभेच्या निवडणुकीला अवकाश आहे. पण लोकशाही आघाडी सरकारने इकडून 19 टीएमसी पाणी आणि 6 टीएमसी पाणी बीड जिल्ह्याला देण्याकरिता शब्द दिला होता त्याला आम्ही कृष्णा मराठवाडा प्रकल्प भाग दोन असे म्हटले आहे त्यामध्ये 6 टीएमसी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/

श्री. अजित पवार .....

पाणी आहे आणि आपण म्हणता त्याप्रमाणे ते पाणी फ्लोने आणले तर खर्च कमी होईल. तसाही प्रयत्न आम्ही केला. काही ठिकाणी एका खोऱ्यातून दुसऱ्या खोऱ्यामध्ये टनेलच्या माध्यमातून पाणी नेलेले आहे. यामध्ये मात्र आम्हाला उपसा सिंचन योजनेतून पाणी न्यावे लागत आहे. बीड जिल्ह्याला 6 टीएमसी पाणी नेण्याकरिता त्याची एकंदरीत किंमत 1430 कोटी रुपये येत आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार....

त्यामध्ये भीमा नदीवर पेडगाव येथे कोल्हापूर पध्दतीचा बंधारा बांधला आहे. हा स्त्रोत निवडलेला आहे. त्याच्यातील 6 टीएमसी पाण्याच्या प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनाला सादर झाला नाही. परंतु प्राथमिक निरीक्षणाचा अहवाल सादर झाला आहे. तो अहवाल सादर झाल्यावर त्यांना पूर्व सूचना दिल्या जातील की, प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव लवकर सादर करावा. जेणे करुन उस्मानाबाद जिल्हयातील या 8 तालुक्यांना कृष्णा प्रकल्पाच्या निमित्ताने पाणी घेऊन जाता येईल. तशाप्रकारे बीड जिल्हयातील आष्टी व पाटोदा या दुष्काळी तालुक्यांना त्यांचे हक्काचे पाणी देण्यासंबंधी 100 टक्के निर्णय जलसंपदा विभाग घेईल. मराठवाडयातील बहुतांश बॅरेजेस् अंतिम टप्प्यामध्ये आले आहेत. एआयबीपीच्या माध्यमातून 965 कोटीचा निधी मिळण्यासाठी माननीय पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग, माननीय श्री.शरद पवार या सगळयांनी मदत केली आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदा जवळपास 1000 कोटी रुपयांची तरतूद एआयबीपीसाठी करण्यात आली आहे. हा निधी जमा सुध्दा झालेला आहे. खरे तर उपसा सिंचना योजना एआयबीपीमध्ये समाविष्ट केल्या जात नाहीत. कदाचित केंद्र सरकार धोरण बदलण्याची शक्यता आहे. परंतु अवर्षण प्रवण तालुक्यांमध्ये पाणी जात असल्यामुळे पण एआयबीपीमध्ये हा प्रकल्प घालावा लागला तरी त्यासाठी निधीची कमतरता भासणार नाही. त्यादृष्टीने जलसंपदा विभाग विचार करीत आहे. त्यामुळे उस्मानाबाद व बीड जिल्हयाला त्यांच्या हक्काचे पाणी देण्याचे कामकाज चालू आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

<u>अर्धा-तास सूचनासंबंधी</u>

उपसभापती : आजच्या कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेल्या क्रमांक 8, 9 व 13 वरील अर्धा-तासाच्या चर्चा सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त अनुपस्थित असल्यामुळे घेण्यात येणार नाहीत.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, या अर्धा-तासाच्या चर्चा कधी घेण्यात येतील ?

उपसभापती : आता होणार नाहीत.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

पृ. शी. : शासनाने ठाणे जिल्हयात शिष्यवृत्तीच्या रकमेत व संच संख्येत केलेली अपुरी वाढ

मु. शी. : शासनाने ठाणे जिल्हयात शिष्यवृत्तीच्या रकमेत व संच संख्येत केलेली अपुरी वाढ यासंबंधी श्री.रामनाथ मोते, वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"गुणवान विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी पूर्व माध्यमिक व माध्यमिक विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षेद्वारे खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती 1954-55 पासून राज्यात कार्यान्वित असणे, 1995-96 पासून शिष्यवृत्तीच्या रकमेत व संच संख्येमध्ये वाढ करण्याचा निर्णय झाला नाही, वार्षिक शिष्यवृत्ती अनुक्रमे 250 रुपये व 400 रुपये एवढी असणे, राज्यात पूर्व माध्यमिक स्तरावर 3954 संच व माध्यमिक स्तरावर 3814 संच मान्य असणे, 14 फेब्रुवारी, 2007 च्या शासन निर्णयानुसार संच संख्या व शिष्यवृत्तीची वाढ करण्याचा निर्णय घेतला असून प्रत्येक जिल्ह्यात संच संख्या दुप्पट केली असणे, संच संख्या वाढविताना जिल्ह्यातील विद्यार्थी संख्येचा विचार न करणे, ठाणे जिल्हा राज्यात सर्वात मोठा जिल्हा असून 6 महानगरपालिका व 10 पेक्षा अधिक नगर परिषदा असूनही ठाणे जिल्हा ग्रामीणसाठी पूर्व माध्यमिक संच संख्या 236 केली असून शहरी विभागासाठी 120 असणे, माध्यमिक शिष्यवृत्ती संच संख्या ग्रामीण साठी 222 व शहरी भागासाठी 108 असणे, ठाणे जिल्ह्यातील विद्यार्थी संख्येचा विचार करता संच संख्या अल्प असणे, शिष्यवृत्तीच्या रकमेत केलेली वाढ नगण्य असणे, परीक्षेसाठी बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या व जिल्ह्याचा विस्तार विचारात घेता संच संख्या अपुरी असणे,त्यामुळे विद्यार्थी व पालक यांच्यामध्ये निर्माण झालेली नैराश्याची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

सभापती महोदय, पूर्वमाध्यमिक व माध्यमिक स्तरावर शासनाने शिष्यवृत्तीत वाढ करण्याचा निर्णय वर्षभरापूर्वी घेतलेला आहे. 1954-55 पासून ही योजना सुरु आहे. स्पर्धेच्या माध्यमातून या राज्यामध्ये शिष्यवृत्ती देण्यात येते. 1995-96 पर्यंत या रक्कमेमध्ये कोणतीही वाढ झालेली

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

श्री.रामनाथ मोते....

नाही. पूर्वमाध्यमिक व माध्यमिक स्तरावर शिष्यवृत्ती संच मंजूर केले आहेत त्याच्यामध्ये वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. परंतु दिनांक 14.2.2007 रोजी शासनाने संच संख्येत व शिष्यवृत्तीमध्ये चांगल्या प्रकारे वाढ केलेली आहे. पूर्वीच्या संच संख्येपेक्षा आता दुप्पट वाढ केली आणि शिष्यवृत्तीमध्ये सुध्दा वाढ केलेली आहे. पूर्व माध्यमिक स्तरावर 25 रुपयांऐवजी 75 रुपये दिले जात आहेत आणि माध्यमिक स्तरावर 40 रुपयांऐवजी 100 रुपये शिष्यवृत्ती देण्याचा चांगला निर्णय शासनाने घेतला आहे. विद्यार्थ्यांच्या संख्येचा किंवा लोकसंख्येचा विचार करुन प्रत्येक जिल्हयाला संच संख्या शासनाने मंजूर केली आहे का ? कोणत्या निकषाच्या आधारावर मंजूर केली आहे ते समजत नाही. कारण ठाणे जिल्हयाचा विचार केला तर संपूर्ण राज्यात सर्वात मोठा हा जिल्हा आहे. लोकसंख्येचा विचार केला तरी सुध्दा व विद्यार्थ्यांच्या संख्येचा विचार केला तरी हा फार मोठा जिल्हा आहे. तरी सुध्दा इतर जिल्हयांच्या मानाने या जिल्हयामध्ये पूर्वमाध्यमिक आणि माध्यमिक स्तरावर जी संच संख्या मंजूर केली आहे ती फारच कमी आहे असे मला वाटते.

नंतर श्री.शिगम

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रामनाथ मोते...)

सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यामध्ये 10 पेक्षा अधिक नगरपरिषदा आणि 15 तालुके आहेत. राज्यामध्ये कोठेही नाहीत इतक्या 6 महानगरपालिका या ठाणे जिल्हयामध्ये आहे. या ठाणे जिल्ह्यामध्ये पूर्वमाध्यमिक स्तरावर ग्रामीण भागासाठी 236 आणि शहरी भागासाठी 120, माध्यमिक स्तरावर ग्रामीण भागासाठी 222 आणि शहरी भागासाठी 108 संच मंजूर केलेले आहेत. सन 2001च्या आकडेवारीनुसारा ठाणे जिल्ह्याच्या विद्यार्थी आणि लोकसंख्येचा विचार केला तर ठाणे जिल्हयाची 2001ची लोकसंख्या 81 लाख 28 हजार इतकी आहे आणि पाहिली ते सातवीपर्यन्तची विद्यार्थी संख्या 9 लाख 87 हजार इतकी आहे. आपण तुलनात्मकदृष्टया नाशिकचा विचार केला तर नाशिकची लोकसंख्या फक्त 49 लाख आणि विद्यार्थ्यांची संख्या 5 लाख आहे. तेथील संच संख्या पूर्वमाध्यमिक स्तरावर ग्रामीण भागासाठी 254 आणि शहरी भागासाठी 124 आहे. माध्यमिकस्तरावर ग्रामीण भागासाठी 184 आणि शहरी भागासाठी 172 आहे. म्हणजे 49 लाख लोकसंख्येसाठी 172 आणि ठाण्यातील 81 लाख लोकसंख्येसाठी आणि 9 लाख विद्यार्थ्यांसाठी फक्त 108 संच आहेत. संपूर्ण राज्याची तपशीलवार माहिती मी वेळे अभावी देत नाही. परंतु तुलनात्मकदृष्टया अभ्यास केला तर असे लक्षात येईल की इतर जिल्ह्यांच्या मानाने लोकसंख्येच्या आणि विद्यार्थ्यांच्या संख्येच्या प्रमाणात ठाणे जिल्ह्याला मिळालेली संच संख्या कमी प्रमाणात आहे. या विषयाच्या संदर्भात माझे फक्त दोन स्पेसिफिक प्रश्न आहेत. ठाणे जिल्ह्यातील लोकसंख्या आणि विद्यार्थी संख्या विचारात घेऊन आपण संच संख्येमध्ये बदल करणार आहात काय ? संच ठरविण्याचे निकष काय आहेत आणि या निकषामध्ये बदल करण्यात येणार आहेत काय ? शिष्यवृत्ती अनुदान वर्षाच्या सुरुवातीला देणार आहात काय ? संच आणि शिष्यवृत्तीमध्ये वाढ करणार काय ? ग्रामीण भागातील विद्यार्थी हा मूलतः ग्रामीण भागातील असतो. परंतु गावामध्ये 7वी पर्यन्त शाळा नसल्यामुळे जी शाळा शहरी भागामध्ये मोडली जाते त्या शाळेमध्ये तो विद्यार्थी शिकत असतो. म्हणून अशा विद्यार्थ्याला तो ग्रामीण भागातील विद्यार्थी म्हणून शिष्यवृत्तीचा फायदा देणार आहात काय ? बरेचसे मुद्दे आहेत. परंतु वेळेअभावी मी येथेच थांबतो.

--

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, या संदर्भात मी एकाच वाक्यात उत्तर देऊ इच्छितो. कारण लोकसंख्येचा निकष लावायचा की विद्यार्थी संख्येचा निकष लावायचा ही बाब अतिशय महत्वपूर्ण आहे. ग्रामीण विद्यार्थी आणि शहरी विद्यार्थी हा देखील भेदाभेद होता कामा नये म्हणून एक अभ्यास गट तयार करुन दोन महिन्याच्या आत निर्णय घेण्यात येईल.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : अष्टविनायक स्थळांच्या ठिकाणी पालखीमार्गाच्या धर्तीवर सोईसुविधा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता

मु. शी. : अष्टविनायक स्थळांच्या ठिकाणी पालखीमार्गाच्या धर्तीवर सोईसुविधा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता यासंबंधी श्री. भास्कर जाधव, वि.प.स.यांच्या उपस्थित झालेली अर्धा-तास चर्चा.

श्री. भास्कर जाधव (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"राज्यातील अष्ठविनायक स्थळांच्या ठिकाणांची असलेली दुरवस्था, त्यामुळे देशभरातून तसेच परदेशातून येणा-या गणेश भक्तांचे होणारे हाल, या ठिकाणच्या सार्वजनिक आरोग्याबाबत निर्माण झालेलेय प्रश्नचिन्ह, या अष्टविनायक स्थळांना जोडणा-या रस्त्यांचा पालखीमार्गाच्या धर्तीवर विकास करण्याबाबत राज्यातील लोकप्रतिनिधी व जनतेने शासनाकडे वारंवार केलेली मागणी, राज्य शासनाने या अष्टविनायक तीर्थस्थळांना जोडणा-या रस्त्यांचा पालखीमार्गाचया धर्तीवर विकास करुन सोयीसुविधा उपलब्ध करण्याची नितांत आवश्यकता, या दृष्टीने शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना व कार्यवाही."

सन्माननीय सभापती महोदय, अष्टविनायक म्हणजे गणपतीची आठ तीर्थस्थाने आहेत हे आपणास माहीतच आहे. ही आठही तीर्थस्थाने संपूर्ण देशामध्ये प्रसिध्द आहेत. ही तीर्थस्थाने फार जुन्या काळी डेव्हलप करण्यात आली. आताची वाढलेली लोकसंख्या, भाविकांची वाढलेली संख्या याचा विचार केला तर या तीर्थस्थांनाच्या ठिकाणी उपलब्ध असलेल्या सोईसुविधा फार तुटपुंज्या आहेत. मग तेथे राहाण्याची सुविधा असेल, पाण्याची सुविधा असेल, मुतारी किंवा शौचालयाची सुविधा असेल, रस्त्यांची सुविधा असेल रेलिंगची सुविधा असेल, पाखाडयांची सुविधा असेल या

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. भास्कर जाधव....)

अपु-या आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर शासनाने जो पालखी रस्ता तयार केलेला आहे त्या पध्दतीने या अष्टविनायक स्थळांना जोडणा-या रस्त्यांचा पालखीमार्गाच्या धर्तीवर विकास करावा अशी या अर्धा-तास चर्चेच्या निमित्ताने शासनाला माझी विनंती आहे. ही गणपतींची 8 तीर्थस्थाने पूर्ण करण्यासाठी अडीच दिवस लागतात त्याच्या ऐवजी ती एका दिवसामध्ये पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने एक ठोस अशा प्रकारचा कार्यक्रम हातामध्ये घ्यावा. माझ्या माहिती प्रमाण यावर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये शासनाने त्यासाठी 10 कोटी रु.ची तरतूद केलेली आहे. या 10 कोटीचे शासन कशा पध्दतीने नियोजन करणार आहे ? केवळ या गणपतीच्या 8 देवळांकरिता, तीर्थस्थळांकरिताच या निधीचा उपयोग करणार आहे काय हे शासनाने थोडे विस्ताराने सांगावे. तसेच ही अत्यंत पवित्र अशी तीर्थस्थाने एका दिवसामध्ये पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासन कोणत्या सोईसुविधा उपलब्ध करुन देणार आहे आणि आता असलेल्या अडचणीवर मात करण्याकरिता निधीचे कसे नियोजन करणार आहे याचे खुलासेवार उत्तर शासनाने द्यावे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी (पर्यटन व विशेष सहाय्य राज्यमंत्री) : महाराष्ट्रामध्ये अष्टविनायकाची 8 तीर्थस्थाने आहेत. त्यासाठी पर्यटन विभागाने आतापर्यन्त 51.8 लाख रु. खर्च केलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे या अर्थसंकल्पामध्ये या 8 तीर्थस्थळांसाठी 10 कोटीची तरतूद केलेली आहे.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी....

या तरतुदीमधून सदर तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भक्तांसाठी पिण्याच्या पाण्याची सोय, टॉयलेट इत्यादी प्राथमिक सुविधा निर्माण करुन देण्यात येणार आहेत. 10 कोटी रुपयांचा एक प्रोजेक्ट तयार करण्यात येणार आहे. पुणे, रायगड आणि रत्नागिरी या तिन्ही जिल्हयातील स्थानिक आमदारांना विश्वासात घेऊन एक कन्सॉलिडेटेड प्रोजेक्ट तयार करणार असून सदरहू 10 कोटी रुपयांचा प्रोजेक्ट कशा पध्दतीने अंमलात आणावयाचा यासंबंधी एक या तिन्ही जिल्हयातील आमदारासमवेत एक बैठक घेण्यात येईल आणि सदर तीर्थक्षेत्राच्या विकासाच्या बाबतीत लवकरात लवकर निर्णय घेण्यात येतील.

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय मंत्री महोदय या तीर्थक्षेत्रातील विकासाची कामे करण्यासाठी स्थानिक आमदारांना बैठकीसाठी बोलावतील अशी अपेक्षा आहे. तीर्थक्षेत्रांचा विकास करण्यासाठी या अर्थसंकल्पात 10 कोटी रुपयांची तरतूद राज्य शासनाने केलेली आहे. ती तरतूद फक्त अष्टविनायक स्थळांचा विकास करण्यासाठी खर्च करण्यात येणार आहे काय ?

श्री. सुरेश शेट्टी : स्पेसिफिक या आठ तीर्थक्षेत्रांच्या विकास कामावरच ही तरतूद खर्च करण्यात येईल अशा प्रकारचे मी या ठिकाणी आश्वासन देतो.

उपसभापती : आता सभागृहाची बैठक स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.15 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक 11.56 ते 12.15 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

सभापतीस्थानी माननीय सभापती

पृ.शी./मु.शी. : तोंडी उत्तरे

सायन प्रतिक्षानगर येथील अल्पउत्पन्न गटातील घरांच्या किंमतीबाबत

(१) * ३७६०५ श्री. शरद रणपिसे , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. सुरेशदादा देशमुख , श्री.राजन तेली : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सायन प्रतिक्षानगर येथील ८ लाख ३१ हजार किंमतीच्या अल्पउत्पन्न गटातील घराची किंमत म्हाडाने १९ लाख २३ हजार इतकी ठरविण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे अल्प उत्पन्न गटातील लोकांनी स्वस्त दरात घर देण्याच्या शासनाच्या निर्णयाचे व नियमाचे उल्लंघन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर घरांची किंमत पूर्ववत ८ लाख ३१ हजार करण्याबाबत म्हाडाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अल्प उत्पन्न गटाचे ७००० मासिक उत्पन्नाची मर्यादा १००० इतकी नव्याने करण्यात आली आहे, हे खरे आहे काय, असल्यास ती पूर्ववत दर महा ७०००/- करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात आला आहे,

(५) प्रश्न भाग (३) व (४) बाबत कारवाई झाली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.विलासराव देशमुख : (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, म्हाडा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. टी.चंद्रशेखर यांनी म्हाडाच्या घरांच्या किंमतीचे दर रेडीरेकनरप्रमाणे ठरविण्याचे आदेश दिले होते हे खरे आहे काय ? याबाबतीत सद्यस्थिती काय आहे ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, प्रतिक्षा नगरमध्ये रेडीरेकनरप्रमाणे ३००० रु.चौ.फूट या दराने म्हाडाने अल्पभूधारकांसाठी दर लावला तर १४ लाख २४ हजार रुपये घराची किंमत होईल. पूर्वीची किंमत ८ लाख ३१ हजार आहे. या नवीन प्रस्तावित किंमतीमुळे सर्वसामान्य ग्राहकांना घरे घेणे शक्य होईल काय असा माझा मूळ प्रश्न आहे. खाजगी बिल्डर जे दर लावतात त्याप्रमाणे म्हाडा जर दर लावणार असेल तर गोरगरिब आणि मध्यमवर्गीयांना ही घरे घेणे कसे परवडणार आहे ? आज सदनामध्ये आमचे नेते आणि राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री तसेच गोरगरिबांचे कैवारी श्री. विलासरावजी देशमुख उपस्थित आहेत. त्यांना मी आपल्या माध्यमातून विनंती करतो की, त्यांनी याबाबत खुलासा करावा.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. राज्य सरकार आणि आघाडीचे सरकार हे नेहमीच गरिबांचे कैवारी म्हणून काम करीत आहे. ही गोष्ट खरी आहे की, म्हाडाच्या उपाध्यक्षांनी साधारणपणे म्हाडाचे उत्पन्न वाढावे या उद्देशाने एक पत्र संबंधित अधिकाऱ्यांना पाठविले होते. रेडी रेकनरप्रमाणे या घरांच्या किंमती किती होऊ शकतात याचा अंदाज घ्यावा, त्यातून जर अधिक पैसे म्हाडाला मिळणार असतील तर त्या संदर्भात विचार करावा. म्हाडाचे धोरण हे 1992 सालाचे आहे. कोणत्या घराच्या किंमती कशा ठरवाव्यात याचे प्रचलित धोरण हे ॲथॉरिटीने प्रस्ताव करुन केलेले धोरण आहे, ते पत्राने बदलता येत नाही. पत्राने असेसमेंट करता येऊ शकते. परंतु धोरण बदलता येत नाही. पत्र पाठविले असले तरी धोरण बदललेले नाही. राज्य सरकारने ठरविले आहे की, या संदर्भात म्हाडा जी काही घरे प्राधान्याने सामान्य माणसांसाठी, मध्यमवर्गीयांसाठी, कमी उत्पन्न गटासाठी आणि उच्च उत्पन्न गटांसाठी बांधते त्या बाबतीत 1992 सालची जी व्यवस्था आहे त्या व्यवस्थेमध्ये सध्या तरी कोणताही बदल केलेला नाही. त्यामुळे प्रतिक्षानगर असेल किंवा इतर म्हाडा कॉलनी असेल किंवा म्हाडाने घरे बांधली त्या संदर्भात 1992 च्या सर्क्युलरप्रमाणे जी रुढ पध्दत आहे, ती कायम राहील.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, एक अतिशय चांगला प्रश्न विचारला गेला आहे. मुंबई शहरामध्ये म्हाडाच्या इमारतीत राहणाऱ्या लोकांसाठी हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. 1992 साली औद्योगिक कामगारांचे उत्पन्न 3500 रुपये होते त्याची मर्यादा 7000 रुपयांपर्यंत वाढविली. 7 हजार रुपयांपर्यंत ज्यांचे उत्पन्न आहे तो पात्र ठरतो. म्हाडाने किंमतीबाबत नवीन निकष जाहीर केले काय? याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, तसा निर्णय घेतलेला नाही. अशा प्रकारच्या बातम्या बाहेर जातात त्याचवेळी शासनाकडून खुलासा केला गेला तर जनतेमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होणार नाही. प्रामुख्याने जे लोक राजकारणाशी निगडित नाहीत त्यांना फार त्रास सहन करावा लागतो. अशा अफवा पसरविणाऱ्या लोकांपासून सावध राहण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट्र शासनाचा गृहनिर्माण विभाग काळजी घेण्याचा प्रयत्न करील काय? सध्या औद्योगिक कामगार किती कमीत कमी उत्पन्न घेत असल्यास त्याला म्हाडाचे घर उपलब्ध होईल याचा माननीय मुख्यमंत्रीमहोदय खुलासा करतील काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37605.....

श्री.विलासराव देशमुख : प्रश्न पुन्हा विचारला जाईल का?

श्री.मधुकर सरपोतदार : पात्रता ठरविण्यासाठी औद्योगिक कामगारांचे उत्पन्न 3500 रुपयांवरुन 7000 पर्यंत वाढविण्यात आले. 7000 रुपये उत्पन्न हे सुध्दा आऊटडेटेड झालेले आहे. इंडेक्स फिगर वाढत असल्यामुळे डी.ए.वाढतो आणि पर्यायाने उत्पन्न सुध्दा वाढते. त्यामुळे ही मर्यादा 10 हजार रुपयांपर्यंत वाढवावी. मुंबई शहराच्या दृष्टीने हे उत्पन्न जास्त नाही. राहणीमान खूप ऊंचावले आहे. यादृष्टीने पुनर्विचार होईल काय? औद्योगिक कामगारांसाठी कमीत कमी उत्पन्नाची मर्यादा किती जाहीर करणार आहात? 1992 सालचा निकष सांगितला गेला. ज्यांना इंटरेस्ट असतो ते प्रयत्न करतात. 1992 साली निकष काय होते, ते केव्हापर्यंत कायम राहतील याचा खुलासा झाला तर अधिक चांगले होईल.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, जेव्हा अशा प्रकारच्या बातम्या वृत्तपत्रात प्रसिध्द होतात, तेव्हा कारण नसताना लोकांच्या मनामध्ये या प्रश्नाबद्दल चिंता निर्माण होते. विभागाच्या मुंबई बोर्डाने बैठक घेतली. त्या बैठकीत ठराव केला आणि त्यांनी सांगितले की, 1992 च्या धोरणामध्ये काहीही बदल करणार नाही. 1992 च्या धोरणात विकासकाला येणारा खर्च, जमीन संपादनाचा खर्च आणि बांधकामाचा खर्च एकत्रित करुन जी किंमत येईल त्यामध्ये मग म्हाडाचा काही नफा घ्यावा. या संदर्भात पूर्वी निर्णय असा घेतला की, 25 चौ.मी.चे घर बांधतो त्यामध्ये काही नफा घ्यायचा नाही. 30 चौ.मी.चे घर बांधतो त्यामध्ये काही नफा घ्यायचा नाही. 50 चौ.मी.च्या घरासाठी जी किंमत ठरते त्या किंमतीवर 15 टक्के नफा घ्यायचा.

(नंतर श्री.खर्चे.....

अशुध्दीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र.37605..... श्री. विलासराव देशमुख.....

आणि उच्च उत्पन्न गटामध्ये साधारणत: 50 टक्के नफा असे हे दर आहेत. 50 चौरस मीटरच्या वर असलेल्या क्षेत्रासाठी 25 टक्के आणि लोकेशन वगैरे चांगले असेल तर त्यात पुन्हा 10 टक्के जास्त नफा गृहित धरुन ते दर उच्च उत्पन्न गटासाठी आहेत. बाकी आर्थिकदृष्ट्या दुर्बल आणि एलआयजी घटकांसाठी जे निकष आहेत त्यात कुठलाही बदल केलेला नाही. पूर्वीच्या काळात उत्पन्नाची जी मर्यादा होती ती कमी होती त्यात आता वाढ झालेली आहे. म्हणून एलआयजी साठी 8 हजार ते 12 हजार, एमआयजीसाठी 12 ते 20 हजार आणि एचआयजीसाठी 20 हजारच्या वर असे आजचे धोरण आहे. आपण म्हटले की, यामध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे. हे खरे आहे कारण दिवसेंदिवस दरडोई उत्पन्न वाढत आहे आणि विशेष करुन मुंबईतील दरडोई उत्पन्नात आणि राज्यातील इतर भागापेक्षा असलेल्या दरडोई उत्पन्नामध्ये फरक आहे. त्यामुळे मुंबईचे धोरण संपूर्ण राज्याला आणू शकत नाही, इतर भागासाठी ही उत्पन्नाची मर्यादा वेगळीच ठेवण्यात येते म्हणून सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी सुचविलेली सूचना जरुर तपासून घेण्यात येईल, व हे धोरण शासन अवश्य स्वीकारेल. ज्या किंमती आमच्या हिशेबाप्रमाणे असतात त्या म्हणजे 2100 रुपये चौरस फूट एलआयजीसाठी, एमआयजीसाठी 2400 रुपये चौरस फूट आणि एचआयजीसाठी 2550 रुपये चौरस फूट अशा आहेत. रेडिरेक्नरमध्ये ह्या किंमती कन्व्हर्ट केल्या तर एचआयजीची किंमत 3000 रुपये चौरस फुटापेक्षा वर जाईल, परंतु आम्ही रेडिरेक्नरसंबंधीची सुधारणा स्वीकारलेली नाही. कारण शासनाचे धोरण हे गरिबांसाठी घरे बांधण्याचे आहे, ॲफोर्डेबल हाऊसिंग संबंधीचे धोरण असून तेच शासनाने स्वीकारले आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी आताच सांगितले की, जमिनीची किंमत आणि इतर बाबी यांचा विचार केला जातो. परंतु ह्या जमिनी शासनाने आज खरेदी केलेल्या नाहीत, पूर्वी खरेदी केलेल्या आहेत. म्हणून आजचे बाजारभाव न धरता ज्यावेळी जमीन ताब्यात आली त्यावेळचे भाव विचारात घेणे आवश्यक आहे. कारण शासन नफा मिळविण्यासाठी हे धोरण राबवित नाही. म्हणून सध्याचे बाजारभाव न ठरविता ही घरे देतांना जुने बाजारभाव विचारात घेऊन या घरांच्या किंमती लावणार काय ? तसेच एलआयजी व एमआयजीसाठी स्टँप ड्युटी नाममात्र आकारली जाईल काय ?

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37605.....

श्री. विलासराव देशमुख : महोदय, शासनाची जमीन असेल तर ती नाममात्र दरात दिलेली असते परंतु काही ठिकाणी म्हाडाने स्वत: जमीन संपादित केलेली आहे. अशी जमीन संपादित केल्यानंतर त्यात डेव्हलपमेंट, लेव्हलिंग वगैरे खर्च समाविष्ट करावा लागतो. यात जरी नफा मिळविण्याचा उद्देश नसला तरी ही जमीन विकसित करण्यासाठी जो खर्च आलेला असतो तो विचारात घ्यावाच लागेल. तसेच म्हाडाला दोन पैसे मिळाले पाहिजेत व त्यातूनच आपण हा कार्यक्रम राबवित असतो हा देखील उद्देश असतो. राज्यातील इतर भागात सुध्दा म्हाडाच्या वतीने घरे बांधण्याचा कार्यक्रम आपण घेत असतो. म्हणून म्हाडाला इतर उत्पन्नाची साधने शोधण्याचे काम आपण करीत आहोत व त्यासाठीच 2.50 टक्के इतका एफएसआय आपण दिलेला आहे. स्टॅम्प ड्युटीच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला आहे त्याबाबत मला असे स्पष्ट करावयाचे आहे की, याबाबतीत पूर्वीच काही निर्णय घेतलेले आहेत. विशेषत: जी घरे आम्ही एसआरए मध्ये देतो त्यांचे 25 चौरस मीटरच्या घरापर्यंत आपण नॉमिनल स्टँम ड्युटी घेतो परंतु सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी सूचना केल्याप्रमाणे एमआयजीसाठी असलेल्या घरांसाठी सुध्दा स्टँप ड्युटीमध्ये सवलत देण्याबाबत विचार करण्याच्या दृष्टीने बाब तपासून पाहिली जाईल.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

ता.प्र.क्र. : 37605 .....

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये हौसींग बोर्डाच्या मोठया कॉलनीज आहेत. या कॉलनीमध्ये स्लमची घरे आहेत, एचआयजी, एमआयजी घरे आहेत. ही घरे म्हाडा बांधून देणार आहे, खाजगी विकासक बांधुन देणार आहे असे शंकेचे वातावरण निर्माण झालेले आहे. त्यामुळे यामध्ये खरे कारण काय आहे? रिपेअर बोर्ड किंवा स्लम बोर्डाची घरें रिपेअर होत नाही ती कधी रिपेअर होणार आहेत?

श्री. विलासराव देशमुख : सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी जो प्रश्न विचारलेला आहे तो प्रश्न या प्रश्नाशी निगडीत नाही परंतु नवीन सदस्यांचे मनोधैर्य वाढावे यासाठी मी सांगू इच्छितो की, म्हाडाने ज्या कॉलनीज बांधलेल्या आहेत त्याना रि-डेव्हलपमेंट करण्याची गरज आहे. त्यामुळे अशा ठिकाणी रि-डेव्हलपमेंट कोणी करावे असा प्रश्न निर्माण झालेला आहे. रि-डेव्हलपमेंटचे काम खाजगी विकासकाने करावे की, म्हाडाने करावे असा वाद आहे. परंतु यासंदर्भात आम्ही जॉईंट व्हेंचरचे नवीन धोरण आखलेले आहे. खाजगी विकासक पुढे आला असेल तर त्यामध्ये खाजगी विकासकही राहील आणि म्हाडाही राहील कारण यामध्ये जमीन आमची आहे. त्यामुळे जॉईंट व्हेंचरने काम करावे असा विचार आहे त्यामुळे खाजगी विकासक पुढे आला तर त्यासोबत म्हाडा देखील काम करेल आणि जर खाजगी विकासक पुढे येणार नसेल तर म्हाडा स्वत: रि-डेव्हलपमेंटचे काम हातात घेईल. रिपेअर बोर्डाने ज्या गतीने दुरुस्ती करावयास पाहिजे त्या गतीने दुरुस्ती होत नसल्यामुळे यामध्ये गती वाढवण्याची आवश्यकता आहे या मताशी मी सहमत आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, रेडीरेकनर नसल्याबद्दल मी माननीय मुख्यमंत्री महोदयांचे स्वागत करतो. म्हाडामध्ये जसे उत्पन्न मर्यादेचे गट तयार केले परंतु सिडकोमध्ये तसे नाही. सिडकोमध्ये मध्यम उत्पन्नाचा गट 10 हजार रुपये ठेवला असल्यामुळे त्यांना घरे घेता येत नाही आणि खालच्या उत्पन्न गटासाठी तो पात्र होत नाही. त्यामुळे सिडकोतील उत्पन्नाचे गट आपण बदलणार आहात काय?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, ही बाब तपासून पहावी लागेल. सिडकोही वेगळी संस्था आहे. सिडको आणि म्हाडाचे उद्दिष्ट वेगवेगळे असल्यामुळे ही बाब तपासून पहावी लागेल.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 37605 .....

श्री. मधुकर सरपोतदार : मला माननीय मुख्यमंत्रीमहोदयांना आठवण करुन द्यावयाची आहे की, म्हाडाच्या वसाहती जुन्या आहेत. 50 वर्षापूर्वीच्या काही इमारती आहेत. मागे कन्व्हेयन्सच्या संदर्भात आपल्या बरोबर चर्चा झाली होती. त्यावेळी म्हाडाच्या उपाध्यक्षांनी असे सांगितले होते की, सहा महिन्यामध्ये कन्व्हेयन्सचे काम आम्ही पूर्ण करुन देऊ. परंतु या कामाला गती दिली गेली नाही, प्रत्यक्षात कन्व्हेयन्स झाले नाही. आता सोसायटया तयार झालेल्या असल्यामुळे जेव्हा ते कन्व्हेअन्स करावयास जातात त्यावेळी हौसींग बोर्ड आजची किंमत लावून त्यांना कन्व्हेअन्सचे भाव लावतात. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, जुन्या हौसींग बोर्डाच्या ज्या इमारती आहेत त्याची जर रि-डेव्हलपमेंट झाली तर सोसायटयांना कन्व्हेयन्स जुन्या दराने करुन नवे दर लावले जाणार याची काळजी घेतली जाईल काय?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, हा महत्वाचा प्रश्न असल्यामुळे यासंदर्भात सरकारने विचार केलेला आहे. यासाठी आम्ही अभय योजना आणत आहोत. यासंदर्भातील घोषणा बजेटमध्ये देखील करण्यात आलेली आहे. आजच्या किमती गृहीत धरल्या तर त्या व्यक्तिने त्याची जागा जरी विकली तर त्याची किंमत निघणार नाही.

श्री. संजय दत्त : माननीय मुख्यमंत्रीमहोदयांनी लोकाभिमुख भूमिका घेतली त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. अल्प उत्पन्न घरासाठी आकारण्यात येणा-या स्टँप डयूटी बद्दल सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी उल्लेख केलेला आहे. त्याच बरोबर ट्रान्सफर ऑफ टेनन्टचे शुल्क रद्द करुन किंवा कमी करण्याचा विचार शासन करणार आहे काय?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, घर जर कोणी ट्रान्सफर करीत असेल तर त्याला सवलत देण्याची काही गरज नाही. घर ट्रान्सफर करणारा त्याची योग्य ती किंमत वसूल करीत असतो. स्टँप डयुटीच्या रुपाने जर दोन पैसे शासनाच्या तिजोरीत येत असतील तर अशा गोष्टीला आपण पाठिंबा दिला पाहिजे.

अतारांकित प्रश्न / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने विकलेले वांद्रा-कुर्ला संकुलनातील भूखंड

(२) * ४१६४९ श्री. मधुकर सरपोतदार , श्री. अनिल परब , डॉ. दीपक सावंत , डॉ. निलम गोऱ्हे : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंतरराष्ट्रीय दर्जाचे आर्थिक केंद्र म्हणून बांद्रा-कुर्ला संकुलनाचा विकास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण करीत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बांद्रा-कुर्ला येथील एम.एम.आर.डी.ए.चे भूखंड, प्रति चौ.मि. दराने विकण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, बांद्रा-कुर्ला संकुलनातील जी. ब्लॉक येथील पाच भूखंडाच्या निविदा मागविण्यात आल्या, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, भूखंड विक्रितून मिळणाऱ्या कोट्यावधी रुपयांच्या निधीचा विनियोग मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरण कोणकोणत्या कामासाठी करीत आहे वा करणार आहे ?

श्री. राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता : (१) होय. वांद्रे-कुर्ला संकुलातील जी ब्लॉक हा आंतरराष्ट्रीय व वित्त व्यापार केंद्र म्हणून प्राधिकरण विकसित करीत आहे.

(२) होय, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे वांद्रे -कुर्ला संकुलातील जी ब्लॉकमधील अनुज्ञेय बांधकाम क्षेत्र हे प्रती चौ.मी. दराने उच्चतम निविदाकारास अधिमुल्य आकारुन वाटप करण्यात येते.

(३) होय. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने वांद्रे -कुर्ला संकुलाच्या जी ब्लॉकमधील पाच वाणिज्य भूखंडाच्या निविदा दिनांक ०८ डिसेंबर, २००५ साली मागविण्यात आल्या होत्या.

(४) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अशा भूखंड विक्रीतून मिळणाऱ्या निधीचा उपयोग मुंबई महानगर प्रदेशातील खालील दिलेल्या पायाभूत सुविधांच्या गुंतवणुकीच्या गरजांच्या पुर्ततेसाठी करीत आहे/करणार आहे.

मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प, मुंबई महानगर प्रदेशाच्या बाह्य क्षेत्रातील रस्ते सुधारणा, मुंबई महानगर रेल प्रकल्प, रेल्वे स्थानिक परिसरातील वाहतुक सुधारणा, स्काय वॉक एलिव्हेटेड शॉपिंग आणि हॉकर्स प्लाझा, मुंबई नागरी पायाभुत सुधारणा अंतर्गत उड्डाण पूल उभारणे, मुंबई महानगर प्रदेशात विविध ग्रोथ सेंटर्सची उभारणी, प्राधिकरणाच्या प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी भूमी संपादन व विकास केंद्र यासाठी, विशेष नियोजन प्राधिकरण क्षेत्रासाठी विकास योजना तयार करणे, घनकचरा व्यवस्थापनाकरीता क्षेत्र विकसित करणे, मुंबई महानगरप्रदेशातील पर्यावरण व्यवस्थापन, एकात्मिक ग्रामविकास योजना, निर्मल एमएमआर अभियान, पाश्चात्य पुनर्वसन सुविधा पुरविणे, नगरपरिषदांना अर्थसहाय्य, कार्यवाही संस्थांना कर्ज,मुंबई नागरी पायभुत सुविधा प्रकल्प तसेच विस्तारित मुंबई महानगर पायाभुत सुविधा प्रकल्प इत्यादि, वरील कार्यासाठी प्राधिकरणाच्या २००८-०९ या वर्षात ६४२६.३६ कोटी रुपये अर्थसंकल्पीय तरतूद प्रस्तावित केली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. गायकवाड....

ता.प्र.क्र41649..

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, बांद्रा कुर्ला कॉम्पलेक्सच्या संदर्भात हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. गेल्या दहावर्षापासून त्या भागाचा विकास झालेला आहे . त्या भागातील पर स्क्वेअर मिटरचा भाव पाच लाख रुपये एवढा आहे.या प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे लिहिले आहे की, इतर जी विकास कामे करावयाची आहे त्या कामासाठी हा निधी वापरण्यात येणार आहे.मला हे मान्य आहे परंतु या प्लॉटच्या बाजूला काही झोपडपट्टया आहेत आणि तेथे अनेक गैरसोयी आहेत तेव्हा त्या ठिकाणी प्रथम इनफ्रास्टक्चर उभे करण्यात येणार आहे काय ? अन्यथा या भावाने प्लॉट विकून मिळणारा निधी इतरत्र वापरला जाईल आणि तो भाग मात्र अविकसित राहील तेव्हा असे होणार नाही या दृष्टीने योग्य ती काळजी घेऊन कार्यक्रम आखण्यात येणार आहे काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय,एम.एम.आर.डी.ए.च्या क्षेत्रात जी काही जमीन येते त्या भागाचा सुध्दा म्हणजे एम.एम.आर.डी.ए.च्या रिजनच्या आतमधील भागामध्ये सुध्दा एम.एम.आर.डी.ए.चे पैसे वापरणें अनुज्ञेय आहे. त्या दृष्टीकोनातून आतल्या भागात जर झोपडपट्टया असतील तर त्या हद्दीपर्यंतचा विकास करण्याचे आणि तेथे इनफ्रास्टक्चर पुरविण्याचे काम एम.एम.आर.डी.ए.च्या वतीने केले जाईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, बांद्रा कुर्ला काम्पलेक्स भागाचा डेव्हलपमेन्ट करण्यात येत आहे. दोन तीन महिन्यामध्ये जी निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली होती त्यामध्ये दोन कंपन्यांनी प्लॉट घेतले होते. आपल्याला जी अपेक्षित किंमत होती त्या पेक्षा कमी भावाने या कंपन्याना प्लॉट देण्यात आले होते. बाजार भावापेक्षा कमी दराने त्यांना प्लॉट दिले होते. मी त्या कंपन्यांचा नावाचा येथे उल्लेख करु इच्छित नाही. परंतु कमी भावाने त्यांना प्लॉट देण्यात येण्याची कारणे काय आहेत ? या भागातील जमिनीचे भाव घसरत आहेत काय ? या संदर्भात बरीच चर्चा झाली होती. या प्लॉटचे जे अपेक्षित मूल्य होते ते आपल्याला मिळालेले नाही. ही गोष्ट माननीय मंत्री महोदय देखील मान्य करतील तेव्हा या मागची कारणे काय आहेत ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, त्यामध्ये पाच बिझनेस प्लॉटस कोणत्या ठिकाणचे आहेत किंवा काय दराने विकले गेले या संबंधी प्रश्न विचारण्यात आला असून त्याची माहिती मी देऊ शकतो. त्याचप्रमाणे जे राखीव अधिमूल्य होते, जी ऑफसेट प्राईस ठरविण्यात आली होती त्यापेक्षा प्रत्येक प्लॉट जास्त दराने विकण्यात आला आहे. प्रश्नामध्ये ज्या पाच प्लॉटसच्या संदर्भात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माहिती विचारण्यात आलेली आहे त्या पाचही प्लॉटचचे जे राखीव अधिमूल्य होते वा जी ऑफसेट प्राईस ठरविलेली होती त्यापेक्षा जास्त दराने प्लॉटस विकण्यात आलेले आहेत.

श्री.संजय केळकर : माननीय मंत्री महोदयांनी तपशीलवार उत्तर दिलेले आहे एम.एम.आर.डी.ए.च्या अंतर्गत कोण कोणत्या कामासाठी पैसे खर्च करण्यात आलेले आहे त्याचा उल्लेख उत्तरामध्ये करण्यात आला आहे. 2008-2009 मध्ये 6,426.36 कोटी रुपयांची अर्थसकल्पीत तरतूद प्रस्तावित केलेली आहे. मला असे विचारावयाचे आहे की मुंबई सोडून ठाणे जिल्हयातील निरनिराळया योजनांसाठी या रकमेपैकी किती रक्कमचा हिस्सा राहणार आहे ? एम.एम.आर.डी.ए. क्षेत्राच्या बाहेर एम.एम.आर.डी.ए.चा निधी सॉफट लोन म्हणून किंवा ठेव म्हणून काही निधी दिलेला आहे काय, दिला असल्यास तो किती दिला आहे ,कोणत्या ठिकाणी दिलेला आहे,या निधीची वसुली झ्ालेली आहे काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांचा नेहमीच असा प्रश्न असतो की एम.एम.आर.डी.ए.चे पैसे ठाण्यासाठी वापरण्यात येतील काय ? ठाणे असो रायगड असो वा एम.एम.आर.डी.ए.चे जे रिजन आहे त्या रिजनमध्ये बन्याचशा गोष्टी आपण करीत असतो. एनव्हायरनमेन्टच्या संदर्भात मिठी-पोयसर-दहिसर नदीच्या बाबतीत अभ्यास केला जात आहे. सगळयात महत्वाची बाब म्हणूंजे "एम.एम.आर. निर्मल अभियाना" अंतर्गत 30 हजार टॉयलेटस एम.एम.आर.डी.ए.च्या रिजनमध्ये बांधत आहोत. पुढच्या काळात आपण 2 लाख 25 हजार कोटी रुपयांचा बिझनेस प्लॅन तयार केलेला आहे. त्यामध्ये ठाणे आणि रायगड या जिल्हयांचासुध्दा अंतर्भाव करण्यात आला आहे. एम.एम.आर.डी.ए.कडून तो प्लॅन मंजूर होऊन शासनाकडे लवकरच येईल. विभाजन योग्य गुंतवणूंकीसंबंधी सांगावयाचे म्हणजे यासाठी एकूण 1 लाख 46 हजार 632 कोटी रुपये ठेवण्यात आले असून त्यात ठाण्यासाठी 38 हजार 42 कोटी रुपये, रायगड जिल्हयासाठी 18 हजार 926 कोटी रुपये, मुंबई शहर व उपनगर जिल्हयासाठी 90 हजार 664 कोटी रुपये मिळतील. अशा प्रकारे एम.एम.आर.डी.ए रिजनमध्ये सर्वकष विकास करण्याच्या दृष्टीने एम.एम.आर.डी.ए.च्या वतीने कार्यवाही केली जाईल.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आपण पुढील प्रश्न पुकारण्यापूर्वी मला एकच प्रश्न विचारण्याची संधी द्यावी ही विनंती आहे. माझा प्रश्न हा त्या परिसराच्या संदर्भातीलच आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी या संदर्भात उत्तर देताना सांगितले आहे की, एमएमआरडीएच्या रिजन मधील गोष्टी आहेत त्या आपण करू. आता मुंबईमध्ये अनेक झोपडपट्ट्या आहेत तेव्हा मुंबईतील सगळ्याच झोपडपट्ट्यांचा विकास एमएमआरडीए कडून केला जाईल अशी कोणाची अपेक्षा असेल तर ते शक्य नाही इतकेच मला सांगावयाचे आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्सच्या बाजूलाच पक्षी अभयारण्य आहे परंतु ते अभयारण्य आता दारूगुत्त्यांसाठी देखील अभयारण्य बनले आहे आणि दुसऱ्या बाजूला झोपडपट्टयांचे अतिक्रमण चालले आहे, वाढते आहे. तेव्हा या वांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्सला अभय द्यायचे असेल तर तुमच्या या निधीचा वापर करून मिठी नदीचा जो सगळा प्रवाह आहे तो सुशोभित करून त्याला वेगळे रूप देण्याचा आपण प्रयत्न करून त्या भागामध्ये जे अनधिकृत, अनावश्यक अतिक्रमण होत आहे त्यांचा बंदोबस्त शासन करणार आहे काय ?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, आपण यासाठी मिठी नदी डेव्हलपमेंट ॲथॉरिटी निर्माण केलेली आहे आणि त्याच्या वेळोवेळी बैठकाही घेतल्या आहेत तसेच यासाठी 1200 कोटी रूपयांचा निधीचा प्रस्तावही केंद्राकडे पाठविला आहे. मात्र त्या निधीची वाट न पाहता पहिल्यांदा त्या ठिकाणी नदीतील गाळ काढणे आणि या संबंधात नेमल्या गेलेल्या वेगवेगळ्या समित्यांनी शिफारस केल्याप्रमाणे, साधारणत: त्या ठिकाणी रूंदी किती असावी या बाबतीत कोणी ती 60 मीटर, काही ठिकाणी 80 तर काही ठिकाणी 100 मीटर सुचविलेली आहे. तेव्हा एमएमआरडीचा जो भाग आहे तेवढ्या भागातील कामे आपण हाती घेतलेली आहेत व टप्पा 2 ची कामेदेखील प्रगतीपथावर आहेत. त्या ठिकाणी आजूबाजूला झोपडपट्ट्या आहेत मात्र झोपडपट्टी सुधारणेचे काम एमएमआरडीए करीत नाही. त्यासाठी आपल्या अन्य योजना आहेत, त्यातील एसआरए योजनाही संबंधित ॲथॉरिटीकडे पोहोचल्या आहेत. अर्थातच ही गोष्ट खरी आहे की, कमर्शिअल डिस्ट्रिक्ट म्हणून हा भाग पुढे येत असेल तर त्याच्या आजूबाजूला असे चित्र असेल तर ते योग्य नाही या सन्माननीय सदस्यांच्या मताशी मी पूर्णपणे सहमत आहे. परंतु इतर मार्गांनी आपण हे काम करीत आहोत, ते काम गतीने करून हा सगळा परिसर सुशोभित करून तेथे पुन्हा

.... डीडी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विलासराव देशमुख (पुढे चालू.....) ता.प्र.क्र. 41649 ....

नव्याने अतिक्रमणे होणार नाहीत याची काळजी घेणे या दृष्टीने एमएमआरडीएच्या क्षेत्रात एमएमआरडीए निश्चितच प्रयत्न करील आणि त्यासाठी प्रसंगी काही कठोर, कडक कारवाई करावयाची झाल्यास तीही एमएमआरडीए घेईल इतकेच मी सांगतो.

***

..... डीडी 3 ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कायम विनाअनुदानित व विनाअनुदानित असा भेदभाव न करण्याचा मा. उच्च न्यायालयाचा निर्णय

(3) * 38050 प्रा. बी. टी. देशमुख, श्री. व्हि. यू. डायगव्हाणे, श्री. वसंतराव खोटरे : सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) "कायम विना अनुदानित" असा शब्द परवानगीपत्रात वापरल्याने "अशा शाळांना अजिबात अनुदान देणार नाही असा अर्थ लावता येणार नाही" असा निर्णय मा. मुंबई उच्च न्यायालयाने 2003 च्या याचिका क्रमांक 138 मध्ये दिनांक 8 एप्रिल 2005 रोजी दिला हे खरे आहे काय,

(2) केवळ "कायम विनाअनुदान" असा शब्द वापरल्याने असा भेदभाव करता येणार नाही व सर्व व्यावहारीक प्रयोजनासाठी परवानगी देतांना वापरण्यात आलेली "कायम विनाअनुदान तत्वावरील मान्यता" ही शब्दरचना "विनाअनुदान तत्वावरील मान्यता" अशीच वाचली पाहिजे व समजली पाहिजे असाही निर्णय मा. मुंबई उच्च न्यायालयाने सन 2005 च्या याचिका क्रमांक 8736 मध्ये दिला हे ही खरे आहे काय,

(3) खरे असल्यास, हा भेदभाव दूर करण्यासाठी शासनातर्फे काय कारवाई करण्यात आलेली आहे वा येत आहे,

(4) नसल्यास, याबाबत विलंब होण्याची कारणे काय आहेत ?

प्रा.वसंत पुरके : (1) व (2) होय.
(3) कायम विना अनुदान तत्वावरील शाळांना अनुदान देण्याबाबत निश्चित धोरण ठरविण्याच्यादृष्टीने सदरचा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात येत आहे.
(4) प्रश्न उद्भवत नाही.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, माझी आपल्याला व आपल्यामार्फत सदनालाही विनंती आहे की, परवाच्या दिवशीच नियम 93 खाली या विषयावर आपण निदेश दिल्यानुसार मी निवेदन केले होते आणि त्यावेळीही मी सविस्तर उत्तर दिले होते व विस्ताराने चर्चाही झाली आहे. तरी आपण ही बाब या निमित्ताने लक्षात घ्यावी.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय म्हणत आहेत ती गोष्ट बरोबर आहे. पण आपण त्यावेळी हस्तक्षेप केल्यामुळेच या प्रश्नाचा प्रवास पुढे गेलेला आहे, त्याबद्दल वाद नाही. आता या ठिकाणी आमच्या प्रश्न 1 मध्ये विचारलेल्या "'कायम विना अनुदानित' असा शब्द परवानगीपत्रात वापरल्याने 'अशा शाळांना अजिबात अनुदान देणार नाही असा अर्थ

.... डीडी 4 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख (पुढे चालू...) ता.प्र.क्र. 38050 ....

लावता येणार नाही.' असा निर्णय माननीय मुंबई उच्च न्यायालयाने 2003 च्या याचिका क्र.138 मध्ये दिनांक 8 एप्रिल, 2005 रोजी दिला हे खरे आहे काय ? " या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री महोदयांनी 'होय' असे उत्तर दिले आहे आणि त्यानंतर विचारलेल्या "केवळ 'कायम विनाअनुदान' असा शब्द वापरल्याने असा भेदभाव करता येणार नाही व सर्व व्यावहारिक प्रयोजनासाठी परवानगी देताना वापरण्यात आलेली 'कायम विनाअनुदान तत्त्वावरील मान्यता' ही शब्दरचना 'विनाअनुदान तत्त्वावरील मान्यता' अशीच वाचली पाहिजे व समजले पाहिजे असाही निर्णय माननीय मुंबई उच्च न्यायालयाने 2005 च्या याचिका क्रमांक 8736 मध्ये दिला हे खरे आहे काय ?" या प्रश्नाला देखील मंत्र्यांनी "होय" असेच उत्तर दिले आहे. म्हणजे या दोन्ही प्रश्नांना 'होय' असे उत्तर दिले आहे. परंतु हायकोर्टाने दिलेल्या निर्णयाची अमलबजावणी होत नाही अशा वेळी पीठासीन अधिकारी तरी काय करणार ? ते एवढेच सांगणार की, यावर तुम्ही कोर्टात अपील करा. तेव्हा मी या ठिकाणी केवळ एकच दोन ओळीचा प्रश्न विचारणार आहे. मागे देखील मी म्हटले होते की, माननीय मुख्यमंत्री योगायोगाने सभागृहात उपस्थित आहेत आणि आज देखील तो योग आलेला आहे. अर्थात योगायोगाने त्यांच्या प्रश्नांचा दिवस आणि शिक्षण खात्याच्या प्रश्नांचा दिवस एकच असल्याने ते सभागृहात उपस्थित आहेत आणि सभापती महोदय, हे दोन्ही विभाग एकाच दिवशी घेण्याचा आदेश आपला असल्याने आपल्यामुळेच हे घडले आहे. सभापती महोदय, या संदर्भात माननीय सभापतींनी सभागृहात काय सांगितले आहे ते मी आपल्या लक्षात आणून देऊ इच्छितो. त्यांनी असे सांगितले आहे की, "एक महिन्याच्या आत मंत्रिमंडळापुढे हा प्रश्न मांडण्यात यावा ...

(यानंतर श्री. सरफरे .... इइ 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख...

आणि मंत्रिमंडळाला माननीय उच्च न्यायालयाचे अधिकार दाखवून कायम हा शब्द कसा दूर होईल ही व्यवस्था करावी". सभापती महोदय, या संदर्भात माननीय उच्च न्यायालयाने दिलेले इंग्रजीमधील निदेश त्यावेळी वाचून दाखविले असल्यामुळे ते पुन्हा वाचून दाखवीत नाही. तेव्हा माननीय सभापतींनी केलेल्या सूचनेप्रमाणे एक महिन्याच्या आत यावर कारवाई केली जाईल काय?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, हा प्रस्ताव एक महिन्याच्या आत मंत्रिमंडळासमोर सादर केला जाईल.

प्रा. बी. टी.देशमुख : सभापती महोदय, असे नाही. नाही तर मला निषेध करुन सभात्याग करावा लागेल. सभापती महोदय, मंत्रिमहोदयांना शब्द बदलून उत्तर देण्याची संवय आहे.त्याकरिता मल्टिपल डिव्हायसेसचा वापर ते चांगला करतात. माझा पॉईंटेड प्रश्न मी याठिकाणी विचारु इच्छितो. त्याकरिता मला सभागृहाने संरक्षण दिले पाहिजे. सभापती महोदय,मंत्रिमहोदयांनी अशाप्रकारे उत्तर देणे ही गोष्ट बरोबर नाही, ही अनुचित गोष्ट आहे. म्हणून मी पॉईंटेड प्रश्न विचारतो की, "एक महिन्याच्या आत मंत्रिमंडळापुढे हा प्रस्ताव मांडण्यात यावा,आणि मंत्रिमंडळाला उच्च न्यायालयाचा निकाल दाखवून "कायम" हा शब्द कसा दूर होईल याची व्यवस्था करावी" अशाप्रकारे माननीय सभापतींनी दिलेल्या निदेशाप्रमाणे एक महिन्याच्या आत आपण ही कारवाई पूर्ण करणार काय?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, या सभागृहामध्ये एकच प्रश्न किती वेळा चर्चेला यावा हे सुध्दा ठरले पाहिजे. माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नानुसार एक महिन्याच्या आत कॅबिनेटपुढे प्रस्ताव सादर करण्यात येईल.

सभापती : मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की,एखादा विषय हा वेगवेगळया आयुधांच्या माध्यमातून चर्चेला येण्याची शक्यता असते.

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, आपले म्हणणे बरोबर आहे. या प्रश्नामध्ये "कायम विनाअनुदान" हे शब्द अंतर्भूत आहेत. त्यामुळे या प्रश्नावर कायम चर्चा होणारच.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, मी सुस्पष्ट उत्तर देतो की, माननीय उच्च न्यायालयाने"कायम विनाअनुदान तत्वाच्या ठिकाणी अनुदान तत्वाचे" असे वाचावे" असे निदेश दिले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ D/

ता.प्र.क्र. 38050...

प्रा. वसंत पुरके...

आहेत. त्यामुळे त्यासंबंधीचा प्रस्ताव एक महिन्याच्या आत मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात येईल. सभापती महोदय, याठिकाणी लेखी स्वरुपात दिलेले उत्तर काळजीपूर्वक दिलेले आहे. त्यामुळे या संदर्भातील माननीय उच्च न्यायालयाची भूमिका मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात येईल.

प्रा. बी. टी.देशमुख : सभापती महोदय,...

सभापती : याबाबतीत विषय गंभीर स्वरुपाचा असला तरी तो मंत्रिमंडळाच्या निदर्शनास आणून देणे बंधनकारक आहे. त्यामुळे या संदर्भातील निर्णय हा मंत्रिमंडळानेच घ्यावयाचा आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, त्याबद्दल वाद नाही. माननीय सभापतींनी त्या दिवशी जे निदेश दिले आहेत त्याप्रमाणे एक महिन्याच्या आत आपण कारवाई करणार काय?

प्रा. वसंत पुरके :सभापती महोदय, मी "होय" म्हटले आहे.आणखी किती वेळा "होय" म्हणावयाचे?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रुक्मिणीनगर मोर्शी, जि.अमरावती या शाळेने नगर परिषदच्या

ओपन प्लेसवर अतिक्रमण करुन ताबा घेतल्याबाबत

(४) * ४०८५३ श्री. जगदीश गुप्ता , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री.सागर मेघे :

सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शामराव गोमकाळे, माध्यमिक विद्यालय रुक्मिणीनगर मोर्शी, जि.अमरावती, या शाळेने नगर परिषदेच्या ओपन प्लेसवर अतिक्रमण करुन ताबा घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) सदर संस्थेला ७ ते ८ वर्षापूर्वी मोर्शी नगर परिषदेने नोटीस देऊन न्यायालयीन प्रकरण दाखल करुन न्यायालयाचे आदेशानुसार शाळेचे काही अतिक्रमण हटविले होते, हे खरे आहे काय,

(३) दिनांक १४ ऑगस्ट, २००७ ला नगर परिषदेचे बांधकाम सभापती ज्ञानेश्वर गुडथे हे त्याच शाळेवर शिक्षक आहेत, त्यांनी स्वत:च्या अधिकारात ठराव घेऊन लाखो रुपयांची जागा संस्थेला ५००० रु. दंड आकारुन दिली, न्यायालयाकडून प्रकरण मागे घेण्यास लावले, हे खरे आहे काय,

(४) सदर नगर परिषदेची लाखो रुपयांची जागा शामराव गोमकाळे शाळेला वापरण्यास देण्यांत आली, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणाची तक्रार माजी नगराध्यक्ष यांनी दिनांक १२ डिसेंबर, २००७ ला जिल्हाधिकारी यांचेकडे केली व दिनांक १३ डिसेंबर, २००७ रोजी लोकप्रतिनिधींनी सुध्दा तक्रार जिल्हाधिकारी यांचेकडे केली, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, तक्रारीवर, काय कार्यवाही करण्यांत आली वा करण्यांत येत आहे ?

प्रा.वसंत पुरके : (१) नाही.

(२) ८x१० फुट जागेतील न.प.चे ओपन स्पेसमध्ये केलेले अतिक्रमण संस्थेने स्वत:च काढून घेतले.

(३) बांधकाम सभापती श्री.ज्ञानेश्वरराव गुडधे यांनी स्वत:चे अधिकारात ठराव घेतला नसून नगर पालिकाने दिनांक ४.६.२००७ च्या विशेष सभेतील ठराव क्रमांक ८३ नुसार सर्वानुमते ठराव मंजूर करुन न.प.विरुद्ध असलेले न्यायालयीन प्रकरण संस्थेला रुपये ५०००/- दंड भरुन प्रकरण मागे घेण्यात आले.

(४) नाही.

(५) होय.

(६) प्राथमिक शाळेचे बांधकाम ओपन स्पेसवर असल्याबाबत शामराव गोमकाळे माध्यमिक विद्यालय मोर्शी ह्यांना नोटीस दिली होती. त्याविरुद्ध त्यांनी संचालनालयास व मोर्शी न्यायालयात प्रकरण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ D/

ता.प्र.क्र. ४०८५३...

प्रा. वसंत पुरके...

दाखल केले, त्यानुसार संचालनालयाने व न.प.मोर्शी. यांनी दिनांक ३१.१.०३ नुसार संस्थेची प्राथमिक शाळा नुसार ५३(३) व ३४ नुसार न.प.ला नियमीत करण्यासाठी न.प.कडे दाखल करावे व ओपन स्पेस मधील केलेले बांधकाम संस्थेने स्वखर्चाने काढून घेण्यात यावे असे आदेशात नमूद केले आहे.

त्यानुसार दिनांक ४.६.२००७ च्या विशेष सभेत ठराव क्र.८३ नुसार संचालनाच्या आदेशाप्रमाणे सदर प्रकरणाला १४ वर्ष झाल्यामुळे ठरावानुसार न.प.ने रुपये ५०००/- दंड वसूल करुन नियमित करावे या ठरावानुसार न.प.ने रुपये ५०००/- दंड प्रा.क्र. ११ दिनांक ५.८.२००७ नुसार वसुल करुन मोर्शी न.प.ने न्यायालयातील प्रकरण ठरावानुसार मागे घेतले. न.प.च्या मालकीचे ओपन स्पेसवर असलेल्या शाळेच्या १ खोलीचे अतिक्रमण बांधकाम संस्थेने स्वत: पाडले व त्यानुसार न.प.ने व संस्थेने सदर प्रकरणात तडजोड करुन प्रकरण मागे घेण्यात आले.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, माझ्याजवळ नगरपरिषदेच्या ठरावाची प्रत आहे. छापील उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "८X१० फूट जागेतील न.प. चे ओपन स्पेसमध्ये केलेले अतिक्रमण संस्थेने स्वत:च काढून घेतले". या ठरावामध्ये असा उल्लेख आहे की, "३८/१,रुक्मिणीनगर येथील १५०० चौरस फूटाच्या जागेवर प्राथमिक शाळेचे बांधकाम चालू आहे.त्याच्या लगत ४३०२.६२ चौरस मीटर मोकळी जागा दर्शविलेली आहे,त्याठिकाणी ७ खोल्या बांधण्यात आल्या आहेत". सभापती महोदय, याठिकाणी शासनाने दिलेले उत्तर योग्य नाही. याबाबतची संपूर्ण माहिती माझ्याजवळ आहे, ती मी आपणामार्फत मंत्रिमहोदयांना सादर करतो. याचबरोबर दुसरा प्रश्न असा आहे की, बांधकाम समितीच्या सभापतींनी हा ठराव करीत असतांना संपूर्ण नगरपरिषदेची दिशाभूल केली आहे. त्यामुळे जोपर्यंत ही माहिती आपल्यासमोर येणार नाही तोपर्यंत आपण याबाबत उत्तर देऊ शकणार नाही.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.40853 . . . .

श्री.जगदीश गुप्ता . . . .

ते बांधकाम समितीचे सभापती असल्यामुळे त्यांनी नगरपरिषदेची दिशाभूल करुन हा ठराव आणलेला आहे. या विषयासंबंधीचे पुरावे माझ्याजवळ आहेत. तेथील एका नगरसेवकाने माहितीच्या आधारावर . . . .

सभापती : याबाबतीत सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, मी तेच विचारीत आहे.

सभापती पण सन्माननीय सदस्य पाच मिनिटे प्रश्न डेव्हल्प करीत आहेत.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, याठिकाणी बांधकाम समितीच्या सभापतींनी नगरपरिषदेची दिशाभूल केली असेल तर या दोन्ही प्रश्नांच्या बाबतीत आयुक्तांच्या माध्यमातून ठराविक वेळेमध्ये योग्य ती चौकशी करुन नगरपरिषदेची हजारो, लाखो रुपयांची जमीन वाचविण्यासाठी शासन योग्य ती कारवाई करणार आहे काय ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती निश्चितपणे ग्राह्य धरुन दोन महिन्याच्या आत चौकशी केली जाईल.

. . . .2 एफ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबई विभागात शाळेला मान्यता मिळताच शिक्षकांना वैयक्तिक मान्यता मिळत नसल्याबाबत

(5) * 37956 श्री.कपिल पाटील , श्री. जयंत पाटील , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.राजन तेली : दिनांक 23 नोव्हेंबर, 2007 रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या दिनांक 22 नोव्हेंबर, 2007 रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील प्रश्न क्रमांक 33666 ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) महाराष्ट्रात फक्त मुंबईत शाळेला मान्यता मिळताच शिक्षकांना वैयक्तिक मान्यता मिळत नाही त्यामुळे येथील शिक्षकांवर अन्याय होत आहे, हे खरे आहे काय,

(2) मान्यता नसल्यामुळे शाळा अनुदानावर येताच व्यवस्थापन नवीन शिक्षकांना भरती करते आणि त्यामुळे जुन्या शिक्षकांवर अन्याय होतो, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, याबाबत शासनाचे धोरण काय आहे ?

प्रा.वसंत पुरके : (1) होय.

(2) असे झाल्याचे आढळून आले नाही.

(3) खाजगी माध्यमिक शाळा अनुदानावर आल्यानंतर या शाळेतील शिक्षकांच्या नियुक्तांना वैयक्तिक मान्यता देण्यात येते.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, विना अनुदान तत्वावरील शाळांना मान्यता दिल्यानंतर तेथील शिक्षकांची व्यक्तीगत मान्यता दिली जाते. असे केल्यानंतरही जेव्हा शाळेला अनुदान दिले जाते, तेव्हा पुन्हा याबाबतीत मान्यता घेण्याचा प्रश्न कसा उद्‌भवतो ? तसेच हा प्रश्न प्रामुख्याने असा आहे की, मान्यता घेण्यासाठी 25 हजारापासून 3 लाखापर्यंत भाव आहे. तो भाव कमी करण्यासाठी शासन किती दिवसामध्ये कारवाई करणार आहे ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, हे एक नवीनच प्रकरण आहे असे वाटते. पण याची दखल घेतली जाईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, अजून माझ्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही.

सभापती : मी तुम्हाला नंतर उप प्रश्न विचारण्यासाठी परवानगी देतो.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, याठिकाणी प्रश्न क्र.3 ला जे उत्तर दिलेले आहे, त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "खाजगी माध्यमिक शाळा अनुदानावर आल्यानंतर या शाळेतील शिक्षकांच्या नियुक्त्यांना वैयक्तिक मान्यता देण्यात येते." हे खरे नाही. 1995 महाराष्ट्रामध्ये बहिष्कार आंदोलन केले आणि त्यावेळेस एक शासन निर्णय निर्गमित केला आहे. विना अनुदानित

. . . .2 एफ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शाळेतील कर्मचाऱ्यांना आणि शिक्षकांना सुध्दा मान्यता दिली पाहिजे असा शासन निर्णय आजही अस्तित्वात आहे. पण त्याची अंमलबजावणी होत नाही असा मुद्दा आहे.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, त्या जी.आर.प्रमाणे विना अनुदानित शाळांच्या बाबतीत सुध्दा अंमलबजावणी होईल काय ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.व्ही.यू.डागव्हाणे यांनी सांगितले, त्याप्रमाणे हा जी.आर.देखील सुस्पष्ट आहे. फक्त त्याची अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे. कारण जेव्हा आपण शाळेला मान्यता दिली जाते, त्याचवेळस पदांना देखील मान्यता देतो. त्यानंतर ॲप्रुव्हल केस दाखल करतो, तेव्हा वैयक्तिक मान्यता मिळते. तर ती दिली पाहिजे यादृष्टीने आम्ही निश्चितपणे दखल घेऊ.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, 1991 ची जी नियमावली आहे, ती शाळा अनुदानित असो किंवा विना अनुदानित असो, दोधांनाही लागू आहे. म्हणून शाळेला मान्यता मिळाल्यानंतर ती अनुदान तत्वावरील असो किंवा विना अनुदान तत्वावरील असो, या शाळेमध्ये काम करणाऱ्या सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या मान्यता आणि त्यांची संच मान्यता घेणे हे शाळेवर बंधनकारक झालेले आहे. तसेच शाळेने मान्यता घेणेही बंधनकारक आहे. परंतु जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांकडून या शाळा विना अनुदानित आहेत म्हणून मान्यता दिली जात नाही. म्हणून मला माननीय मंत्री महोदयांकडून हे जाणुन घ्यावयाचे आहे की, आपण अशा प्रकारचा सुधारित आदेश काढून किंवा पुन्हा नव्याने आदेश देऊन विना अनुदानित शाळेतील कर्मचाऱ्यांना सुध्दा वैयक्तिक मान्यता देणे, संच मान्यता देणे बंधनकारक करणार काय ? तसेच तशी मान्यता घेणे हे देखील बंधनकारक करणार आहात काय ? हा पहिला प्रश्न आहे. यापूर्वीच्या अनेक शाळांच्या बाबतीत असे झाले आहे की, शाळा विना अनुदानित आहे म्हणून शिक्षकांची वैयक्तिक मान्यता, संच मान्यता घेतलेली नाही. अशा ठिकाणी पूर्वलक्षी प्रभावाने ही मान्यता देण्याच्या संदर्भात शासन काही कार्यवाही करणार आहे काय ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, हा शासन निर्णय अतिशय सुस्पष्ट आहे. पण मुख्य मुद्दा

. . . .2 एफ-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असा आहे की, एखाद्या संस्थेला परमनंन्ट नॉन ग्रँटच्या तत्वानुसार मान्यता मिळाली असेल तर त्या ठिकाणी क्वॉलीफाईड किंवा क्वॉलीफाईड नसलेल्या किंवा गरजू असलेल्या शिक्षकांना राबवून घेतले जाते. जेव्हा ही संस्था अनुदानावर येते, तेव्हा खऱ्या अर्थाने ॲप्रुव्हल केस सादर केली जाते आणि तेथील लोकांना हाकलून दिले जाते. असे शोषण होऊ नये, अशी फसवणूक होऊ नये यासाठी हा मुद्दा उपस्थित झालेला आहे. आम्ही असे होणार नाही याची निश्चितपणे दखल घेऊ.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, दरवर्षी प्रत्येक शाळेमध्ये मग ती शाळा विना अनुदानित असो किंवा कायम विना अनुदानित असो किंवा अनुदानित असो. संच मान्यता घेणे, वैयक्तिक मान्यता घेणे ही दोन अतिशय महत्वाची आणि जिव्हाळयाची कामे त्या-त्या शाळांसमोर आहेत.

यानंतर कु.गायकवाड . . ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DVG/ D/ KGS/ KTG/ प्रथम श्रीमती रणदिवे.. 12:55

ता.प्र.क्र. 37956..

श्री. विक्रम काळे..

ऑक्टोबर अखेरपर्यंत सर्व राज्यातील शिक्षण अधिकाऱ्यांना संच मान्यता दिली पाहिजे. सन 2008-09 या शैक्षणिक वर्षाकरिता डिसेंबर अखेर पर्यंत वैयक्तिक मान्यता देण्यासाठी शासनाकडून काही धोरणात्मक निर्णय घेण्यात येणार आहे काय ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, याबाबत तपासणी करुन धोरणात्मक निर्णय घेतला जाईल.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शिरुर कासार येथे शालेय पोषण आहार योजनेच्या खिचडीसाठी देण्यात येत असलेला तांदूळ निकृष्ट दर्जाचा असल्याबाबत

(६) * ४१८४३ श्रीमती उषाताई दराडे : सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरुर कासार येथे शालेय पोषण आहार योजनेच्या खिचडीसाठी देण्यात येत असलेला तांदूळ निकृष्ट दर्जाचा असून त्यात घाण, खडे, काड्या व पक्ष्यांची पिसे, उंदराच्या लेंड्या असल्याचे आढळून आल्याची घटना शासनाच्या निदर्शनास आणून देण्यात आली वा शासनाच्या निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा.वसंत पुरके : (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, या प्रश्नाला अत्यंत चुकीचे उत्तर देण्यात आलेले आहे. शिरुर कासार येथे शालेय पोषण आहार योजनेच्या खिचडीसाठी देण्यात येत असलेला तांदूळ निकृष्ट दर्जाचा असून त्यात घाण, काडया व पक्ष्यांची पिसे, उंदराच्या लेंडया असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे याबाबत पुन्हा चौकशी शासनाकडून करण्यात येणार आहे काय तसेच दोषी व्यक्तिवर कारवाई करण्यात येणार आहे काय ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, शालेय पोषण आहार योजनेमध्ये पुरविण्यात येणारे धान्य केंद्र सरकारकडून देण्यात येते. या संदर्भात जे लोक दोषी आढळून येतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, एक महिला सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे यांनी या ठिकाणी अत्यंत चांगला प्रश्न विचारलेला आहे. परंतु या प्रश्नाला शासनाने अतिशय उथळपणे उत्तर दिलेले आहे. या बाबत चौकशी केलेली आहे व या चौकशीमध्ये कोणी दोषी असल्याचे आढळून आले नाही असे उत्तर दिले पाहिजे होते. परंतु याठिकाणी असे म्हटले आहे की, (१) नाही. (२) व (३) प्रश्न उद्भवत नाही. माननीय लोकप्रतिनिधी ४५ दिवस आधी प्रश्न देत असतात. त्यांनी दिलेल्या प्रश्नाची कोणतीही चौकशी होत नाही. फक्त छापील उत्तर दिले जाते. अशा प्रकारे उत्तर देणे कितपत उचीत आहे ? या संदर्भात पुन्हा चौकशी करा. सन्माननीय सदस्या श्रीमती दराडे या ठिकाणी जे सांगत आहेत ते सत्य असेल तर दोषी लोकांवर कारवाई करण्यात येणार आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाच्या अनुषंगाने "नाही "असे उत्तर दिले होते. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे या बाबत चौकशी करण्यात येईल व जे लोक दोषी आढळून येतील त्यांच्यावर शासनाकडून कारवाई केली जाईल.

४..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(७) * ३७६८८ श्री.सय्यद जामा , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर सुधार प्रन्यासने आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी व माथाडी कामगांरासाठी मौजा चिखली येथे सुरु केलेल्या अभिनव घरकुल योजनेसाठी दिनांक १० डिसेंबर, २००७ पर्यंत केवळ १५३ लोकांनी अर्ज भरला असून येथील भूखंडावर ५०४ गाळे असलेल्या ८ इमारती आहेत व उर्वरीत गाळे रिकामे असून त्याला मागणीही नाही असे आढळून आले हे खरे आहे काय,

(२) सदर योजना यशस्वी करण्यासाठी शासनाने काही उपाय योजना कली आहे काय,

(३) काही उपाय योजना केली नसल्यास त्या मागील विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता : (१) नागपूर सुधार प्रन्यासने आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी व माथाडी कामगारांसाठी मौजा चिखली येथे सुरु केलेल्या योजनेमध्ये दिनांक १० डिसेंबर, २००७ अखेर १५३ लोकांनी अर्ज भरले. या योजनेमध्ये ५०४ गाळे बांधण्याचे प्रस्तावित होते, तथापि नागपूर सुधार प्रन्यासने दिनांक १०.१२.२००७ रोजी ठराव पारीत केला व प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्वावर गाळे नोंदणीसाठी अर्ज मागविले. वृत्त पत्रातील व्यापक प्रसिद्धीनुसार नव्याने २४० गाळ्यांची नोंदणी झाली. अशारितीने डिसेंबर, २००७ अखेर एकूण ३९३ लोकांनी अर्ज भरले असून प्रत्येकी ३६ गाळ्याच्या ११ इमारतीत ७२ जणांनी पूर्ण पैसे भरल्याने त्यांना ताबा दिला आहे. ३२१ जणांनी आंशीक रक्कमेचा भरणा केला असल्याने त्यांना ताबा दिला नाही. त्यामुळे गाळ्यांना मागणी नाही असे म्हणता येणार नाही.

(२) उर्वरित २ बेडरुम गाळ्यांच्या ३ इमारती प्रत्येकी १८ गाळे बांधण्याबाबत नागपूर सुधार प्रन्यासकडून निविदा मागविण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी घरे बांधण्याची योजना सुरु करण्यात आली होती. त्या योजनेमध्ये ७२ जणांनी पूर्ण पैसे भरलेले आहेत त्यामुळे त्यांना घराचा ताबा दिलेला आहे. उर्वरित ३२१ लोकांनी आंशिक रक्कम भरलेली असल्याने त्यांना अद्याप घरांचा ताबा देण्यात आलेला नाही. उर्वरित रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आलेली आहे ? तसेच या योजनेमध्ये ५०४ गाळे बांधण्याचे प्रस्तावित होते. तथापि ३८२ गाळे बांधण्यास सुरुवात झालेली आहे. तसेच तेथे १११ गाळंयाबाबत मागणी करण्यात आली आहे काय, त्याबाबत देखील कोणती कार्यवाही करण्यात आलेली आहे ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, ३९३ गाळे बांधण्यात आले होते. १४४ गाळयांचे बांधकाम पूर्ण झालेले आहे त्या पैकी ७२ लोकांनी पूर्ण पैसे भरलेले आहेत. ज्यांनी पूर्ण पैसे दिलेले आहेत त्यांना ताबा देण्यात आलेला आहे. उर्वरित लोकांनी पैसे पूर्ण भरल्यानंतर त्यांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ताबा देण्यात येणार आहे. जून २००८ अखेरपर्यंत २५२ गाळे बांधण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात येणार आहे. हे गाळे पूर्ण बांधून झाल्यानंतर अर्जदारांकडून पूर्ण पैसे घेऊन त्यांना ताबा देण्यात येईल. ज्यांनी पैसे यापूर्वीच भरलेले आहेत त्यांना कोणतीही अडचण नाही . तसेच काम पूर्ण झाल्यानंतर उर्वरित लोकांकडून पैसे घेऊन ताबा देण्यात येईल.

६...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शासनाने हिंदू-गवळी या जातीचा (NT.B) या प्रवर्गात समावेश केल्याबाबत

(८) * ३८४२० श्री.भास्कर जाधव : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने हिंदू-गवळी या जातीचा (NT.B) या प्रवर्गात समावेश केला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बाबत सदर प्रवर्गातील लोकांना दिल्या जाणाऱ्या सोयी सवलतींचा लाभ संबंधितांना देण्याचा निर्णय झाला आहे काय,
(३) असल्यास, शासनाने कोणत्या सवलती व शासन स्तरावरील सुविधांचा प्राध्यान्याने लाभ देण्याचे ठरविले आहे,
(४) नसल्यास, या वर्गातील लोकांना सवलती पासून डावलण्याची कारणे काय आहेत ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता : (१) नाही. मात्र " गवळी " व "मुस्लीम गवळी" या जातीचा अंतर्भाव (एनटी बी) या प्रवर्गात करण्यात आलेला आहे.
(२) (३) (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी या प्रश्नाला सुधारित उत्तर दिलेले आहे. त्यांनी दिलेल्या सुधारित उत्तरामुळे माझा गोंधळ झाला आहे. हिंदू गवळी समाजाचा अंतर्भाव एनटी बी या प्रवर्गात करण्यात आलेला आहे. याचा अर्थ मला उलगडलेला नाही. माननीय मंत्री महोदयांनी कृपया याचा उलगडा करावा.

यानंतर श्री. बरवड..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 38420 ..... श्री. भास्कर जाधव .....

दुसरा प्रश्न असा की, त्यांना एनटी बी प्रवर्गामध्ये मान्यता दिलेली आहे त्यामुळे त्यांना त्या सोयीसुविधा मिळावयास पाहिजे परंतु त्याबाबतच्या प्रश्नाला "प्रश्न उद्भवत नाही" असे उत्तर दिलेले आहे. त्या प्रवर्गामध्ये त्यांना समाविष्ट करण्यात आले असेल तर त्यांच्या सोयीसुविधा आणि अधिकार त्यांना का मिळत नाहीत ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, मूळ प्रश्न हा हिंदू-गवळी बद्दल विचारण्यात आला होता. हिंदू-गवळी आपल्या शेड्यूलमध्ये नाही त्यामुळे उत्तरामध्ये दुरुस्ती केली. गवळी आणि मुस्लीम गवळी या दोन सबकास्ट आहेत. जे शेड्युलमध्ये येतात त्यांना सवलती देतो. त्यांना 2.5 टक्के आरक्षण आहे. त्यांना भरती आणि पदोन्नतीमध्ये आरक्षण आहे. आपण त्यांना सवलती देतो.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, त्यांना 2.5 टक्के सवलती देतो असे जे उत्तर दिलेले होते ते उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी खोडलेले आहे. खोडलेले उत्तर बरोबर आहे की, सुधारित उत्तर बरोबर आहे ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, मूळ प्रश्न हिंदू-गवळी बद्दल विचारलेला आहे. हिंदू-गवळीला आपण सवलती देत नाही. मुस्लीम गवळी आणि गवळी यांना सवलती आहेत. त्यांना 2.5 टक्के आरक्षण देतो. मूळ प्रश्न हिंदू-गवळी बाबत विचारलेला आहे.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, महाराष्ट्रातील ग्रामीण भागामध्ये किंवा शहरी भागामध्ये ज्यावेळी शाळेचा दाखला दिला जातो त्या दाखल्यावर किंवा शाळेत प्रवेश घेताना जी जात नोंदवली असेल त्याच्या अगोदर हिंदू हा शब्द लिहिला जातो. हिंदू-धनगर, हिंदू-मराठा, हिंदू-कुणबी असे लिहिलेले असते. माननीय मंत्रिमहोदयांनी असे उत्तर दिले की, हिंदू-गवळी असे लिहिले असेल तर सवलती मिळणार नाहीत. महाराष्ट्रात हिंदू-गवळी असे सर्टिफिकेट शाळेने दिले असेल तर त्यांना व्हीजेएनटी प्रवर्गामध्ये सवलत देणार की नाही ? कारण आपण मुस्लीम-गवळी समाजाला सवलती देणार आहात. मग हिंदू-गवळी समाजाला सवलती देणार की नाही ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, आपल्या शेड्यूलमध्ये ज्या जाती येतात त्या जातीना जातीचा दाखला देतो. हिंदू जात शेड्यूलमध्ये नसल्यामुळे ते यामध्ये येत नाहीत. त्यामुळे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांना जातीचा दाखला देण्याचा प्रश्न येत नाही. गवळी आणि मुस्लीम-गवळी यांना ज्या सवलती आहेत त्या देत आहोत. त्यांनी जातीचा दाखला मागितला तर तो देण्यात येईल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, महाराष्ट्रातील दुसऱ्या आंदोलनाला हे उत्तर कारणीभूत होईल. हा पहिला गवळी कोण ? आपण हिंदू-गवळीला सवलत देत नाही तर मग मुस्लीम गवळीला का देता ? या एका उत्तरामुळे महाराष्ट्रामध्ये आंदोलने निर्माण होतील. आपण कशाला आंदोलनाला निमंत्रण देत आहात. या राज्याचे प्रमुख माननीय मुख्यमंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांना माझी विनंती आहे. हा पहिला गवळी कोण ? हिंदू गवळीला सवलती देत नाही तर मग मुस्लीम गवळीला सवलती का देता ?

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, खरे म्हणजे ज्या विविध जाती आहेत त्या कोणत्या प्रवर्गामध्ये असाव्यात याचा निर्णय शासन करीत नाही हा खुलासा मी पहिल्यांदा करु इच्छितो. ते राज्य सरकारचे डिस्क्रिशन नाही. त्यासाठी कमिशन आहे. मागे खत्री कमीशन होते. शासनाकडे कोणतीही मागणी आली की ती आम्ही कमिशनकडे सुपूर्द करतो. ते त्यांच्या पध्दतीने अभ्यास करतात आणि शासनाला शिफारस करतात. ती शिफारस स्वीकारावयाची किंवा नाकारावयाची एवढाच मर्यादित अधिकार राज्य सरकारला असतो. या ठिकाणी अतिशय योग्य प्रश्न उपस्थित केलेला आहे. कारण गवळी हा जो काही शब्द आलेला आहे त्यामध्ये पहिल्यांदा जी शिफारस झाली ती गवळी म्हणून झाली आणि गवळी म्हणजे हिंदू गवळी असे आम्हा सर्वांना अभिप्रेत आहे. त्यांना सवलती मिळतात परंतु ज्या तत्सम जाती आहेत उदा. माळी समाजाला ओ.बी.सी.च्या सवलती मिळतात परंतु मुस्लीम समाजातील बागवान समाजाला त्या सवलती मिळत नव्हत्या. त्यांचाही धंदा तोच आहे. म्हणून अशा प्रकारच्या जाती नव्याने समाविष्ट झाल्या. मुस्लीम समाजातील लोक गवळी म्हणून बाकीचे सगळे उद्योगधंदे करत असतील तर त्यांच्या सवलती त्यांना मिळाव्यात या उद्देशाने मुस्लीम-गवळी हा शब्द आलेला आहे. हे खरे आहे की, उद्या टी.सी.मध्ये हिंदू-गवळी लिहिले असेल तर त्याला सवलत मिळेल की नाही हा जो प्रश्न उपस्थित केलेला आहे तो नवीन प्रश्न आहे. त्यासंबंधीचा खुलासा आम्ही कमिशनकडून मागवून घेऊ.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38420....

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, जाती जेव्हा प्रवर्गामध्ये मोडतात त्यावेळी प्रथम धर्म लिहिला जातो, हिंदू-मराठा, हिंदू-गवळी, जे काही असेल ते लिहावे लागते. आतापर्यंत राज्य मागास आयोगाने ज्या जाती नमूद केलेल्या आहेत. आताच वैश्यवाणीसंबंधी या आयोगाचा अहवाल आलेला आहे. त्यामुळे प्रथम जात किंवा उपजात किंवा पोट जात लिहिली जाते. हिंदू-गवळी असे म्हणून हिंदूंना नाकारले जात असेल तर तो अन्याय आहे. प्रत्येक वेळी हा खुलासा केलेला असतो. जातीचा दाखला सुध्दा त्याच्या आधारावर दिला जातो. पहिल्यांदा धर्म बघितला जातो. वैशवाणीतील नगरसेवकांच्या केसेस आहेत. त्यांचे जातीचे दाखले या कारणामुळे रद्द झाले आहेत. तसा त्रास बाकीच्या लोकांना होऊ नये म्हणून ही जात हिंदू-गवळी अशी धरणार काय ?

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, आपल्याकडे हा प्रश्न कोठून निर्माण झाला ? मुस्लीम समाजाकडून मागणी आली म्हणून हा प्रश्न निर्माण झाला. पूर्वीपासून गवळी समाज ओबीसीमध्ये आहे. प्रत्येक ठिकाणी हिंदू-गवळी, हिंदू-माळी असे लिहिलेले नाही. हिंदू समाजातील ज्या जाती व उपजाती आहेत ज्या ओबीसीच्या प्रवर्गात येतात त्यांच्यासंबंधी पहिल्यांदा शिफारशी झाल्या. त्यामुळे त्यांचा पूर्वीपासून ओबीसीत समावेश झालेला आहेच. येथे विशिष्ट मुस्लीम गवळी म्हणण्याचे कारण असे होते की पूर्वी गवळी असणारे सर्व हिंदू आहेत असे समजून सवलती मिळत होत्या. परंतु मुस्लीम आहे म्हणून त्यांना सवलत मिळत नव्हती. म्हणून त्याला मुस्लीम गवळी जोडले आहे. याचा अर्थ याला हिंदू-गवळी जोडले पाहिजे असे नाही. तसे करावयाचे म्हटले तर आतापर्यंत मिळालेल्या प्रमाणपत्रांसंबंधी अडचण निर्माण होईल. कारण सर्वच प्रमाणपत्रांमध्ये हिंदू-ओबीसी हिंदू-माळी असे लिहिलेले नाही. म्हणून असा आग्रह धरण्याचे कारण नाही. स्पेसिफिक समाजाला सवलती मिळत नव्हत्या, त्या समाजातील गवळी असेल तर त्याला सवलत मिळाली पाहिजे एवढा मर्यादित त्याचा अर्थ सर्वांनी घ्यावा. त्यामध्ये फार सुधारणा करण्याची गरज आहे असे मला वाटत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

औरंगाबाद येथील जिल्हा परिषदेतील प्रयोग शाळेसाठी लागणारी साहित्य (उपकरणे) उपलब्ध नसल्याबाबत

(९) * ३७८३३ श्री.विक्रम काळे , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , श्रीमती उषाताई दराडे : सन्माननीय **शालेय शिक्षण, क्रिडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद येथील भाभा अणु संशोधन केंद्राचे निवृत्त शास्त्रज्ञ श्री.गंभीर, यांनी "प्रथम" या संस्थेच्या माध्यमातून केलेल्या पाहणीत जिल्हा परिषद शाळेचे प्रयोग फळ्यावर करण्यात येत असल्याचे आढळले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषदेच्या इयत्ता ५ वी ते ७ वीच्या सुमारे ७०० शाळांमध्ये प्रयोगासाठी लागणारी साहित्य (उपकरणे) नाहीत हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

प्रा.वसंत पुरके : (१) विज्ञान विषयाचे प्रयोग फळ्यावर करण्यात येत नाहीत. तथापि काही शाळांमध्ये विज्ञान प्रयोगाचे साहित्य पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याचे दिसून आले आहे.

(२) व (३) जिल्हा परिषद औरंगाबाद अंतर्गत एकूण ७०२ उच्च प्राथमिक शाळा असून विज्ञान प्रयोगाचे साहित्य यापूर्वी खडू फळा योजनेअंतर्गत उपलब्ध करुन दिलेले आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, स्वयंसेवी संस्थांनी औरंगाबाद जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये विज्ञान विषयक प्रगतीचा आढावा घेण्यासाठी भाभा अणु संशोधन केंद्राचे निवृत्त शास्त्रज्ञ श्री.गंभीर यांना तेथे पाठविले होते. त्यांनी काय अहवाल सादर केला आहे ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, शासनाच्यावतीने त्यांना तेथे पाठविले नव्हते. बहुतेक शाळांमध्ये प्रयोगशाळेच्या साहित्याचा अभाव आढळलेला आहे. प्रयोग साहित्य हे वापरले गेले पाहिजे, मुलांना प्रॅक्टीकल ज्ञान मिळाले पाहिजे याबाबत शासन सकारात्मक भूमिका घेईल.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, उत्तरात असे म्हटले आहे की, " विज्ञान विषयाचे प्रयोग फळयावर करण्यात येत नाहीत. तथापि, काही शाळांमध्ये विज्ञान प्रयोगाचे साहित्य पुरेशा प्रमाणात उपलब्ध नसल्याचे दिसून आले आहे. माझ्या माहितीप्रमाणे 702 शाळांपैकी 675 शाळांमध्ये प्रयोग साहित्य नाही. चुकून एखाद्या शाळेत असेल. जेथे प्रयोगशाळाच नाही तेथे विज्ञान हा विषय कशाप्रकारे शिकविला जातो ? प्रत्येक शाळेमध्ये प्रयोगशाळा उपलब्ध करण्याची शासनाची संकल्पना आहे काय, असल्यास त्यासाठी शासन कोणती कार्यवाही करणार आहे ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, बहुतेक शाळेमध्ये अग्निपंख प्रयोगशाळा आहे. हे 5 वी ते 7 वीचे वर्ग आहेत. त्यामुळे तेथे जुजबी स्वरुपात प्रयोग साहित्य असले पाहिजे अशी अपेक्षा आहे. काही शाळांमध्ये हे प्रयोग साहित्य नसेल तर निश्चित तरतूद केली जाईल.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टी पुनर्वसन करण्यासाठी केंद्र शासनाने दिलेले अनुदान

(१०) * ३८५६७ श्रीमती मंदा म्हात्रे : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टी पुनर्वसन करण्यासाठी केंद्र शासनाचे ४० कोटी रुपयांचे अनुदान प्राप्त झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) सिडको व एमआयडीसीने त्यांच्या जागेवरील झोपड्यांचे पुनर्वसन तेच करतील असा निर्णय घेतल्यामुळे ही योजना हाती घेण्यात आली नाही, हेही खरे आहे काय,

(३) सिडको व एमआयडीसीने त्यांच्या जागेवरील झोपडपट्टीचे पुनर्वसन करण्यासाठी काही योजना आखली आहे काय,

(४) असल्यास, उक्त योजनेचे स्वरुप काय आहे ?

ॲड.प्रितमकुमार शेगांवकर, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता : (१) जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुनरुत्थान कार्यक्रमांतर्गत बी.एस.यू.पी. या योजनेसाठी राज्य शासनाच्या हिश्यापोटी रु. १०.६४ कोटी व केंद्र शासनाच्या हिश्यापोटी रु. ३०.८५ कोटी असे एकूण रु. ४१.४९ कोटी निधी नवी मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झालेला आहे.

(२) नाही.

(३) व (४) सिडको व नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत एकत्रितपणे पुनर्वसनासंबंधीचा प्रस्ताव तयार करण्यात येत असून त्यासंबंधीची कार्यपद्धती निश्चित करण्यात येत आहे. तसेच एम.आय.डी.सी.ने त्यांचे जागेवरील झोपड्यांचे पुनर्वसन, झोपडपट्टी पुनवर्सन योजनेंतर्गत करण्याची तयारी दर्शविली असनू यासंबंधीच्या प्रस्तावाबाबत एम.आय.डी.सी.मार्फत कार्यवाही सुरु आहे.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, नवी मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रातील झोपडपट्टयांच्या पुनर्वसनासाठी राज्य व केंद्र शासनाने 41.49 कोटी रुपयांची तरतूद केली आहे, त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करते, धन्यवाद देते. नवी मुंबईच्या परिसरामध्ये एमआयडीसीची जागा आहे त्या जागेवर झोपडपट्टयांनी अतिक्रमण केलेले आहे. दुस-या प्रश्नाला नाही असे उत्तर दिले आहे, परंतु तिस-या प्रश्नाला उत्तर देताना झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या प्रस्तावाबाबत एमआयडीसीने काम चालू केले आहे असे म्हटले आहे.

नंतर श्री.शिगम

अशुद्धीत प्रत / मुद्रणासाठी नाही

हे काम एमआयडीसी करीत असेल तर लोकांची त्याबाबतीत काही हरकत नाही, सिडको किंवा नवी मुंबई महानगरपालिका करीत असेल तरी त्याबाबतीत लोकांची काही हरकत नाही. हे काम होणे हे महत्वाचे आहे. तेव्हा हा प्रकल्प होण्यास किती दिवस लागतील ? हा प्रकल्प करताना स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात घेतले जाईल काय ?

ॲड. प्रितमकुमार शेगांवकर : नवी मुंबईमध्येय 29 झोपडपट्टया एमआयडीसीच्या जागेवर, 17 झोपडपट्टया सिडकोच्या जागेवर आणि 2 झोपडपट्टया शासकीय जागेवर आहेत. जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुनरुत्थान कार्यक्रमांतर्गत बी.एस.यू.पी. या योजनेसाठी केन्द्र शासनाने 30.85 कोटी रुपये मंजूर केलेले आहेत आणि राज्य शासनाच्या हिश्श्यापोटी 10.64 कोटी रु. मंजूर केलेले आहेत. एकूण 41.49 कोटी रुपये नवी मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झालेले आहेत. नवी मुंबई महानगरपालिका आणि एमआयडीसीला ही योजना एसआरअेखाली राबवायची आहे. त्यासंबंधीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविलेला असून तो शासनाच्या विचाराधीन आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एम.एम.आर.डी.ए.च्या हद्दीतील पाच महापालिकांचे
वाहतूक प्राधिकरण स्थापन करण्याबाबत

(११) * ३७३०३ श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. शरद रणपिसे , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री.राजन तेली , डॉ. निलम गोऱ्हे , श्री. दिवाकर रावते , श्री. मधुकर सरपोतदार : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत सुसुत्रता आणण्यासाठी मुंबईतील बेस्ट तसेच ठाणे, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली व मिरा भाईंदर या पाच महापालिकांचे वाहतूक प्राधिकरण स्थापन करण्याचा निर्णय शासन स्तरावर दिनांक ४ ऑक्टोबर, २००७ रोजी वा त्यासुमारास घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील बेस्टच्या तुलनेत ठाणे, नवी मुंबई, कल्याण या शहरांतील परिवहन सेवेत फारच कमी बसेस आहेत व सदर एकत्रिकरण केल्यास बेस्टचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होणार असल्याने, शासनाच्या एकत्रित प्राधिकरणाला मुंबईतील बेस्ट कंपनीने सक्त विरोध केला असून विरोधाची कारणेही दिलेली आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, एकत्रित प्राधिकरण स्थापन करण्याच्या निर्णयाच्या अनुषंगाने तसेच बेस्ट ने केलेल्या विरोधाच्या अनुषंगाने आतापर्यंत कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. धर्मरावबाबा आत्राम, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता : (१) नाही. तथापि, पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने परिवहन सेवेचे एकत्रिकरण करुन स्वतंत्र कंपनी स्थापन केली आहे.त्यानुसार या महानगरपालिका परिवहन उपक्रमाकरिता एक वाहतूक प्राधिकरण करण्यासंबंधीची बाब तपासण्यात येत आहे.

(२),(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. संजय दत्त : मुंबईला लागून असलेल्या महानगरपालिकांतील ज्या समस्या आहेत त्याकडे या प्रश्नाच्या माध्यमातून मी लक्ष वेधण्याचा प्रयत्न करीत आहे. या शहरातील परिवहन सेवा आणि वाहतुकीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. वाढते नागरिकरण लक्षात घेऊन याठिकाणी एकत्रित परिवहन प्राधिकरण स्थापन करण्याची आवश्यकता आहे. छापील उत्तर "नाही" असे दिलेले आहे. तरी याबाबत शासन पुनर्विचार करील काय ? अशा प्रकारचे प्राधिकरण स्थापन करण्यामध्ये कोणत्या अडचणी आहेत ?

श्री. विलासराव देशमुख : सन्माननीय सदस्यांची सूचना उत्तम आहे. अशा प्रकारचा प्रस्ताव संबंधित महापालिकांनी पाठविला पाहिजे. त्या त्या महापालिकांची स्वत:ची परिवन सेवा आहे. पुणे-पिंपरी चिंचवड महानगरपालिकांनी या सेवा एकत्र केल्या. ज्याप्रमाणे पुणे-पिंपरी चिंचवड महानगरपालिकांनी परिवहन सेवा एकत्र केल्या त्याप्रमाणे सगळया महापालिकांनी संमती दिली तर

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हे प्राधिकरण होऊ शकेल. आता या बसेस एकमेकांच्या क्षेत्रामध्ये जाण्यासाठी महानगरपालिका परवानगी देत नाही. ओव्हरलॅपिंग होते. वाहतुकीची एकत्रित व्यवस्था असावी यादृष्टीने वेगळे प्राधिकरण करण्याची आमची इच्छा आहे. त्यासाठी त्या त्या महानगरपालिकांनी, संबंधित संस्थांनी ठराव करावा आणि तसा ठराव करण्यास सन्माननीय सदस्यांनी त्यांना प्रवृत्त करावे.

डॉ. नीलम गो-हे : स्थानिक स्वराज्य संस्थांकडे काही सेवा सोपविण्यात आल्या याचे कारण असे आहे की, स्थानिक गरजाप्रमाणे कार्यक्षमपणे हे उपक्रम चालविले जातात. पुणे आणि पिंपरी-चिंचवडची परिस्थिती वेगळी आहे आणि मुंबईची परिसिथती वेगळी आहे. अशा प्रकारच्या प्राधिकरणाला मुंबई महानगरपालिकेने आणि बेस्टने नापसंती दाखविलेली आहे.

श्री. विलासराव देशमुख : मुंबईचा वीज पुरवठा बेस्टकडे आहे म्हणून ही परिवहन सेवा परवडते. मुंबईचा अपवाद सोडला तर कोठेही ही परिवहन सेवा फायद्यामध्ये नाही. आम्हाला अनुदान द्यावे, पगार द्यावा यासाठी कामगारांची शिष्टमंडळे सरकारकडे सातत्याने येत असतात. मुंबई आणि लगतच्या महानगरपालिका ह्या एकमेकांना लागून आहेत. त्या फार दूर अंतरावर आहेत अशातला भाग नाही. तेव्हा या ठिकाणी इंटिग्रेटेड वाहतुकीची व्यवस्था निर्माण करता आली तर त्यामुळे जनतेची सोय होईल. महानगरपालिकेकडे ही सेवा आहे यापेक्षा लोकांना सेवा देणे हे जास्त महत्वाचे आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

मुंबई इमारती दुरुस्ती व पुनर्रचना मंडळावरील सदस्यांच्या नियुक्त्या

(१२) * ४१७३१ श्री. दिवाकर रावते , श्री. अरविंद सावंत , डॉ. दीपक सावंत : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई इमारती दुरुस्ती व पुनर्रचना मंडळावर शासनाने अशासकीय सदस्यांच्या नेमणूका केल्या आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मंडळ हे फक्त मुंबई शहरापुरतेच मर्यादित असून या मंडळावर मुंबईच्या बाहेरील सदस्यांच्या नियुक्त्या करता येत नसतांना आता शासनाने सदर मंडळावर मुंबई बाहेरील अशासकीय सदस्यांच्या नेमणुका केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, इमारती दुरुस्ती मंडळाच्या कार्यक्षेत्राबाहेरील सदस्यांच्या बेकायदा केलेल्या नियुक्त्या रद्द करण्यात येणार आहेत काय,

(४) असल्यास, अशासकीय नेमणुक नेमण्याची तरतूद काय आहे ?

श्री.विलासराव देशमुख : (१) होय.

(२) मंडळावर मुंबईबाहेरील अशासकीय सदस्यांच्या नेमणुका केलेल्या नाहीत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ च्या कलम १८, पोट कलम (२) अन्वये प्राधिकरणांतर्गत क्षेत्रिय मंडळामध्ये सभापती व उप सभापती सह १७ पेक्षा अधिक नसतील इतक्या सदस्यांची नियुक्ती करण्याची तरतूद आहे.

श्री. दिवाकर रावते : मुंबई इमारती दुरुस्ती व पुनर्रचना मंडळावर शासनाने अशासकीय सदस्यांच्या नेमणूका केल्या आहेत हे खरे आहे काय ? या प्रश्नाला " होय " असे उत्तर विभागाने दिलेले आहे. या मंडळावर अशासकीय सदस्यांची नेमणूक करणे योग्य वाटते काय ?

(उत्तर देण्यात आले नाही.)

श्री. मधुकर चव्हाण : मुंबई इमारती दुरुस्ती पुनर्रचना मंडळावर भिवंडी येथील एका मुस्लीम व्यक्तीची अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती केली गेली आहे हे खरे आहे काय ?

श्री. विलासराव देशमुख : योग्य कारभार व्हावा यासंबंधी विचार करीत आहोत. यात सगळया गोष्टी येतात.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे. ----------

२...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सन 2006-07 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

3...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रविशेठ पाटील (सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मर्यादितचा सन 2004-2005 चा 9 वा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सार्वजनिक उपक्रम समितीचा अहवाल सादर करणे.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सार्वजनिक उपक्रम समितीचा पंधरावा अहवाल सभागृहाला सादर करतो.

सभापती : सार्वजनिक उपक्रम समितीचा पंधरावा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचे अहवाल सादर करणे.

श्रीमती उषा दराडे (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण ससिमतीचा आठवा व नववा अहवाल सभागृहाला सादर करीत आहे.

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सभागृहास सादर केलेल्या विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीच्या सिंधुदूर्ग व रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व जिल्हा परिषदेच्या आठवा व नववा अहवालातील महत्वाच्या शिफारशीबाबत चार शब्द बोलू इच्छिते.

विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीने दिनांक 29 व 30 मे, 2007 सिंधुदूर्ग व रत्नागिरी जिल्हा परिषद तसेच सिंधुदूर्ग व रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस भेट देऊन तेथील विमुक्त जाती व भटक्या जमातीच्याउमेदवाराची भरती, बढती, आरक्षण व अनुशेषाबाबतची माहितीा घेतली व नंतर विभागीय सचिवांची साक्ष घेतली, त्यावर आधारीत आठवा व नववा अहवाल आहे. त्यातील शिफारशी पुढील प्रमाणे आहेत.

सिंधुदूर्ग जिल्हा मध्यवर्ती बँकेचा समितीने आढावा घेतला असता समितीच्या निदर्शनास आले की, या बँकेने वेळोवेळी रोस्टरची तपासणी करुन घेतलेली नाही. 1980 पासूनचे रोस्टर अद्यावत नाही. विमुक्त जाती व भटक्या जमाती प्रवर्गाच्या नोकर भरतीच्या बाबतीत बँक प्रशासनाने दुर्लक्ष केलेले आहे. भरती प्रक्रियेच्या वेळी सामान्य प्रशासन विभाग, सामाजिक न्याय व सहकार विभागाचे नियम व शासन सनिर्णय यांचे पालन केलेले नाही. कोणत्याही सहकारी संस्थेत पद भरतीच्या वेळी त्या विभागाच्या नियमांचे पालन काटेकोरपणे व्हायला पाहिजे ते झालेले नाही. कर्मचा-यांना कायम करताना अंतरीम आदेशाचे व रोस्टरचे पालन झालेले नाही. जिल्हा परिषदांनी रोस्टरची नियमित तपासणी करुन घ्यावी व रोस्टर अद्यावत ठेवावे.

6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे...

जिल्हा परिषदेच्या कर्मचा-यांची जात वैधता प्रमाणपत्रे घेण्याच्या संदर्भात विलंब होत आहे. तेव्हा सामाजिकन्याय व ग्रामविकास विभागाने समन्वय साधून जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याच्या संदर्भात राज्यातील सर्व जिल्हा परिषद व सहकारी बँकासाठी संयुक्त मोहिम आखावी व जात पडताळणी प्रमाणपत्रे कर्मचा-यांना लवकरात लवकर प्राप्त करुन द्यावीत.

सभापती : समितीचा आठवा व नववा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

यानंतर श्री. कानडे...

.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ MMP/ KGS/ 13:20

पृ.शी./मु.शी.: सदस्यांची अटक व त्यांच्या सुटकेसंबंधी

सभापती : मला वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मरीन ड्राईव्ह पोलीस ठाणे, मुंबई यांचेकडून कळविण्यात आले आहे की, सन्माननीय विधानपरिषद सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांना दिनांक 8 एप्रिल 2008 रोजी मुंबई पोलीस अधिनियम,1951 च्या कलम 69अन्वये उषा मेहता चौक, विधानभवनासमोर, बॅ.रजनी पटेल मार्ग, नरीमन पॉइंट, मुंबई येथे 11.00 वाजता ताब्यात घेण्यात येऊन त्यांना 12.00 वाजता मुक्त करण्यात आले आहे.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी " अकरावी व बारावीच्या बदललेल्या अभ्यासक्रमामुळे गणिताच्या विषयासाठी नव्या शिक्षकांच्या नेमणुकीची परवानगी देऊनही शासनाने शिक्षकांच्या पदाला मान्यता न देणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, श्रीकांत जोशी यांनी " राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांचे सक्षमीकरण होण्यासाठी प्रा.पी.व्ही.पाटील समितीने जिल्हा परिषदेकडील प्रत्येक संवर्गास स्वतंत्र वेतनश्रेणी लागू करण्याची शिफारस करुनही कनिष्ठ अभियंता,शाखा अभियंता यांना स्वतंत्र वेतनश्रेणी देण्यापासून वंचित ठेवणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, केशवराव मानकर, जगदीश गुप्ता यांनी "आयुर्वेद संचालनालय, मुंबई येथील संचालक डॉ.गो.प्र.तितर यांच्या मनमानी कारभारामुळे तसेच कर्मचाऱ्यांची पदोन्नती प्रकरणे प्रलंबित ठेवणे, महिला कर्मचाऱ्यांचा अपमान करणे, इ.कृत्यांमुळे त्यांच्या कार्यालयातील कर्मचारी त्रस्त होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "मुंबईतील वाळकेश्वर भागात 42 भाडेकरु रहात असलेल्या दाणी चाळीस भुपेश जैन या विकासकाने विकत घेणे, सदर विकासकाने चाळीतील 30 भाडेकरुंना बाहेर काढून पुनर्विकासाच्या प्रस्तावात स्वत:च्या नातेवाईकांची नांवे टाकून शासनाची केलेली फसवूणक " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती ....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी "ठाणे,रायगड,सिंधुदूर्ग,रत्नागिरी जिल्हयातील ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई असून पंचायत समिती स्तरावर पाणीपुरवठा आराखडे तयार करताना संभाव्य पाणीटंचाई लक्षात न घेणे, पाण्याच्या टंचाईचा सर्वे प्रत्यक्ष पाहणी न करता कार्यालयात बसूनच कागदोपत्री दाखविणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जगदीश गुप्ता, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी यांनी "धनोडी,ता.चांदूर,जि.अमरावती येथील श्री गणेश जोशी या पायी चालणाऱ्या शेतकऱ्याचा एका मोटर सायकलस्वाराने धडक मारल्याने जागीच मृत्यू होणे, पोलिसांनी मात्र मृतांच्या नातेवाईकांवर दरोडयाचा गुन्हा दाखल करुन त्यांचा छळ करणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रकाश शेंडगे, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी यांनी "विमुक्त जाती, भटक्या जमाती यांना पदोन्नतीवरील आरक्षण सर्वोच्च न्यायालयाने दिनांक 28मार्च 2008 रोजी उठविले असून या प्रवर्गातील लोकांचा पदोन्नतीतील सुमारे 35 हजार जागांचा अनुशेष गेल्या 16 वर्षापासून भरला नसणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. अनिल परब यांनी " मुंबई उपनगरातील अंधेरी येथील म्हाडाच्या ताब्यात खेळाच्या मैदानासाठी आरक्षित असलेला भूखंड महापालिकेने पत्रव्यवहार करुनही म्हाडाने ताब्यात न देणे, सदर भूखंडावर अतिक्रमण होत असल्याने जनतेत निर्माण झालेली चिडीची भावना " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

.....4

सभापती...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "राज्यातील वनविकास महामंडळातील सुमारे 3200 रोजंदारी मजूर वर्षानुवर्षे अस्थायीरित्या कामावर असून त्यांना सेवेत कायम न करता 5 वर्षे सलग सेवा पूर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना कायम केले असल्याने हजारो अस्थाची कर्मचाऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी "दिनांक 2 एप्रिल 2008 रोजी महानंदा दूध डेअरीच्या वितरकांनी दूध खराब येत असल्याची तोंडी तक्रार केल्यानंतर डेअरीच्या व्यवस्थापनाने 35 लाख रुपये किंमतीचे दूध वितरकांना मोफत देणे, याकरिता संचालक मंडळाची परवानगी न घेणे, यामुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान झाल्याने त्यांच्यात निर्माण झालेली असंतोषाची भावना " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

अन्य सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

यानंतर श्री. भोगले

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राज्य समाजकल्याण बोर्डातील कर्मचाऱ्यांना राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनेतर सवलती लागू करणे

मु. शी. : राज्य समाजकल्याण बोर्डातील कर्मचाऱ्यांना राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनेतर सवलती लागू करणे याबाबत सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.धर्मरावबाबा आत्राम (महिला व बालकल्याण राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, विनोद तावडे, मधुकर चव्हाण यांनी "राज्य समाजकल्याण बोर्डातील कर्मचाऱ्यांना राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनेतर सवलती लागू करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-2.....

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, केंद्र शासनाच्या महाराष्ट्र राज्य समाजकल्याण बोर्डातील अनेक कर्मचारी तेथील योजना बंद झाल्यानंतर राज्य शासनाने जी.आर.काढून या सगळ्या योजना राज्य शासनाकडे हस्तांतरित करण्यात आल्या. या सर्व योजना राज्य शासनामार्फत चालविल्या जात आहेत. शासनाने आदेश काढून तेथील कर्मचाऱ्यांचे आहे त्या परिस्थितीत समायोजन केले आहे. परंतु शासनाने म्हटले आहे की, आम्ही त्यांना प्रतिनियुक्तीवर नेमले आहे. योजना बंद झाली, विभाग बंद झाल्यानंतर हे सगळे कर्मचारी शासनाकडे आले. त्यांना प्रतिनियुक्तीवर म्हणणे बरोबर होणार नाही. या कर्मचाऱ्यांना पाचवा वेतन आयोग लागू करण्याचा प्रश्न होता. त्यांना फेब्रुवारी, 2008 पासून पाचवा वेतन आयोग लागू केला असे म्हटले आहे. वास्तविक शासनाने पाचव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी 1.1.1996 पासून केली आहे. या कर्मचाऱ्यांना 1.1.1996 ते फेब्रुवारी, 2008 पर्यंतची थकबाकी दिली जाईल का? प्रतिनियुक्तीवर न समजता राज्य शासनाचे कर्मचारी म्हणून त्यांना शासकीय कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती व इतर सवलती दिल्या जातील काय?

श्री.धर्मरावबाबा आत्राम : सभापती महोदय, या कर्मचाऱ्यांना आरोग्यविषयक सवलती देतच आहोत. प्रतिनियुक्तीवरच त्यांना नेमलेले आहे. आस्थापनेवर इतर जे कर्मचारी व अधिकारी आहेत त्यांच्याबाबत 50:50 या प्रमाणात राज्य व केंद्र सरकार खर्च देत आहे. त्यांना सेवेत कायम करता येणार नाही. इतर ज्या सवलती आहेत त्या आपण देत आहोत.

श्री.रामनाथ मोते : केंद्र शासनाच्या सवलती राज्य शासनाने देऊ केलेल्या आहेत. राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या सवलती या कर्मचाऱ्यांना मिळत नाहीत हेच माझे म्हणणे आहे.

श्री. धर्मरावबाबा आत्राम : सवलती आपण त्यांना देतो, तसा जी.आर.सुध्दा काढलेला आहे.

सभापती : शासकीय कर्मचाऱ्यांना ज्या सुविधा आहेत अशा सुविधा या कर्मचाऱ्यांना देता का? या प्रश्नाला देत आहोत असे मंत्रीमहोदयांनी उत्तर दिलेले आहे.

श्री. धर्मरावबाबा आत्राम : देत आहोत.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी या प्रश्नाबाबत मंत्रीमहोदयांच्या दालनात जाऊन प्रत्यक्ष चर्चा करावी.

श्री.रामनाथ मोते : धन्यवाद.

----- ..3.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने मुंबईसह मुंबई शेजारील ठाणे, रायगड जिल्हयातील पायाभूत सुविधा व विकासकामासाठी निधी देणे

मु. शी. : मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने मुंबईसह मुंबई शेजारील ठाणे, रायगड जिल्हयातील पायाभूत सुविधा व विकासकामासाठी निधी देणे याबाबत सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर यांनी "मुंबई महानगर विकास प्राधिकरणाने मुंबईसह मुंबई शेजारील ठाणे, रायगड जिल्हयातील पायाभूत सुविधा व विकासकामासाठी निधी देणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-3.....

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, एमएमआरडीए हे प्राधिकरण घटनेतील 249 व्या कलमाप्रमाणे देशातील चार राज्यांमध्ये सुरु झाले. मुख्यत: मुंबई शहरावरील ताण कमी व्हावा म्हणून ठाणे व रायगड जिल्हयातील पायाभूत सुविधा व विकासकामांसाठी 2.40 लाख कोटी रुपयांचा विकास आराखडा लि कन्सल्टन्सीने सादर केला. त्यातील सर्व खर्च मुंबईवरच होत आहे. खर्च करावयास आमची हरकत नाही. परंतु ठाणे, अलिबाग, रायगड या पट्टयात विकास होत नाही. प्राधिकरणाकडून बहुतांश खर्च ठाणे जिल्हयामध्ये झाला पाहिजे. त्याप्रमाणे खर्च केला जाईल काय?

(नंतर श्री.खर्चे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, प्रश्नोत्तराच्या तासात यासंदर्भात सविस्तर उत्तर दिलेले आहे परंतु त्यावेळी सन्माननीय सदस्य उपस्थित नसावेत. तरी देखील मी सांगू इच्छितो की, एमएमआरडीएने यासंबंधी 2.06 लाख कोटीचा एक बिझनेस प्लॅन तयार केला असून त्यात पूर्ण एमएमआरडीए रिजनचा अंतर्भाव आहे. यात मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड हे सर्व भाग अंतर्भूत आहेत. त्यात इनफ्रास्ट्रक्चर, रोड्स, उड्डाणपूल, घनकचरा, मेट्रो, मोनो रेल वगैरे जे जे रिजनल लेव्हलला आवश्यक असते ते सर्व येते. रिजनल लेव्हलसाठी आवश्यक असलेल्या घन कचऱ्याच्या व्यवस्थापनासाठी साईट शोधून त्यावर खर्च करणे हेही त्यात आहे. या सर्वांची विगतवारी केली जाणार आहे व त्यासाठी ज्या ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्याही या बिझनेस प्लॅनमध्ये आपण घेऊ शकतो व त्यावर खर्च करु शकतो.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझा प्रश्न एवढाच आहे की, यावर्षी ठाण्यासाठी किती खर्च केला जाणार आहे ? कारण हा सर्व खर्च मुंबईवरच होत आहे, ठाण्यासाठी मात्र कुठलाही खर्च केला जात नाही. म्हणून ठाण्यासाठी किती खर्च करणार आणि तो कधी करणार आहात ?

श्री. राजेश टोपे : महोदय, मी अगोदरच सांगितले की, ज्या ज्या गोष्टी बिझनेस प्लॅनसाठी आवश्यक आहे त्या आपण करणार आहोत. स्पेसिफिक ठाण्यासाठी किती खर्च करणार यासंबंधीची माहिती मी पटलावर ठेवतो.

महोदय, यामध्ये एकूण गुंतवणूक 2.06 लाख असून त्यात विभाजन करण्यायोग्य गुंतवणूक 1,46,632 कोटी आहे. त्यातून मुंबई, व मुंबई उपनगरांवर 89,664 कोटीचा खर्च होणार आहे, ठाणे जिल्ह्यासाठी 38,046 कोटी एवढा खर्च होणार आहे आणि रायगडमध्ये 18,826 कोटी इतका खर्च केला जाणार आहे. यासंबंधीचा वार्षिक आराखडा एमएमआरडीए तयार करते व या अनुषंगाने सुध्दा आराखडा तयार केला आहे. यावर्षी कोणता खर्च केला जाणार आहे त्यासंबंधीची अधिकची माहिती मी पटलावर ठेवण्यास तयार आहे.

श्री. संजय केळकर : महोदय, मागील वेळी सुध्दा सभागृहात मी ही माहिती विचारली असता त्यावेळेस सुध्दा उत्तर आले नव्हते आणि आजही उत्तर येत नाही. म्हणून हे निवेदन राखून ठेवावे, अशी माझी विनंती आहे. कारण त्याशिवाय आमच्या शंकांचे निरसन होणार नाही.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : मागील वेळी हा विषय सभागृहात उपस्थित झाला होता त्यावेळी या भागातील लोकप्रतिनिधींच्या सोबत एक बैठक घेऊन चर्चा करण्यात येईल, असे सांगण्यात आले होते. परंतु आज मात्र कसल्याही प्रकारचे उत्तर आम्हाला मिळत नाही. म्हणून एमएमआरडीएची स्थापना करण्यामागचा मुंबईतील लोड कमी व्हावा हा जो उद्देश आहे तो सफल होत नाही. कारण आजही बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्समधील प्लॉट विकले जातात. तसेच या एमएमआरडीएचे काही पैसे लातूरला तर काही पैसे कृष्णा खोऱ्याकडे जातात, पण ठाण्यासाठी मात्र कोणताच खर्च केला जात नाही, कारण ठाण्याकडे कोणीच लक्ष देत नाही.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, एमएमआरडीएचे जे रिजन आहे त्यासंदर्भात काय काय प्लॅनिंग करण्यात आलेले आहे त्यासंदर्भात मी स्पष्टपणे सांगितले आहे. नियम 93 अन्वयेची सूचना वाचली तर त्यामध्ये या वर्षापुरते काय काय असा यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी काही सुध्दा विचारलेले नाही. आपला काय प्लॅन आहे, एमएमआरडीए मध्ये आपण काय करणार आहोत यासंदर्भात विचारणा करण्यात आलेली आहे व त्यासंदर्भातील अतिशय सविस्तरपणे आपण काय काय करणार आहोत यासंदर्भातील एमएमआरडीएच्या पूर्ण प्लॅनिंगच्या संदर्भातील उत्तर मी दिलेले आहे. एक्सटेंडेड एमयुआयपी ठाणे आणि रायगडमध्ये करणार आहोत त्यासंदर्भातील सर्व माहिती निवेदनामध्ये देण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्यांना या वर्षीपुरती माहिती हवी असेल तर तशा प्रकारची माहिती मी सन्माननीय सदस्यांना कधीही देऊ शकेल.

सभापती : एमएमआरडीएच्या अनुषंगाने विचार करतो तेव्हा मुंबई, ठाणे आणि रायगड या तिन्ही रिजनमध्ये डेव्हलपमेंट होण्यासाठी यासंदर्भात ज्या तरतुदी आहेत त्या तरतुदी होण्याची आवश्यकता आहे असा या प्रश्नाचा खरा गाभा आहे. या विषयाच्या संदर्भात मी असे सांगू इच्छितो की, या निवेदनाच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी जे उत्तर दिलेले आहे त्या उत्तराच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांबरोबर तुमच्या दालनात एक बैठक घ्या व या बैठकीमध्ये जी चर्चा होईल त्यामध्ये प्राधान्याने यावर्षी ठाणे आणि रायगड करिता किती तरतूद होईल, कशी तरतूद होईल यासंदर्भात चर्चा करुन ती माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवा.

श्री. राजेश टोपे : होय सभापती महोदय. ताबडतोबीने या आठवडयात बैठक घेतली जाईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, या निवेदनाच्या संदर्भात अतिशय तुटपुंजी माहिती देण्यात आलेली आहे. त्यामुळे या विषयाच्या संदर्भात आपल्याला लक्ष घालावे लागेल.

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण या विषयाच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांबरोबर चर्चा करा व त्यानंतर एक दिवस या विषयाच्या संदर्भात माझ्या दालनात चर्चा करु.

श्री. विनोद तावडे : ठीक आहे.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय,आपल्या सूचने प्रमाणे निश्चित मिटींग घेण्यात येईल जी तुटपुंजी रक्कम आहे ती वाढेल कशी यासंदर्भात सुध्दा लक्ष देईन.

सभापती : या ठिकाणी सन्माननीय मंत्री महोदय श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी त्यांच्या निवेदनाच्या संदर्भात पत्र दिलेले आहे. त्यांची एकूण 3 निवेदने आहेत. सन्माननीय मंत्रीमहोदयांना खालच्या सभागृहात लवकर जावयाचे असल्यामुळे निवेदन क्रमांक 6,10 व 12 अगोदर घेण्यात येतील.

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : शवागरातून मृतदेहाचे मुंडके कापून नेणे

मु. शी. : शवागरातून मृतदेहाचे मुंडके कापून नेणे याबाबत डॉ. नीलम गो-हे, डॉ. दीपक सावंत, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. दिलीप वळसे-पाटील (वैद्यकीय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, डॉ. नीलम गो-हे, डॉ. दीपक सावंत यांनी "शवागरातून मृतदेहाचे मुंडके कापून नेणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

... 4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, ससून हॉस्पिटलचा विषय हा वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांच्या अंतर्गत येतो परंतु या विषयामध्ये गृह विभागाचाही संबंध येतो असे मला वाटते. पुणे येथील दापोडी-बोपोडी भागातील स्मशानांमध्ये मृतदेहाच्या शिरावर खिळे मारल्याची उदाहरणे यापूर्वीही घडलेली आहेत. त्यामुळे प्रश्न असा आहे की, या विषयाच्या संदर्भात चौकशी करण्यात आलेली आहे परंतु पोलिसांची मदत घेऊन या प्रकरणाची सीआयडी मार्फत चौकशी करण्याची शिफारस माननीय मंत्री महोदय करतील काय ? बंग गार्डन पोलीस स्टेशन आणि ससून हॉस्पिटल यांच्यामध्ये सुरक्षितेच्या प्रश्नावरुन रोज वाद होत आहेत. मागे महानगरपालिकेच्या संदर्भात विषय आला होता तेव्हा या विषयाच्या संदर्भात मी लक्ष वेधले होते. अर्भकही सुरक्षित नाही आणि मृतदेह सुध्दा सुरक्षित नाही अशी परिस्थिती आहे, त्यामुळे या घटनेची चौकशी सीआयडी मार्फत केली जाणार आहे काय?

दुसरा प्रश्न असा आहे की, शव विच्छेदन करणा-या अधिका-यांनी खिडकीतून बघितले की, एक माणूस तेथे गेला होता परंतु आपल्या उत्तरात म्हटले आहे की, "साडेतीन ते चार या वेळेत मुंडके गायब झालेले आहे". मृतदेहाचे शवविच्छेदन झाल्यानंतर मृतदेह उघडयावरच पडलेले असतात त्यामुळे यासंदर्भात आपण कोणती पाऊले उचलली आहेत?

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ MMP/ KGS/ प्रथम श्री.जुन्नरे 13.40

श्री.दिलीप वळसे - पाटील : सभापती महोदय, पुणे येथील ससून रुग्णालयामध्ये ही अतिशय दुर्देवी घटना घडलेली आहे. निवेदनातील उत्तरामध्ये कोणत्याही प्रकारची विसंगती नाही. क्रोनोलॉजीप्रमाणे व टाईमिग प्रमाणे निवेदनामध्ये माहिती देण्यात आलेली आहे. एका अज्ञात इसमाने काही तरी हेतू डोळयासमोर ठेवून हे कृत्य केलेले आहे. त्यासंबंधी पोलीस तपास सुरु आहे आणि हा तपास जवळपास पूर्ण होत आला आहे अशी प्राथमिक माहिती मिळालेली आहे .या घटनेची चौकशी सी.आय.डी.कडे देण्यात यावी असे जर सन्माननीय सदस्यांचे म्हणणे असेल तर तशा प्रकारची विनंती गृह विभागाला करण्यात येईल.

डॉ.दीपक सावंत :सभापती महोदय, निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, "रात्री 1.40 ते 2.25 च्या दरम्यान शवविच्छेदन करण्यात आले होते ". संकेतानुसार सूर्यास्ता नंतर शवविच्छेदन करण्याचे टाळले जाते. अगदीच इमर्जन्सी असेल, अपघात झाला असेल तरच सूर्यास्ता नंतर शविविच्छेदन केले जाते. हा यामधील एक तांत्रिक मुद्दा आहे. असे असतांना सूर्यास्ता नंतर शवविच्छेदन का करण्यात आले होते ? तेथील डॉक्टरांनी किंवा पोस्ट मार्टेम करणा-या डिपार्टमेन्टने सूर्यास्ता नंतर शवविच्छेदन करण्याचा निर्णय का घेतला होता ? सूर्यास्तानंतर शव विच्छेदन करण्यामध्ये कोणती इमर्जन्सी होती ? त्यानंतर माझा दुसरा प्रश्न असा आहे की, अवयव चोरण्याची घटना यापूर्वी ससून रुग्णालयात घडल्याचे आपल्याला ज्ञात आहे काय ?

श्री.दिलीप वळसे- पाटील : सभापती महोदय, सूर्यास्ता नंतर शवविच्छेदन करु नये अशा प्रकारचे संकेत वा नियम आहेत. या प्रकरणामध्ये इतक्या रात्री शवविच्छेदन का करण्यात आले होते यासंबंधीची माहिती आता माझ्याकडे नाही. अशा प्रकारच्या घटना वारंवार घडता कामा नये अर्भक पळवून नेण्याचा प्रकार असो, अवयव चोरण्याचा प्रकार असो वा ही घडलेली घटना असो या सगळया गोष्टीचा तडा लावण्याच्या दृष्टीने ही बाब सी.आय.डी.कडे तपासण्यासाठी निश्चितपणे दिली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : अमरावती जिल्हयातील भारनियमन

मु.शी : अमरावती जिल्हयातील भारनियमनाबाबत सर्वश्री जगदीश गुप्ता पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.दिलीप वळसे पाटील (उर्जा मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री जगदीश गुप्ता,पांडुरंग फुंडकर,नितीन गडकरी यांनी " अमरावती जिल्हयातील भारनियमन " या विषयावर नियम 93 अन्यये जी सूचना दिली होती,तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस :कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

- निवेदनानंतर -

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, या निवेदनाच्या अनुषंगाने मला तीन प्रश्न विचारावयाचे आहेत. त्यातील पहिला प्रश्न असा आहे की, या कामासाठी नियुक्त करण्यात आलेल्या कंत्राटदाराचे काम समाधानकारक नसल्यामुळे या कंत्राटदारास आजमितीपर्यंत सुमारे 211 लाख रुपये दंड आकारण्यात आला आहे. तेव्हा हा आकडा बरोबर आहे किंवा नाही याबद्दल माझ्या मनात शंका येते. ही रक्कम त्याच्याकडून वसूल करण्यात आली आहे काय ? तसेच त्या कंत्राटदाराला ब्लॅकलिस्टमध्ये टाकण्यात आलेले आहे काय ? त्यानंतर माझा दुसरा प्रश्न असा आहे की, हे काम वेळेत पूर्ण कण्यासाठी विशेषत्वाने लक्ष घालण्यात येणार आहे काय ? त्यानंतर माझा तिसरा प्रश्न असा आहे की, राज्यातील इतर विभागीय जिल्हयांना लोड शेडीगच्या संदर्भात न्याय दिला आहेत परंतु अमरावती जिल्हा मात्र लोडशेडीगच्या न्यायापसून वंचित राहिलेला आहे. तेव्हा आयोगाचे कोणते निकष पूर्ण न केल्यामुळे आम्हाला ही सवलत मिळत नाही ? अमरावतीला हा न्याय मिळवून देण्यासाठी शासन विशेषत्वाने प्रयत्न करील काय ?

श्री.दिलीप वळसे - पाटील : सभापती महोदय, राज्यामध्ये सगळयाच ठिकाणी सिंगल फेजिग आणि फिडर सेपेरशनचा एक मोठा कार्यक्रम हातामध्ये घेतला आहे. अमरावती जिल्हयामध्ये सिगल फेजिगच्या कार्यक्रमाच्या अंतर्गत 22 फिडर्स बसविण्याचे काम करावयाचे होते त्यानुसार 22 फिडर्सचे काम पूर्ण करण्यात आले असून 136 गावे टॅप करण्यात आलेली आहेत. फिडर सेपरेशनचे एकूण दोन टप्पे असून पहिल्या टप्यातील योजनेअंतर्गत 66 फिडर्स बसवावयाचे होते त्यापैकी 15 फिडर्स बसविण्यात आले आहेत आणि 391 पैकी 45 गावांना त्याचा लाभ झालेला आहे. फिडर सेपरेशनच्या दुस-या टप्यातील योजनेअंतर्गत 26 फिडर्स बसवावयाचे असून 298 गावाचा समावेश करण्याचे ठरविले होते. ज्या एजन्सीला हे कंत्राट दिले होते त्या एजन्सीने हे काम वेळेत पूर्ण केले पाहिजे अशा प्रकारचे बंधन त्यांच्यावर घालण्यात आले होते.

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वळसे-पाटील ....

सभापती महोदय, या संदर्भात दरमहिन्याला मी स्वत: सर्व अधिकारी आणि एजन्सींच्या बरोबर एक आढावा बैठक घेत असतो आणि त्यांना दर महिन्याचे टार्गेट ठरवून देत असतो आणि ज्या एजन्सी ते टार्गेट पूर्ण करण्यात कमी पडत असतील तर त्यांना दंड केला जातो तसेच प्रसंगी त्यांच्याकडून ते काम काढून घेऊन दुसऱ्या एजन्सीला देण्याची कारवाई देखील केली जाते. या ठिकाणी सुभाष प्रोजेक्टस म्हणून जी कलकत्त्याची कंपनी आहे तिला आपण 40 फिडरचे काम दिले होते पण ते त्यांच्याकडून वेळेत पूर्ण होऊ न शकल्याने त्यांच्याकडून ते काम काढून घेऊन दुसऱ्या एजन्सीला देण्याचा निर्णय देखील आपण घेतला आहे. सभापती महोदय, दुसरे म्हणजे आज बाकीच्या डिव्हिजनल प्लेसेसला ज्या सवलती या भार नियमनाच्या संदर्भात लागू आहेत त्यांचा लाभ अमरावती हे डिव्हिजनल प्लेस असूनही अमरावतीला मिळत नाहीत ही गोष्ट सत्य आहे आणि ही बाब एमइआरसी पुढे मांडून अमरावतीच्या बाबतीत देखील त्यांनी वेगळा विचार करावा यासाठी प्रयत्न केला जाईल.

श्री. जगदीश गुप्ता : सभापती महोदय, या निवेदनामध्ये आपण म्हटलेले आहे की, नियामक आयोगाची जी मार्गदर्शक तत्त्वे आहेत त्यात अमरावती बसत नाही. तर अशी कोणती मार्गदर्शक तत्त्वे वा निकष नियामक आयोगाचे आहेत की ते अमरावतीमध्ये कमी असल्याने अमरावतीला त्या सवलतीचा फायदा मिळत नाही. ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, त्या ठिकाणी शहर आणि औद्योगिकदृष्ट्या विकसित वा विकसनशील भाग असणे आवश्यक आहे. असे असेल तर त्या ठिकाणी साडेचार तासाचे भार नियमन होते. परंतु अमरावती ही डिव्हिजनल प्लेस असूनही तेथे हे निकष लागू होत नसल्याने तेथे साडेचार तासापेक्षा थोडे जास्त भार नियमन करावे लागत आहे आणि ही गोष्ट आम्ही नियामक आयोगाच्या लक्षात आणून दिलेली आहे आणि अमरावती ही डिव्हिजनल प्लेस असल्याने इतर भागांना ज्या सवलती लागू आहेत त्या अमरावतीलाही लागू केल्या जाव्यात यासाठी विनंती केली आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या निवेदनातील पहिल्याच परिच्छेदात आपण म्हटले आहे की, "....अमरावती जिल्ह्यातील प्रलंबित असणाऱ्या 3365 कृषी पंपांचे संपूर्ण टर्न की पद्धतीने विद्युतीकरणासाठी स्पर्धात्मक निविदेची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. ही वस्तुस्थिती

..... क्यूक्यू 2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर ....

विचारात घेता आतापर्यंत जेमतेम 192 कृषी पंपांना वीज पुरवठा करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे असे म्हणणे योग्य होणार नाही." म्हणून माझा या ठिकाणी स्पेसिफिक प्रश्न आहे की, या जिल्ह्यात साडेतीन हजार शेतकऱ्यांचे कृषी पंपांसाठी वीज मिळावी म्हणून पैसे भरून अर्ज प्रलंबित आहेत. यामध्ये कृषी पंपांचे फीडरचे वेगळे आणि सिंगल फेजिंगचे वेगळे. आता सर्वदूर ही योजना आपण लागू केली आहे त्याबद्दल जरूर आपले मी अभिनंदन करीन. पण महाराष्ट्रात अमरावती मध्ये 3365 कृषी पंपांसाठीचे पेड पेंडींग अर्ज प्रलंबित आहेत तर संपूर्ण महाराष्ट्रात अशा प्रकारचे पेड पेंडींग अर्ज किती प्रलंबित आहेत की त्यांना अजून आपण वीज कनेक्शन दिलेले नाही. आणि अमरावतीच्या बाबतीत हे पेड पेंडींग अर्ज निकाली काढण्याच्या दृष्टीने काही टाईम बाऊंड कार्यक्रम आपण आखलेला आहे का ? नसल्यास, आखणार आहात का?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, राज्यामध्ये आपण कृषी पंपांचे विद्युतीकरणाचा जो कार्यक्रम हाती घेतला आहे त्यात 2007-08 चे 2,16,269 पंपांचे लक्ष्य आपण ठरविले होते आणि त्या अगेंस्ट 29.2.2008 पर्यंत 1 लाख 724 अर्ज सँक्शन केलेले आहेत. ...

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, महाराष्ट्रात एकूण असे किती पेडपेंडींग अर्ज प्रलंबित आहेत ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, माझ्याकडे थोडीशी आधीची माहिती आहे. 31.3.2007 अखेर आपल्याकडे असे 3 लाख अर्ज प्राप्त झालेले होते आणि त्यापैकी 1,76,656 अर्ज पेडपेंडींग आहेत पैकी 92,096 च्या बाबतीत टेस्ट रिपोर्ट दिला होता. त्यानंतर 2007 अखेरचे 2.16 लाखाचे लक्ष्य आपण ठरविले आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अमरावती जिल्ह्यात असलेल्या 3365 कृषी पंपासाठीच्या पेडपेंडींग अर्जाबाबत लवकरात लवकर कार्यवाही होऊन विद्युतीकरण करण्याच्या दृष्टीने आपण काही टाईम बाऊंड कार्यक्रम आखणार आहात का ?

(यानंतर श्री. सरफरे .... आरआर 1 ..

अशुद्धीत प्रत / शोधनेसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, कृषी पंपाचे विद्युतीकरण करण्यासाठी विलंब लागत असल्यामुळे आता याबाबतीत महावितरण कंपनीला सूचना दिल्या आहेत की, आपण टर्न की पध्दतीने जिल्हयाचे टारगेट दिले पाहिजे. आणि दिलेले टारगेट आणि त्या वर्षीचे टारगेट हे कोणत्याही परिस्थिती त्या वर्षीच्या मार्च महिन्यापर्यंत पूर्ण केले पाहिजे. त्यापध्दतीने अमरावती जिल्हयाचे टारगेट सुध्दा मार्च अखेर पूर्ण केले जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/

पृ.शी.: यवतमाळ येथील नगरपरिषदेच्या शाळेतील आदिवासी शिक्षिकेने जाळून घेऊन केलेली आत्महत्त्या

मु.शी.: यवतमाळ येथील नगरपरिषदेच्या शाळेतील आदिवासी शिक्षिकेने जाळून घेऊन केलेली आत्महत्त्या याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, रामनाथ मोते, जगदीश गुप्ता, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री.राजेश टोपे (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, रामनाथ मोते, जगदीश गुप्ता, वि.प.स. यांनी "यवतमाळ येथील नगरपरिषदेच्या शाळेतील आदिवासी शिक्षिकेने जाळून घेऊन केलेली आत्महत्त्या" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुसरून आपण निर्देश दिल्याप्रमाणे मला निवेदन सादर करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यांत आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या राज्याला लाजिरवाणी आणि गंभीर अशी घटना घडलेली आहे. महाराष्ट्र हे एक अग्रगण्य राज्य आहे. या राज्यामध्ये एका आदिवासी शिक्षिकेचा मानसिक छळ केला गेल्यामुळे तिच्यावर जाळून घेऊन आत्महत्त्या करण्याची पाळी येते. यापेक्षा दुसरी लाजिरवाणी गोष्ट नाही. सभापती महोदय, निवेदनात म्हटले आहे की, "शिक्षिकेने 4 जानेवारी रोजी मुख्याध्यापिकेकडे अर्ज केला की, सर्वश्री. सुभाष गावंडे, लक्कडवाड, बांबल हे मानसिक त्रास देत आहेत." अशाप्रकारे अर्ज केल्यानंतर त्या अर्जाची दखल घेतली गेली नाही. त्यानंतर मुख्याध्यापिकेने दिनांक 5 जानेवारीला एक बैठक घेऊन संबंधित शिक्षकांना बोलावून त्यांना समज दिली. निवेदनात म्हटले आहे की, "श्रीमती सुनिता वाढवे यांची शिक्षणाधिकारी व मुख्याधिकारी यांच्याकडे कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही" माझ्याजवळ त्या शिक्षिकेचा अर्ज आहे, त्यात म्हटल्याप्रमाणे गेल्या सहा महिन्यापासून तिला सतत मानसिक त्रास व छळ सहन करावा लागत आहे. श्रीमती सुनिता वाढवे यांनी दिनांक 12 जानेवारी 2008 रोजी मुख्याध्यापिकेच्या माध्यमातून शिक्षणाधिकारी आणि मुख्याधिकारी, नगरपरिषद यांच्याकडे रितसर अर्ज केल्यानंतर प्रशासनाने सदर तक्रारीला केराची टोपली दाखविली.या शिक्षिकेने केलेल्या अर्जाची मुख्याधिकाऱ्यांनी, शिक्षणाधिकाऱ्यांनी व मुख्याधिपेकेने वेळीच दखल घेतली असती तर या शिक्षकांवर कारवाई झाली असती, आणि एका आदिवासी शिक्षिकेवर आत्महत्त्या करण्याची पाळी आली नसती. निवेदनात सांगितल्याप्रमाणे आदिवासी शिक्षिकेने आत्महत्त्या केल्यानंतर संबंधित शिक्षकांना निलंबित करण्यात आले. आदिवासी विकास परिषदेने याबाबत आंदोलनाच्या धमक्या दिल्या. त्यांनी दिल्लीपर्यंत तक्रार केल्यानंतर या शिक्षकांना निलंबित करण्यात आले. सदर शिक्षिकेने 12 जानेवारी 2008 रोजी केलेल्या तक्रार अर्जाची दखल मुख्याधिकाऱ्यांनी, शिक्षणाधिकाऱ्यांनी व मुख्याध्यापिकेने घेतली असती तर तिचा जीव वाचला असता. तेव्हा तक्रार अर्जाची दखल न घेणाऱ्या मुख्याधिकाऱ्यांवर व शिक्षणाधिकाऱ्यांवर आपण कारवाई करणार काय? त्यांना निलंबित करणार काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय,माननीय विरोधी पक्षनेत्यांनी नियम 93 च्या सूचनेव्दारे एक महत्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. एका आदिवासी शिक्षिकेवर झालेल्या अन्यायाबद्दल हा विषय असल्यामुळे तो अत्यंत भावनिक स्वरुपाचा आहे. त्यामुळे या प्रश्नाचे शासनाला निश्चितपणे गांभीर्य आहे. सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी दिलेली माहिती खरी आहे असे गृहीत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/

श्री.राजेश टोपे...

धरुन व मला मिळालेल्या माहितीनुसार सदर शिक्षिकेने पहिली तक्रार मुख्याध्यापिकेकडे केली. त्यानंतर प्रथा परंपरेनुसार मुख्याध्यापिकेने ताबडतोब एक बैठक घेऊन जे संबंधित शिक्षक त्रास देत आहेत त्यांना समज देण्याची सूचना दिली.. त्यानंतर माननीय विरोधी पक्षनेत्यांनी दिलेली माहिती खरी मानून दिनांक 12 जानेवारी 2008 रोजी त्या शिक्षिकेने मुख्याधिकारी आणि शिक्षणाधिकारी यांच्याकडे तक्रार अर्ज केल्यानंतर त्या तक्रारीची योग्य ती दखल घेतली गेली नसल्यामुळे त्याबाबत निश्चितपणे डी.एम.ए. च्या स्तरावर चौकशी करण्यात येईल. कारण याबाबतीत त्यांनी निष्काळजीपणा करावयास नको होता. त्याबाबत चौकशी करुन आवश्यक त्या कायदेशीर बाबी पूर्ण करुन कारवाई करण्यात येईल. परंतु एवढयावरच न थांबता त्याही पुढे जाऊन मी सांगू इच्छितो की, या प्रकरणी उप जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून प्रशासकीय चौकशी सुध्दा लावण्यात आली आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे . . . .

त्या चौकशीच्या अनुषंगाने या सगळया अधिकाऱ्यांची म्हणजे जे आरोपी आहेत. महिलेने डाईंग डिक्लरेशनमध्ये ज्यांची नावे घेतलेली आहेत. त्या सगळयांची विभागीय चौकशी करण्यात येईल. केवळ सस्पेशन ही शिक्षा असू शकत नाही. खरे म्हटले तर ज्यांची डाईंग डिक्लरेशनमध्ये नावे आहेत, त्यांची विभागीय चौकशी करुन त्यांचे टोटल टर्मिनेशन कसे करता येईल यासंदर्भात सुध्दा काळजी घेतली जाईल. त्याचबरोबर जी इंटेरिअम बेल दिलेली आहे, ती रद्द करण्याच्या दृष्टीकोनातून . . . .

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ही फार गंभीर बाब आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी देखील हा विषय तेवढयाच गंभीरपणे घेतलेला आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, त्या शिक्षिकेने बदली मागितली होती, पण ती सुध्दा शिक्षण अधिकाऱ्यांनी दिली नाही. त्यामुळे आरोपींना फरार होण्यासाठी वाव मिळाला. घटना घडल्यानंतर 36 तासानंतर संबंधितांना पकडले आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन मी हे देखील सांगू इच्छितो की, बेल रद्द करण्यासाठी सुध्दा पूर्ण प्रयत्न केले जातील. एवढेच नाही तर यवतमाळ येथील कलेक्टर यांनी या प्रकरणाच्या बाबतीत सी.आय.डी.ची मागणी केलेली आहे. गरज पडली तर या प्रकरणाच्या बाबतीत सी.आय.डी. मार्फत चौकशी करण्याचे आदेश दिले जातील.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, माझा असा प्रश्न आहे की, संबंधितांना अग्रिम जमानत कशी मिळाली ? कारण पोलिसांचा शेअर त्यामध्ये असणार. ज्या पोलिसांनी या सर्व प्रकरणामध्ये आरोपिंना मदत केली, त्यांच्यावर आपण काही कारवाई करणार आहात काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, येथे कोर्टाच्या बाबतीत बोलणे बरोबर नाही.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, यामध्ये पोलिसांचा शेअर असणार. पोलिसांनी जर काही आरोपिंना मदत केली असेल तर त्यांच्यावर आपण कारवाई करणार आहात काय ?

श्री.राजेश टोपे : याबाबतीत कोर्टाने निर्णय दिलेला आहे. परंतु सन्माननीय सदस्यांची भावना लक्षात घेऊन याबबातीत बेल का मिळाली ? याची चौकशी करु.

. . . .2 एस-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : जिल्हा परिषदेच्या हातपंप/वीज पंप दुरुस्त करणाऱ्या कर्मचाऱ्यांना नियमित वेतन न मिळणे

मु. शी. : जिल्हा परिषदेच्या हातपंप/वीज पंप दुरुस्त करणाऱ्या कर्मचाऱ्यांना नियमित वेतन न मिळणे याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर व इतर वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.रणजित कांबळे (पाणी पुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री पांडुरंग फुंडकर व इतर वि.प.स. यांनी "जिल्हा परिषदेच्या हातपंप/वीज पंप दुरुस्त करणाऱ्या कर्मचाऱ्यांना नियमित वेतन न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

. . . .2 एस-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, 26 तारखेपासून संबंधित कर्मचारी उपोषणास बसलेले आहेत. याठिकाणी नियम 93 अन्वये सूचना दिल्यानंतर परवाच म्हणजे दि.7 एप्रिल 2008 रोजी शासन निर्णय निगर्मित केलेला आहे. खरे म्हणजे शासन निर्णय काय आहे ? हे देखील या निवेदनासोबत सांगणे गरजेचे होते. पण ती माहिती दिलेली नाही. मग आम्ही यासंबंधात कसा प्रश्न विचारणार आहोत ? दि.7 एप्रिल 2008 रोजी जो शासन निर्णय निगर्मित करण्यात आला आहे, तो काय आहे ? त्याची येथे माहिती द्यावी. हातपंप दुरुस्त करणारे जे कर्मचारी आहेत, त्यांच्या वेतन व भत्त्याचा प्रश्न निकालामध्ये काढण्याची गरज आहे. म्हणून 7 एप्रिल 2008 रोजी जो निर्णय घेतला आहे, तो घेण्यास एवढा विलंब का झाला आहे ? तसेच हा निर्णय काय आहे ? याचे उत्तर द्यावे.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, हातपंप दुरुस्त करणारे जे कर्मचारी आहेत, ते जिल्हा परिषदेचे ॲडहॉक कर्मचारी आहेत. त्यामुळे जिल्हा परिषदेनेच त्यांचा पगार देणे अपेक्षित आहे आणि जिल्हा दुरुस्ती फंड आहे. त्याच्या माध्यमातून या कर्मचाऱ्यांचा पगार होतो. याबाबतीत 1978 चा जी.आर.आहे. तेव्हा एका हातपंपाचा दुरुस्तीचा रेट 300 रुपये होता. आता त्यांचा पगार लक्षात घेऊन हा रेट किमान 1000 रुपये असणे आवश्यक आहे आणि त्याप्रमाणे आम्ही दुरुस्ती केली आहे. एक हातपंपाच्या मागे 1000 रुपये रेट असेल आणि 1 पॉवर पंपाच्या मागे ग्राम पंचायतीने पाच हजार रुपये दरवर्षी जिल्हा परिषदेला मेन्टेनन्ससाठी दिले पाहिजेत. अशा प्रकारे ग्राम पंयायत कडून जी रक्कम जमा होते, ते सगळे पैसे जिल्हा देखभाल व दुरुस्ती फंडमध्ये एकत्रित होतात. या हेडच्या माध्यमातून दुरुस्ती आणि या कर्मचाऱ्यांचा पगार व्हावयास पाहिजे .....

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या कर्मचाऱ्यांचा तीन-तीन महिने पगार होत नाही. म्हणून हे कर्मचारी उपोषणासाठी बसले होते. त्यामुळे या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत शासन निश्चित धोरण ठरवण्याच्या दृष्टीने निर्णय घेणार आहे काय ?

यानंतर कु.गायकवाड . . . .

अशुद्धीत पत्र / शुद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

श्री. रणजित कांबळे..

विरोधी पक्षाचे नेते सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी सांगितले आहे की, काही जिल्हयामध्ये हातपंप दुरुस्त करणाऱ्या लोकांना वेळेवर वेतन देण्यात आलेले नाही. जळगाव, सोलापूर अमरावती, बीड, लातूर, अकोला, वर्धा, बुलढाणा येथील काही भागात हातपंप दुरुस्त करणाऱ्या कर्मचाऱ्यांना वेतन देण्यास विलंब झालेला आहे ही गोष्ट खरी आहे. हे जिल्हापरिषदेचे कर्मचारी आहेत. त्यामुळे त्यांचे वेतन वेळेवर झाले पाहिजे. ही गोष्ट निदर्शनास आल्यानंतर जिल्हा परिषदेला अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत. जिल्हापरिषदेच्या एकूण उत्पन्नापैकी, पाणीपुरवठयाकरिता 20 टक्के रकमेची तरतूद, समाज कल्याणाकरिता 20 टक्के रकमेची तरतूद, पाणी पुरवठा व स्वच्छतेसाठी 20 टक्के व महिला व बाल कल्याण विकास करीता 10 टक्के रकमेची तरतूद करण्यात येणार आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मला एकच प्रश्न विचारावयाचा आहे की, हात पंप दुरुस्त करणारे कर्मचारी आझाद मैदानामध्ये उपोषणाला बसलेले आहेत. दर महिन्याला त्यांचे वेतन थकीत राहते. या कर्मचाऱ्यांना दर महिन्याला नियमित वेतन दिले जाणार आहे काय एवढाच माझा स्पेसिफिक प्रश्न आहे.

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, शासनाने जिल्हापरिषदेला असे आदेश दिलले आहेत की, कोणतेही काम करण्याच्या अगोदर तेथील कर्मचाऱ्यांना त्यांचा पगार दिला पाहिजे. कर्मचाऱ्यांना पगार दिल्यानंतर बाकीचे काम केले पाहिजे.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, ग्रामीण भागामध्ये 40 टक्के पाणीपुरवठा हा हातपंपाने होत असतो. हात पंप दुरुस्त करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा संप असल्यामुळे, हातपंपाची दुरुस्ती न झाल्यामुळे जनतेला पिण्याचे पाणी देखील आज मिळू शकत नाही. 1246 कामगारांच्या वेतनाचा हा प्रश्न आहे. वेतन न मिळाल्यामुळे आज त्यांची उपासमार होत आहे. या कर्मचाऱ्यांना 1 तारखेला वेतन देण्याकरिता डीआरडीए यांच्याकडून व्यवस्था करता येऊ शकेल. या बाबत शासन कोणताही पुढाकार घेत नाही असे मला वाटत आहे. या कर्मचाऱ्यांचे प्रश्न सुटण्याकरिता शासनाने निर्देश द्यावेत. शासनाने पुढाकार घेऊन कर्मचाऱ्यांना होणाऱ्या उपासमारीपासून वाचवावे व नियमित पेमेंट होण्यासंदर्भात काही तरी तोडगा काढावा.

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, ग्रामीण विकास विभागाचे माननीय मंत्री श्री. विजयसिंह मोहिते पाटील व पाणी पुरवठा, स्वच्छता विभागाचे माननीय मंत्री महोदय श्री. अजित पवार यांच्या बरोबर बसून या संदर्भात तोडगा काढण्यात येणार आहे. तसेच हातपंप दुरुस्त करणाऱ्या कर्मचाऱ्यांना दर महिन्याला इतर कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन देणे बंधनकारक करण्यात येणार आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हे कर्मचारी उपोषणाला बसलेले आहेत. माननीय मंत्री महोदयांना मी एकच प्रश्न विचारु इच्छितो की, या कर्मचाऱ्यांचे जे 3 महिन्याचे थकीत वेतन आहे ते वेतन किती दिवसात देण्यात येणार आहे ? पुढील वेतन नियमित देण्यात येईल असे आपण म्हटलेले आहे. परंतु या पूर्वीचे थकीत वेतन देण्याबाबत कोणता निर्णय घेण्यात येणार आहेत ? हे कर्मचारी आज उपाशी आहेत

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, मी आताच सांगितले आहे की, ग्रामीण विकास व पाणीपुरवठा, स्वच्छता या विभागाच्या माननीय मंत्री महोदयांबरोबर बसून, हे अधिवेशन संपण्यापूर्वी हा प्रश्न निकालात काढला जाणार आहे.

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी..: उस्मानाबाद जिल्हयातील कळंब तालुक्यातील मजुरांना कूपन असूनही गहू,तांदूळ न मिळण्याबाबत.

मु. शी. :उस्मानाबाद जिल्हयातील कळंब तालुक्यातील मजुरांना कूपन असूनही गहू,तांदूळ न मिळण्याबाबत. श्री श्रीकांत जोशी, पाशा पटेल वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सुनील तटकरे (अन्न व नागरी पुरवठामंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री श्रीकांत जोशी , पाशा पटेल यांनी उस्मानाबाद जिल्हयातील कळंब तालुक्यातील मजुरांना कूपन असूनही गहू, तांदूळ न मिळण्याबाबत या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

... ...

4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, उस्मानाबाद जिल्हयातील कळंब तालुक्यातील मजुरांना गेल्या दोन वर्षापासून कूपन असूनही गहू, तांदूळ मिळालेले नाही. या ठिकाणी रास्तभाव दराने धान्यपुरवठा करणारी 4 दुकाने आहेत. या मागे खरा गुन्हेगार कोण आहे याचा आपण शोध घेतला पाहिजे. तसेच ही बाब ऑडीट पॅरामध्ये निदर्शनास आलेली आहे. या प्रकरणात कोणाचे मास्टर माईंड आहे हे आपण तपासून पाहणार काय ?

यानंतर श्री. बरवड..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे तो खरा आहे. म्हणूनच या सगळ्या प्रकरणाची चौकशी करण्याच्या बाबतीत आयुक्त, औरंगाबाद विभाग यांना सूचित करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे या गैरव्यवहाराच्या पाठीमागे आणखी कोणी आहे काय तसेच ऑडिट परिच्छेदाच्या बाबतीत सुध्दा योग्य ती उपाययोजना करण्याच्या दृष्टीने एक महिन्यात कार्यवाही करण्यात येईल.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : यवतमाळ जिल्ह्यात दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना रेशन दुकानातून मका व बाजरी सक्तीने देण्यात येणे

मु. शी. : यवतमाळ जिल्ह्यात दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना रेशन दुकानातून मका व बाजरी सक्तीने देण्यात येणे याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सुनील तटकरे (अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री) : सभापती महोदय, डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "यवतमाळ जिल्ह्यात दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांना रेशन दुकानातून मका व बाजरी सक्तीने देण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, यवतमाळ जिल्ह्यात बाजरी व मक्याची उचल न झाल्याने त्या प्रमाणात गव्हाचे नियतन कमी झाले होते. त्या ठिकाणी जबरदस्ती होत होती म्हणून बाजरी आणि मका घेण्यापेक्षा गहू सुध्दा न घेतलेला बरा अशी परिस्थिती होती. या उत्तरामध्ये विसंगती दिसते. अमुक धान्य घेणार असाल तरच दुसरे धान्य घ्यावयास मिळणार अशी कोणत्याही प्रकारची सक्ती करणार नाही अशी हमी शासन देणार काय ? वर्तमानपत्रामध्ये आम्ही वाचले की, महागाईच्या विरोधात उच्च स्तरावर एक कमिटी तयार झाली आहे. त्यामध्ये यासंदर्भात काय झाले याबाबतची माहिती माननीय मंत्रिमहोदय देतील काय ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, बाजरी आणि मका हे धान्य देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. अशा प्रकारची कोणतीही सक्ती केली जाणार नाही.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : अमरावती शहरात रेशन दुकानातून खाण्यास अयोग्य असलेल्या लाल गव्हाचे झालेले वितरण

मु. शी. : अमरावती शहरात रेशन दुकानातून खाण्यास अयोग्य असलेल्या लाल गव्हाचे झालेले वितरण याबाबत सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सुनील तटकरे (अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री) : सभापती महोदय, सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे यांनी "अमरावती शहरात रेशन दुकानातून खाण्यास अयोग्य असलेल्या लाल गव्हाचे झालेले वितरण" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...5 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, निवेदनाच्या परिच्छेद क्रमांक 4 मध्ये असा उल्लेख केला आहे की, शासनाच्या विविध गोदामांमध्ये जवळपास 36,040 मे.टन लाल गहू शिल्लक असून त्याची विल्हेवाट लावण्याच्या प्रस्तावाबाबत कार्यवाही सुरु आहे. ही कोणती कार्यवाही शासन करणार आहे ? या गव्हाची विल्हेवाट कशी लावणार ? 36 हजार मे.टन गहू गोदामात पडलेला आहे. अमरावती जिल्ह्यामध्ये 25 नमुने घेण्यात आले आणि ते खाण्यास योग्य आहे असे म्हटले आहे. खाण्यालायक असताना लाल गव्हाचे वितरण अमरावती जिल्ह्यामध्ये बंद केले आणि देशी गव्हाचे वितरण सुरु केले अशा प्रकारचे निवेदनामध्ये म्हटले आहे. देशी गव्हाबरोबर बाजरीचे वितरण सुरु आहे काय ? 36 हजार मे.टन गव्हाची विल्हेवाट कोणत्या पध्दतीने लावणार ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, जेव्हा अशा पध्दतीचे धान्य खराब होते त्याबाबतीत जे प्रचलित धोरण आहे आणि जी नियमावली तयार करण्यात आलेली आहे त्या प्रचलित धोरणानुसारच त्याची विल्हेवाट लावण्यात येईल. अगोदरच्या प्रश्नाच्या बाबतीत सांगितल्याप्रमाणे अमरावती जिल्ह्यामध्ये भरड धान्य देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. गहू आणि तांदूळ मागणीनुसार जेवढा लागणार आहे तेवढे नियतन त्या ठिकाणी उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, लाल गहू खाण्यालायक नसल्यामुळे त्याचे वाटप बंद केले आणि असा 36 हजार मे.टन गहू गोदामांमध्ये पडलेला आहे. तो गहू जनावरांना सुध्दा खाण्यालायक नाही. गोदामात बंद असलेल्या या गव्हाची विल्हेवाट कशी लावणार या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, त्याची विल्हेवाट लिलावाव्दारे करण्यात येईल. जे प्रचलित धोरण केंद्र आणि राज्य सरकारने स्वीकारलेले आहे त्या पध्दतीने ते करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 93 च्या निवेदन 1 बाबत

उपसभापती : नियम 93 अन्वये असलेले निवेदन क्रमांक 1 सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी दिलेल्या सूचनेच्या संदर्भात आहे परंतु आता माननीय मंत्रिमहोदय सभागृहात उपस्थित नाहीत. हे निवेदन उद्या ठेवले तर चालेल काय ?

श्री. पाशा पटेल : ठीक आहे.

उपसभापती : नियम 93 चे निवेदन क्रमांक 1 उद्या घेण्यात येईल. आता मध्यंतराची सुट्टी घ्यावयाची काय ?

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज सकाळी 10.00 पासून सुरु झालेले आहे त्यामुळे आता मध्यंतराची सुट्टी घ्यावी.

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, माझ्या विभागाशी संबंधित अनुक्रमांक 8 वर लक्षवेधी सूचना आहे ती घ्यावी.

उपसभापती : ठीक आहे. आता प्रथम लक्षवेधी सूचना क्रमांक 8 घेण्यात येईल.

...7...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : अलिबाग येथील थळ आर.सी.एफ. कारखान्याच्या बॅगिंग प्लँटमध्ये कॉम्प्रेसरचा स्फोट होऊन तीन कामगार जखमी होणे

मु. शी. : अलिबाग येथील थळ आर.सी.एफ. कारखान्याच्या बॅगिंग प्लँटमध्ये कॉम्प्रेसरचा स्फोट होऊन तीन कामगार जखमी होणे यासंबंधी सर्वश्री जयंत प्र. पाटील, शरद पाटील, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अलिबाग (जि.रायगड) येथील थळ आर.सी.एफ कारखान्याच्या बॅगिंग प्लँटमध्ये दिनांक 12 जानेवारी 2008 रोजी सायंकाळी 5 वाजण्याच्या सुमारास कॉम्प्रेसरचा जबरदस्त स्फोट होऊन तीन कामगार जखमी होणे, एवढा जबरदस्त स्फोट होऊन देखील व्यवस्थापनाने नेहमी प्रमाणे ही घटना लपविण्याचा प्रयत्न करणे, यासंबंधीची माहिती पोलीस खात्याला न देणे, एवढ्या प्रचंड स्फोटामुळे परिसरात घबराट निर्माण होणे, मात्र याबाबत पोलीस खात्याने देखील दखल न घेणे, त्यामुळे पोलीस खाते व कंपनीच्या व्यवस्थापनाबद्दल कामगारांमध्ये आणि परिसरातील जनतेमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण होणे, सबब याबाबत शासनाने केलेली कार्यवाही व करावयाची उपाययोजना."

श्री. गणेश नाईक (कामगार मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या सभागृहामध्ये मागील 3 वर्षात मी सात वेळा किंवा आठ वेळा या विषयावर लक्षवेधी सूचना मांडत आहे. आरसीएफ कंपनीकडून तेथे स्फोट होतात, घटना घडतात. तेथे सुरक्षा अधिकारी किंवा कामगार खात्याचे अधिकारी जात नाहीत. त्यामुळे ही आरसीएफ कंपनी कोणाचीच दखल घेत नाही. शासनाने यापुढे आरसीएफ कंपनीने योग्य ती कारवाई करण्याबाबत अधिका-यांना पाठवावे आणि हया घटना थांबविण्यासाठी प्रयत्न करावेत, शासन अधिका-यांना पाठवून योग्य ती कार्यवाही करील काय ?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, दिनांक 12.1.2008 रोजी पोलिसांनी घटनास्थळी जाऊन झालेल्या प्रकाराची चौकशी केली आणि पोलीस स्टेशनमध्ये त्याबाबत गुन्हयाची नोंद केली आहे. त्याबाबत पोलीस खात्याकडून चौकशी सुरु आहे. परंतु कारखाने अधिनियम 148 च्या कलम 37 (4), 7 (अ) (2) (क) नुसार कंपनीने भंग केलेला आहे असे आढळल्यामुळे सदर भोगवटादारास कारणे दाखवा नोटीस दिली आहे. या कायद्यानुसार कलम 232/2008 द्वारे केस दाखल केली आहे. ही भारत सरकारची कंपनी असताना सुध्दा त्याबाबत कसल्याही प्रकारचा भेदभाव न करता कारवाई केलेली आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हा प्रकार एकदाच घडलेला नाही. गेल्या 3 वर्षामध्ये 8 वेळा असे प्रकार घडले आहेत. प्रत्येक वेळी या स्फोटामुळे अपघात होत आहेत. त्यामुळे मी प्रत्येक वेळी नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे, लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे. हे स्फोट किंवा ॲक्शन्स थांबविण्यासाठी शासन कंपनीला नोटीस देणार आहे काय ?

श्री.गणेश नाईक : हा खत निर्मिती करणारा भारत सरकारचा कारखाना आहे. त्याची व्याप्ती 850 एकरामध्ये आहे. अपघात घडला आहे त्यात कोणी मृत झालेले नाही, त्यात कोणी मृत होण्याची शासन वाट पहात नाही. परंतु आजवर त्या कंपनीने ज्या ज्या चूका केल्या आहेत त्यासंबंधी शासनाने निश्चित कारवाई केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे त्या कंपनीच्या व्यवस्थापनाला अधिक काळजी घेण्यास सांगितले जाईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, तेथे अनेक वेळा असे प्रकार होत आहेत. त्याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी या सभागृहाचा एक सदस्य म्हणून माझ्याबरोबर एक संयुक्त बैठक घ्यावी. तसेच मंत्रिमहोदयांनी स्वत: कंपनीला भेट देऊन स्थानिक लोकप्रतिनिधीबरोबर

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

बैठक घेऊन त्या कंपनीच्या व्यवस्थापनाने पुढे चांगले कामकाज करावे यासाठी त्यांना धोरण स्वीकारण्यास भाग पाडले जाईल काय ?

श्री.गणेश नाईक : सन्माननीय सदस्य आणि मी स्वत: त्या व्यवस्थापनातील उच्च प्रतिनिधी यांची एक बैठक करु. शक्य झाले तर त्या कंपनीला सुध्दा भेट देऊ.

श्री.परशुराम उपरकर : इस्पात कंपनीमध्ये सुध्दा असा प्रकार घडला होता. त्यासंदर्भात मंत्रिमहोदयांच्या दालनात बैठक झाली होती. त्यावेळी सांगितल्याप्रमाणे मंत्रिमहोदय त्या कंपनीला भेट देणार काय आणि त्या बैठकीत ठरल्याप्रमाणे कार्यवाही झाली आहे काय ?

श्री.गणेश नाईक : त्या कंपनीबरोबर बैठक घेऊ असे सांगितले होते त्याप्रमाणे बैठक घेतली आहे. त्यांनी पुढे कार्यवाही केली की नाही त्याची निश्चितपणे चौकशी करीन आणि कोकणातील दौ-यावर येईन त्यावेळी त्या कंपनीला निश्चित भेट देईन.

उपसभापती : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.45 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 2.14 ते 2.45 पर्यंत मध्यंतर)

नंतर श्री.शिगम

अशुधारित प्रत / शुद्धीपत्रक नाही

(मध्यंतरानंतर)

सभापतीस्थानी माननीय उपसभापती

उपसभापती : सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री हजर नाहीत म्हणून मी सभागृहाची बैठक 15 मिनिटाकरिता तहकूब करीत आहे.

(दुपारी 2.45 ते 3.00 वाजेपर्यन्त बैठक स्थगित झाली.)

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

निवेदने शासनाकडून न आल्याबाबत

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, म.वि.स.93 अन्वये ठाणे येथे मॅग्रोज तोडीसंबंधीचे एक निवेदन राखून ठेवले आहे, ते निवेदन शासनाकडून अद्याप करण्यात आले नाही, तसेच नियम 289 अन्वये आंबाच्या नुकसानीसंबंधीचे निवेदन देखील शासनाने केलेले नाही. ही दोन्ही निवेदन शासनास करण्यासंबंधीचे आपण आदेश द्यावेत.

उपसभापती : आपण ती निवेदन पुढील आठवडयात घेऊ. आता ती निवेदने होणार नाहीत.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी म.वि.स.नियम 289 अन्वये प्रस्ताव आणला होता. कोकणात अवेळी झालेल्या पावसामुळे आंबा पिकाचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे असा त्या प्रस्तावातील विषय होता. परंतु नियम 289 अन्वये या विषयाची चर्चा उपस्थित न करता दुस-या नियमाखाली ही चर्चा उपस्थित केली जाईल आणि त्याबाबतची सूचना पीठासीन अधिकारी देणार होते. परंतु या विषयाच्या बाबतीत अद्यापपर्यंत कोणत्याही प्रकारचा निर्णय घेण्यात आलेला नाही. हा महत्वाचा विषय असल्यामुळे त्यावर सभागृहात चर्चा होणे आवश्यक आहे. या विषयासंबंधीची चर्चा येत्या एक, दोन दिवसात अथवा पुढच्या आठवडयात घेण्यासंबंधीचे आपण निदेश द्यावेत अशी माझी विनंती आहे.

उपसभापती : या विषयाच्या बाबतीत माननीय सभापती यांच्याशी बोलून ही चर्चा नजिकच्या काळात कधी घेता येईल ते पाहतो.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या सभागृहात मत्स्य दुष्काळाच्या संदर्भात लक्षवेधी सूचनेवर चर्चा झाली होती. त्यावेळी आपल्या दालनामध्ये संबंधित विभागाचे मंत्री आणि वित्त मंत्री यांचेबरोबर एक बैठक आयोजित केली होती. ती बैठक आपण आयोजित केली होती. परंतु आपली अचानक प्रकृती बिघडल्यामुळे ती बैठक होऊ शकली नाही. ती बैठक कधी घेण्यात येणार आहे ?

उपसभापती : सन्माननीय मत्स्यविकास मंत्री श्री. अनिस अहमद यांनी बैठकीस उपस्थित राहण्याची तयारी दाखविली होती. येत्या सोमवारी अथवा मंगळवारी या विषयाच्या संदर्भात बैठक आयोजित करतो.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, आपण चार दिवसापूर्वी आणिक-चेंबूर या ठिकाणी भरणीचे काम चालू आहे. त्यासंबंधी शासनास निवेदन करण्यास सांगितले होते. ते निवेदन शासनाकडून अद्यापपर्यंत झाले नाही. त्या ठिकाणी दुपटीने भरणीचे काम सुरु झाले आहे. या ठिकाणच्या भरणीच्या कामासंबंधीची वस्तुस्थिती काय आहे याबाबतची माहिती सभागृहाला कळली तर बरे होईल. म्हणून यासंदर्भात शासनास निवेदन करण्यासंबंधीचे पुन्हा निदेश देण्यात यावेत.

उपसभापती : मी यासंदर्भात शासनास निवेदन करण्यास सांगितले होते. या ठिकाणी जे मंत्री उपस्थित आहेत, त्यांनी या विषयाबाबतची नोंद घ्यावी आणि संबंधित मंत्र्यांना आज सायंकाळपर्यंत निवेदन करण्यास सांगावे.

ॲड. अनिल परब : शाह-चतुर्वेदी प्रकरणासंबंधी सी.आय.डी.चा अहवाल मागवितो आणि अर्ध्या तासात निवेदन करतो अशा प्रकारचे आश्वासन माननीय उप मुख्यमंत्र्यांनी केले आहे. परंतु त्या प्रकरणाच्या संदर्भात अजूनपर्यंत निवेदन करण्यात आलेले नाही. यासंदर्भात शासनास निवेदन करण्यास सांगावे.

उपसभापती : ठीक आहे. आपला मुद्दा माझ्या लक्षात आला आहे.

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, आपण मागच्या अधिवेशनामध्ये शकुंतला कोठारी यांना जागा देण्यासंबंधीचे आदेश दिले होते. परंतु अद्याप कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही.

उपसभापती : जागा देण्याच्या संदर्भातील विषय आहे काय ?

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, होय. या विषयाच्या संदर्भात तीन वेळा लक्षवेधी सूचना सभागृहात उपस्थित करण्यात आली आहे. परंतु त्या प्रकरणाबाबत काहीही कार्यवाही शासनाच्या माध्यमातून केली गेली नाही. आपण याबाबतीत पुन्हा शासनास निदेश द्यावेत अशी माझी विनंती आहे.

उपसभापती : उद्या संबंधित मंत्री सभागृहात उपस्थित असतील, त्यावेळी हा विषय उपस्थित करावा.

श्री. गोपीकिसन बाजोरिया : ठीक आहे.धन्यवाद.

उपसभापती : आता लक्षवेधी सूचना क्रमांक 1 चर्चेला घेण्यात येईल.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : बीड जिल्हयात नवीन रस्ते तसेच रस्त्याची दुरुस्तीची कामे न होणे

मु. शी. : बीड जिल्हयात नवीन रस्ते तसेच रस्त्याची दुरुस्तीची कामे न होणे यासंबंधी सन्माननीय सदस्या श्रीमती उषा दराडे ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती उषा दराडे (महाराष्ट्र विधानसभा सदस्याव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय रोजगार हमी योजना मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" बीड जिल्हयात राज्यमार्ग 156 ते विखे पाटील सहकारी साखर कारखाना मार्ग, टाकळी ते घुलेवस्ती, धारुर ते बांगरवाडा, जायभायेवाडी ते धारुर रस्ता, नागझरी ते मान्याचा वाडा, बीड, सोनी मोहा ते धुनकवड रस्ता तसेच सोनी मोहा ते गाढवदरा वस्ती ता.धारुर, काचरवाडी ते हिवरा पहाडी 2.5 कि.मी. ता.केज, जि.बीड, पिराची वाडी ते हिवरा 2.5 कि.मी. ता.केज, जि.बीड दत्तमंदीर रोड 2 कि.मी., ता.शिरुर,हनुमान गढ 2 कि.मी. ता.पाटोदा तसेच केज धारुरमुख्य रस्ता केज शिवावरुन धनगर वस्ती, केजपर्यंत नवीन रस्ता करणे याबाबत रोजगार हमी योजना मंत्री यांचेकडे प्रस्ताव सादर करुनही रस्त्यांची दुरुस्ती अथवा नवीन रस्ते न झाल्याने सदर रस्त्सयावरुन ये-जा करणा-या जनतेची गैरसोय होणे, तसेच चांगल्या रस्त्याअभावी वाहनांची खराबी होणे, यामुळे जनतेत पसरलेला असंतोष व याबाबत करावयाची वा केलेली उपाययोजना."

श्री. राणा जगजितसिंह पाटील (रोजगार हमी योजना राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, या राज्याचे रोजगार हमी योजना राज्यमंत्री यांना भेटून या दहा रस्त्यांची कामे व्हावीत अशी मागणी केली आहे. त्या पत्रावर माननीय राज्यमंत्र्यांनी सदर रस्त्यांची कामे विशेष बाब म्हणून करावीत अशा प्रकारचे आदेश दिले आहेत. या कामांची संपूर्णपणे शासकीय प्रोसीजर पूर्ण होऊन सदर 10 रस्त्यांपैकी 7 रस्त्यांच्या कामांना प्रशासकीय मान्यता मिळण्यासंबंधीची फाईल जिल्हाधिकारी,बीड यांच्या टेबलावर पडून आहे. या कामांना प्रशासकीय मान्यता मिळावी म्हणून गेल्या दोन तीन महिन्यात मी व्यक्तीश: जिल्हाधिकारी यांना भेटले. मी जाणीवपूर्वक एक गोष्ट सभागृहाच्या रेकॉर्डवर आणू इच्छिते. जिल्हाधिकारी यांना प्रथम भेटले, त्यावेळी त्यांनी सांगितले की, या कामांना दोन दिवसात प्रशासकीय मान्यता देतो. दुस-यांदा भेटण्यासाठी गेले त्यावेळी तुम्ही आठ दिवसांनी या असे मला सांगितले. पुन्हा या कामांच्या संदर्भात त्यांना भेटावयास गेले त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, मी फार कामात आहे, आपण नंतर यावे. त्यानंतरही मी त्यांना याच कामाच्या संदर्भात भेटण्यासाठी गेले असता अध्यक्षांचे एवढे रस्ते आहेत, माजी अध्यक्षांचे एवढे रस्ते आहेत, अमूक पक्षाचे अध्यक्ष आहेत, त्यांचे एवढे रस्ते आहेत, माजी आमदारांचे एवढे रस्ते आहेत, विद्यमान आमदारांचे एवढे रस्ते आहेत, म्हणून तुमच्या रस्त्यांच्या कामांना मी प्रशासकीय मान्यता देऊ शकत नाही. तुमच्या रस्त्यांना प्रशासकीय मान्यता दिली तर मी अडचणीत येईन, त्यामुळे मी तुम्हाला सहकार्य करु शकत नाही...

यानंतर श्री. कानडे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MMP/ 15:05

लक्षवेधी सूचना क्र. 1 पुढे सुरु....

श्रीमती उषा दराडे .....

सभापती महोदय, अशा प्रकारची उत्तरे एखाद्या आमदाराला दिली जात असतील तर माझा प्रश्न असा आहे की, दिनांक 5.3.08 रोजी चौसाळा-नांदूर रोडला का प्रशासकीय मंजुरी दिली गेली ? धागरगाव-नागरेवाडी 7.1.08 ला का प्रशासकीय मान्यता देण्यात आली ? गजानन कारखाना ते मुंदारवाडी 7 जानेवारीला का प्रशासकीय मंजुरी दिली गेली आणि औरंगपूर ते मानट जानेवारी 5 तारखेला का प्रशासकीय मंजुरी दिली गेली हा माझा प्रश्न आहे. मला याठिकाणी सांगायला दु:ख होते की, उपळी ते लोनवन आणि लोनवनतांडा ते उपळी या रस्त्याची मागणी केली होती ती मंजुर झाली नाही. माझे स्वत:चे गाव आहे. मी जिल्हाधिकारी श्री. कवडे यांना बघायला नेले होते आणि त्याठिकाणी त्यांना चालत जाता आला नाही. विशेष बाब म्हणून एस्टीमेट केले आणि जिल्हाधिकाऱ्यांनी ते मंजूर केले नाही रिव्हाईज करावे लागले. ते सुध्दा जिल्हाधिकारी,बीड यांच्याकडे प्रलंबित आहे. अशा प्रकारच्या शासकीय अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई होणार आहे काय ? आणि ज्या प्रलंबित रस्त्यांची मी मागणी केली आहे त्याबाबत मागील दोन वर्षामध्ये ज्याच्यासंदर्भात प्रशासकांनी म्हणजे जिल्हाधिकाऱ्यांनी जाणीपूर्वक दुर्लक्ष केले आहे त्यांच्याविरुध्द शासन कोणती कारवाई केली जाणार आहे ?

श्री. राणा जगजिसिंह पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी तक्रार केलेली आहे त्याबाबत चौकशी करुन निश्चितपणाने योग्य ती कारवाई केली जाईल. सन्माननीय सदस्यांनी ज्या 10 रस्त्यांचा उल्लेख केला त्याबाबतीत 25.4.07 ला बैठक घेण्यात आली होती. या 10 रस्त्यांच्या एस्टीमेटला मान्यता देण्यात आलेली आहे. पुढील काळामध्ये प्राधान्याने या रस्त्यांची कामे हाती घेतली जातील.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना दिल्यानंतर एस्टीमेटला मान्यता दिली ही गोष्ट खरी आहे काय ? त्याव्यतिरिक्त माझ्या गावचा मालदारा रस्ता व अन्य तीन रस्त्यांची एस्टीमेट प्रलंबित आहेत त्याबाबत उत्तर मिळाले नाही ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला तो खरा आहे. कामांना मंजुरी दिली आहे ही गोष्ट खरी आहे. परंतु वारंवार मागणी करुनही ज्या अधिकाऱ्यांनी प्रतिसाद दिला नाही त्यांच्याविरुध्द चौकशी करुन कारवाई करण्यात येईल. अशी घटना पुन्हा घडणार नाही याची खबरदारी घेऊ. 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : मी आपल्याला पत्र देऊन गावतळे होण्यासाठी मी दोन वर्षापूर्वी पत्राद्वारे मागणी केली होती आणि त्यावर आपण आदेश दिले होते. आता अख्ख गाव तळ होण्याची पाळी आली तरी कारवाई झाली नाही. शेती खाते झोपलेले आहे. किमानपक्षी दोन वर्षे आपल्या पृत्राची दखल न घेणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई होणार किंवा नाही ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, आपण दिलेल्या पत्रावर सूचना दिलेल्या होत्या परंतु त्यावर अजून कारवाई झालेली नाही असे आताच आपण सांगितले. निश्चितपणे याबाबत चौकशी करुन कारवाई करण्यात येईल.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, मी स्वत: जिल्हाधिकाऱ्यांना भेटले होते. उपजिल्हाधिकारी(रोहयो) सांगतात की, रस्ते करावयाला पाहिजेत आणि जिल्हाधिकारी सांगतात मला करावयाचे नाहीत ते बाजूला ठेवा. यासंदर्भात शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, चौकशी करण्याच्या संदर्भात आश्वासन दिलेले आहे. वास्तविक पाहता जिल्हाधिकाऱ्यांना रस्त्यांची कामे मंजूर करण्याकरिता 30 टक्के कोटा ठरवून दिलेला आहे. 70 टक्के कामे ही जलसंधारणाची करावयाची आहेत. जिल्हयामध्ये सेल्फवर किती कामे होती त्या कामांच्या संदर्भात कारवाई सुरु केली किंवा नाही हे पहावे लागेल. सन्माननीय सदस्यांनी ज्या रस्त्यांची मागणी केलेली आहे ती मागणी करुनही कारवाई केली नाही ही गोष्ट खरी मानून त्यासंदर्भातील पुढील कारवाई करण्यात येईल.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : उल्हासनगर,जि.ठाणे येथील कामगार विमा योजनेच्या रुग्णालयात मिळणारे निकृष्ट दर्जाचे जेवण

मु. शी. : उल्हासनगर,जि.ठाणे येथील कामगार विमा योजनेच्या रुग्णालयात मिळणारे निकृष्ट दर्जाचे जेवण यासंबंधी सर्वश्री प्रतापसिंह मोहिते-पाटील, संजय दत्त, गोविंदराव आदिक, राजन तेली, शरद रणपिसे ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"उल्हासनगर जिल्हा ठाणे येथील कामगार विमा योजनेच्या रुग्णालयात अत्यंत निकृष्ट दर्जाचे जेवण मिळत असल्याच्या निषेधार्थ ५३ रुग्णांनी सदरहू हॉस्पिटलच्या प्रवेशद्वाराजवळ दिनांक २७ फेब्रुवारी, २००८ रोजी वा त्या सुमारास निदर्शन केले असणे, जेवण तसेच औषधोपचारही व्यवस्थित होत नसल्याचा आरोप रुग्णांनी केला असणे, डोंबिवलीपासून ते कर्जत, कसाऱ्यापर्यंतच्या गोरगरीब रुग्णांना उल्हासनगरातील ईएसआय हॉस्पिटलचा मोठा आधार असूनही गोरगरीब रुग्णांची हेळसांड होत असल्याने त्यांच्यामध्ये निर्माण झालेला असंतोष, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.''

श्री. रणजित कांबळे (आरोग्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

नंतर श्री. भोगले

अशुधारित प्रत/शुद्धीपत्रक नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रतापसिंह मोहिते पाटील : सभापती महोदय, राष्ट्रीय कामगार विमा महामंडळ, नवी दिल्ली यांच्याकडून उल्हासनगर कामगार विमा योजना रुग्णालयाच्या देखभालीसाठी 3 कोटी रुपये दिले असे निवेदनामध्ये म्हटले आहे. हे देखभाल दुरुस्तीचे काम किती कालावधीत पूर्ण होणार आहे? ज्या तज्ज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली ती नियुक्ती कायमस्वरुपी आहे की तात्पुरत्या स्वरुपाची आहे?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, या कामासाठी आताच तरतूद केली असून सहा महिन्यात काम पूर्ण होणार आहे. जी रिक्त पदे भरली त्यामध्ये डॉ.राठी या सर्जनची नियुक्ती झालेली आहे. पेडियाट्रीक, गायनॅक, ऑथ्यो, अनेस्थेटिस्ट आणि 2 गायनॅक अशा डॉक्टरांची नियुक्ती झालेली असून 4 पदे रिक्त आहेत. ती लवकर भरली जातील.

श्री.प्रतापसिंह मोहिते पाटील : या नियुक्त्या तात्पुरत्या आहेत की कायमस्वरुपी आहेत?

श्री.रणजित कांबळे : ऑनररी बेसिसवर आहेत.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, डोंबिवलीपासून कर्जत कसाऱ्यापर्यंत गोरगरीब रुग्णांना उल्हासनगरचे इएसआयएस रुग्णालयाचा मोठा आधार आहे. असे असताना या रुग्णालयात निकृष्ट दर्जाचे जेवण आणि योग्य तो औषधोपचार मिळत नसल्याने 53 रुग्णांनी निदर्शने केली. अशा घटना वारंवार घडतात हे मी मुद्दाम आपल्या निदर्शनास आणून देत आहे. निवेदनात म्हटले आहे की, असा प्रकार घडलेला नाही. माझ्याकडे श्री.सतीश एटांबे या रुग्णाची लेखी तक्रार प्राप्त झालेली आहे. या घटनेची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून कोणती दक्षता घेण्यात येत आहे?

श्री.रणजित कांबळे : सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी जेवणाबाबत तक्रार केली, निकृष्ट दर्जाचे जेवण मिळत असल्यामुळे रुग्णांनी निदर्शने केली असे म्हटले. असे झालेले नाही. भिषक, वर्ग.1 हे पद रिक्त असल्यामुळे रुग्णांना डायव्हर्ट केले जात होते. टाटा व इतर सरकारी रुग्णालयांमध्ये उपचारासाठी डायव्हर्ट केले जात होते. आंतररुग्णांचे म्हणणे होते की, हे रुग्णालय आमच्यासाठी असल्यामुळे आम्हाला वेगळी ट्रिटमेंट मिळते, म्हणून रिक्त पदे भरली पाहिजेत. शासनाने पदे भरली आहेत. आकृतीबंधाप्रमाणे पदे बदलली आहेत. ती पदे भरावयाची होती. जेवणाबद्दल कोणतीही तक्रार नव्हती. जेवण व औषधोपचाराबाबत पुरेशी तरतूद केली आहे. 4.75 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. या घटनेची पुनरावृत्ती होणार नाही याची काळजी शासन घेणार आहे.

---------- ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : आमगाव, जि.गोंदिया येथे वाढीव पाणीपुरवठा योजना सुरु होऊन ती ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित न होता वीज बील ग्रामपंचायतीस पाठविण्यात येणे

मु. शी. : आमगाव, जि.गोंदिया येथे वाढीव पाणीपुरवठा योजना सुरु होऊन ती ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित न होता वीज बील ग्रामपंचायतीस पाठविण्यात येणे यासंबंधी सर्वश्री केशवराव मानकर, नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाराष्ट्र जीवन प्राधिकरण योजनेअंतर्गत आमगांव, जिल्हा गोंदिया येथे वाढीव पाणी पुरवठा योजना प्रायोगिक तत्वावर सुरु करणे, परंतु गावात विविध ठिकाणी पाण्याचे पाईप फुटलेले असून पाण्याचा पुरवठा न होणे, त्यामुळे परिसरातील जनता पिण्याच्या पाण्यापासून वंचित असणे, अशाप्रकारचे अपूर्ण काम असूनही पूर्ण झाल्याचे दाखवणे, तसेच सदर योजना ग्रामपंचायत, आमगांवला हस्तांतरीत झाली नसतांना सुध्दा ग्रामपंचायत आमगांवला हस्तांतरीत झालेली दाखवणे, प्रायोगिक तत्वावर चालविलेल्या वाढीव पाणी पुरवठा योजनेचे वीज बील भरण्याचे अधिकार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडे असूनही ग्रामपंचायत आमगांवला वीज बील (रुपये ७२,८९२.६८/-) भरावयास पत्राद्वारे कळविण्यात येणे, अशाप्रकारे शासनाची व नागरिकांची केलेली दिशाभूल, त्यामुळे त्यांच्यात पसरलेला असंतोष व यासंबंधात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.रणजित कांबळे (पाणीपुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

(नंतर श्री.खर्चे...

अशुद्धीरहित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर : महोदय, लक्षवेधी सूचनेला जे उत्तर दिलेले आहे ते असमाधानकारक आहे. कारण हस्तांतरणासंबंधीच्या ज्या अटी व शर्ती आहेत त्यांचे पूर्णपणे पालन झालेले नाही तरी देखील दि. 15.6.2005 रोजी ही योजना हस्तांतरित करण्यात आल्याचे म्हटले आहे. परंतु माझ्याकडे येथील ग्रामपंचायतीचा ठराव आहे. ही योजना हस्तांरित झाल्यानंतर दि. 25.5.2005 रोजी काढलेल्या नोटीशीप्रमाणे ठीक 12.00 वाजता सरपंचांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. त्या बैठकीत माननीय अध्यक्षांच्या परवानगीने येणारे विषय या सदराखाली "सदर विषयावर चर्चा करण्यात येते की, आमगाव वाढीव पाणीपुरवठा योजना पूर्ण झालेली नाही. तात्पुरती इतर कामे पूर्ण होईपर्यंत दिनांक 15.11.2005 पर्यंतच तात्पुरती हस्तांतरित करण्यात यावी. जर इतर कामे जसे हे कर्मचाऱ्यास जाण्याकरिता पोहच रस्ता व कर्मचारी निवासस्थान पंपगृहाजवळ व जलशुध्दीकरण केंद्र येथील कामे पूर्ण झाली नाहीत. म्हणून हे हस्तांतरिण रद्द समजण्यात येईल, असे आजच्या सभेने ठरविले." असा ठराव करण्यात आला. या ठिकाणी मात्र माननीय मंत्री महोदय सचिव ग्रामविकास विभाग यांनी दिलेल्या माहितीनुसार उत्तर देत आहेत. आपल्या उत्तरात म्हटले आहे की, तीन महिने पाणीपुरवठा सुरु करण्यात आला. जर विजेचे बिल ग्रामपंचायतीला भरावयाचे होते तर ते बिल महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने का भरले ? तसेच या योजनेची बरीच पाईपलाईन फुटलेली होती ती स्वतंत्र करारनाम्यानुसार जून 2006 मध्ये दुरुस्त करण्यात आली आहे. म्हणून ही योजना तात्काळ सुरु करुन शुध्द पाण्याचा पुरवठा करण्यात येईल काय? बाकी आम्हाला काही घेणे-देणे नाही.

श्री. रणजित कांबळे : या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात दिनांक 2 एप्रिल, 2008 रोजीच सविस्तर चर्चा झालेली आहे. योजना हस्तांतरित झालेली असूनही सन्माननीय सदस्यांनी सांगितले होते की, ही योजना ग्रामपंचायतीला हस्तांतरित झालेली नाही. यासंदर्भात आपण देखील निदेश दिले होते की, सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्याप्रमाणे मंत्री महोदयांनी चौकशी करावी व अशा प्रकारे ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात आली होती. परंतु माझ्याकडे ही योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित झाल्याचे पत्र आहे. आज सन्माननीय सदस्य सांगत आहेत की, त्यांच्याकडे ग्रामपंचायतीचा ठराव आहे व त्या ठरावाप्रमाणे योजना हस्तांतरित झालेली नाही असे ते म्हणाले. अर्थात त्या ग्रामसेवकाने आपल्याला चुकीची माहिती दिलेली आहे. मी सभागृहाला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे....

अशी माहिती देऊ इच्छितो की, योजना पूर्णपणे हस्तांतरित झालेली असून जवळपास 50 हजाराचे विजेचे देयक थकित राहिले होते. एमजेपीने ही योजना हस्तांतरित करतांना ग्रामपंचायतीने ही योजना चालविली, ग्रामपंचायतीने विजेचे देयक थकविले म्हणून दिनांक 10.8.2006 रोजी एमजेपी मार्फत जलशुध्दीकरण केंद्राचे 20 हजार रुपये बिल वीज मंडळाकडे भरण्यात आले. उर्वरित रकमेचा भरणा ग्रामपंचायतीने केला नाही. ही रक्कम भरल्यानंतर मात्र खंडित झालेला पाणीपुरवठा पुन्हा सुरु करण्यात आला. परंतु उर्वरित रक्कम न भरल्यामुळे पुन्हा वीज पुरवठा बंद करण्यात आला. 25 हजार लोकसंख्येचे हे गाव आहे परंतु दरवर्षी प्रति माणसी एक रुपया जरी दिला असता तरी तीन वर्षात विजेचे देयक शिल्लक राहिले नसते. वरुन सन्माननीय सदस्य म्हणतात की, आमची योजना चालू करा, बाकी आम्हाला काही घेणे-देणे नाही. परंतु ग्रामपंचायतीकडून वसूली केली पाहिजे, 1.80 लाख इतकी बिलाची रक्कम बाकी आहे. योजना हस्तांतरित झाल्यानंतर ही जबाबदारी संपूर्णपणे ग्रामपंचायतीची आहे व ग्रामपंचायतीने सुध्दा ही वसुली करणे आवश्यक असते. अशा प्रकारे ही योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित झालेली असतांना सुध्दा संबंधित ग्रामसेवकाने चुकीची माहिती सन्माननीय सदस्यांना दिली, म्हणून मी आताच्या आता या ग्रामसेवकाला निलंबित करणार आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, खरे म्हणजे ग्रामसेवकाला निलंबित करण्याएवेजी माननीय मंत्र्यांनाच निलंबित केले पाहिजे. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात म्हटले आहे की, "सरपंच, ग्राम पंचायत आमगाव व सहाय्यक अभियंता श्रेणी-1 म.जी.प्र. उपविभाग यांनी स्वाक्ष-या केल्या आहेत. ज्या अटी व शर्तीच्या अधीन राहून योजनेची उपांगे ताब्यात घेतली आहेत. त्यातील बहुतेक अटी व शर्तीची पुर्तता करण्यात आली आहे." सभापती महोदय, खरे म्हणजे जोपर्यंत 100 टक्के अटींची पूर्तता होत नाही तोपर्यंत योजना ग्रामपंचायतीला हँडओव्हर करुन नये असे कायद्यात म्हटलेले आहे. अर्धवट काम तुम्हाला ट्रान्सफर करता येत नाही हे तुम्ही स्वत:च मान्य करता. तुम्ही जर या ठिकाणी असे लिहिले असते की, "यासंदर्भातील योजनाचे सर्व काम पूर्ण झाले असून सर्व अटींची पूर्तता झालेली आहे व त्यावर सरपंच व इंजिनिअरच्या सहया करुन कॉन्ट्रॅक्ट झाले आणि योजना ट्रान्सफर केलेली आहे" असे झाले असते तर मग तुमचे म्हणणे बरोबर झाले असते. बहुतेक अटींची पूर्तता केली आहे याचा अर्थ काही अटींची पूर्तता केली नाही असा होतो. सन्माननीय सदस्यांनी बांधकामाच्या त्रुटीच्या संदर्भात वारंवार सांगितलेले आहे त्यामुळे आपण जोपर्यंत 100 टक्के अटींची पूर्तता करीत नाही तोपर्यंत तुमच्या नियमाप्रमाणे ही योजना ट्रान्सफर होऊ शकत नाही. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, या ठिकाणी जर 100 टक्के अटींची पुर्तता झाली नसेल आणि काही अटी बाकी असतील तर तो पर्यंत ही योजना लिगली ट्रान्सफर होऊ शकत नाही. त्यामुळे या योजनेची जबाबदारी तुमच्यावर येते. या योजनेचे बील भरुन, दुरुस्त करुन, सगळया अटी 100 टक्के पूर्ण करुन ही योजना ग्रामपंचायतीला ट्रान्सफर कराल काय व तोपर्यंत ही योजना तुम्ही दुरुस्त करुन चालविणार आहात काय?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, ॲप्रोच रोडच्या साईडच्या ड्रेन्स करावयाचे आहे. या कामाचे आणि योजनाचा काही संबंध नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, 100 टक्के अटींची पूर्तता केल्यावरच योजना ट्रान्सफर केली जात असते की, 70 टक्के अटी पूर्ण केल्यावर ट्रान्सफर केली जाते ? यासंदर्भात कायद्यात काय लिहिले आहे? विभागाने ही योजना पूर्णपणे व्यवस्थित करावी, या योजनेतील सर्व अटी पूर्ण केल्या आहेत असे त्यांनी म्हणावे, कायद्या प्रमाणे सहा महिन्यांची ट्रायल द्यावी व मग ग्रामपंचायतीच्या सहया घेऊन त्यांना ही योजना ट्रान्सफर करावी. स्वत: अर्धवट काम करुन योजना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी....

ग्रामपंचायतीच्या माथ्यावर मारायची आणि मग म्हणायचे की, आम्ही ही योजना तुम्हाला ट्रान्सफर केली आहे असे एक तर्फी म्हणावयाचे हे काही बरोबर नाही. आपण अटी पूर्ण केल्या नाहीत याचा अर्थ ही योजना 100 टक्के ट्रान्सफर होऊ शकत नाही. त्यामुळे सर्व दुरुस्तीचे काम करुन, 100 टक्के अटींची पूर्तता करुन या शहराला पाणी पुरवठा करणार आहात काय?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, जेव्हा ही योजना हस्तांतरीत केली होती तेव्हा ही योजना 100 टक्के सुरु होती. साईड ड्रेनेजचे किरकोळ काम शिल्लक होते. पाणी पुरवठा त्यावेळेस 100 टक्के सुरु होता, फिल्टरेशन प्लँट सरु होता व तेव्हा पासून आतापर्यंत ही योजना सुरु असून ग्रामपंचायत टॅक्स वसूलीचे काम सुध्दा करीत आहे. आजपर्यंत सदर ग्रामपंचायत पाणी पुरवठा स्वत:च्या माध्यमातून करीत आहे. ट्रीटमेंट प्ल्ँटच्या एमएसईबीच्या बिलामुळे हा प्लँट बंद होता. त्यावेळी विजेचे बील 30 हजार रुपये होते आता ते 75 हजार रुपये झालेले आहे. वीज बिलाच्या संदर्भात सुध्दा किश्त होती. ग्रामपंचायत टॅक्स वसूली करीत आहे. कोणतीही योजना जेव्हा हस्तांतरीत केली जाते तेव्हा काही तरी किरकोळ काम शिल्लक राहतच असते. पाणी पुरवठयाच्या संदर्भात जेव्हा पूर्ण योजना सुरु असते तेव्हाच पाणी पुरवठा सुरु होत असतो असतो . या योजनेच्या संदर्भात जी जी कामे पूर्ण करावयास पाहिजे होती ती सर्व कामे पूर्ण करण्यात आली होती. त्या कंडीशनवरच ही योजना ग्रामपंचायतीला हस्तांतरीत करण्यात आलेली आहे. त्यावेळेस सुध्दा पाणी पुरवठयामध्ये काहीही कमतरता नव्हती.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, जीवन प्राधिकरणाचा नियम असा आहे की ,एखाद्या योजनेचे 100 टक्के काम पूर्ण झाल्यानंतर आणि सहा महिन्याची ट्रायल दिल्यानंतर ती योजना ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित केली पाहिजे. या प्रकरणामध्ये 6 महिन्याची ट्रायल दिलेली नाही. उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "बहुतेक अटी व शर्तीची पूर्तता करण्यात आली आहे " याचा अर्थ असा आहे की अजून काही अटी व शर्तीची पूर्तता करावयाचे बाकी आहे. त्यामुळे ही योजना 100 टक्के पूर्ण करण्यात यावी, योजना चालू करण्यात यावी, सहा महिन्याची ट्रायल देण्यात यावी आणि नंतर ती ट्रान्सफर करावी अशा प्रकारचे आपण शासनाला निदेश द्यावेत .

श्री.रणजित कांबळे : सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी चुकीची माहिती देत आहे.ही योजना कमिशन झाली होती, त्याचबरोबर कोणत्याही योजनेची सहा महिने ट्रायल दिली जात नाही तर तीन महिन्यांची दिली जाते. तेव्हा तीन महिन्याची ट्रायल दिल्यानंतर ही योजना हस्तांतरित करण्यात आली होती. ही योजना हस्तांतरित करीत असतांना या योजनेचे सगळे बिल भरण्यात आले होते.रेडचे किरकोळ काम शिल्लक होते. या योजनेचे 100 टक्के काम पूर्ण झाल्यामुळे ही योजना कंडिशनल हॅन्डओव्हर करण्यात आली होती. ही योजना काही कालावधीमध्ये त्या ग्रामपंचायतीने स्वत: चालवली होती . सन्माननीय आमदारांबरोबर मिटीगमध्ये चर्चा झाल्यानंतर एम.एस.ई.बी.च्या पैशाचा एक हप्ता भरला होता. त्यानंतर या मिटीगमध्ये असेसुध्दा ठरले होते की, बाकीचे पैसे वसूल करुन ते स्वत: भरणार आहेत.....

श्री.नितीन गडकरी : पुन्हा एकदा तपासून पाहतो एवढे सांगण्यासाठी माननीय मंत्री महोदयांनी मन मोठे करावे.

श्री.रणजित कांबळे : ठीक आहे. मी पुन्हा तपासून पाहतो व यातून योग्य तो मार्ग काढतो

श्री.नितीन गडकरी : 70 ते 80 हजार लोकसंख्या असलेले हे गाव आहे आणि त्या गावाला पाणी पुरवठा करण्याची ही योजना आहे.

श्री.रणजित कांबळे : 22 ते 23 हजार लोकवस्तीचे ते गाव आहे.

श्री.नितीन गडकरी : 22 - 23 हजार लोकांनी पाण्यापासून वचित रहावयाचे काय ?

श्री.रणजित कांबळे : चार वर्षापासून ही योजना हस्तांतरित करुन ग्रामपंचायत चालवत आहे. आता ट्रीटमेन्ट प्लॅन्टचा मोटार पंप बंद आहे .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ते चार वर्षापासून पाणी घेत आहेत. टॅक्स वसूल करीत आहेत परंतु एम.एस.ई.बी.चे पैसे भरत नाही. सभापती महोदय, ही योजना हस्तांतरित होऊन चार वर्षे झाल्यावर एम.एस.ई.बी.चे पैसे शासनाने भरावे अशी मागणी कशी करता येईल ?

श्री.नितीन गडकरी : 100 टक्के काम पूर्ण झाल्याशिवाय योजना हस्तांतरित करता येते काय ?

उपसभापती : माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले आहे की, या योजनेचे 100 टक्के काम पूर्ण झाले होते तसेच सहा महिने ट्रायल दिली होती.

श्री.नितीन गडकरी : बहुतेक अटी व शर्तीची पूर्तता करावयाची बाकी आहे असे निवेदनात म्हटलेले आहे.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, मला न्याय मिळाला नाही म्हणून मी सभात्याग करीत आहे.

(सन्माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर यांनी सभात्याग केला)

एक सन्माननीय सदस्य (बसून) : लवकर परत या.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सर्व सामान्य माणसांचे प्रश्न मांडण्यासाठी आम्ही येथे येत असतो. एखाद्या प्रश्नावर न्याय मिळणे किंवा न मिळणे ही बाब त्या त्या प्रश्नावर अवलंबून असते. सन्माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर यांची लक्षवेधी सूचना दुस-या वेळी सभागृहात आली असून आपण त्यांना संरक्षण दिले म्हणूनच ती दुस-यांदा येथे आलेली आहे. त्यांच्या दृष्टीने त्यांना न्याय मिळाला नाही म्हणून त्यांनी संताप व्यक्त केला आहे. सन्माननीय सदस्य बसून जरी बोलले असले तरी मी त्यांना सांगू इच्छितो की , जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी एखाद्या सन्माननीय सदस्यांनी पोटतिडकीने एखादा विषय मांडला तर तो टिंगल करण्याचा विषय होता कामा नये. आपल्या गावाच्या संदर्भातसुध्दा असा प्रश्न निर्माण होऊ शकतो. सन्माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर यांना न्याय मिळाला नाही म्हणून त्यांनी सभात्याग केला आहे असे असतांना " लवकर परत या "असे त्यांना सांगणे म्हणजे त्यां सदस्यांच्या भावनेचा आणि प्रश्नाचा अवमान असतो. आपण वरिष्ठ सभागृहाचे सदस्य असून जो निर्णय वा न्याय खालच्या सभागृहामधून होत नाही तो

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निर्णय येथे होतो असा आतापर्यंतचा अनुभव आहे तेव्हा मी अत्यंत नम्रपणे सन्माननीय सदस्यांना सांगतो की अशा प्रकारे त्यांनी शब्द वापरावयास नको होता .एरवी काही प्रमाणात गंमत चालते ते ठीक आहे.

यानंतर श्री.सुंबरे

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत आमदारांनी सुचविलेल्या कामावरील अखर्चित स्थानिक विकास निधीस मुदतवाढ देऊन तो अन्य कामावर खर्च करण्यास परवानगी मिळणेबाबत.

मु. शी. : स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत आमदारांनी सुचविलेल्या कामावरील अखर्चित स्थानिक विकास निधीस मुदतवाढ देऊन तो अन्य कामावर खर्च करण्यास परवानगी मिळणेबाबत यासंबंधी सर्वश्री नितीन गडकरी, विनोद तावडे, केशवराव मानकर, पाशा पटेल, जगदीश गुप्ता, जयंत प्र.पाटील, प्रा.शरद पाटील, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय नियोजन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"आमदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत शासनाकडूनराज्यातील जिल्हाधिकारी कार्यालयांना सन 2006-07 करिता उपलब्ध करून देण्यात आलेला 205 कोटी 97 लाख 15 हजार रूपयांचा निधी वेळेमध्ये पूर्णपणे खर्च न होणे, या निधीपैकी अखर्चित राहिलेला 47 कोटी 95 लाख 61 हजार रूपये एवढा निधी दिनांक 31 मार्च 2008 पर्यंत खर्च करण्याची मुदतवाढ नियोजन विभागाने माहे जून ते सप्टेंबर 2007 या काळात देणे, परंतु निधी दिलेल्या मुदतीत विकास कामाकरिता खर्च करण्यास अडचणी निर्माण होणे, जिल्हाधिकारी कार्यालयाकडून वेळेवर विकास कामाकरिता निधी उपलब्ध होऊनसुद्धा खर्च केला जात नसल्याने जनतेच्या मनात निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिंतेची भावना, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ. सुनील देशमुख (वित्त व नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..... 3डी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(लक्षवेधी सूचनेवरील मा. नियोजन राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर..)

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आम्ही आमदारांनी स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत आमच्या विभागातील कामे सुचविल्यानंतर त्या कामावर स्थानिक विकास निधी दिला जातो त्यातील अखर्चित राहिलेला निधी मुदतवाढ देऊन दुसऱ्या कामांवर खर्च करण्यास परवानगी दिली पाहिजे. मी या संदर्भात माननीय वित्त मंत्र्यांना भेटलो होतो आणि त्यांनी यासाठी परवानगीही दिली होती. परंतु त्यांचे पॉवरफूल सचिव श्री.सुबोधकुमार यांनी काही त्यासाठी परवानगी दिली नाही. जणू काही माननीय मंत्र्यांनी अशा प्रकारे पाठविलेली फाईल निकाली काढायचीच नाही अशी त्यांनी प्रतिज्ञा केली असल्यामुळे मंत्र्यांनी परवानगी देऊनही आमचे हे काम झालेले नाही. खरे तर माननीय श्री.जयंत पाटील यांच्यासारख्या उच्च विद्याविभूषित असलेल्या, स्व. राजारामबापू पाटील यांचे चिरंजीव असलेल्या आणि खंबीर स्वभावाच्या मंत्र्यांनी अशा प्रकारे सेक्रेटरीच्या गुलामगिरीत राहणे बरोबर नाही, किंबहुना ते या गुलामगिरीमध्ये कसे आणि का राहतात हेच मला कळलेले नाही. त्यांचा स्वाभिमान कोठे गेला आहे हा मला सतत प्रश्न पडतो आहे. त्यांच्या जागी दुसरा एखादा स्वाभिमानी मंत्री असता तर तो सरळ राजीनामा देऊन मोकळा झाला असता. सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, माननीय वित्त मंत्र्यांकडे मी हे काम घेऊन गेलो असताना आणि त्यांनी त्यावर आपला होकारार्थी शेरा लिहून सही केली असताना देखील माझे काम झालेले नाही. माझे म्हणणे एवढेच आहे की, मी सुचविलेल्या कामासाठी जे पैसे स्थानिक विकास निधीतून ठेवले गेले होते ते काम अन्य शासकीय योजनांतून दरम्यानच्या काळात होऊन गेले असल्याने हा स्थानिक विकास निधी अखर्चित राहिला. तो अखर्चित निधी आम्ही सुचविलेल्या दुसऱ्या कामांवर खर्च करण्यास आपण परवानगी दिली, त्यासाठी कलेक्टरला अधिकार दिले तर बरे होईल. तरी त्यादृष्टीने आपण हे अधिवेशन संपेपर्यंत आदेश काढून कलेक्टरला अधिकार द्याल का ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, आता येथे सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांनी जे काही सांगितले ते वस्तुस्थितीला धरून नाही. 12 मार्च 2008 रोजी सरकारने या संबंधात जीआर काढून हा निधी खर्च करण्यास परवानगी दिलेली आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझे म्हणणे असे आहे की, आम्ही जे काम सुचविले होते ते मधल्या काळात शासनाच्या अन्य योजनांतून पूर्ण होऊन गेले आहे. आता कलेक्टर म्हणतात की, हा निधी अन्य कामाकडे वळविण्याचे अधिकार आम्हाला नाहीत. त्यामुळे तो अखर्चित

..... 3डी 3 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ....

निधी त्यांना आम्ही सुचविलेल्या अन्य कामांकडे वळविता येत नाही. म्हणून अशी अखर्चित रक्कम आम्हीच सुचविलेल्या अन्य कामांसाठी वळविण्याचे अधिकार आपण कलेक्टरला द्यावेत. आपण या अगोदर त्यासाठी मुदतवाढ दिली होती हे खरे आहे, पण दरम्यानच्या काळात ते काम अन्य शासकीय योजनेतून पूर्ण झालेले आहे त्यामुळेच मी ही विनंती करीत आहे.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या विनंतीचा सकारात्मक विचार सरकार करील. ....

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, केवळ 2-4 लाख रूपये या निधीतील उरले आहेत त्यामुळे आपण याबाबत सरळ आदेश द्यावेत. आपण असे आदेश दिले नाहीत, किमान सभागृहात तसे सांगितले नाही तर आपले सचिव ऐकणार नाहीत. किमान तुमच्या स्वतःच्या प्रतिष्ठेसाठी मी हे सांगतो आहे ते तरी आपण मान्य करावे. आपण सभागृहात उभे राहून आश्वासन दिलेले आहे असे आपल्यालाही आपल्या सेक्रेटरीला मग सांगता येईल.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, मी नम्रतेने सांगू इच्छितो की, मी जे सांगतो तेच खात्याचे सेक्रेटरी करतात. सन्माननीय सदस्यांचा काही तरी त्या संदर्भात गैरसमज झालेला आहे. माझे सर्व कार्यक्रम व्यवस्थितपणे चालतात, कोणी सेक्रेटरी ऐकत नाहीत असे होत नाही, तरी आपण त्याबद्दल मनात कोणतीही शंका ठेवू नका. मंत्री म्हणून माझी जी जबाबदारी आहे ती मी पूर्णपणे पार पाडीत असतो. आता या ठिकाणी माननीय राज्यमंत्र्यांनी त्यांचे उत्तर पूर्ण केले असते तर आपल्याही लक्षात आले असते. सभापती महोदय, 6-7 च्या मुदतवाढीचा हा सगळा प्रश्न आहे आणि त्यासाठी आपण जानेवारी 2007 ते मार्च 2007 या काळातील मुदतवाढ ही रक्कम खर्च करण्यासाठी मागितली होती आणि आम्ही ही मुदतवाढीसाठी मार्च 2008 पर्यंत परवानगी दिली आहे. त्यानंतर मागणी आली की, उरलेल्या एप्रिल ते डिसेंबर पर्यंत मुदतवाढ द्यावी, त्यासाठीही 12 मार्च रोजी परवानगी आपण दिली आणि पुढील वर्षात ही रक्कम खर्च करता येईल म्हणून ही परवानगी होती. कारण अशी परवानगी देऊन आमदारांच्या सूचनेप्रमाणे कामे व्हावीत हाच त्या मागील उद्देश होता. आता त्यानंतर असे झाले आहे की, जी कामे आमदारांनी सुचविली होती ती दरम्यानच्या काळात शासनाच्या वेगळ्या योजनेतून पूर्ण झालेली आहेत असा उल्लेख आपण आता केला आहे. खरे तर असे व्हायला नको. आपण सुचविलेले काम आहे आणि ते शासकीय यंत्रणेला

..... 3डी 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील....

माहिती असताना, हे मुदतवाढीतील आणि स्थानिक विकास निधीतील काम असताना त्यावर त्यातून काही प्रमाणात का होईना काही खर्च झाला असेल तर अशा कामावर दुसऱ्या योजनेतून, दुसऱ्या यंत्रणेने अशा प्रकारे पैसे खर्च करून ती कामे पूर्ण करणे योग्य आहे असे मला वाटत नाही. ...

(यानंतर श्री. सरफरे ....3इ 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत पाटील...

तथापि, अशा स्वरुपाचे स्पेसिफिक पूर्वोदाहरण धरता येणार नाही. अशाप्रकारे आपण सुचविलेली जी कामे आहेत, व जी दुसऱ्या योजनेमधून झालेली आहेत म्हणून ती रक्कम अतिरिक्त झाली असेल तर ती रक्कम नव्याने उपलब्ध करुन देण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मागील वेळी मी हा विषय या सभागृहामध्ये उपस्थित केला होता. रामटेक येथील लोकसभेच्या निवडणुकीच्या वेळी आचारसंहिता लागल्यामुळे त्या मतदारसंघामधील वरुड, मोर्शी येथील एका गावामधील कामासाठी 1 लाखाचा दिलेला निधी खर्च होऊ शकला नाही. मार्च महिन्यामध्ये अधिवेशन असल्यामुळे त्याबाबत मी या सदनामध्ये विनंती केली होती की,पहिल्यांदा लॅप्स झालेला हा निधी दुसऱ्या वेळी खर्च कां झालेला नाही?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे वेगवेगळया ठिकाणी अखर्चित राहिलेला निधी कव्हर करण्यासाठी मुद्दाम आढावा घेण्यात आला. त्यानुसार सन 1998-99 पासून 2005-06 पर्यंत अखर्चित राहिलेला निधी जून 2007 पर्यंत खर्च करण्यासंबंधीचे आदेश ऑगस्ट 2006 मध्ये काढण्यात आले. गेल्या 5 ते 10 वर्षींचा जो राहिलेला अखर्चित निधी असेल तो खर्च करण्याच्या उद्देशाने ही एक ब्लॅंकेट ऑर्डर काढण्यात आली. जिल्हा परिषद, नगरपरिषद यांच्याकडे प्रलंबित असलेल्या रकमा खर्च करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी अनुज्ञप्ती देण्याबाबत ब्लॅंकेट ऑर्डर काढणे हा त्यामागील उद्देश होता. त्या कालावधीमध्ये हा खर्च होणे आवश्यक होते. कदाचित आपल्या जिल्हयातील यंत्रणेकडून याबाबतीत दुर्लक्ष झाले असेल, ज्या गावासाठी आपण 1 लाख रुपये दिले ती रक्कम त्या कामावर खर्च करणे आवश्यक होते. तेव्हा या काळात त्यांच्याकडून झालेली चूक दुरुस्त करण्याची आपण त्यांना संधी दिली आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, रक्कम खर्च करण्यामध्ये जर यंत्रणेचा दोष असेल आणि शासनाने आदेश काढल्यानंतर त्या आदेशाची अंमलबजावणी जबाबदार यंत्रणेकडून होत नसेल तर त्या यंत्रणेला आपण जबाबदार धरणार की नाही? मी जिल्हाधिकाऱ्यांना एका कामाबाबत पत्र दिले होते की, सदरचे काम 31 मार्चपर्यंत पूर्ण झाले आहे, परंतु त्याचे बिल दिले गेले नाही. त्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडून उत्तरही देण्यात आले नाही, व तो निधी लॅप्स झाला. अशाप्रकारे गेल्या चार-पाच वर्षापासून हा निधी खर्च होत नाही. आम्ही सुचविलेली कामे सुध्दा घेण्यात आलेली नाहीत. याबाबत मी जिल्हाधिकाऱ्यांकडे जाऊन त्यांना पत्र दिले होते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, मघाशी सांगितल्याप्रमाणे शासनाने अखर्चित राहिलेली रक्कम खर्च करण्याकरिता जून 2007 पर्यंत परवानगी दिली होती. या कालावधीमध्ये दोन्ही कामे कां घेण्यात आली नाहीत? याबाबत संबंधित यंत्रणेकडून दिरंगाई झाली असेल तर त्यांच्यावर जबाबदारी फिक्स करण्याची कारवाई करु. त्याचप्रमाणे रक्कम खर्च न होता ती अखर्चित राहिली असेल तर त्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. लोकसभेमध्ये खासदारांना दिला जाणारा निधी हा कधीही व्यपगत होत नाही तर तो पुढे कॅरी फॉरवर्ड होतो. त्याचप्रमाणे या सभागृहातील कोणत्याही पक्षाचे आमदार एखादे काम सुचवितात व त्या कामाची मागणी करतात त्यावेळी तेथील स्थानिक आमदारांच्या लक्षात ही बाब येते.त्यावेळी ते आमदार ताबडतोब जिल्हाधिकाऱ्यांकडे जाऊन हे काम माझ्या निधीमधून करा अशाप्रकारची मागणी करुन जिल्हाधिकाऱ्यांना पत्र देतात.त्यामुळे आमच्या सारख्या सदस्यांनी दिलेले काम डावलले जाते. त्यादृष्टीने शासनाकडून धोरणात्मक निर्णय झाला पाहिजे. विधान परिषदेच्या सदस्यांना अशाप्रकारची जी ट्रीटमेंट मिळत आहे ती मिळता कामा नये. दुसऱ्या सभागृहाच्या सदस्यांनी काम सुचविल्यानंतर आमचा निधी बाजूला सारला जातो. त्याकरिता हा निधी व्यपगत न होता तो पुढे कॅरी फॉरवर्ड होईल यादृष्टीने आपण धोरणात्मक निर्णय घेणार काय?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, विधानपरिषदेच्या माननीय सदस्यांनी एखादे काम पहिल्यांदा सुचविले असेल आणि विधानसभेच्या माननीय सदस्यांनी तेच काम ओव्हरलॅपिंग करुन सुचविले असेल त्याठिकाणी पहिल्यांदा ज्या माननीय सदस्यांनी काम सुचविले असेल त्यांना ऑनर केले पाहिजे अशाप्रकारच्या सूचना दिल्या जातील. सभापती महोदय, माननीय सदस्यांनी लोकसभेप्रमाणे आपला निधी देखील व्यपगत होऊ नये अशी मागणी केली. याबाबत मी घेतलेल्या माहितीचा तपशील आपणास सांगतो. महाराष्ट्रातील लोकसभेच्या एका माननीय सदस्यांनी ज्यांचे नाव मी याठिकाणी सांगत नाही, त्यांनी 2004-05 या वर्षीचे पैसे अजून दिलेले नाहीत.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखाची नाही

श्री.जयंत पाटील . . . .

यासाठी काय प्रोसीजर आहे ? तर युटीलायझेशन सर्टीफीकेट द्यावे लागते. ते पैसे जिल्हाधिकारी यांच्याकडे येतात. मग ते लोकसभेच्या सन्माननीय सदस्यांच्या नावाने वेगळे अकाऊंट उघडतात आणि त्यामध्ये ते पैसे जमा करतात. या पैशाचे युटीलायझेशन सर्टीफीकेट द्यावे लागते, सी.ए.कडून त्याचे ऑडीट सर्टीफीकेट मिळवावे लागते. यामध्ये जो शेवटचा हप्ता असतो तो सोडून त्यापूर्वीचे पैसे पूर्णपणे खर्च झालेले आहेत याचे ऑडीट करावे लागते. मग त्याचे व्याज त्यामध्ये ॲड होते. अशा पध्दतीने केल्यामुळे बऱ्याच सन्माननीय सदस्यांचे पैसे दीर्घकाळ अखर्चित राहतात, अकाऊंटमध्ये पडून राहतात. आपली जी प्रोसीजर आहे, त्यामुळे किमान संबंधित यंत्रणेवर तरी वचक राहतो. परंतु आपण जर अशी पध्दत स्विकारली तर सन्माननीय सदस्यांचा सदस्यत्वाचा कालावधी संपेपर्यंत देखील कामे होणार नाहीत. म्हणून आपली जी व्यवस्था आहे, त्यानुसार संपूर्ण सदना समोर ही रक्कम मान्य होते. अशा वेळी समजा जर यावर्षी रक्कम खर्च झाली नाही तर पुढच्या वर्षी बजेट मध्ये तरतूद करुन पुन्हा तो निधी उपलब्ध करुन देता येतो. शेवटी यंत्रणेवर काही प्रेशर राहिले पाहिजे आणि सदनामध्ये ही बाब उपस्थित झाल्यामुळ यंत्रणेवर प्रेशर रहाते.

श्री.अरविंद सावंत (खाली बसून) : दुसऱ्याने केलेले काम कळत नाही.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, पूर्वी मी सर्व सन्माननीय सदस्यांना स्थानिक विकास निधी खर्च करण्याच्या बाबतीत 1998 मध्ये मार्गदर्शक तत्वे पत्राव्दारे पाठविली होती. त्यामध्ये सन्माननीय सदस्यांनी कामे कधी सुचवावीत याच्या बाबतीत साधारणपणे गाईड लाईन देण्याचा प्रयत्न केला होता. यामध्ये एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे की, शक्यतो सन्माननीय सदस्यांनी आर्थिक वर्ष सुरु होण्यापूर्वीच कामे सुचविली, याबाबतीत अप टू डेड प्रोग्रॅम दिला तर सन्माननीय सदस्यांना याबाबतीत फार कमी त्रास होईल. समजा त्यात जर काही राहून गेले तर पुढच्या वर्षी बजेटरी प्रोव्हीजन करुन आपण ते दुरुस्त करतो. त्यामुळे माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, जर त्यांनी आपली कामे वेळेवर सुचविण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला तर असे प्रसंग येणार नाहीत.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, विधानसभेच्या सन्माननीय सदस्यांचा आमदार निधी अडीच कोटी रुपयापर्यंत केलेला आहे. काल याठिकाणी माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी आमदार निधीच्या बाबतीत निवेदन केलेले आहे.

. . . .3एफ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : माननीय उपमुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी कामाच्या बाबतीत माहिती दिलेली आहे. आमदार निधी वाढवून देण्याच्या बाबतीत माहिती दिलेली नाही.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, त्यांनी निधी वाढविलेला नाही. मात्र हा निधी वाढविण्याची आवश्यकता आहे.

उपसभापती : याठिकाणी आमदार निधी वाढविण्याच्या बाबतीत प्रश्न उपस्थित झाला आहे. विधानसभेच्या सन्माननीय सदस्यांचा आमदार निधी अडीच कोटी रुपये करण्यात आला आहे ही वस्तुस्थिती नाही असे सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी सांगितले आहे. विधान परिषदेच्या सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, विधानसभेच्या सन्माननीय सदस्यांना आमदार निधीच्या बाबतीत जो निकष लावला जातो, तोच निकष विधान परिषदेतील सन्माननीय सदस्यांना देखील लावावा अशी येथील सर्व सन्माननीय सदस्यांची मागणी आहे. यामध्ये एक गोष्ट रास्त आहे की, आपण ज्या मतदार संघातून निवडून येतो, त्याच्या मर्यादा ठरलेल्या आहेत. जर मी स्थानिक स्वराज्य संस्थांमधून निवडून येत असेल तर मला त्या संपूर्ण जिल्हयातील ज्या 600-700 स्थानिक स्वराज्य संस्था असतील त्यांचा विचार करावयाचा आहे. तीच परिस्थिती विधानसभेमध्ये जे आमदार निवडून येतात, त्यांची देखील आहे. परंतु एकंदर पाहिले तर विधान परिषदेतील सन्माननीय सदस्यांच्या काम करण्याच्या ज्या कार्यकक्षा आहेत, त्या विधानसभेतील आमदारांच्या कार्यकक्षेपेक्षा निश्चितपणे जास्त आहेत. त्यामुळे आमदार निधीच्या बाबतीत अशा प्रकारची विषमता असू नये. म्हणून विधान परिषदेतील सन्माननीय सदस्यांचे यासंबंधातील म्हणणे ग्राह्य धरुन, विधानसभेतील सन्माननयी सदस्यांप्रमाणे विधान परिषदेतील सन्माननीय सदस्यांचा आमदार निधी वाढवून देण्यात यावा अशी त्यांची मागणी आहे.

श्री.भास्कर जाधव (खाली बसून) : नगरसेवकांना दोन कोटी रुपयांचा निधी मिळतो.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर कु.गायकवाड . . . .

श्री. जयंत पाटील : मी आपणास सांगू इच्छितो की, विधानसभा सभागृहात जर आमदार निधीची रक्कम वाढविली तर विधान परिषदेतील सन्माननीय सदस्यांचा आमदार निधी देखील वाढतोच. आता विधानसभा सदस्यांचा आमदार निधी वाढलेला नाही त्यामुळे विधानपरिषदेतीन सन्माननीय सदस्यांचा आमदार निधी वाढण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण येथे बोलून आम्हाला फायदा होण्याऐवजी नुकसानच झाले. माननीय मंत्री महोदयांनी आता जे काही सांगितले आहे ते तर आम्हाला माहीत आहे.

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव यांनी म्हटल्याप्रमाणे नगरसेवक झाल्यास 2 कोटी रुपये मिळतील. आपल्याला नगरसेवक व्हायचे आहे काय ?

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, विधानसभा सभागृहामध्ये, सत्तारुढ पक्षाच्या काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या काही सन्माननीय सदस्यांची अडीच कोटी रुपयांची कामे घेण्यास सुरुवात केलेली आहे. आमच्या दोन सन्माननीय सदस्यांनी देखील कामे मिळालेली आहेत. सन्माननीय सदस्य श्री. चंद्रशेखर बावनकुळे व सन्माननीय सदस्य श्री. देवेंद्र फडणवीस यांनी त्यांची कामे करुन घेतली आहेत.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांचा काही तरी गैरसमज झालेला आहे. असे काहीही झालेले नाही. महाराष्ट्र राज्यातील काही लोकप्रतिनिधींनी मिळून काही कामे अर्थसंकल्पित करण्याची सूचना केली होती. त्या पैकी काही कामे झालेली आहेत, काही अजून व्हावयाची आहेत. त्यातील काही कामे होणारही नाहीत.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी ही गोष्ट इतक्या लाईटपणे घेऊ नये. आम्ही भोळे आहोत मात्र मूर्ख नाही. माननीय मंत्री हुशार आहेत. आपण आम्हाला मूर्ख समजून उत्तर देऊ नये. आम्ही आपल्या हुशारीची दाद देतो. आमची अशी विनंती आहे की, विधानसभा सभागृहामध्ये माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर. पाटील यांनी कालच रेकॉर्डवर असे कबूल केलेले आहे की, विधानसभा सभागृहाप्रमाणे विधानपरिषद सभागृहातील सन्माननीय सदस्यांना देखील निर्णय लागू करण्यात येईल. या संबंधी आपण आपल्या क्षेत्रातील

2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ..

कामांचे पत्र माननीय अर्थ मंत्र्यांना द्यावे. माननीय उपमुख्यमंत्री हे या सदनाचे नेते आहेत. त्यांनी आपणाला पत्र द्यावयास सांगितले आहे. आपण देखील एक आमदार आहात.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांचा काही तरी गैरसमज झालेला आहे. "नाही " असे मी म्हटलेले नाही. माझ्या उत्तरामध्ये कोठेही नकार नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, विधानसभेमधील काही सन्माननीय सदस्यांकडून अडीच कोटी रूपयांची कामे अर्थसंकल्पात घेण्याकरिता आपण सूचविले होते. आपण सुचविल्याप्रमाणे जवळपास 70 टक्के सन्माननीय सदस्यांची कामे अर्थसंकल्पित करण्यात आली आहेत. त्यानंतर विधानसभेमध्ये या विषयावर चर्चा झाली. माननीय मुख्यमंत्र्यांनी व माननीय उपमुख्यमंत्र्यांनी देखील चर्चा केली. माननीय मंत्री महोदयांनी हे सर्व केलेले आहे असे माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर. पाटील यांनी मान्य केलेले आहे. या संबंधी या सभागृहामध्ये देखील चर्चा झालेली होती. हे सर्व रेकॉर्डवर आहे. याबाबत भेदाभेद केला जाणार नाही असे माननीय उपसभापतींनी देखील सांगितले आहे. आमची अशी भावना आहे की, ज्या निकषाने विधानसभा सदस्यांची अडीच कोटी रुपयांची कामे आपण स्वीकारली आहेत त्या प्रमाणे आम्ही पत्र दिल्यास आमची देखील कामे स्वीकारली जातील असे आश्वासन आपण द्यावे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर. पाटील यांनी सभागृहामध्ये काय आश्वासन दिलेले आहे हे मला माहीत नाही. त्यांनी दिलेले आश्वासन तपासून कार्यवाही करण्यात येईल. माननीय उपमुख्यमंत्री हे या सभागृहाचे नेते आहेत त्यामुळे त्यांनी दिलेला आदेश मला शिरसावंद्य आहे.

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी..: ठाणे येथील जीर्ण अवस्थेत असलेल्या सहकारी गृहनिर्माण सोसायटयांच्या व धोकादायक इमारतींच्या पुर्नविकासासाठी दोन किंवा त्यापेक्षा जास्त चटई क्षेत्र देण्याबाबत.

मु. शी. : ठाणे येथील जीर्ण अवस्थेत असलेल्या सहकारी गृहनिर्माण सोसायटयांच्या व धोकादायक इमारतींच्या पुर्नविकासासाठी दोन किंवा त्यापेक्षा जास्त चटई क्षेत्र देण्याबाबत यासंबंधी सर्वश्री जितेंद्र आव्हाड लक्ष्मण जगताप, भास्कर जाधव, रणजितसिंह मोहिते पाटील, डॉ.वसंत पवार, सर्वश्री राजेंद्र जैन,रमेश शेंडगे,श्रीमती मंदा म्हात्रे,प्रा.फौजीया खान,सर्वश्री संजय केळकर,रामनाथ मोते,मधुकर चव्हाण,कपिल पाटील ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जितेंद्र आव्हाड (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ठाणे येथील जुन्या जीर्ण अवस्थेत असलेल्या सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांच्या व धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासासाठी दोन किंवा त्यापेक्षा जास्त चटईक्षेत्र (एफएसआय) देणेसाठी मा. मुख्यमंत्री, सचिव, नगरविकास विभाग यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ मार्च, २००८ रोजी तसेच यापूर्वी वारंवार केलेली मागणी, सुमारे ५० वर्षापूर्वी बांधलेल्या सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये लक्षावधी सर्वसामान्य नागरीकांचे वास्तव्य असून सदरच्या इमारती धोकादायक अवस्थेत असल्याने त्यांच्या जिवितास धोका निर्माण झालेला असणे, सदर गंभीर प्रकरणी आवश्यक ती कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी परिसरातील नागरीकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष तसेच जीर्ण

४...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अवस्थेत असलेल्या इमारतींमध्ये रहावे लागत असून आगामी कालावधीत गंभीर अपघात होण्याच्या निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे नागरीकांमध्ये पसरलेले चिंतेचे तथा भितीचे वातावरण, सदर गंभीर प्रकरणी शासनाने वेळीच हस्तक्षेप करुन सहकारी गृहनिर्माण सोसायट्यांच्या विकासासाठी दोन किंवा त्यापेक्षा जास्त एफएसआय देऊन सर्वसामान्यांना दिलासा देण्यासाठी त्वरीत निर्णय घेण्याची अत्यावश्यकता आणि शासनाची प्रतिक्रिया."

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून मी एका अत्यंत गंभीर व महत्वाच्या प्रश्नाला वाचा फोडू इच्दितो. 1995 साली डीपी मंजूर झाला असे निवेदनात म्हटलेले आहे. 2008 मंजूर केलेल्या फेरबदलानुसार दाट वस्ती क्षेत्राबाहेरील धोकादायक इमारतीच्या पुर्नबांधणीसाठी कमाल 3.00 चटई क्षेत्र निर्देशांक व दाट वस्ती क्षेत्राबाहेरील धोकादायक इमारतींच्या पुर्नबांधणीसाठी कमाल 2.00 चटई निर्देशांक अनुज्ञेय करण्यात आला होता. या फेरबदलामुळे महानगरपालिकेमध्ये काही मुद्यांबाबत संदिग्धता निर्माण झाली होती. काही मुद्यांवर मार्गदर्शन मिळविण्याकरिता शासनाकडे पत्र पाठविण्यात आले होते.यावर शासनाने काही डायरेक्टीव्हज दिलेले आहेत.

यानंतर श्री. बरवड..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड ....

हे सगळे या निवेदनामध्ये म्हटले आहे. आता 2008 साली आपण त्यांना आपण काय करावयास हवे याबाबत काही सूचना केलेल्या आहेत. त्या सूचना आणि महानगरपालिकेने केलेली सूचना नेमकी विरोधात आहे. 1995 साली आपण जे सांगितले त्याला महानगरपालिकेने विरोध केला आणि आता महानगरपालिका जे सांगत आहे त्याला शासन विरोध करीत आहे. त्यामुळे मधल्यामध्ये सर्वसामान्य नागरिकांचे हाल होत आहेत तसेच शहराचा विकास होत नाही. डिलॅपिडेटेड इमारती कोणी घेत नाहीत. इमारती पडावयास आलेल्या आहेत. मालक दुरुस्ती करावयास मागत नाहीत. त्यामुळे गोरगरीब माणूस मधल्यामध्ये मरत आहे. तीच परिस्थिती सोसायट्यांची आहे. मुंबईला वेगळा न्याय आणि ठाण्याला वेगळा न्याय अशी परिस्थिती आहे. ठाणे शहर हे मुंबईचे उपनगर आहे. हायकोर्टाने आदेश दिला की, सोसायट्यांना 2 एफ.एस.आय. द्यावा. सोसायट्यांची सुध्दा मागणी होती तसेच हायकोर्टाने सुध्दा सांगितले. सुप्रीम कोर्टामध्ये शासनाचे अपील आहे. ते अपील करण्याची गरज नव्हती. जर उच्च न्यायालयाने लोकांच्या हिताचा निर्णय दिला असेल तर त्याच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयामध्ये जाण्याची गरज नव्हती. यामध्ये दोन प्रश्न आहेत. 1995 ची जी नियमावली आहे त्यामध्ये डिलॅपिडेटेड इमारतींना 2 एफ.एस.आय. द्यावा. तसेच यामध्ये सोसायट्यांचा खास बाब म्हणून विचार करुन त्यांनाही 2 एफ.एस.आय. द्यावा. शासन हे मान्य करणार काय ? कारण शहराचा जो विकास कुंठीत झालेला आहे तो वाढीस लागेल. तसा निर्णय शासन घेणार काय ? तसा निर्णय घेणे शक्य नसेल तर अनधिकृत धोकादायक इमारतींचा सर्व्हे करण्यासाठी जी अग्रवाल समिती ठाणे शहरामध्ये फिरत आहे त्यांनी लोकप्रतिनिधींशी चर्चा करुन, ठाणे महानगरपालिका, नगरसेवक, महासमिती तसेच तेथील नागरिक, सोसायट्यांमधील रहिवाशी यांच्याबरोबर चर्चा करुन त्याच्या बाबतीत त्या समितीकडून शिफारस घेऊन शासन त्यासंदर्भात कार्यवाही करणार काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी सोसायट्यांच्या जीर्ण झालेल्या इमारतींना जास्तीचा एफएसआय मिळावा अशी मागणी केलेली आहे. या निवेदनामध्ये स्पष्टपणे सांगितले आहे की, उच्च न्यायालयाने जो काही निर्णय दिला होता

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे .....

त्यासंदर्भात सुप्रीम कोर्टामध्ये प्रकरण गेले होते आणि ही बाब सबज्युडिस आहे. ही बाब सबज्युडिस असल्यामुळे त्या ठिकाणी धोकादायक अनधिकृत इमारतींचा सर्व्हे करुन धोरण ठरविण्यासाठी अग्रवाल समिती नेमली होती. सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, धोकादायक इमारतींना जास्तीचा एफ.एस.आय. द्यावा. परंतु अग्रवाल समितीच्या पर्व्ह्यूमध्ये या गोष्टी आहेत. त्या समितीचा अहवाल एखाद्या महिन्यात येईल. धोकादायक इमारती आणि सोसायट्यांचा जो विषय सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी सांगितला त्याचा अंतर्भाव त्यामध्ये केला जाईल जेणेकरुन अग्रवाल समिती धोकादायक इमारती आणि सोसायट्यांच्या बाबतीत निर्णय घेईल. ती समिती धोकादायक अनधिकृत इमारतींच्या बाबतीत सुध्दा निर्णय घेईल. यासंदर्भात त्या समितीला 3 महिन्यांचा कालावधी दिला होता ती मुदत एप्रिलअखेर संपत आहे. आणखी महिनाभराचा कालावधी त्यांना वाढवून देऊ. त्या कालावधीत अग्रवाल समितीने आपल्या शिफारशी द्याव्यात. त्यामध्ये सोसायट्यांच्या विषयाचा अंतर्भाव करण्याविषयीच्या सूचना अग्रवाल समितीला देण्यात येतील आणि त्या अनुषंगाने जो अहवाल येईल यावर शासन योग्य तो निर्णय घेईल.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, अग्रवाल समितीचे प्रिॲम्बल तयार आहे. त्यांचे कार्यक्षेत्र तयार आहे. अग्रवाल समितीला पूर्ण जिल्ह्यांची तपासणी करण्यास सांगितले आहे. त्यामध्ये उल्हासनगर, कल्याण-डोंबिवली, वसई, विरार, मिरा-भाईंदर हा सर्व भाग येतो. आपण त्या समितीला स्पेसिफिक सांगावे की, ठाणे शहरातील अधिकृत डिलॅपिडेटेड इमारती आणि सोसायट्या यावर अभ्यास करुन त्याबाबत ज्या शिफारशी करावयाच्या आहेत त्या कराव्यात. पुढचे अधिवेशन सुरु होण्याच्या अगोदर आपल्याला त्यावर निर्णय घेता येईल. शासन हे करणार काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, होय.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. खंदारे...

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी लांबलचक उत्तर दिलेले आहे. ठाणे शहरामध्ये आमच्या 4 पिढया रहात आहेत, आपणही राहता आणि सन्माननीय सदस्य श्री.आव्हाड सुध्दा राहतात. शासनाच्या माध्यमातून ठाणे जिल्हयावर कायम अन्याय होत आहे. मुंबईला एक न्याय आणि ठाणे जिल्हयाला एक न्याय दिला जातो. मग तो एफएसआयच्या संदर्भात असेल, एमएमआरडीएच्या कामाच्या संदर्भात असेल. ठाणे जिल्हयात प्रचंड प्रमाणात नागरीकरण वाढत आहे. आतापर्यंत समित्या खूप झाल्या. यापूर्वी काकोडकर समिती नेमली होती, त्या समितीचा अहवाल शासनाने बासनात गुंडाळून ठेवला आहे. अशा समित्या येतील आणि जातील. शासनाने समिती नियुक्त करु नये असे माझे म्हणणे नाही. शासन आग लागेपर्यंत वाट पाहणार आहे काय ? ठाणे शहरात इमारती कोसळत आहेत, तेथे जुन्या मालकी तत्वाच्या इमारती आहेत, अपार्टमेंट आहेत, सहकारी गृहनिर्माण सोसायटया आहेत. मुंबईचा भार ठाण्यात येत आहे. यासंबंधी तातडीने निर्णय घेणार काय ? मोडकळीस आलेल्या इमारतीसंबंधी दुरुस्ती मंडळाची एक बैठक झाली होती त्या बैठकीला मी उपस्थित होतो. त्या दुरुस्ती मंडळाची स्थापना होणार आहे काय ? त्यासंबंधी केवळ चर्चा चालू आहे. ठाणे शहरातील लोकप्रतिनिधींची मागणी आहे की या मंडळाची स्थापना करावी. त्याचा पुनर्विचार शासन करणार आहे काय ? वाढते नागरीकरण लक्षात घेता शैक्षणिक संस्थांना वाढीव एफएसआय दिला जाणार आहे काय ? कारण मुंबई महानगरपालिकेने यासंबंधी ठराव करुन शासनाकडे पाठविला आहे. तसा ठाणे महानगरपालिकने ठराव दिला तर शैक्षणिक संस्थांकरिता 4 एफएसआय मंजूर करणार काय ?

श्री.जितेंद्र आव्हाड : आरक्षित प्लॉट आहेत ते मुक्त करण्यासाठी ठाणे महापालिकेकडे 100 अर्ज आलेले आहेत. महापालिकेच्या हातातील काम आहे पण ते करीत नाहीत. त्याबाबत शासन काहीच करु शकत नाही. स्व.परांजपे यांनी ठाणे महानगरपालिकेला 100 पत्रे दिली. त्यानंतर 823 प्लॉटपैकी केवळ 10 टक्के प्लॉट मुक्त झालेले आहेत. आपण या सभागृहात ठराव संमत करु की ज्या ज्या महापालिका क्षेत्रात शैक्षणिक संस्थेचे प्लॉटस् आहेत, शाळेचे, क्रीडांगणाचे प्लॉटस् आहेत ते त्वरीत रिलीज करावेत. ते प्लॉटस् शैक्षणिक संस्थांना द्यावेत, क्रीडा प्रतिनिधींना द्यावेत आणि शहराचा विकास करावा. आपण शासनाकडून पाहिजे ते करु घेऊ शकतो, पण महानगरपालिकेची मानसिकता दिसली पाहिजे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/ KGS/ KTG/

श्री.राजेश टोपे : सन्माननीय सदस्य श्री.केळकर यांना तातडी आहे तशी शासनाला सुध्दा आहे. काकोडकर समितीचा अहवाल शासनाने बासनात गुंडाळलेला नाही. त्या समितीच्या अहवालाच्या अनुषंगाने एक नवीन कायदा आणला आहे. राज्यात अनधिकृत इमारती आहेत त्यांना दुप्पट शास्ती लावावयाची, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना हे माहीत आहे. काकोडकर समितीच्या अहवालातील शिफारशीनुसार ही कार्यवाही केली होती. आता मी एवढेच सांगतो की, या सभागृहातील सदस्यांच्या मागणीमुळे अगरवाल समिती मी नेमली होती, त्या समितीला 3 महिन्यांचा कालावधी दिला होता. मी निवेदनातही स्पष्टपणे सांगितले आहे की, भाडेकरु इमारतींच्या पुनर्विकासासाठी आजही डी.सी.रुलप्रमाणे 0.5 इन्टेंसिव्ह एफएसआय दिला जातो. एखादी भाडेकरु इमारतीमधील भाडेकरुंचे व्याप्त क्षेत्र आहे त्याच्या अनुषंगाने 0.5 जादा देऊन त्या इमारतीचा पुनर्विकास करण्याची तरतूद डी.सी.रुलमध्ये आहे. परंतु मालकी हक्काची इमारत असेल किंवा सहकारी संस्थेची इमारत असेल, रुटीन एफएसआय 1 असेल तर तो 1.15 होईल.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय सांगत आहेत त्याप्रमाणे कोणी करीत नाहीत.

श्री.राजेश टोपे : सन्माननीय सदस्यांची या प्रश्नाबद्दलची तळमळ समजू शकतो. पण आज डी.सी.रुलमध्ये भाडेकरु इमारतीसाठी काय तरतूद आहे आणि मालकी हक्काच्या इमारतीसाठी काय तरतूद आहे ते सांगणे आवश्यक आहे.

नंतर श्री.शिगम

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, याबाबतीत हायकोर्टाने देखील भाडेकरुंच्या इमारती आणि सोसायटी इमारती यांना एकच नियम लागू करावा असा निर्णय दिलेला आहे. त्यानंतर महानगरपालिका आणि शासन सुप्रिम कोर्टात गेल्यामुळे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. 0.1 एफएसआय दिल्याने सोसायट्यांच्या इमारती पुनर्विकसित करण्यासाठी लोक पुढे येणार नाहीत ही गोष्ट मी सुध्दा मान्य करीन. आज आयुक्तांनी 900 धोकादायक इमारती पिनपॉईंट केलेल्या आहेत. याबाबतीत नवीन स्पष्ट धोरण आखणे आवश्यक आहे. अग्रवाल समितीने सोसायट्यांना त्यांच्या हद्दीपर्यन्त विकास करण्याच्या दृष्टीने सूचना दिलेल्या आहेत. याबाबतीत 1 महिन्याच्या आत रिपोर्ट घेतला जाईल. तसेच यासंदर्भातील तातडी लक्षात घेऊन नवीन धोरण आखले जाईल.

श्री. मुझफ्फर हुसेन : ठाणे जिल्हयातील सर्व महानगरपालिका आणि नगरपरिषदांनी हा मुद्दा उपस्थित केला होता. महानगरपालिका, नगरपालिका, मुख्याधिकारी असे प्रशासन असताना ही अनधिकृत बांधकामे होतातच कशी हा प्रश्न आहे. उल्हासनगरच्या बाबतीत तेथील जनतेच्या दृष्टीने शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला. तो पायंडा पडला. म्हणजे अनधिकृत बांधकाम केल्यानंतर ते नियमित करण्यासाठी शासन समिती नेमणार आणि धोरण ठरविणार. आता अग्रवाल समिती अस्तित्वात आलेली आहे. ही समिती जिल्ह्यामध्ये फिरुन अनधिकृत बांधकामे अधिकृत करण्यासाठी काय करता येईल याबाबतीत अभ्यास करणार आहे. हे शासन अनधिकृत बांधकामे अधिकृत करण्याची भूमिका घेत असतांना ज्यांच्यामुळे ही अनधिकृत बांधकामे झाली त्या लोकांवर, अधिका-यांवर, पदाधिका-यांवर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

उपसभापती : एक अत्यंत महत्वाचा प्रश्न या लक्षवेधीच्या माध्यमातून सभागृहामध्ये उपस्थित झालेला आहे. मी देखील 12 वर्षे या ठाणे महानगरपालिकेमध्ये होतो. मी ठाणे महानगरपालिकेचा सुध्दा महापौर होतो. ही जी लक्षवेधी या ठिकाणी उपस्थित करण्यात आलेली आहे त्या संदर्भात ठाण्याचा एक नागरिक म्हणून माझे असे स्पष्ट मत आहे की, ठाण्याची वाढती लोकसंख्या आणि ठाणे शहराच्या महानगरपालिकेला इन्फ्रास्ट्रक्चर पुरविण्यासाठी येत असलेला ताण याचे मूल्यमापन केले तर अशा प्रकारचा कोणताही निर्णय घेणे हे शासनाच्या आणि ठाण्याच्यादृष्टीने हितावह

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नाही. हा निर्णय घ्यावयाचा असेल तर सर्व पक्षाचे लोकप्रतिनिधी, स्वत: माननीय राज्यमंत्री, संबंधित महानगरपालिकेचे आयुक्त यांनी एकत्रपणे चर्चा करुन निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. कारण उल्हासनगरमध्ये जे झाले ते ठाण्यामध्ये होऊ नये अशी माझी प्रांजळ इच्छा आहे. आज वागळे इस्टेट भागामध्ये प्रचंड बांधकाम उभे राहिलेले आहे. त्या बाबतीत तत्कालीन मुख्यमंत्री आदरणीय श्री.शरद पवार यांनी देखील भविष्यात निर्माण होणा-या धोक्यांची कल्पना त्यावेळी दिली होती. परंतु त्यांनी दिलेल्या सूचनेकडे दुर्लक्ष करण्यात आले. त्यासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधी हे देखील कारणीभूत असू शकतील. कालच्या पिढीत या गोष्टी केलेल्या असल्या तरी पुढचा काळ हा तुम्हा आम्हाला क्षमा करणार नाही. आज 900 इमारती धोकादायक आहेत. उद्या 30 वर्षापूर्वी बांधलेल्या हजार इमारती पुढे येतील. आपला एक निर्णय हा कायमस्वरुपी पुढच्या लोकांना आदर्श ठरणार आहे. यामध्ये नेमके कुणाचे हित साधले जाणार आहे याचा देखील गांभीर्याने विचार केला पाहिजे. तेव्हा शासन जर एखादा निर्णय घेणार असेल तर स्थानिक लोकप्रतिनिधी समवेत शासनाने जरुर चर्चा करावी, त्यांची मते जाणून घ्यावीत. मी आजच सकाळी या विषयाच्या संदर्भात आयुक्तांशी बोललो. त्यांच्याकडून मी संपूर्ण माहिती घेतली. त्या माहितीनुसार हे सर्व उपद्व्याप जर आपण करीत बसलो तर पुढे अधिकाधिक प्रश्नांना शासनाला सामोरे जावे लागेल. सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी शैक्षणिक संस्थांचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित केला. माझे मत असे आहे की, मोठमोठी संकुले बांधण्यासाठी महानगरपालिका आणि शासन परवानगी देत असताना त्या संकुलामध्ये प्राथमिक शिक्षणाची सोय करण्याचे कम्पल्शन केले पाहिजे. हे कम्पल्शन 1987मध्ये सुरु केले. ऑडिशनल एफएसआय इत्यादी गोष्टी शासन सार्वजनिक प्रयोजनासाठी करीत असते.

...नंतर श्री. गिते...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

उपसभापती....

परंतु एखाद्या विवक्षित सोसायटीपुरता मर्यादित प्लॅन मंजूर करीत असेल तर तेवढे ठीक आहे. परंतु सोसायटीचे बांधकाम करीत असताना विकासक टाळूवरचे लोणी खाणार असेल तर त्याचा संपूर्ण भार ठाण्याच्या जनतेवर पडणार आहे. वागळे इस्टेटमधील इमारती पडलेल्या आपण पाहिल्या आहेत. त्या दुर्घटनेत अनेक लोक मृत्यूमुखी पडले आहेत. वागळे इस्टेटमध्ये ज्या विकासकांनी इमारती बांधल्या होत्या, ते विकासक आज कुठे गेले आहेत ? त्या ठिकाणच्या इमारती बांधणारे विकासक पळून गेले. मग ही जबाबदारी कोणावर फिक्स करणार आहे ? सार्वजनिक हिताचा निर्णय घेणार असाल तर स्थानिक लोकप्रतिनिधी, संबंधित प्रशासन, तसेच या गोष्टीशी संबंधित असलेल्या सर्व बाबी यांनी एकत्र येऊन या गोष्टीची नीट पडताळणी करावी आणिमगच अशा प्रकारचे निर्णय घ्यावेत. मिरा-भाईंदरचे सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी अत्यंत थोडक्यात परंतु अतिशय महत्वाची माहिती या ठिकाणी दिली. ठाणे, वसई, विरार, मिरा-भाईदर ही मुंबई जवळची शहरे असून ती शहरे अतिशय झपाटयाने वाढत आहेत. सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन हे मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे उप महापौर होते. त्यांना माहिती आहे की, त्यांच्या परिसरात मोठयाप्रमाणात इमारतींची बांधकामे होत आहेत, लोकसंख्या वाढत चालली आहे. तेथील लोकांसाठी महानगरपालिकेला पाणी उपलब्ध करुन द्यावयाचे असते. आज मिरा-भाईंदर येथे पिण्याच्या पाण्याची काय परिस्थिती आहे ? नवीन नवीन विकास येतात, ते इमारती बांधून जातात. या इमारतींमध्ये जे लोक रहावयास जातात, त्यांना पाणी व इतर सुविधा उपलब्ध झाल्या नाहीत तर ते महानगरपालिकेला आणि शासनाला दोष देतात. त्यांच्या शापाचे धनी शेवटी तुम्ही आम्ही होतो. एखादा निर्णय जर आपणास घ्यावयाचा असेल तर त्या निर्णयाचे भविष्यात होणारे परिणाम देखील लक्षात घेतले पाहिजेत. आज अनेक धोकादायक इमारतींना महानगरपालिकेने नोटीसा दिल्या आहेत. जिवीत हानी आणि वित्त हानी होऊ नये म्हणून धोकादायक इमारतींना नोटीसा दिल्या आहेत. महानगरपालिकेच्या नोटीसेस किती लोकांनी गांभीर्याने घेतल्या? मी तुम्हाला एक उदाहरण देईन की, धोकादायक इमारत जाहीर करावयाची असेल तर महानगरपालिका ही एक ॲथॉरिटी आहे. इमारत धोकादायक नसली तरी ती इमारत धोकादायक आहे असे जाहीर करण्यासाठी विकासक कोणत्या तंत्राचा वापर करतो यासंबंधी शासनकर्ते म्हणून आपल्याला देखील माहिती आहे आणि आम्ही स्थानिक लोकप्रतिनिधी असल्यामुळे

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती...

त्या गोष्टीची आम्हाला देखील कल्पना आहे. लोकांच्या जिवाशी खेळणा-या मंडळींना जर तुम्ही अशा योजनांचा कारण नसताना सरसकट लाभ देणार असाल तर भविष्यामध्ये या गोष्टी तुम्हाला क्षमा करणार नाहीत. माझी आपल्याला विनंती आहे की, हा सगळा निर्णय घेण्यापूर्वी आपण संबंधित महानगरपालिका, महापालिका आयुक्त, महापालिकेचे महापौर,महानगरपालिकेतील गटनेते आणि त्या भागातील सर्व आमदार यांची या विषयाच्या संदर्भात एकत्रित बैठक बोलवावी आणि त्यात सविस्तर चर्चा करुन अशा प्रश्नाची तड लावावी. अग्रवाल समिती येईल, ती समिती नंतर जाईल, काकोडकर समिती येईल, ती समिती नंतर जाईल. शेवटी त्या समित्यांनी घेतलेले निर्णय तुम्ही आमच्यावर लादणार असाल तर त्याचे परिणाम भविष्यात तुम्हा आम्हालाच भोगावे लागणार आहेत. मला तरी याबाबतीत असे वाटते की, अग्रवाल समितीचा येणारा अहवाल तुम्ही ताबडतोबीने ग्राहय धरावा अशातला भाग नाही. यासंबंधीचा निर्णय घेण्यापूर्वी त्या भागातील सर्व लोकप्रतिनिधींची, संबंधित अधिका-यांची एक संयुक्त बैठक घ्यावी. नाही तर तेथे दुसरे उल्हासनगर होण्यास काही वेळ लागणार नाही. आज वन जमिनीचा जो प्रश्न निर्माण झाला आहे तो अशातूनच निर्माण झाला. आज लाखो लोक रस्त्यावर येणार आहेत. यासंदर्भात शासनाने प्रगल्भपणे विचार करावा. या ठिकाणी नेमके हित कोणाचे करणार आहात ही बाब डोळयासमोर ठेऊन अशा प्रकारचे निर्णय घ्यावेत असे मी या निमित्ताने सुचवितो.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, आपल्या सर्व सूचना अतिशय महत्वाच्या आहेत त्यात वादच नाही. यासंदर्भात अग्रवाल समिती नेमण्यात आली आहे. त्या समितीच्या जेवढया बैठका झाल्या, त्या बैठकांमध्ये महानगरपालिकेचे लोकप्रतिनिधी, नागरिकांचे म्हणणे ऐकून घेऊनच शिफारशी केल्या जाणार आहेत. या समितीच्या 18.3.08, 3.4.08, 4.4.08, 8.8.08 आणि काल एक बैठक झाली अशा एकूण सहा बैठका झाल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी देखील या विषयाच्या संदर्भात माहिती दिली आहे... सन्माननीय सदस्यांनी माझे पूर्णपणे उत्तर ऐकून घ्यावे अशी माझी विनंती आहे. सभापती महोदय, ही समिती लोकप्रतिनिधींचे आणि नागरिकांचे म्हणणे ऐकून शिफारशी करणार आहे. ठाणे जिल्हयातील विधानसभा आणि विधानपरिषद सदस्य आहेत त्यांना यासंदर्भात काही म्हणणे मांडावयाचे असेल तर ते शासनापुढे आपले मांडू शकतात. त्या ठिकाणच्या लोकप्रतिनिधींचे म्हणणे ऐकून घेऊनच यासंदर्भातील निर्णय घेतला जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : मी मघाशी सूचविल्याप्रमाणे आपण या विषयाच्या संदर्भात संयुक्त बैठक आयोजित करावी.

श्री. राजेश टोपे : आपल्या सूचनेप्रमाणे या विषयाच्या बाबतीत निश्चितपणे आपल्या दालनात बैठक आयोजित करण्यात येईल. ठाणे जिल्हयातील सर्व लोकप्रतिनिधींना त्या बैठकीस निमंत्रित करण्यात येईल, त्या बैठकीत ठाणे जिल्हयातील सर्व लोकप्रतिनिधींचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतरच अग्रवाल समितीमध्ये काय टाकावयाचे, काय टाकावयाचे नाही यासंदर्भातील निर्णय अंतिम करण्यात येईल.

यानंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी अग्रवाल समितीच्या बैठका केव्हा झाल्या याबाबत माहिती दिली. सभापती महोदय, अधिवेशन चालू असताना 12 तारखेला ठाणे महानगरपालिकेमध्ये अग्रवाल समिती आली होती. आम्ही समितीला कळविले असताना देखील 12 वाजताची बैठक ठेवण्यात आली. 10 वाजता सभागृह सुरु होणार असल्यामुळे आम्ही 12.00 वाजता बैठकीला कसे हजर राहणार ? केवळ बैठकीचा टिकमार्क करण्यासाठी आणि बैठकीचा फार्स करण्यासाठी बैठक बोलाविली होती काय ?

उपसभापती : अग्रवाल समितीला ज्यांना भेटायचे होते त्यांना ती समिती भेटली काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय आपले म्हणणे मी नाकारीत नाही. आपल्या म्हणण्याचा आदर ठेऊन सूचना केलेल्या आहेत. याविषयाबाबत खालच्या सदनातील ठाणे जिल्हयाचे सदस्य आणि या सदनातील ठाणे जिल्हयाचे सदस्य आणि लोकप्रतिनिधी यांची बैठक घेऊन याबाबत निर्णय घेतला जाईल.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक आणि अनधिकृत इमारती आणि सोसायटयांमधील ऑब्जेक्शन आणि जनतेची ऑब्जेक्शन ऐकून घेऊन मग अग्रवाल समिती शासनास शिफारशी करणार आहे काय ? या प्रश्नाला आपण पूर्वी 'होय' असे उत्तर दिलेले आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, माननीय सभापतींनी निर्देश दिलेले आहेत की सदनाची बैठक चालू असताना अशा प्रकारच्या बैठका घेऊ नयेत. ते निदेश डावलून जर बैठका होत असतील तर तो सदनाचा अवमान आहे. असे असताना अग्रवाल समितीने ठाणे महापालिकेत कशी काय बैठक आयोजित केली याचा शासनाने खुलासा करावा.

श्री. राजेश टोपे :सभापती महोदय, शासनाच्या जी.आर.च्या माध्यमातून 18 जानेवारी 2008 ला समितीचे गठन झालेले आहे. श्री. अग्रवाल निवृत्त आय.ए.एस. अधिकारी, जिल्हाधिकारी,ठाणे, मुख्याधिकारी, कोकण गृहनिर्माण मंडळ, ठाणे जिल्हयातील सर्व महानगरपालिकांचे आयुक्त, संचालक, नगररचना आणि मुख्य आर्किटेक्ट, महाराष्ट्र राज्य अशी ही समिती आहे. समितीला अहवाल सादर करण्यासाठी मार्च-एप्रिल पर्यंतचा वेळ दिलेला आहे. त्यांनी शिफारशी करुन शासनास अहवाल सादर करावयाचा आहे. बैठका केव्हा घेणे हा समितीचा अधिकार आहे. अधिवेशन चालू असताना स्थानिक लोकप्रतिनिधी अधिवेशनात व्यस्त असतात त्यामुळे त्यांचे म्हणणे

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे ...

नोंदविले जाऊ शकत नाही. याबाबत मी सूचना देईन. लोकप्रतिनिधींचे म्हणणे लक्षात घेऊनच शिफारशी कराव्यात. तेवढे मात्र नक्की मी समितीला सांगेन. ठाणे येथील धोकादायक आणि अनधिकृत इमारतींच्या संदर्भातच समिती गठीत करण्यात आलेली आहे. या विषयाचा समितीमध्ये अंतर्भाव आहेच. लोकप्रतिनिधींचे म्हणणे ऐकून घेऊन त्यांना जे काही सांगावयाचे आहे ते ऐकले जाईल आणि त्यांच्या शिफारशीवरुनच निर्णय घेतला जाईल.

श्री. मुजफ्फर हुसेन : सभापती महोदय, अग्रवाल समितीचा अहवाल स्वीकारताना आणि त्यावर निर्णय घेताना ज्यांच्या काळात अनधिकृत बांधकामे झाली त्या काळातील अधिकारी आणि पदाधिकारी यांच्यावर कारवाई करण्याच्या संदर्भात शासन धोरणात्मक निर्णय घेणार आहे काय किंवा नाही ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, उल्हासनगरमधील अनधिकृत बांधकामाबाबतीत आपण कायदा केला. त्यावेळी भाषण करताना मी सांगितले होते की, जरी इमारती अधिकृत केल्या असल्या तरी ज्या ज्या तत्कालीन अधिकाऱ्यांनी चुका केल्या असतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल आणि फौजदारी गुन्हे दाखल करण्याची कायदेशीर कारवाई केली जाईल आणि तशी कारवाई केलेली आहे. नंदलाल समितीने सांगितल्याप्रमाणे यासंदर्भात कारवाई केलेली आहे. ज्यांनी चुका केल्या असतील त्यांना क्षमा करण्याचे कारण नाही. निश्चितपणाने कारवाई केली नसेल तर केली जाईल.

नंतर श्री. भोगले

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.5..... श्री.राजेश टोपे.....

अनधिकृत बांधकामाचा विषय हा एका दिवसात निर्माण झालेला नाही. आत्मपरिक्षण करण्यासारखा विषय आहे. आपण सगळेजण राजकारणाच्या माध्यमातून वेगवेगळ्या पदावर काम करीत असतो. ब्रिफिंग घेत असताना मला स्वत:ला सुध्दा अतिशय आश्चर्य वाटले. ठाणे जिल्हयातील सर्व महानगरपालिकांमध्ये केवळ 70 ते 80 टक्के अनधिकृत इमारती आहेत असे नव्हे तर काही ठिकाणी 90 टक्के इमारती अनधिकृत आहेत. या बांधकामांना कोण प्रोत्साहन देतो, कशी बांधकामे उभी केली जातात हा महत्वाचा विषय आहे. यामध्ये क्षमा करण्याचा किंवा कोणाला पाठिशी घालण्याचा प्रश्न नाही. प्रशासनाने अधिक कडक कारवाई केली पाहिजे.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, कोणाला पाठिशी घालणार नाही ही वाक्यरचना सोडून द्यावी. कोणते संसदीय शब्द वापरावेत असा माझ्यापुढे प्रश्न निर्माण झाला आहे. मला स्वत:ला लाज वाटते. या सदनामध्ये माननीय उपसभापतींनी व्यक्तिश: त्यांच्या संदर्भातील मातोंडकरांची घटना घडली त्याबाबत निदेश दिले होते. सन्माननीय सदस्य श्री.उपरकर यांनी एका घटनेच्या संदर्भात सभागृहात मागणी केली होती. जिल्हा पुरवठा अधिकारी आणि तहसीलदार यांना दोन वर्षापूर्वी लाचलुचपत विभागाने अटक केली, त्यांना 48 तास जेलमध्ये ठेवण्यात आले. आजपर्यंत त्यांना निलंबन करण्याचे घोषित करुनही शासनाने त्याची अंमलबजावणी केली नाही. सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसैन यांनी उल्हासनगर येथील अनधिकृत बांधकामाबाबत कोणत्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली, केली नसल्यास ती करावी असे सांगितले. या सदनामध्ये जे जे सांगितले जाते ते अंमलात आणले जात नाही. मग उद्रेक होतो. आम्ही याठिकाणी कशासाठी येतो? न्याय मिळविण्यासाठी येतो. शासन गोल गोल शब्द फिरविण्याचे काम करते. सगळ्या भ्रष्टाचाराच्या मागे शासन उभे आहे. म्हणून मुंबईसारखी सगळ्या शहरांची वाट लागत आहे. सर्वसामान्य माणसांची ससेहोलपट होत आहे. जी जी आश्वासने गेल्या दोन वर्षात दिली गेली त्यापैकी किती आश्वासनांची पूर्तता केली याचा अहवाल शासनाने पटलावर ठेवावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, खालच्या सदनामध्ये काय चालले आहे आणि या सदनामध्ये काय चालले आहे? आम्ही काय करावे? या सदनातील अनेक बाबी आहेत. आपल्या बाबतीत जे घडले ते बोलणे आम्हाला योग्य वाटत नाही. आपला आदर केला जात नाही. तेथे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

सदस्यांचा काय आदर केला जाणार हा प्रश्न आहे. दाढीला हात लावावा तसे प्रकार केले जातात. या सदनामध्ये शासनाने आश्वासन दिले, अधिकाऱ्याला रजेवर पाठवितो असे सांगितले. आम्ही रजेवर नको, बदली करा अशी विनंती केली. आजपर्यंत बदली केली नाही. सभापती महोदय, मी काल 4 तासासाठी अमरावती येथे गेलो होतो. तेथे मला लोकांनी भेटून सांगितले. काल विधानसभेमध्ये गदारोळ झाल्यानंतर एका पोलीस अधिकाऱ्याला निलंबित करण्याचे घोषित केले गेले. या क्षणापासून निलंबित करु असे सांगूनही तो अधिकारी अद्याप सेवेत आहे. मी रात्री 11.00 वाजता प्रधान सचिव श्री.कळसे यांना फोन करुन सांगितले. सदनातील आश्वासनाबाबत अशी परिस्थिती आहे. आज तुम्ही सरकार चालवित आहात. उद्या आम्ही सरकार चालविणार आहोत. या अधिकाऱ्यांना डोक्यावर का घेत आहात? हे अधिकारी उद्या तुम्हा-आम्हाला सळो की पळो करुन सोडणार आहेत. अधिकारी गॅलरीमध्ये सचिव दर्जाचे अधिकारी बसतात. जरी ते सभागृहाच्या दृष्टीने अदृश्य असले तरी त्यांच्याकडून नोंद घेतली जात नाही का? आपल्या विभागाच्या मंत्रीमहोदयांनी जे आश्वासन दिले आहे, त्याबाबत पाठपुरावा केला जात नाही का? काही वेळापूर्वी एका विभागाच्या मंत्रीमहोदयांनी ग्रामविकास विभागाच्या अधिकाऱ्याना सस्पेंड केले. संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी ग्रामविकास मंत्रीमहोदयांशी संपर्क साधून या आश्वासनाबाबत पाठपुरावा केला पाहिजे. आम्ही केवळ जनतेच्या हिताचे प्रश्न लावून धरायचे. अधिकाऱ्यांचा गलथानपणा सिध्द करायचा आणि त्यांच्याविरुध्द शासनाने कारवाई करायची नाही असे होत असेल तर याला काय म्हणायचे? अधिवेशन जसे आले तसे गेले असे होऊ नये. उद्या सत्तेत आपण असाल, आम्ही असू. परंतु सरकार म्हणून धाक असला पाहिजे. करा हो, करता का असे बोलणे योग्य नाही.

(नंतर श्री.खर्चे.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार : महोदय, यासंदर्भात एक गोष्ट मी शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या संदर्भात माननीय मंत्री महोदय जाहीर करतात की यासंदर्भात कारवाई करण्यात येईल. पण प्रत्यक्षात ही जबाबदारी महसूल विभागाची आहे आणि भ्रष्टाचारी लोकांना पाठीशी घालण्याचे काम महसूल विभाग करीत आहे. हा काय प्रकार या राज्यात चालला आहे, हेच मला समजत नाही. शेवटी या सदनात शासनाची जबाबदारी कशा प्रकारे पार पाडली जाणार आहे ? या ठिकाणी आश्वासने दिली जातात परंतु त्यांची अंमलबजावणी शासन कोणाच्या माध्यमातून करणार आहे हे समजत नाही. अन्यथा माझी विनंती आहे की, माननीय मुख्यमंत्री नावाची जी शक्ती या राज्यात आहे त्यांनाच इकडे बोलवावे, आम्ही अशा प्रकारचे सर्व विषय त्यांच्यासमोर मांडतो आणि त्यांच्याकडूनच उत्तर घेतो. कारण येथे एक मंत्री म्हणतात की, संबंधित अधिकाऱ्याला निलंबित करण्यात येईल आणि दुसरे मंत्री म्हणतात की निलंबित होऊ देणार नाही. म्हणून यासंदर्भात कठोर निर्णय होणे आवश्यक आहे.

श्री. मुजफ्फर हुसैन : महोदय, उल्हासनगरच्या संदर्भात निर्णय होऊन जवळपास दीड ते दोन वर्षे झाली परंतु अद्याप एकाही अधिकाऱ्यावर कारवाई झाली नाही. ज्या ज्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे ठरविले होते ते सेवानिवृत्त झाल्यामुळे ही कारवाई डब्यात गेली असेही कदाचित होऊ शकते. मग अशा प्रकारे अनधिकृत बांधकामे वाढत जातात. त्याला काही राजकीय पदाधिकारी अथवा अधिकारी सुध्दा जबाबदार असतील परंतु जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई झालीच पाहिजे. ठाणे जिल्ह्यातील उदाहरण मी देऊन सांगतो की, मीरा-भाईंदर नगरपालिकेचे सन 1991 मध्ये नगरपरिषदेत रुपांतर झाले. त्या वेळेपासून डी.पी.प्लॅन तयार आहे तो सन 1999 मध्ये पूर्ण झाला. परंतु डेव्हलपमेंट कंट्रोल रेग्युलेशन तयार होऊन आज 9 वर्षे झाली तरी देखील महानगरपालिकेच्या डेव्हलपमेंट कंट्रोल रेग्युलेशनला मान्यता मिळाली नाही. हीच परिस्थिती वसई-विरार, भिवंडी आणि कल्याण-डोंबिवली महापालिकेची आहे. अशा परिस्थितीत ज्या ठिकाणी 15-15 वर्षे जर डी.पी. तयार होत नसतील, डी.पी. तयार झाले आणि त्यासाठी आवश्यक असणारे डेव्हलपमेंट कंट्रोल रेग्युलेशन तयार करुन त्याला 15-15 वर्षापर्यंत मान्यता मिळणार नसेल तर अनधिकृत बांधकाम होणार नाही तर काय होणार ? तसेच अशा प्रकारे अनधिकृत बांधकाम झाले तरी कारवाई होत नाही. अशी जी अनधिकृत बांधकामे आहेत त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुजफ्फर हुसैन .....

ठिकाणी ऑलरेडी 4-4 चे एफएसआय वापरुन इमारती बांधलेल्या आहेत. या ठिकाणी जर शासनाने रि-डेव्हलपमेंटचा विचार केला आणि 2.5 चा जरी एफएसआय दिला तरी अगोदरच 4 चा एफएसआय वापरुन बांधकाम केलेल्या ठिकाणी 2.5 चा एफएसआय देऊन कोणती डेव्हलपमेंट करणार आहात ? यासंदर्भात शासनाने नोंद घेण्याची गरज आहे. अशा गोष्टींचा विचारच केला नाही तर 2.5 लाख कोटीची जी गुंतवणूक मुंबईत करण्याचे शासनाने ठरविले आहे. त्यासंदर्भात मला असे सांगावयाचे आहे की, असे प्रकार होत राहिले तर मग कितीही पाणी पुरवठ्याच्या योजना करा, कितीही ट्रान्सपोर्टची व्यवस्था करा अथवा शाळांची व्यवस्था करा, त्याचा काहीच उपयोग होणार नाही. म्हणून जिल्ह्यातील ज्या ज्या महापालिकांचे डेव्हलपमेंट कंट्रोल रेग्युलेशन मान्य झालेले नाहीत, ते लवकरात लवकर मान्य करावेत. ते किती दिवसात आपण मान्य करणार आहात ?

श्री. राजेश टोपे : महोदय, रेकॉर्डवर चुकीचे राहू नये म्हणून कारवाई करण्यासंबंधी मी सांगू इच्छितो की, ज्या ज्या केसेसमध्ये विभागीय चौकशी करावयाची होती, कायदेशीर कारवाई करावयाची होती ती संबंधित विभागांकडून करण्यात येईल. आज अचानक हा विषय लक्षवेधीच्या माध्यमातून आला तरी देखील बरीच चर्चा झाली. मी सभागृहाला एवढेच सांगू इच्छितो की, अनधिकृत बांधकामासंबंधी कडक कारवाई करण्याच्या दृष्टीने जी पावले उचलली पाहिजेत, ती उचलली जातील, कोणालाही पाठीशी घालणार नाही.

श्री. जगदीश गुप्ता : महोदय, जो न्याय आपण ठाणे जिल्ह्याला दिला त्याबद्दल आपले अभिनंदन करीत असताना इतर जिल्ह्यांना सुध्दा तोच न्याय द्यावा अशी माझी विनंती आहे.

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मोबाईल कंपन्यांनी शासनाचा महसूल बुडविणे

मु. शी. : मोबाईल कंपन्यांनी शासनाचा महसूल बुडविणे यासंबंधी सर्वश्री अरविंद सावंत, अनिल परब, जितेंद्र आव्हाड, लक्ष्मण जगताप, राजेंद्र जैन, सदाशिवराव पोळ, भास्कर जाधव, डॉ. वसंत पवार, प्रा. फौजिया खान, श्रीमती मंदा म्हात्रे वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ठाणे येथील वोडाफोन, बीपीएल व रिलायन्स या नामवंत मोबाईल कंपन्यांनी राज्य शासनाचा महसूल करापोटी सुमारे साडेतीन कोटी रुपये बुडविल्याचे उघडकीस आल्याने ठाणे तहसिल कार्यालयाने सदर कोट्यावधी रुपयांची थकबाकी वसूल करण्याच्या दिलेल्या नोटीसा, उपरोक्त मोबाईल कंपन्यांकडे कोट्यावधी रुपयांची थकबाकी वर्षानुवर्षे असताना ठाणे तहसिल कार्यालयाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, सदर कंपन्यांनी शासनाचा कोट्यावधी रुपयांचा महसूल थकविल्याने तो भरीत नसल्याने थकबाकीदार कंपन्यांची बँक खाती गोठविण्याची नितांत आवश्यकता, याबाबत राज्य शासनाने तातडीने केलेली व करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ. राजेंद्र शिंगणे (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो. असे करीत असतांना मी आपल्या अनुमतीने निवेदनात पुढील दुरुस्ती करु इच्छितो :--

दुसया परिच्छेदात तिसऱ्या ओळीत "सदर कंपन्यांना प्रतिटॉवर रु.1.00 ऐवजी सदर कंपन्यांना प्रतिटॉवर रु.1.00 लक्ष असे वाचावे."

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

नंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : माननीय सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात मी फक्त दोन-तीन प्रश्नच उपस्थित करणार आहे. अकृषिक आकार भरण्याबाबत या कंपन्यांना आपण कधी नोटीसा दिलेल्या होत्या? रिलायन्स कंपनी व बीपीएल कंपनीने 86 लक्ष रुपये भरले परंतु अजून बीपीएल कंपनीकडून 6 लक्ष रुपये येणे बाकी आहे त्यामुळे सदर पैसे किती दिवसात वसूल केले जाणार आहे? तसेच मे.वोडाफोन आणि मे.एअरटेल या कंपन्या शासनाच्या नोटीसेस विरुध्द उच्च न्यायालयात कधी गेल्या आहेत? तसेच इमारतीवर टॉवर्स उभे करतांना त्या इमारती टॉवर्सचा भार उचलण्या योग्य आहेत की नाही यासंदर्भात इमारतींची तपासणी करण्यात आली आहे काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मे. वोडाफोन, मे,एअरटेल, मे. रिलायन्स, मे.बीपीएल या कंपन्याना दिनांक 14 मार्च, 2008 रोजी नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत. या कंपन्यानाना नोटीसा देण्यामध्ये किंवा कर आकारणी करण्यामध्ये उशीर झालेला आहे ही वस्तुस्थिती आहे. मे.वोडाफोन यांचे 129 टॉवर्स असून त्यांना 129 लक्ष रुपये दंड झालेला आहे. लक्षवेधी सूचनेच्या उत्तरामध्ये यासंदर्भात सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे. मे. रिलायन्सचे 54 टॉवर्स असून त्यांकडून 54 लक्ष रुपये दंड आकारणी केलेली आहे. मे.बीपीएल या कंपनीचे 38 टॉवर्स असून त्यांच्याकडून 32 लक्ष रुपये दंड आकारणी केलेली असून बीपीएल कडून उर्वरित रक्कम 8 दिवसात वसूल केली जाईल. उरलेल्या दोन कंपन्या कोर्टात गेल्यामुळे कोर्टाने स्थगिती दिलेली आहे. त्यामुळे ही स्थगिती लवकरात लवकर उठवण्याचा शासनाकडून प्रयत्न केला जाणार आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, दोन कंपन्यानी पैसे कधी भरले आणि उर्वरीत दोन कंपन्या कोर्टात कधी गेल्या? ज्या इमारतीवर टॉवर्स उभारले जातात तेव्हा त्या इमारतीचे स्ट्रक्चर टॉवर्सचे वजन उचलण्यास समर्थ आहे काय यासंदर्भात स्ट्रक्चर इंजिनिअरकडून सर्टिफिकेट घेण्यात आले होते काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मे. रिलायन्स या कंपनीने 1 मार्च रोजी पैसे भरलेले असून दुस-या कंपनीने कधी पैसे भरले याची माहिती आता माझ्याकडे नाही परंतु ही सर्व माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो. सन्माननीय सदस्यांनी इमारतींची क्षमता टॉवर्सचे वजन उचलण्यास समर्थ आहे काय यासंदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे इमारतींवर मोठया प्रमाणात टॉवर्स उभे होत आहेत ही वस्तुस्थिती आहे त्यामुळे शासन यासंदर्भात धोरण करीत असून मागील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. राजेंद्र शिंगणे.....

अनेक वर्षामध्ये ठाणे, मुंबई किंवा महाराष्ट्रातील अनेक ठिकाणी अशाप्रकारच्या कंपन्यानी शासकीय आणि खाजगी जागेवर टॉवर्स उभारलेले आहेत. 9-10 वर्षापासून शासनाची परवानगी न घेता टॉवर्स उभारले जात आहे ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे या कंपन्यांकडून जमीन महसूल संहिते नुसार गेल्या 10 वर्षापासूनचा योग्य तो दंड वसूल केला जाणार आहे. टॉवर्सच्या संदर्भात धोरण ठरवित असतांना ज्या इमारतींवर टॉवर्स उभे करण्यात आलेले आहेत त्या ठिकाणच्या आजूबाजूच्या रहिवाश्यांनी रेजच्या संदर्भात तक्रारी केलेल्या आहेत. तसेच या टॉवर्स भोवती खाजगी केबल धारक वायरचा ताण देतात. त्यामुळे महानगरपालिका, नगरपालिकेच्या माध्यमातून ज्या इमारतींवर टॉवर्स उभारण्यात आलेले आहेत त्या सर्व इमारतींची तपासणी केली जाईल. नवीन धोरण ठरवित असतांना इमारतींची कपॅसिटी बघून एनओसी मिळाल्यानंतरच कंपन्याना टॉवर्स उभारण्याची परवानगी दिली जाईल.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना मला एक स्पेसिफिक प्रश्न विचारावयाचा आहे. अनेक वेळा गृह निर्माण सोसायटया आपल्या इमारतीवर टॉवर उभा करण्यासाठी परवानगी देतात. हा टॉवर उभा केल्यामुळे त्याव्दारे जो काही पैसा मिळतो त्या पैशातून सोसायटीचा मेन्टेनन्स भागवता यावा म्हणून या सोसायटया इतर बाबी कडे लक्ष देत नाहीत म्हणून या सोसायटयांची इच्छा असो अथवा नसो. त्या सोसायटीच्या इमारतीवर टॉवर उभा करावा असे जरी त्या सोसायटीला वाटत असले तरी या संदर्भात तातडीने एक यंत्रणा उभी करुन स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी सर्टिफिकेट त्या सोसायटीकडे असले पाहिजे. अशा प्रकारचे सर्टिफिकेट ज्या सोसायटीकडे असेल त्या सोसायटीला टॉवर उभा करण्याची परवानगी दिली पाहिजे आणि ज्या सोसायटीकडे हे सर्टिफिकेट नसेल त्या ठिकाणचे टॉवर काढून टाकण्यात आले पाहिजे तेव्हा अशा प्रकारे करण्यात येणार आहे काय ? माननीय मंत्री महोदयांनी केवळ गोलमाल उत्तर देता कामा नये .जनतहिताचे जे कायदे असतात त्यासंबंधी किंवा जनहिताच्या बाबीसंबंधी माननीय मंत्री महोदय उत्तर देतात परंतु त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी केली जात नाही. म्हणून एक महिन्यामध्ये अशा प्रकारची यंत्रणा उभी करुन स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी सर्टिफिकेट आणल्याशिवाय सोसायटींना टॉवर उभारु दिले जाणार नाही आणि ज्यांनी असे सर्टिफिकेट आणले नाही त्यांचे त्वरित टॉवर काढण्यात येतील असे धोरण स्वीकारण्यात येणार आहे काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मी अत्यत स्पेसिफिक उत्तर देत आहे. ज्या इमारतीवर अशा प्रकारचे टॉवर उभे आहेत ते टॉवर उभे करण्याच्या संदर्भात संबंधित सोसायटी आणि कंपनी यांच्यामध्ये भाडे करार झालेला असतो . सोसायटीच्या परवानगीनेच,भाडे करार झाल्यानंतर त्या सोसायटीच्या इमारतीवर टॉवर उभे करण्यात येतात. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी दुसरा महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे की,त्या इमारतीची कॅपिसीटी असेल तरच तेथे टॉवर उभारण्याची परवानगी देण्यात येणार आहे काय ? त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, येत्या महिन्याभरात किंवा लवकरात लवकर यासबंधीचे धोरण आम्ही जाहीर करीत आहोत. तसेच त्या इमारतीची कॅपिसीटी असल्याचे एन.ओ.सी. असेल तरच त्यांना टॉवर उभा करण्याची परवानगी देण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, मोबाईल कंपन्याचे टॉवर इमारतीवर उभा करण्याचा प्रश्न केवळ ठाणे शहरापुरताच मर्यादित नाही. अनेक ठिकाणच्या इमारतीवर सर्व मोबाईल कंपन्याचे टॉवर उभारले जातात .त्याचे कारण असे की इमारतीवर टॉवर उभा करण्यात आल्यामुळे त्यांच्या टॉवरची हाईट वाचते. त्यामध्ये त्यांचा एफ.एस.आय. सुध्दा समाविष्ट असतो. काही सोसायटयांनी जास्त एफ.एस.आय.वापरला आहे.तेव्हा महसूल विभागाने धोरण तयार करीत असतांना नगरविकास विभागाच्या एफ.एस.आय.चा देखील उल्लेख असला पाहिजे त्याचबरोबर इमारतीवर टॉवर उभा न करता तो जमिनीपासून उभा केला पाहिजे अशा प्रकारचे धोरण तयार करण्यात येणार आहे काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, या संदर्भात मी मघाशीच असे सागितले आहे की याबाबत धोरण ठरविण्यात येणार आहे त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री..गोपीकि सन बाजोरिया यांनी जी सूचना केलेली आहे त्याचा देखील अंतर्भाव करण्यात येईल. महानगरपालिका किंवा नगरपालिकाच्या क्षेत्रातील इमारतीवर मोबाईल कंपन्यांनी आपले टॉवर उभे करीत असतात इमारतीधारक आणि मोबाईल कंपन्या यांच्यामध्ये जो भाडेपट्टयाचा करार होतो त्या संदर्भात नगरपालिका किंवा महानगरपालिका परवानगी देत असतात. सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केल्याप्रमाणे या इमारतीची कॅपेसिटी तपासण्यात येईल व एफ.एस.आय.च्या बाबतीत त्या ठिकाणी काय नियम असावे यासंबंधी महसूल आणि नगरविकास विभाग वा अन्य खात्याची गरज पडत असेल तर त्याही खात्याची मदत घेऊन धोरण तयार करण्याचा निर्णय घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी : राज्यातील ज्येष्ठ कलावंताच्या निर्वाहवेतनात वाढ करणे
मु.शी : राज्यातील ज्येष्ठ कलावंताच्या निर्वाहवेतनात वाढ करण्याबाबत सर्वश्री संजय दत्त, गोविंदराव आदिक, शरद रणपिसे,प्रतापसिंह मोहिते- पाटील, सुभाष चव्हाण,एस.क्यु.जामा,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री.संजय दत्त (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सांस्कृतिक कार्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

" राज्यातील ज्येष्ठ रंगकर्मी, तमाशा व चित्रपट, रंगभूमी गाजवणा-या वयोवृध्द कलावंताची परिस्थिती हालाखीची असणे, तसेच नाटय, तमाशा, चित्रपट कलावंतांना वृध्दापकाळात मिळणारे निर्वाहवेतन रु.500 इतके कमी असणे, त्यामुळे वयोवृध्द कलावंताच्या अन्न, वस्त्र, निवारा वैद्यकीय खर्च इत्यादी गरजा लक्षात घेऊन त्यांना देण्यात येणा-या निर्वाहवेतनात वाढ करण्याची आवश्यकता, सदर वयोवृध्द कलावंताना पुरेसे निर्वाहवेतन मिळत नसल्याने त्यांच्यावर अखेरचे दिवस अत्यंत हालाखीत घालविण्याची आलेली पाळी, याबाबत तातडीने निर्णय घेऊन त्यांचे निर्वाह वेतन वाढविण्याबाबत व त्यांना इतर सुविधा देण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

श्री.राणा जगजितसिंह पाटील (सांस्कृतिक कार्य राज्यमंत्री): सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

(प्रेस :कृपया सोबत जोडलेले निवेदन येथे छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, अत्यंत महत्वाच्या परंतु प्रलंबित अशा विषयावर परत एकदा लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधण्याची संधी आपण मला दिली त्याबद्दल मी आपल्याला तसेच माननीय सभापतीना धन्यवाद देतो

.सभापती महोदय, या विषयाच्या बाबतीत सभागृहातील सर्वच सन्माननीय सदस्यांच्या भावना अत्यंत तीव्र आहेत. सभापती महोदय, आपण स्वत: कलाप्रेमी आहात म्हणून आपणही या विषयाला न्याय देण्यासाठी पुढाकार घेतला होता. मी या ठिकाणी एक दोन कलावंताची उदाहरणे देऊ इच्छितो. ज्येष्ठ चित्रपट कलावंत कै. गणपत पाटील यांचे मार्च महिन्यात दु:खद निधन झाले होते. एक काळ रंगभूमी गाजविणा-या या कलावंताजवळ शेवटच्या दिवशी अश्रू पुसण्यासाठी देखील कोणी नव्हते. तशाच प्रकारचे हाल पाश्वगायक विठ्ठल शिंदे यांचे व अनेक वृध्द कलावंताचे झालेले आहेत. प्रभाताई शिवनेरकर या वृध्द कलावंतणीला गोळया बिस्कीटे विकून उदरनिर्वाह करावा लागतो.ज्यावेळी मी हा मुद्दा विशेष उल्लेखाव्दारे सभागृहामध्ये उपस्थित केला होता त्यावेळी आपण मदत जाहीर केली त्यातून आपल्या मनाचे औदार्य दिसून आले होते. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी देखील मदत जाहीर केली त्यांच्या पासून प्रेरणा घेऊन मी देखील थोडीशी मदत जाहीर केली होती.

नतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.संजय दत्त ...

परंतु सध्याची वाढती महागाई लक्षात घेता त्या सर्व कलाकारांना देण्यात येणारे मानधन अत्यंत तुटपुंजे आहे. सभापती महोदय, हा विषय बऱ्याच काळापासून शासनाकडे प्रलंबित आहे. या बाबतीत मी सांस्कृतिक कार्य मंत्री माननीय श्री.अशोक चव्हाण यांच्याकडे देखील पाठपुरावा केला आहे आणि तेही यासाठी अनुकूल आहेत. परंतु निर्णय मात्र होत नाही. सभापती महोदय, 500-700 रूपयांमध्ये सध्याच्या काळात काय होते ? म्हणून मी आपाल्यामार्फत मागणी करतो, कळकळीची विनंती करतो आहे आणि मला खात्री आहे की माझ्या या विनंतीला या सदनातील सर्वच सन्माननीय सदस्यांचा पाठिंबा आहे. माझी मागणी अशी आहे की, या कलाकारांच्या मानधनामध्ये किमान 3 हजार रूपयांची वाढ करावी, ती आपण करणार काय ? तसेच प्रत्येक जिल्ह्यात प्रत्येक वर्षात 40 कलाकार यासाठी निवडण्याची व्यवस्था आहे ती संख्या वाढवून 50 केली आहे ती आपण 100 करणार काय ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, राज्यातील मान्यवर साहित्यिक, कलावंत आहेत त्यांना त्यांच्या उदरनिर्वाहासाठी शासनाकडून काही आर्थिक सहाय्य देण्याचा निर्णय घेण्यात आला होता आणि 29 मे, 1999 रोजी या बाबत दरमहा किती रक्कम द्यावी हे ठरविण्यात आले आणि त्या निर्णयानुसार यामध्ये वर्गीकरण करून अ वर्गासाठी 700, ब वर्गासाठी 600 आणि क वर्गासाठी 500 रूपये दरमहा अनुदान दिले जात आहे. हा निर्णय घेऊन आज जवळ जवळ 9 वर्षे होऊन गेली आहेत. त्यामुळे निश्चितच त्यात बदल करण्याची गरज आहे आणि मी आपल्याला सांगेन की, त्या दृष्टीने शासनाचा विचार चालू आहे. येत्या 15 दिवसात या विभागाच्या माध्यमातून याबाबत निर्णय घेण्यात येईल आणि त्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविण्यात येईल. सभापती महोदय, त्याचबरोबर सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी असाही प्रश्न उपस्थित केलेला आहे की, प्रत्येक जिल्ह्याला 50 कलावंताचे लक्ष्य दिलेले आहे ते वाढविणार काय ? तर त्याबद्दल देखील निश्चितपणे विचार करण्यात येईल एवढेच मी येथे सांगू इच्छितो.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांना मनापासून धन्यवाद देतो की, त्यांनी अतिशय चांगला विषय या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून येथे आणलेला आहे. ...

..... 3क्यू 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, या विषयावर अधिक चर्चा न करता आपण यावर निश्चितपणे अत्यंत प्रभावीपणे मार्गदर्शन करू शकता. आता सन्माननीय सदस्यांनी दरमहा 3000 रूपये मानधन किमान द्यावे अशी अपेक्षा व्यक्त केली असली तरी काही सबस्टँशिअल व्हावे या दृष्टीने आपण येथे आपल्या भावना व्यक्त केल्या आणि मार्गदर्शन केल्यास ते अधिक उचित होईल.

उपसभापती : मी सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्यास परवानगी दिली आहे. त्यांच्या प्रश्नावर शासनाकडून काय उत्तर येते ते पाहून नंतर मी मला जे काही याबाबत सांगावयाचे आहे ते सांगेन.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, हाच विषय मी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये उपस्थित केला होता आणि त्यावेळी मराठीतील ज्येष्ठ संगीतकार श्री.विठ्ठल शिंदे यांची सध्याची असलेली विपन्नावस्था सभागृहापुढे मांडली होती आणि त्यांना शासनाकडून त्वरित मदत देण्याची विनंती केली होती. त्यावेळी सभापती महोदय, आपणही याच पीठासनावरून आदेश दिले होते की, तातडीने, दोन दिवसात शासनाच्या मंत्र्यांनी वा प्रतिनिधींनी श्री.विठ्ठल शिंदे यांची भेट घेऊन त्यांना काय मदत देता येईल ते पाहून मदत द्यावी व त्याची माहिती सभागृहाला अवगत करावी. पण मला सांगण्यास अतिशय दु:ख होते आहे की, त्यानंतर आजपर्यंत श्री.विठ्ठल शिंदे यांच्यापर्यंत शासनाकडून कोणीही पोहोचलेले नाही, गेलेले नाही. त्यांची विचारपूस देखील कोणी केलेली नाही. त्यानंतर शेवटी मी स्वत: त्यांच्या घरी जाऊन त्यांना बरोबर घेऊन त्यांची मंत्री महोदयांची भेट घालून दिली आणि त्यांना प्रत्यक्ष परिस्थिती काय आहे ते सांगितले. त्यांनी देखील त्यांचे संपूर्ण प्रकरण सांस्कृतिक कार्य विभागाकडे पाठविले आहे. तर ते प्रकरण आपल्याला मिळाले आहे काय ? आणि या श्री.विठ्ठल शिंदे यांच्या बाबतीत शासन काय करणार आहे ते आपण येथे सांगावे.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, श्री.विठ्ठल शिंदे यांच्या बाबतचा प्रस्ताव निवड समितीकडे पाठविण्यात आलेला असून लवकरच त्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

(यानंतर श्री. सरफरे .... 3आर 1 ..

अशुद्धित प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. सुरेश नवले : सभापती महोदय, महाराष्ट्राच्या ग्रामीण भागामध्ये काम करणाऱ्या श्रीमती विठाबाई मांग यांना राष्ट्रपतींचा पुरस्कार मिळाला. त्यांच्या अंत्यविधीकरिता त्यांच्या नातेवाईकांजवळ पैसे नव्हते. तेव्हा महाराष्ट्र सरकारने उदार भूमिका स्वीकारुन महाराष्ट्राच्या ग्रामीण भागामध्ये जे कलाकार आपली कला जतन करतात त्यांच्या मानधनामध्ये वाढ करीत असतांना महागाई निर्देशांक विचारात घेतला पाहिजे. आज 500 रुपयामध्ये आठवडयाचा बाजार सुध्दा येत नाही. तेव्हा महाराष्ट्र सरकारने या विषयी गांभीर्यपूर्वक विचार करुन या कलाकारांना जास्तीत जास्त रक्कम देण्यासाठी प्रयत्न करावेत, आणि ही रक्कम किमान 2 हजार रुपयांपेक्षा अधिक असावी.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, यासंबंधी सर्वंकष विचार करुन निर्णय घेण्यात येईल.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, महाराष्ट्रातील व देशातील कलाकार व खेळाडू हे ठराविक काळामध्ये लोकप्रिय असतात,त्यानंतर ते निवृत्त होतात.त्यांच्याकडे कुणीही बघायला तयार नाही. याबाबत माननीय सदस्यांनी आपल्या व्यथा मांडलेल्या आहेत. याबाबत शासनाने उदासिनता न दाखविता त्यांची कदर केली पाहिजे. त्यांनी आपल्या राज्याचे नाव उज्वल केलेले असते,देशाची सेवा केलेली असते. याठिकाणी मंत्रिमहोदयांनी मानधन वाढवून देण्याबाबत 15 दिवसात निर्णय घेण्यात येईल असे सांगितले आहे. हल्लीच्या महागाईच्या काळात हे मानधन हजार आणि दोन हजारांनी वाढविणे योग्य होणार नाही, त्यापेक्षा अधिक वाढवून दिले पाहिजे. सभापती महोदय, दुसरी सूचना अशी आहे की, प्रत्येक जिल्हयामध्ये कलाकारांना मानधन घेण्यासाठी फार चकरा माराव्या लागतात त्यापेक्षा ते मिळाले नाही तरी चालेल अशी परिस्थिती असते. याबाबत मी स्वत: अनुभव घेतला आहे. याकरिता आपण जिल्हा स्तरीय समिती नेमून त्यांना अधिकार दिले आहेत. परंतु मानधन देण्याचे अधिकार जिल्हा स्तरावर देणार काय? मानधनाची प्रकरणे प्रांत अधिकाऱ्यांच्या पातळीवरपर्यंत पाठविली जात असल्यामुळे त्यामध्ये दिरंगाई होते. त्यामुळे ही दिरंगाई टाळण्याकरिता आपण या सिस्टीममध्ये काही सुधारणा करणार काय?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय,सध्या प्रचलित जी पध्दत आहे तिची तपासणी करुन त्यामुळे जर काही दिरंगाई होत असेल आणि त्यामध्ये बदल करणे गरजेचे असेल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ D/

श्री. राणा जगजितसिंह पाटील....

तर ते निश्चितपणे केले जातील. जे बदल केले जातील त्याची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवली जाईल.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, वृद्ध साहित्यिक किंवा वृद्ध कलावंतांच्या मानधनाचा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. आपणास कल्पना आहे की, श्री. केशव मेश्राम हे साहित्यिक मृत्यूशी झुंज देत होते.त्याचप्रमाणे श्री. नामदेव ढसाळ हे देखील आजारी होते. कै. बाबूराव बागूल तर आपल्यातून निघून गेले आहेत. या साहित्यिकांना आमच्या नेत्यांमार्फत निधी उभा करुन दिला, परंतु शासनाकडून त्याची दखल घेतली जात नाही. शासनाने याचे उत्तरदायित्व स्वीकारुन त्यांच्या मानधनामध्ये वाढ करण्याबाबतचा प्रश्न विचाराधीन न ठेवता तात्काळ निर्णय घेतला पाहिजे. आज दिवसें दिवस महागाई वाढत आहे, त्यामुळे वाढत्या महागाईचा निर्देशांक विचारात घेऊन गुळमुळीत उत्तर न देता किमान 2 हजार रुपये मानधन देण्याची घोषणा करावी अशी माझी विनंती आहे.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, यासंबंधी 15 दिवसाच्या आत विभागाचा जो काही प्रस्ताव असेल तो पुढे पाठविण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आजकाल इलेक्ट्रॉनिक ट्रान्सफर क्लिअरिंग सिस्टीमचा वापर करुन एका मिनिटामध्ये संबंधितांच्या बँक अकाऊंटमध्ये पैसे ट्रान्सफर केले जातात. याठिकाणी कलाकारांना त्यांच्या मानधनाकरिता आज वारंवार चकरा माराव्या लागत आहेत. त्यांच्या वृद्धापकाळामध्ये आपण अशाप्रकारची सुविधा त्यांना उपलब्ध करुन दिली तर एक तारखेला त्यांच्या बँक अकाऊंटमध्ये आपोआप पैसे ट्रान्सफर होतील. या सिस्टीममुळे आपली मॅनपॉवर वाचेल, स्टँपचा खर्च वाचेल. दर महिन्याला सही करण्यासाठी जाण्या-येण्याचा त्रास वाचेल. तेव्हा याबाबत विचार करुन ही नवीन इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग सिस्टीम आपण अंमलात आणणार काय? सभापती महोदय,आजच्या काळात 500 रुपयांना काहीच महत्व राहिले नाही. साधे टॅक्सीने जायचे म्हटले तरी 100 रुपये खर्च होतात. तेव्हा या मानधन वाढीचा निर्णय आपण किती दिवसात घेणार आहात?

(यानंतर सौ.रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी साहेबांनी अशी सूचना केली आहे की, बँकेच्या खात्यामध्ये पैसे जमा करावेत. तसेच हा निधी आर.टी.ई.जी. आणि इलेक्ट्रॉनिक सिस्टीम व्दारे ट्रान्सफर करण्याच्या बाबतीत देखील सूचना केली आहे. तर आपण निश्चितपणे त्यानुसार करीत आहोत आणि त्याची अंमलबजावणी करण्यात येईल. तसेच दुसरी गोष्ट म्हणजे याबाबती 15 दिवसामध्ये निर्णय घेण्यात येईल. आपण 50 वर्षाच्या वरील कलाकारांना मानधन देतो. त्याचप्रमाणे त्यांच्यासाठी हेल्थ इन्शुरन्स्च्या बाबतची योजना ॲड करता आली तर ती निश्चितपणे करण्यात येईल.

श्री.विलासराव शिंदे : सभापती महोदय, वृध्द कलाकारांनी मानधनासाठी अर्ज केल्यानंतर 4-4, 5-5 वर्षे तो जिल्हा समितीकडून वरच्या स्तरावर येत नाही ही वस्तुस्थिती आहे. यामध्ये बदल होण्याची गरज आहे. यासंदर्भात शासन वेगळे धोरण स्विकारणार आहे काय ? कारण कलाकार अर्ज केल्यानंतर हेलपाटे घालूनच दमतो. म्हणून याबाबतीत शासनामार्फत वेगळी पध्दत स्विकारली जाईल काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, यासंदर्भात जी कमिटी असते, त्यासाठी माननीय पालकमंत्री अध्यक्ष नियुक्त करतात, ते शासकीय सदस्य असतात. त्याचबरोबर आणखी चार सदस्य असतात, जे तमाशा, नृत्य इ.वेगवेगळया क्षेत्रातील मान्यवर लोक असतात. तसेच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हे सदस्य सचिव असतात. या समितीसमोर आलेल्या सर्व अर्जांची छाननी करुन, त्याला निकष लावून दरवर्षी याची यादी तयार करुन ती विभागाकडे पाठविली जाते आणि त्यानुसार मानधन देण्याची सोय केली जाते. आपण दरवर्षी या समितीला निकष ठरवून देतो. तसेच प्रत्येक जिल्हयासाठी 40 परसेंट किंवा 50 परसेंट असे टारगेट ठरवून देतो. हे टारगेट वाढविण्याच्या बाबतीत यावर्षी प्रयत्न करण्यात येईल हे मी या अगोदरच सांगितलेले आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, मला या विषयाच्या अनुषंगाने दोन गोष्टींची आठवण होते. पहिली गोष्ट अशी की, यासंबंधात निर्णय होऊन दहा वर्षे झाली आहेत आणि आज आपण 21 व्या शतकामध्ये आहोत. 1999 मध्ये निर्णय झाला होता, परंतु महाराष्ट्र शासनाने 21 व्या शतकाचा बोध घेतलेला दिसत नाही. 1999 मध्ये राज्याचे बजेट किती कोटी रुपयांचे होते आणि आज 2008 मध्ये बजेट किती कोटी रुपयांचे आहे ? याचा रेशो तपासून त्या प्रमाणात ...

. . . .3 एस-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार . . . .

कलाकारांना देण्यात येणारे मानधन वाढविणार आहात काय ? असा माझा पहिला प्रश्न आहे. निवेदनामध्ये जी माहिती दिलेली आहे, त्यानुसार सध्या वर्ग-अ साठी 700 रुपये, वर्ग-ब साठी 600 रुपये आणि वर्ग-क साठी 500 रुपये मानधन दिले जात आहे.अशा वेळी जर ही रक्कम रिव्हाईज करावयाची असेल तर 30 टक्क्याप्रमाणे 3000 रुपये मानधन द्यावयाचे म्हटले तर कमीतकमी 2000 रुपये पेन्शन बसले पाहिजे. यादृष्टीने शासन फेर विचार करणार आहे काय ? मध्यंतरी माननीय मंत्री श्री.अनिल देशमुख यांच्या बाबतीत एक प्रकरण जाहीर झाले होते आणि त्यामध्ये हाय कोर्टाने निर्णय दिला. त्यानुसार बोगस स्वातंत्र्य सैनिकांना, बोगस कलाकारांना पेन्शन दिली होती, आर्थिक मदत दिली होती. त्याबाबतीत पुढे काय झाले ? कोणती कारवाई करण्यात आली ? कोणती प्रगती झाली ? याची सदनाला माहिती दिली तर बरे होईल.

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून जो विषय उपस्थित करण्यात आला आहे, त्यावरील चर्चेमध्ये बऱ्याच सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला आहे. त्या चर्चेच्या माध्यमातून सन्माननीय सदस्यांनी कलाकारांना देण्यात येणाऱ्या मानधनामध्ये वाढ करण्याच्या बाबतीत, त्यासंबंधात लावण्यात येणाऱ्या निकषाच्या बाबतीत सूचनाही केल्या आहेत. त्या सर्व गोष्टींचा विचार करुन सकारात्मक निर्णय घेण्यात येईल.

यानंतर कु.गायकवाड . . . .

अशुधारित प्रत / शीघ्रलेखनाची नाही

डॉ. वसंत पवार : सभापती महोदय, ज्येष्ठ, रंगकर्मी, तमाशा व चित्रपट, रंगभूमी गाजवणाऱ्या वयोवृध्द कलावंतांच्या संदर्भातील प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून उपस्थित केलेला आहे. माननीय मंत्री महोदयांना मी प्रश्न विचारु इच्छितो की, कलावंतांना मदत देण्याकरिता शासनाकडे किती फंड आहे, किती लोकांना दर वर्षी मानधन देण्यात येते, व किती लोकांचे अर्ज अजून प्रलंबित आहेत ? वृद्ध कलावंतांना वृध्दापकाळात कोणतीही मदत मिळत नाही. त्यांना केवळ 500 रुपये इतके निर्वाहवेतन दिले जाते. खरे म्हणजे इतके कमी निर्वाहवेतन देणे म्हणजे त्यांना हिणवण्यासारखे आहे. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, प्रत्येक जिल्हयातील 40 कलाकार व सन 2007-08 या वर्षासाठी 50 कलाकार निवडण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून तसे आदेश शासनाकडून निर्गमित करण्यात आले ओहत. माझे असे म्हणणे आहे की, निर्वाह वेतन मिळण्याकरिता जे लोक पात्र आहेत त्यांना निर्वाह वेतन देण्यात यावे याकरिता उद्दिष्ट कशाकरिता निश्चित करण्यात येत आहे ? एखाद्या जिल्हयामध्ये जास्त कलाकार पात्र असतील. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्या जिल्हयामध्ये किंवा नाशिक जिल्हयामध्ये जास्त कलाकार निर्वाहवेतन मिळण्याकरिता पात्र असू शकतील. त्यामुळे शासन उद्दिष्टांची मर्यादा काढणार आहे काय ?

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, सन 2007-08 मध्ये लाभार्थ्यांची संख्या 17 हजार 219 इतकी होती. या लाभार्थींना 11 कोटी 30 लाख रुपयांचा निधी देण्यात आला आहे. तसेच या वर्षी 957 लाभार्थ्यांची वाढ करण्यात आलेली आहे. निधीची कमतरता लक्षात घेता, प्रत्येक जिल्हयामधून जेवढे अर्ज येतात त्या सगळयाच अर्जांना मान्यता देता येत नाही. प्रत्येक जिल्हयातील साधारणपणे 1200 ते 1500 अर्ज प्रलंबित आहेत. या अर्जामधील सिनियर लिस्ट काढून अधिक वयाच्या कलावंतांना निर्वाह वेतन देण्यात येईल.

उपसभापती : या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने सदनातील अनेक मान्यवरांनी त्यांची मते व्यक्त केलेली आहेत. कलाकारांच्या मानधनाबाबत येथे बराच उहापोह झालेला आहे. या कलाकारांनी कला क्षेत्रामध्ये त्यांचे योगदान दिलेले आहे म्हणून त्यांना मानधन दिले जाते. हे

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती ...

मानधन त्यांना सन्मानाने दिले गेले पाहिजे. मानधन मिळविण्याकरिता त्यांना चकरा माराव्या लागू नयेत. ही बाब शासनास निश्चितच भूषणावह नाही. कलाकारांना मानधन सन्मानाने मिळावे याकरिता सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी अतिशय योग्य अशी सूचना केलेली आहे. त्याची अंमलबजावणी कशा प्रकारे केली पाहिजे याचा शासनाने विचार केला पाहिजे. कलाकारांना 500 रुपये इतके कमी वेतन दिले जाते. आजच्या काळामध्ये ही रक्कम फारच अल्प आहे. या कलावंतांना 3 हजार रुपये किंवा 2 हजार रुपये देण्यात यावेत अशी मागणी येथे काही सन्माननीय सदस्यांनी केलेली आहे. यापैकी किती रक्कम द्यावयाची हे शासनाने ठरवायचे आहे. परंतु त्यांना दिले जाणारे अनुदान हे त्यांचा चरितार्थ चालण्यास तरी पुरेसे असले पाहिजे.

मी आपणास सांगू इच्छितो की, ग्रामीण भागामध्ये देखील बरेच कलाकार आहेत. त्या कलाकारांना केवळ मानधन देऊन त्यांचा प्रश्न सुटणार नाही. त्यामुळे त्यांच्या कुटुंबामध्ये त्यांच्या पश्चात जे जबाबदारी सांभाळण्यास समर्थ असतील अशा लोकांना आपण नोकरी किंवा रोजगार मिळवून दिला तर यातून काही तरी मार्ग निघू शकेल. कोणाला नोकरी द्यायची आहे हे स्वत: कलावंत ठरवतील. त्यांना नोकरी दिली तर ते सर्वांची जबाबदारी निश्चितपणे पेलू शकतील असे मला वाटते. केवळ मानधनामुळे हा प्रश्न सुटणार नाही. शहरातील कलाकारांना पैसे मिळविण्याकरिता इतर अनेक माध्यमे असतात. परंतु ग्रामीण भागातील परिस्थिती अत्यंत वाईट आहे. अर्थात ग्रामीण भागातील जनतेच्या गरजा देखील अत्यंत कमी आहेत. शहरी जीवनामध्ये व ग्रामीण जीवनामध्ये बरीच तफावत आहे. ग्रामीण भागातील कलाकारांच्या मुलांना नोकरी दिली तर शासनावरील बोजा बराच कमी होऊ शकतो.

यानंतर श्री. बरवड..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखाही नाही

उपसभापती .....

म्हणून यावर अधिक भाष्य न करता सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचना आणि मी या ठिकाणी आपल्याला केलेली विनंती या सर्वांची योग्य ती सांगड घालून हा प्रश्न सोडवावा.

श्री. राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, होय.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, आपल्याला मनापासून धन्यवाद देतो.

उपसभापती : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि सायंकाळी 5.15 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 4.55 ते 5.15 पर्यंत मध्यंतर)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. जगदीश गुप्ता

विशेष उल्लेख

पृ. शी. : ठाणे शहरामध्ये राज्य परिवहन महामंडळाच्या गाड्या वंदना व ठाणे स्टेशननजिकच्या बस स्थानकातून सुटत असल्यामुळे प्रवाशांमध्ये परसलेले संभ्रमाचे वातावरण

मु. शी. : ठाणे शहरामध्ये राज्य परिवहन महामंडळाच्या गाड्या वंदना व ठाणे स्टेशननजिकच्या बस स्थानकातून सुटत असल्यामुळे प्रवाशांमध्ये परसलेले संभ्रमाचे वातावरण याबाबत श्री. संजय केळकर वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : मा□□य सदस्य श्री. संजय केळकर यां□ ए□ विशेष उल्ले□ाची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, सुमारे 10-11 महिन्यांपूर्वी ठाणे शहरात राज्य परिवहन महामंडळाने खोपट परिसरात ठाण्यातील तिसरे असे सुसज्ज बस स्थानक सुरु करुन हजारो प्रवाशांची चांगली सोय केलेली आहे. आता 1 वर्षानंतर अपेक्षा अशी आहे की सर्व गाड्या खोपट या मुख्य स्थानकावरुन सुटाव्यात. याबाबतीत योग्य नियोजन झाले तर प्रवाशांची चांगली सोय होईल. परंतु अद्यापही काही गाडया वन्दना व ठाणे स्टेशन नजिकच्या बस स्थानकातून सुटत असल्यामुळे प्रवाशांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. गाडी नक्की कुठून पकडायची असा प्रवाशांना प्रश्न पडतो. नवीन प्रवाशांना तर वन्दना कुठे आहे आणि खोपट कुठे आहे याचा बोध होत नाही. त्यामुळे हातात सामान घेतलेले प्रवासी बाहेर भटकतात व रिक्षावाले त्यांचा अचूक फायदा घेतात. तसेच खोपट

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. संजय केळकर....)

स्थानकांत बसेसचे वेळापत्रकही लावण्यात आलेले नाही. प्रवाशांच्या सोयीच्या दृष्टीने गाडी केव्हा येईल व केव्हा सुटेल याचे वेळापत्रक लावणे आवश्यक आहे. वन्दना स्थानक बंद केले तर अतिक्रमण होईल अशी भीती व स्टेशन जवळील स्थानक बंद केले तर तेथे टी.एम.टी. (ठाणे म्युनिसिपल ट्रान्सपोर्ट) घुसेल अशी भीती. यामुळे राज्य परिवहन महामंडळाचे स्थानिक अधिकारी संभ्रमात पडलेले आहेत. परिणामी प्रवाशांना हाल सोसावे लागत आहेत. त्यामुळे प्रवाशांमध्ये संतापाची भावना आहे.

सभापती महोदय, या ठिकाणाहून जवळ जवळ 20 ते 25 हजार प्रवाशी बसेसच्या माध्यमातून प्रवास करतात. हे मध्यवर्ती जिल्ह्याचे ठिकाणी असल्यामुळे व प्रवाशांचे हाल होत असल्यामुळे ही बाब मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाच्या निदर्शनास आणून देत आहे. याबाबतीत शासनाने त्वरित कार्यवाही करावी अशी माझी शासनाला विनंती आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : आदिवासी विकास विभागाच्या प्राथमिक आश्रम शाळांतील घडयाळी तासावर काम करणा-या शिक्षकांना नियमित शिक्षक म्हणून सेवेत सामावून घेण्याबाबत

मु. शी. : आदिवासी विकास विभागाच्या प्राथमिक आश्रम शाळांतील घडयाळी तासावर काम करणा-या शिक्षकांना नियमित शिक्षक म्हणून सेवेत सामावून घेण्याबाबत श्री. रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : मा□□य सदस्य श्री. रामनाथ मोते यां□ ए□ विशेष उल्ले□ाची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने आदिवासी विकास विभागातील शिक्षकांच्या संदर्भातील विशेष उल्लेख या ठिकाणी उपस्थित करीत आहे.

सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाच्या प्राथमिक आश्रम शाळेमध्ये शिक्षकांची अनेक पदे रिक्त आहेत. खरे म्हणजे आदिवासी विकास विभागाने योग्य त्या पध्दतीचा अवलंब करुन नियमित शिक्षकांची नियुक्ती करणे अपेक्षित आहे. परंतु या रिक्त पदांवर नियमित शिक्षकांची नियुक्ती न करता घड्याळी तासावर नियुक्ती केलेली असून त्यांना तासाला 12 रुपये मानधन दिले जाते. हे शिक्षक नियमित शिक्षक म्हणून नियुक्तीस पात्र असतांना देखील त्यांचे आर्थिक शोषण केले जात आहे. ठाणे जिल्ह्यातील अनेक प्राथमिक आश्रम शाळांमध्ये अशा प्रकारे घड्याळी तासावर काम करणारे शिक्षक आहेत. या शिक्षकांना एका तासाला 12 रुपये मिळतात. यापूर्वी देखील हा विषय या सभागृहामध्ये मी उपस्थित केला होता. त्यावर चर्चा झाली होती. या प्रश्नामध्ये आदिवासी विकास विभागाने लक्ष घालण्याचेही मान्य केले होते. याबाबतीत मी अनेक वेळा आदिवासी विभागातील अधिका-यांना भेटलो. परंतु अद्यापही हा प्रश्न सुटलेला नाही. म्हणून या विशेष

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उल्लेखाच्या माध्यमातून मी शासनाला विनंती करतो की घडयाळी तासावर काम करणारे आदिवासी विभागाच्या आश्रमशाळेतील शिक्षकांना नियमित शिक्षक म्हणून सेवेत सामावून घ्यावे. इतर विभागामध्ये घड्याळी तासावर काम करणा-या शिक्षकांच्या मानधनामध्ये वाढ करुन ते 20 रुपये करण्यात आलेले आहे. तेव्हा एकतर या आदिवासी विभागाच्या आश्रमशाळेतील शिक्षकांच्या मानधनामध्ये वाढ करावी किंवा त्यांना नियमित शिक्षक म्हणून सेवेत सामावून घ्यावे आणि या आदिवासी क्षेत्रामध्ये काम करणा-या शिक्षकांना न्याय द्यावा अशी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाला विनंती करतो.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. :डी.एड.धारक उमेदवारांवर शिक्षण सेवक भरती प्रकरणी झालेला अन्याय

मु. शी. :डी.एड.धारक उमेदवारांवर शिक्षण सेवक भरती प्रकरणी झालेला अन्याय याबाबत श्रीमती उषा दराडे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : **(श्री.जगदीश गुप्ता)** : मा□□य सदस्या श्रीमती उषा दराडे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्रीमती उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

" जुन्या अभ्यासक्रमात डी.एड.धारक अभ्यासक्रमाच्या उमेदवारांवर शिक्षणसेवक भरती प्रकरणी अन्याय करणा-या निर्णयाविरुध्द डी.एड. जुना अभ्यासक्रम संघर्ष कृती समिती, बीड येथील उमेदवारांनी जिल्हा कार्यालयासमोर बेमुदत उपोषणास बसणे, राज्यात विविध ठिकाणी याच प्रश्नावर उमेदवारांनी उपोषण सुरु करणे, डी.एड.च्या उमेदवारांमध्ये नवीन आणि जुना वाद निर्माण होणे, त्यामुळे शिक्षण सेवक भरती प्रक्रियेबाबत निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना"

सभापती महोदय, नवीन डी.एड.चा अभ्यासक्रम यामध्ये 100 मार्काच्या परिक्षा घेण्यासाठी जवेढा वेळ दिला तेवढाच वेळ 80 मार्काच्या परीक्षेसाठी देण्यात आला अशा प्रकारचा आक्षेप या जुन्या डी.एड.च्या विद्यार्थ्यांनी घेतला आहे. तसेच प्रॅक्टीकलचे सुध्दा मार्कस् नवीन डी.एड.च्या विद्यार्थ्यांना मिळालेले आहेत. त्यामुळे जुना आणि नवा वाद डी.एड.विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाला आहे. या ठिकाणी जागा भरण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असताना नवीन डी.एड.च्या विद्यार्थ्यांना त्याच्यामध्ये फॉर्म भरण्याची परवानगी शासनाने दिली आहे. म्हणून मला असे सूचित करावयाचे आहे की, डी.एड.चे जुने 30 ते 40 हजार विद्यार्थी आहेत. नवीन डी.एड.चे 30 ते 40 हजार विद्यार्थी आहेत. 70 ते 80 हजार डी.एड.चे झालेले उमेदवार आहेत. ते शिक्षण सेवकाच्या प्रतिक्षेत आहेत. परंतु शिक्षकांच्या जागा 5 ते 6 हजार आहेत असे मला समजलेले आहे. महाराष्ट्रात

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे....

राहणारे विद्यार्थी आहेत, परंतु ते कर्नाटक मध्ये जाऊन शिकले, त्यासंबंधीचा विशेष उल्लेख मी याच अधिवेशनात केला आहे. मला असे समजले की, यावेळी त्या विद्यार्थ्यांना ॲपीअर होण्याची संधी दिली जाणार आहे. या सगळया प्रकरणाचा बाबतीत काही तरी सुवर्णमध्ये शासनाला काढावा लागणार आहे. जुना अभ्यासक्रम आणि नवीन अभ्यासक्रम यांना 50-50 टक्के कुठे सामावून घेता येते याचा विचार शासनाने करावा. शासनाने यासंदर्भात सरळ सरळ सी.ई.टी. घ्यावी. याबाबतीत शासनाने सर्वमान्य तोडगा काढावा. याबाबतीत अधिक गुंतागुंत होऊ देऊ नये अशी विनंती करते. याबाबतीत शासनाने तातडीने लक्ष घालावे म्हणून मी विशेष उल्लेख सभागृहात उपस्थित केला आहे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : ऑल इंडिया इंजिनिअरींग ॲण्ड आर्किटेक्चर एन्ट्रन्स परीक्षा देशभर एकाच वेळी घेण्याबाबत

मु. शी. : ऑल इंडिया इंजिनिअरींग ॲण्ड आर्किटेक्चर एन्ट्रन्स परीक्षा देशभर एकाच वेळी घेण्याबाबत याबाबत श्री. संजय दत्त, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : : मा□□य सदस्य श्री.संजय दत्त यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

" ऑल इंडिया इंजिनिअरींग ॲन्ड आर्किटेक्चर एन्ट्रन्स परीक्षा ही दिनांक 27 एप्रिल, 2008 रोजी देशभर एकाच वेळी सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन, नवी दिल्ली यांच्या मार्फत घेण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना इंजिनिअरींग ॲन्ड आर्किटेक्चर महाविद्यालयात प्रवेश परीक्षेसाठी 15 टक्के जागा राखून ठेवल्या आहेत. राज्यातील शहरी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी या परीक्षेसाठी अर्ज केलेइआहेत. या परीक्षेचे मुंबई, पुणे आणि नागपूर परीक्षा केंद्र आवेदन पत्रात प्राधान्यक्रम देऊन भरलेले असताना आणि महाराष्ट्रात सी.बी.एस.ई.चे केंद्र उपलब्ध असताना प्रत्यक्षात राज्यातील विद्यार्थ्यांना भोपाळ, अहमदाबाद, बडोदा येथील परीक्षा केंद्रावर जाऊन परीक्षा देण्याबाबत बोर्डाने कळविले आहे. परिणामी प्रत्येक विद्यार्थ्यास 3 ते 4 हजार रुपये प्रवास, निवास आणि भोजन खर्च येऊन सुमारे 7 ते 8 दिवस प्रवास करावा लागणार आहे. यामुळे बहुसंख्य ग्रामीण आणि शेतक-यांची मुले असलेल्या विद्यार्थ्यांना निवास आणि भोजनाच्या समस्येमुळे परीक्षेपासून वंचित रहावे लागणार आहे. त्यांच्यामध्ये जाणीवपूर्वक परीक्षेपासून वंचित ठेवले जात आहे अशी भावना निर्माण होऊन असंतोष निर्माण झालेला आहे. तसेच राज्यातील विद्यार्थ्यांना

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील परीक्षा केंद्र देण्यात यावे अशी मागणी दिनांक 3 एप्रिल, 2008 रोजी समस्त विद्यार्थ्यांनी शासनाकडे केली आहे. याकडे सहानुभूतीपुर्वक लक्ष देऊन सदर मागणीच्या अनुषंगाने तातडीने तोडगा काढण्याची आवश्यकता आहे. या सार्वजनिकदृष्टया महत्वाच्या विषयावर विशेष उल्लेखाची सूचना दाखल करीत आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी मी मुद्दाम माहिती देऊ इच्छितो की, संबंधित मंत्री माननीय श्री.दिलीप वळसे पाटील यांच्याकडे यासंदर्भात पाठपुरावा केला आणि त्यांनी आपल्या अधिका-यांना सूचना देऊन याबाबतीत बोर्डाकडून लेखी स्वरुपात मागणी केली आहे.

यानंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : गिरणी कामगारांच्या दीर्घकालीन समस्या सोडविण्यास शासनास आलेले अपयश

मु.शी.: गिरणी कामगारांच्या दीर्घकालीन समस्या सोडविण्यास शासनास आलेले अपयश या विषयावर सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, विनोद तावडे, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री. मधुकर सरपोतदार, अरविंद सावंत, प्रकाश शेंडगे, डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

(चर्चा पुढे सुरु)

श्री. नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मुंबईतील गिरणी कामगारांच्या जीवन-मरणाच्या प्रश्नावर या सदनामध्ये सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी चर्चा उपस्थित केलेली आहे. मुंबई शहर हे एकेकाळी गिरणगांव म्हणून ओळखले जायचे. या शहरामध्ये जवळपास 61 कापड गिरण्या ज्याला आपण टेक्सटाईल मिल म्हणतो त्या आहेत. या गिरण्यांमधून जवळपास अडीच लाख कामगार काम करीत होते. या व्यतिरिक्त या गिरण्यांना विविध वस्तूंचा पुरवठा करणारे छोटे उद्योग, लघुउद्योगांच्या माध्यमातून जवळजवळ सात ते साडेसात लाख लोकांना रोजगार मिळत होता. मुंबईचे अर्थशास्त्र हे या टेक्सटाईल मिल आणि इंडस्ट्रीवर अवलंबून होते. म्हणून महाराष्ट्राच्या विधिमंडळामध्ये मग खालच्या सदनात सदस्य असो किंवा वरच्या सदनात सदस्य असो किंवा मंत्रिमंडळातील मंत्री असो ते गिरणी कामगारांचे सुपुत्र आहेत.

सभापती महोदय, मुंबईचे सगळे वैशिष्टय हे मुळात गिरणी कामगारांच्या प्रश्नाबरोबर निगडीत होते. विशेषत: मुंबईचे हे दमट हवामान आहे त्या हवामानामध्ये कापसापासून सूत योग्य प्रकारे निघते म्हणून स्वाभाविकपणे येथे टेक्सटाईल मिल निर्माण झाल्या आणि त्यामुळेच मुंबईत मोठया प्रमाणावर कापडाच्या गिरण्या उभ्या राहिल्या. यामध्ये 25 एनटीसीच्या गिरण्या आहेत, 35 खाजगी गिरण्या आहेत आणि राज्य शासनाची एक मिल अशा एकूण 61 कापड गिरण्या आहेत. सभापती महोदय, या गिरण्यांना मुंबईमध्ये जमीन कुणी दिली याचा विचार केला तर त्यावेळच्या महाराष्ट्र सरकारने ही जमीन दिली. त्यावेळी याची कल्पना नव्हती की या गिरणीच्या जागांची किंमत किती वाढणार आहे ? याठिकाणी सभागृहाच्या निदर्शनास एक गोष्ट आणू इच्छितो की, या गिरण्यांच्या माध्यमातून ज्या गरीब माणसांना रोजगार मिळत होतो त्या कामगार चळवळीचा मुंबईचा

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

इतिहास फार मोठा आहे. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी आपल्या भाषणात सांगितले की, मुंबईत कॉ.एस.ए.डांगे आणि इतर अशा अनेक कामगार नेत्यांचा मुंबईच्या समाजकारणावर आणि राजकारणावर प्रभाव होता. मी ज्यावेळी शाळेत होतो त्यावेळी मुंबईमध्ये 1974 मध्ये एक पोटनिवडणूक झाली होती. त्या निवडणुकीमध्ये कॉ.रोझा देशपांडे निवडून आल्या होत्या. त्यावेळी बॅ.रामराव आदिक त्यांच्या विरोधात उभे होते. त्यावेळची ही निवडणूक देशामध्ये चर्चेचा विषय बनली होती. मुंबईतील कामगारांचे श्री.जॉर्ज फर्नांडीस यांनी नेतृत्व केले. त्यांच्यासारखा नेता मिळाला होता. साम्यवादी चळवळीमध्ये कॉ. डांगे यांच्यासारखे अनेक नेते तयार झाले होते. कामगारांच्या चळवळीने मुंबईचे सांस्कृतिक, राजकीय जीवन समृध्द केले आणि आर्थिक जीवनही समृध्द केले. हा सगळा इतिहास एवढयासाठी मी सांगत आहे की मुंबई ज्यांच्या नांवाने ओळखली जायची आणि ज्यांनी रक्ताचे पाणी करुन परिश्रम करुन मुंबई मोठी केली आणि मुंबई घडविण्यामध्ये ज्यांचा सिंहाचा वाटा होता त्या गिरणी कामगारांची तेव्हाची अवस्था काय होती आणि आजची अवस्था काय आहे याचा विचार करण्याकरिता ही सर्व परिस्थिती मी सांगितली. 1987 पासून भूखंडाच्या किंमती आकाशाला भिडू लागल्या आणि त्यामध्ये स्पर्धा सुरु झाली. गिरण्या लवकर बंद करावयाच्या कशा हा विचार सुरु झाला.

नंतर श्री. भोगले

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

माझ्याकडे या सर्व गिरण्यांच्या नावाची यादी आहे. अभ्यास केला तर या गिरण्यांपैकी अनेक गिरण्या बंद करण्याची आवश्यकता नव्हती. परंतु त्यांनी हिशोब केला की, या गिरण्यांच्या जमिनीवर जर आपण डेव्हलपमेंट केली तर त्या माध्यमातून येणारा पैसा आणि गिरणी चालवून येणारा पैसा यापैकी अधिक नफा विकास करण्यामध्येच आहे. डेव्हलपमेंट करण्यामध्ये, मॉल्स बांधण्यामध्ये आहे. त्यामुळे सुनियोजित मार्गाने षडयंत्र रचले गेले. या गिरण्यांच्या मालकांनी आपल्या गिरण्या घाट्यात आणल्या. कामगारांची देणी थकविली गेली. इतकेच नव्हे तर तत्कालीन मान्यताप्राप्त इंटक नेत्यांनी फार मोठे सहकार्य केले. सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेब, आजचे इंटक नेते यांचे फायनान्शीयल स्टेटस बघायचे असेल तर मी सांगतो, मुंबईच्या करोडपतींमध्ये त्यांची गणना होते. नंबर एकचे 5 टक्के मिळाले ते वेगळे, एक-एक गिरणी बंद झाली, त्यातून 5 टक्के मिळाले ते वेगळे आणि गिरण्या बंद करण्यासाठी आणि कामगारांचे करार करण्यासाठी आतबट्टयाचा आर्थिक व्यवहार झाला हा वेगळा इतिहास आहे. पुढे या गिरण्यांच्या जमिनींवर विकास सुरु झाला. सन्माननीय श्री.नीलकंठ खाडीलकर यांनी 'टॉवर' नावाचे पुस्तक लिहिले आहे. टॉवरमध्ये कोणी काय केले हे सांगितले आहे. त्यामधील एक कविता मी शोधून काढली. डॉ.महेश केळुस्कर यांनी ती कविता लिहिली आहे. "शरदाच्या चांदण्यात मी न्हाते गं, एक -एक भूमीखंड सावकाश खाते गं", ही त्या काळातील कविता आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, 1995 साली जे राजकारण झाले त्यावेळी खैरनार असतील, अन्य मंडळी असतील त्यांच्या भूखंडाच्या श्रीखंडाबद्दल ही कविता आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, भूखंडावर जगद्विख्यात प्रेम करणारी व्यक्ती कोण आहे, हे संपूर्ण हिंदुस्थानला माहिती आहे. मी कोणाचे नाव घेत नाही. असते प्रेम, कोणाला साहित्याबद्दल, कोणाला कवितेबद्दल. तुमचे नेते माननीय सदस्य श्री.उल्हासदादा पवार यांना साहित्य आणि कवितेबद्दल प्रेम आहे. कोणाला भूखंडाचे प्रेम असते.

सभापती महोदय, 1987 साली हे कट कारस्थान सुरु झाले. हा इतिहास म्हणजे एक चांगला सिनेमा तयार होऊ शकतो. गरीब कामगारांचे गळे कापण्याचा जो इतिहास आहे या इतिहासाचे अध्ययन करुन वस्तुस्थिती चित्रपटाद्वारे समाजासमोर आणण्याची आवश्यकता आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

1987 मध्ये हे कारस्थान सुरु होऊन 23 मार्च, 2001 रोजी पूर्ण झाले. या विकास नियमावलीमध्ये बदल करुन गिरणी मालकांना सोयीचे होईल असा नवीन नियम तयार झाला. 'मोकळी व आत असलेली बांधकामे पाडून तयार झालेली जागा' याऐवजी 'मोकळी जागा व शिल्लक एफएसआय' एवढी फक्त सुधारणा झाली. एका वाक्याची सुधारणा झाली. या एका सुधारणेमुळे 7.5 ते 8 लाख लोकांच्या माना कापून घेतल्या. सगळा सत्यानाश झाला.

(नंतर श्री.खर्चे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

या नियमात एवढाच बदल करुन गिरणी मालकांना शासनाने मोकळे मैदान करुन दिले. या गिरणी कामगारांचे पुनर्वसन करण्याच्या बाबतीत शासनाने 1 जानेवारी, 2000 रोजी गिरण्यांच्या जमिनीवर राहणाऱ्या रहिवाशांना 225 चौरस फूट एवढया चटई क्षेत्राची सदनिका देऊन त्यांचे पुनर्वसन करण्याचा प्रस्ताव गिरण्यांच्या पुनर्विकसित प्रस्तावात अंतर्भूत नसेल तर गिरण्यांची जमीन विकसित अथवा पुनर्विकसित करण्यासाठी मान्यता दिली जाणार नाही, असे शासनाचे धोरण आहे असे त्यावेळी शासनाने सभागृहात जाहीर केले होते. परंतु त्यामध्ये दि.23.3.2001 मध्ये फेरबदल केला. मुंबई विकास नियमावलीच्या कलम 58, पोटकलम 7 (ब) व (क) मध्ये सन 2001 मध्ये बदल करुन सुधारित विकास नियमावली तयार करण्यात आली. अशा प्रकारे हा मुंबई विकास नियमावलीतील कलम 58, पोटकलम 7 (ब) व (क) हे जे कलम आहे ते सर्वात खतरनाक कलम आहे. या "टॉवर" नावाच्या पुस्तकात कै. शंकरराव चव्हाण काय म्हणाले, पवार काय म्हणाले, खाडिलकर यांचा इतिहास त्यात आहे. या कलमामुळे मुंबईतील गिरणी कामगाराला संपूर्ण उद्ध्वस्त केला. पूर्वी बिग बाजारसारख्या रस्त्यावर गेलो असता एक चिमणी दिसत होती. त्या ठिकाणी मोठे खिंडार आहे, जुन्या भिंतीवरुन दिसतात पण आत गेल्यानंतर संपूर्ण चकाचक, एअर कंडिशन अशा इमारती दिसतात. मी बांधकाम मंत्री असताना सेनापती बापट मार्गावर अशी परिस्थिती होती की मला सुध्दा वाटत होते की, या ठिकाणी लोक कसे राहतात, तेथे गेल्यावर कसे वाटत होते हे सर्वांना माहीत आहे. परंतु आज पाहिले तर दोन्ही बाजूला कार्पोरेट ऑफिसेस उभे राहिली, हजारो-लाखो गाड्या तेथे येतात, अशा प्रकारे गिरण्यांच्या जमिनीवर मोठमोठ्या इमारती उभ्या राहिल्या, त्यात गिरणी मात्र कुठेही दिसत नाही. शब्दांची हेराफेरी करुन हा जो नियम बदलला त्या नियम 58 (अ) मध्ये बांधकामासाठी असलेली जागा, नव्या बांधकामासाठी जागा याचा उपयोग कसा करावा याचा खुलासा केला आहे. तर नियम 58 (ब) मध्ये बदल करुन पाच एकरपर्यंत जागा मोकळी असेल तर त्यातील 33 टक्के जागा महानगरपालिका, 27 टक्के जागा म्हाडा आणि उर्वरित 40 टक्के पुनर्वसनासाठी अशा प्रकारची तरतूद करण्यात आली.....अडथळा.....सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांच्या म्हणण्याप्रमाणे हे क्षेत्र 5 एकरऐवजी 5 हेक्टर असे असावे, परंतु मला दिलेल्या कागदपत्रांवरुन मी सांगत आहे. 10 हेक्टर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

पेक्षा जास्त जागा असेल तर 33 टक्के महानगरपालिका, 37 टक्के म्हाडा आणि 30 टक्के मूळ मालकाला अशी ही दुरुस्ती करण्यात आली. या तरतुदीचा फायदा मोरारजी मिल, बॉम्बे मिल, श्रीनिवास टेक्स्टाईल, सेंच्युरी मिल, डॉन मिल, रुबी मिल अशा गिरणी मालकांनी उचलण्यास सुरुवात केली. आमच्या नागपूरला व्हेरायटी चौकात डॉन कंपनीचे एक शो-रुम आहे. आम्ही लहानपणी डॉन कंपनीचे अंडरविअर व बनियन घेण्याचा हट्ट धरत होतो. .....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

सभापती महोदय, त्या मिलच्या वस्तूंची कॉलिटी अतिशय उत्तम होती त्यामुळे या मिलचे प्रॉडक्टस चांगल्या किमतीत विकून ही मील चांगल्या पध्दतीने सुरु होती. परंतु या मिल मालकांना समजले की, चड्डी, बनियान विकत बसण्यापेक्षा या जागेवर मॉल, टॉवर्स बांधून करोडो-अब्जावधी रुपये कमवता येतील त्यामुळे या मिल मालकांनी आपल्या मिल तोटयात दाखवून जाणूनबुजून या मील बंद पाडल्या. या मिल मालकांनी, गिरणी कामगारांची कायदेशीर देणी आहेत ती देणी सुध्दा दिल्या नाहीत म्हणजे जीपीएफ, ग्रॅच्यूईटी अशी कायदेशीर देणी सुध्दा दिली नाही. कामगारांची करोडो रुपयांची वैधानिक देणी या मिल मालकांनी कामगारांना न देता जमिनी डेव्हलप केल्या कारण गिरणी मालकांच्या मागे आपले मायबाप सरकार उभे होते. गिरण्या बंद करुन कामगारांना देशोधडीला लावण्याचे काम मिल मालकांनी केलेले आहे. खटाव मिल, श्रीनिवास मिल, ब्ल्यू बर्ड मिल नादारीत गेल्या त्याची योग्य ती अंमलबजावणी झाली आणि गिरणी कामगार उध्वस्त झाला, मिल बंद झाल्यापासून कामगाराच्या बरबादीला सुरुवात झाली. कामगारांना उद्ध्वस्त करण्यासाठी सोयीस्कर षडयंत्र रचले गेले. आपल्या राजकारणी आणि श्रीमंत उद्योगपतींची साठगांठ झाली आणि कट रचला आणि एका मागून एक मिल बंद करण्याचा सपाटा सुरु करुन समाजवादाचा कार्यक्रम सुरु झाला.

(अडथळा)

सभापती महोदय, समाजवाद, लोकशाही, धर्मनिरपेक्षता या शब्दाशी तुमचा कोणाचाही दुरान्वयानेही संबंध येत नाही. मी ज्यावेळेस मंत्री होतो त्यावेळेस मी 8 हजार कोटी रुपयांची कामे केली होती. माझ्या कामांमध्ये काही फॉल्ट सापडतो का हे पाहण्यासाठी माझ्या सर्व फाईल्स आपण उघडून बघा आपल्याला त्यामध्ये काहीही सापडणार नाही. माझे तुम्हाला चॅलेंज आहे की, तुमचे सरकार आहे, मी विरोधी पक्षात आहे तुमच्यात हिंमत असेल तर तुम्ही माझ्या फाईल्स उघडा पण त्यामध्ये तुम्हाला काहीही सापडणार नाही.

(अडथळा)

सभापती महोदय, मिलच्या जागेच्या संदर्भात नियमावली तयार करण्यात आली होती त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

नियमावली प्रमाणे म्हाडा, महानगरपालिका यांना किती जागा मिळालेली आहे? या जागेचे काय झालेले आहे? कसे नियम बदलले गेले ? या ठिकाणी माननीय नगरविकास राज्यमंत्री बसलेले आहेत त्यांना यासंदर्भातील काही माहिती आहे काय? गेल्या 20 वर्षापासून हे प्रकार सुरु आहेत यासंदर्भातील आपण सर्व माहिती घेऊन त्यांना केस टू केस कसे रिलॅक्सेशन कसे दिले गेले याची माहिती मिळण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, यासंदर्भात उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश श्री. बी.व्ही. चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली सनियंत्रण समिती नेमण्यात आली.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांचे कोणीही ऐकत नाही. त्यांनी बोलाविलेल्या बैठकीला कोणी उपस्थित राहत नाहीत. कामगारांच्या हिताच्या दृष्टीने उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांची एक संनियंत्रण समिती नेमलेली आहे आणि शासन यामध्ये लवकरात लवकर लक्ष घालून कामगाराच्या कल्याणाच्या योजना राबविणार आहे अशा प्रकारचे उत्तर देण्यासाठीच केवळ ही समिती नेमण्यात आली आहे. केवळ या ठिकाणी उत्तर देण्यासाठी श्री.चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आलेली आहे परंतु त्या व्यतिरिक्त सात वर्षात त्यांनी काहीही काम केलेले नाही. कारण त्यांनी बोलाविलेल्या बैठकीस कोणीही येत नव्हते. गिरणी कामगारांना द्यावयाचा रोजगार, त्यांना उपलब्ध करुन द्यावयाची घरे इत्यादी संबंधी समिती कार्यवाही करणार होती. परंतु या समितीने एकाही कामगाराला रोजगार दिला नाही एकाही कामगाराला घर दिले नाही. या समितीने एकाही कामगारांला त्याची वैधानिक देणी मिळवून दिली नाहीत. या समितीने गेल्या सात वर्षात कोणते काम केले होते ?

सभापती महोदय, मध्यंतरी " दामिनी " नावाचा चित्रपट आला होता . त्यामध्ये धर्मेद्रचा मुलगा सनी देवल कोर्टात जातो आणि विचारतो की, " क्या चल रहा है ? तारीख पर तारीख,तारीख पर तारीख, तारीख पर तारीख " तशाच प्रकारे गिरणी कामगारांच्या संदर्भात नेमण्यात आलेल्या समितीच्या बैठकांच्या फक्त तारखाच पडत गेल्या. परंतु त्या समितीसमोर कोणीही उपस्थित राहिले नव्हते. श्री.चव्हाण यांच्या समिती समोर तुमच्या सारखा एखादा सनी देवल गेला नाही. सन्माननीय मंत्री श्री.हंडोरे यांना मी सांगू इच्छितो की, तुमच्या सारखा एखादा मंत्री जर या समितीपुढे उपस्थित राहिला असता तर या गिरणी कामगारांच्या बाबतीत काही चांगले निर्णय घेतले गेले असते परंतु तुम्हाला या समितीकडे जाण्यासाठी वेळ नाही. मुंबईच्या आमदारांना वा तुमच्या नेत्यांनाही या समितीकडे जाण्यास वेळ नव्हता. त्यामुळे या प्रश्नाकडे लक्ष दिले गेले नाही. राज्य शासनाच्यावतीने या विभागाचे सचिव श्री.रामानंद तिवारी यांनी कोर्टामध्ये असत्य प्रतिज्ञापत्र दाखल केले होते. त्यांनी प्रतिज्ञापत्रात असे म्हटले की, " शहरातील बंद कापड गिरण्यांच्या जागावर उभे राहिलेले उद्योग आणि मॉल यामध्ये गिरणी कामगार किंवा त्यांची मुले यांना नोक-या देणे शक्य नाही." या गिरणी कामगारांची मुले काचेवर कपडा मारण्याच्या लायकीचीसुध्दा नाहीत काय ? या मॉलमध्ये सेल्स गर्ल किंवा सेल्समन म्हणून उभे राहण्याचीसुध्दा या गिरणी कामगारांच्या मुला - मुलीची लायकी नाही काय ? या मॉलमध्ये येणाऱ्या गाडया पे ॲन्ड पार्कमध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उभ्या केल्या जातील तेव्हा त्या गाडीवाल्याकडून पैसे घेऊन त्याना कुपन देण्याचीसुध्दा या मुलांची लायकी नाही काय ? कोर्टामध्ये आपण अशा प्रकारचे प्रतिज्ञापत्र देण्यापूर्वी या कामगाराच्या मुला मुलीना तेथे नोक-या देण्यासाठी काही प्रयत्न केला आहे काय ? आपण जर त्यासाठी काही प्रयत्न केले असते व त्यासाठी काही योजना आखल्या असत्या तरीसुध्दा ऐकले गेले नसल्यामुळे अशा प्रकारचे प्रतिज्ञा पत्र दिले गेले असते तर ते मी समजू शकतो. परंतु यासाठी अगोदर काहीही प्रयत्न केले नाहीत. जोपर्यंत या कामगाराच्या मुला मुलींना नोकरी दिली जाणार नाही तोपर्यत डेव्हलपमेन्ट करण्यास परवानगी दिली जाणार नाही व आपल्या फाईलवर सही होणार नाही असे त्यांना सांगावयास पाहिजे होते. अशा प्रकारे जर त्यांना धमकाविण्यात आले असते तर अशी वेळ आली नसती. सभापती महोदय, शासनाने यापूर्वी जे गॅझेट प्रसिध्द केले होते त्याची प्रत माझ्याकडे आहे त्यातील मजकूर मी नंतर वाचून दाखविणार आहे.त्या गॅझेटमध्ये तसेच कायद्यात लिहिले आहे परंतु शासनाने त्या सदर्भात काहीही प्रयत्न केलेले नाहीत. त्यामुळे गिरण्यामध्ये काम करणारे सात आठ लाख लोक उद्ध्वस्त झाले आहेत. अडीच लाख गिरणी कामगार देशोधडीला लागले असून त्याच्या मुली बार मध्ये नाचावयाला लागल्या आणि मुले गुन्हेगार बनले. त्यांना कायदेशीर व वैधानिक रोजगार देण्याच्या दृष्टीने शासनाने काहीही प्रयत्न केले नाहीत. उलट महाराष्ट्र शासनाने हायकोर्टात प्रतिज्ञापत्र केले होते त्या प्रतिज्ञापत्रात श्री.रामानंद तिवारी यांनी असे सांगितले की, ही मुले कोणत्याही लायकीची नाहीत. या गिरण्यांच्या जागेवर तयार होणा-या मॉलमध्ये वा उद्योगामध्ये नोक-या देण्याच्या लायकीची ही मुले नाहीत त्यामुळे त्याना नोक-या देऊ शकत नाहीत. हा विषय आम्ही सभागृहात वारंवार उपस्थित करीत होतो. हायकोर्टात न्यायमूर्ती श्री.जस्टीस यांच्यासमोर प्रकरण गेल्यानंतर त्यांनी शासनाची चांगली खरडपट्टी काढली. त्यानी सांगितले की दुसरे प्रतिज्ञापत्र करुन द्या आणि या कामगारांच्या मुलांना या उद्योगामध्ये सरकार नोक-या का देऊ शकले नाही हे आपण सांगावे.

नतर श्री.सुंबरे

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. गडकरी ....

सभापती महोदय, गिरणी कामगार आणि त्यांच्या मुलांना जमणार नाही असे कोणते मोठे काम त्या मॉलमध्ये, तेथे उभ्या राहणाऱ्या इतर उद्योगांमध्ये आहे, असे कोणते कुशल काम तेथे होत आहे ? सभापती महोदय, आमच्या आदरणीय भगिनी येथे बसल्या आहेत, मी त्यांना विचारू इच्छितो की, हे जे काही मोठमोठे मॉल्स या गिरण्यांच्या जमिनींवर झालेले आहेत त्यामध्ये गरीबांच्या मुलांना, कामगारांच्या मुलांना नोकऱ्या मिळू शकतात की नाही ? या गिरणी कामगारांच्या मुली शेवटी काम मिळत नाही म्हणून बारमध्ये नाचायला गेल्या, त्यांच्यासाठी त्या मॉलमध्ये एकही नोकरी मिळू शकत नाही का ? त्यांच्या लायक एकही नोकरी तेथे नाही का ? तुम्ही त्यांना सर्रास अपात्र सर्वच नोकऱ्यांसाठी ठरवून टाकले. सभापती महोदय, आम्ही सरकारकडे मागणी करतो की, धरण बांधायचे असेल तर अगोदर तेथे राहणाऱ्यांच्या पुनर्वसन करा. त्यांच्यासाठी त्या पुनर्वसित गावामध्ये रस्ते, शाळा, मंदिर वगैरे सर्व सोयी-सुविधा द्या, अगदी टर्न की बेसिसवर या सगळ्या व्यवस्था तेथे करा आणि मगच धरणाचे काम सुरू करा. आम्ही हे सरकारला म्हणतो. पण तुम्ही हे जे सगळे मोठमोठे उद्योगपती आहेत, तुमचे वाडिया, खटाव, टाटा इ. त्या सगळ्यांची आता हेलिकॉप्टर्स देखील आहेत. त्यामुळे ते आम्हाला सांगू लागले, सरकारमधील मंत्र्यांना सांगू लागले की, तुम्हाला गरज लागली तर आम्हाला सांगा, आमचे हेलिकॉप्टर तुमच्या सेवेला केव्हाही मिळेल. आज खाजगी हेलिकॉप्टर्सची संख्या एवढी वाढली आहे की विचारू नका. मला मध्यंतरी एक उद्योगपती भेटला. तो म्हणाला की, एका एसआरए योजनेमध्ये त्याला 18 कोटी रूपये मिळाले. आता आमचे येथे सांस्कृतिक कार्यमंत्री आहेत, त्यांना ही सारी वर वरची माहिती आहे, पण तेथे खरे कीर्तन काय सुरू आहे याची माहितीच नसते. एका एका प्रकल्पामध्ये दीड-दोन हजार कोटीचा फायदा ते घेत आहेत. आता तर कॉंट्रॅक्टरर्स तुमच्या मुंबईमध्ये कामच करू शकत नाहीत. तुमच्या शुभेच्छे शिवाय, तुमच्या सहकार्याशिवाय ते येथे कामच करू शकत नाही आणि आता तर 8 वर्षे तुमचेच राज्य आहे ना ? मग आमच्यावर कशासाठी तुम्ही खडे फोडता ?

सभापती महोदय, मी आपल्याला एक येथे वाचून दाखवितो. महाराष्ट्र रिजनल ॲण्ड टाऊन प्लॅनिंग ॲक्ट अंतर्गत 20.3.2001 रोजी राज्य शासनाचे एक राजपत्र प्रसिद्ध झाले आहे. त्यातील पृष्ठ 33 वर जे म्हटले आहे ते मी येथे वाचून दाखवितो, माझे काही चुकत असेल तर जरूर मंत्री महोदयांनी खोडून काढावे. या राजपत्रातील पृष्ठ 33 वर असे म्हटले आहे की, "If and when a

..... 4सी 2 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ....

Cotton Textile Mill is Shifted of the mill owner establishes a diversified industry, he shall offer on priority in the relocated mill or the diversified industry, as the case may be, employment to the worker or at least one member of the family of the worker in the employ of the mill on the 1st January, 2000" हे तुमच्या कायद्यातच तुम्ही लिहिलेले आहे. 1966 च्या महाराष्ट्र रिजनल ॲण्ड टाऊन प्लॅनिंग ॲक्ट, य1966 च्या पृष्ठ 33 वर जे लिहिलेले आहे ते तुम्हाला लागू आहे की नाही ? हा माझा येथे प्रश्न आहे. यात जे काही लिहिलेले आहे त्यानुसार अशा जागांवर उभ्या राहणाऱ्या उद्योगांमध्ये तेथील कामगाराला किंवा त्यांच्या वारसांना नोकरी देणे हे कायद्याने बंधनकारक आहे. हे तुम्हीच लिहिलेले आहे. तुम्हीच हा कायदा केलेला आहे. त्यात पुढे असेही म्हटले आहे की, "(c) For the purpose of close (b) above the cotton textile mill owner shall undertake and complete training of candidates for employment before the recruitment of personal and starting of the relocated mill or diversified industry take place." ज्यांनी तेथे मॉल उभे केले, ज्यांनी मोठमोठ्या इमारती उभ्या केल्या त्यांचे हे कर्तव्य आहे, त्यांचे हे काम आहे की त्यांनी तेथील कामगारांना, त्यांच्या मुलांना प्रशिक्षण देऊन तयार करून रोजगार दिला पाहिजे. ही तरतूद तुमच्या कायद्यात आहे तर मग त्याची अमलबजावणी का तुम्ही केली नाही? तुमच्या कायद्यात ही तरतूद असताना तुम्ही त्या उद्योगपतींना कशी काय परवानगी दिली ? तेव्हा आता तरी तुमच्यात खरोखरी हिंमत असेल तर तुम्ही त्यांना लिहा आणि सांगा की, तुम्ही तेथील कामगारांच्या मुलांना तेथे काम दिले नाही तर आम्ही तुम्ही बांधलेले मॉल्स, बांधलेल्या इमारती उद्ध्वस्त करू., तीन महिन्यात त्यांना नोकऱ्या देता की नाही ? तुम्ही असे केले आणि त्याप्रमाणे कारवाई करण्यास सुरूवात केली तर लगेचच लाईनीने सारे सरळ येतील आणि या लोकांना तेथे रोजगार मिळू शकेल. परंतु या गिरण्यांच्या मालकांना हे माहिती आहे की, त्यांचे मित्र मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावर बसले आहेत, त्यामुळेच हे सरकार त्यांच्या विरूद्ध अशी कोणतीही कारवाई करू शकत नाही. हा दुर्दम्य विश्वास त्या करोडपती उद्योगपतींना असल्यामुळेच .....

(यानंतर श्री. सरफरे .... 4डी 1 ..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

श्री.नितीन गडकरी...

सभापती महोदय, याठिकाणी सर्व कायद्यांचे उल्लंघन झाले आहे. "He shall offer on priority in the relocated mill or the diversified industry, as the case may be, employment to the worker or at least one member of the family of the worker in the employment of the mill as on 1st January 2000 who possess the requisite qualification or skills for the job" हा नियम आहे, हे गॅझेट नोटिफिकेशन आहे. तुम्ही करीत नाही आणि त्यांनाही करावयास लावीत नाही. मिलचे केस टू केस कायदे बदलवून तुम्ही मॉल ओपन करता, एफ.एस.आय. वाढविता. यामध्ये म्हाडाला एक फुटकी जमीन मिळाली नाही, महानगरपालिकेला जमीन मिळाली नाही. तुम्ही मात्र त्यांच्या केसेस पटा पट पास करता. त्यामागील रहस्य काय आहे? त्याचे कारण काय आहे? या श्रीमंत उद्योगपतींवर मर्जी ठेवण्याचे कारण काय? याचा खुलासा आपण करणार की नाही? उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती माननीय श्री. चव्हाण साहेबांनी राजीनामा पत्र दिले. त्यांनी आपल्या राजीनामा पत्रामध्ये काय लिहिले आहे हे माननीय श्री. टोपे साहेबांनी सभागृहाच्या पटलावर ठेवावे. त्यांनी असे म्हटले आहे की, "या नियमाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी सनियंत्रण समितीची, आणि त्या अनुषंगाने राज्य शासनाची होती". असे हायकोर्टाचे सेवानिवृत्त न्यायमूर्ती श्री. चव्हाण साहेब म्हणतात. या समितीच्या अध्यक्षांनी यासंदर्भात राज्य सरकारला वारंवार विचारणा केली, परंतु यासंदर्भात गेल्या सात वर्षामध्ये आजतागायत राज्य सरकारला कोणताही खुलासा करता आला नाही. माजी न्यायमूर्ती श्री. चव्हाण साहेबांनी दिलेले हे पत्र आहे. नियमांची अंमलबजावणी करण्याची राज्य सरकारची जबाबदारी असून राज्य सरकार ती कां पार पाडीत नाही? गेल्या सात वर्षात याबाबत तुम्ही खुलासा कां केला नाही? असे आपण नेमलेल्या सनियंत्रण समितीचे अध्यक्ष सेवानिवृत्त न्यायमूर्ती श्री. चव्हाण साहेब म्हणत आहेत. शेवटी कंटाळून सेवानिवृत्त न्यायमूर्ती श्री. बी.बी. चव्हाण साहेबांनी मार्च 2007 च्या शेवटच्या आठवडयात या समितीच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. आपण म्हणता की, त्यांचा राजीनामा आम्ही स्वीकारला नाही. तो आपण कशासाठी ठेवला आहे? त्यांचे आपण ऐकत नाही तर फक्त चहा पिण्यासाठी त्या समितीमध्ये त्यांनी कशासाठी येऊन बसायचे? त्यांचा राजीनामा आपण स्वीकारला नाही म्हणता, परंतु करीत तर काहीच नाही. या मॉलमध्ये एकाही गिरणी कामगाराला किंवा त्याच्या मुलाला श्री. चव्हाण साहेब नोकरी देऊ शकले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ D/ KGS/ MMP/

श्री. नितीन गडकरी....

नाहीत. आज बहुतांशी गिरण्यांच्या जमिनीवर डेव्हलपमेंट झाली आहे, परंतु गिरणी कामगारांची देणी अजून त्यांना मिळाली नाहीत. महानगरपालिकेला, म्हाडाला जागा मिळाली. करोडपती लोकांचे मॉल आणि इमारती उभ्या राहिल्या. तेथील हॉटेलमध्ये चकाचक लाईट सुरु आहेत, दिवे लागले आहेत. समोर स्मारक म्हणून चिमणी उभी असलेली आपल्याला दिसते. त्या चिमणीमधून पूर्वी आवाज आणि धूर यायचा. या चिमण्या म्हणजे मुंबईचे वैभव होते. आणि आज "खंडहर कहेता हैं के इमारत बुलंद थी" "मॉल चकाचक आणि चिमणी दिमतीला" ती समोर स्मारक म्हणून ठेवली आहे. उद्या जर कुणी विचारले की, तुम्ही काय केले? त्यावेळी आपण सांगणार की, आम्ही ही चिमणी हेरिटेज म्हणून जतन केली आहे,तिला रंग लावणार आणि तिचे उद्घाटन करण्याकरिता आणि नारळ फोडण्याकरिता मंत्रिसाहेबांना पाचारण करणार. आम्ही मुंबईचे हेरिटेज टिकविले आहे.डॉ. बागबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले आणि छत्रपती शाहू महाराजांच्या या महाराष्ट्रामध्ये आम्ही मुंबईच्या गिरणी कामगारांचे हेरिटेज म्हणून ही चिमणी टिकविली आहे. सभापती महोदय, आपल्या सौजन्याने या ऐतिहासिक वास्तूला ती चिमणी वाकुल्या दाखवीत आहे. जुन्या दगडांची भासणारी ही गिरणी आतून मात्र चकाचक काचांनी आणि लाद्यांनी चमकून राहिली आहे. **तालिका सभापती (श्री. जगदीश गुप्ता)** : सभागृहाची वेळ 6 वाजेपर्यंत होती. आता सभागृहाची वेळ 7 वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, एके काळी या गिरण्यांमधून सूत निघत होते, तेथे आता अंग्रेजछाप भूते नाचत आहेत. लाल दिवे, पिवळे दिवे दणादण नाचत आहे. धडाघड, धडाधड म्युझिक सुरु आहे. डिस्को थेक वगैरे. केस टू केस, खरे म्हणजे मी बिचाऱ्या माननीय राज्यमंत्री श्री.राजेश टोपे साहेब यांना कशासाठी दोष देऊ. खरे म्हणजे मला वाईट वाटते. तुमच्यासमोर बोलताना मला संकोच होत आहे. माझ्या मनामध्ये अपराधीपणाची भावना आहे. अहो, यांना नेवैद्यातील एक कणही मिळाला नाही. वरच्यावर सगळे झाले. या बिचाऱ्याचा काय संबंध आहे? सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांना सांगू इच्छितो की, बिचारे सन्माननीय सदस्य श्री.रामदास फुटाणे निवृत्त झाले. "कोणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे" अरेरे, कुणी पाप करावे आणि याठिकाणी या तरुण माणसाने शिव्या खाव्यात. कशाकरता ? मलाही ते बरे वाटत नाही. खरे म्हणजे त्यांचा काहीही संबंध नाही. मला खरेच सहानुभूती आहे. बरे, सदनामध्ये अशा वेळी उत्तर देण्यासाठ यांनाच पाठवितात. याठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांना बोलवावे, त्यांना विचारावे की, म्हाडाला किती जमीन मिळाली ? महानगरपालिकेला किती जमीन मिळाली ? किती कामगारांना नोकऱ्या लागल्या ? किती लोकांची कायदेशीर देणी बाकी आहेत ? याबाबतीत नेमण्यात आलेल्या समितीचे काय झाले ? श्री.चव्हाण यांनी समितीचा राजीनामा का दिला ? काय ठरलेले होते ? गॅझेटमध्ये काय आलेले आहे ? गिरणी मालकांनी कामगारांच्या मुलांना का नोकऱ्या दिल्या नाहीत? सन्माननीय सदस्य श्री.अरुणभाई गुजराथी हे सर्व वैधानिक प्रश्न आहेत ? मी एकही गैरप्रश्न उपस्थित केलेला नाही. जे यांनी कबूल केले होते, तेच सांगितले आहे. आता काय झाले ? गिरण्यांची जमीन जीवन उध्वस्त केली. आता मिल मालकांचे उखळ पांढरे झाले, कामगारांना उध्वस्त केले आणि यामध्ये अजून एक वाईट गोष्ट झाली आणि ती म्हणजे कामगारांची पेन्शन रोखण्यात आली. त्यांच्या भविष्य निर्वाह निधीचे पैसे खाल्ले. आता कामगारांच्या उपचारार्थ सुरु होणाऱ्या ई.एस.आय.एस.रुग्णालयाच्या भूखंडावर देखील गिरणी मालक आणि सरकारमधील लोकांचे लक्ष गेलेले आहे. तो भूखंडही आता हडप करा. अरेरे, अरेरे. तुम्ही तो भूखंड देखील सोडत नाही. तिथे एक दवाखाना असून तो देखील ताब्यात घेण्याचा प्रयत्न करीत आहात. तुम्ही शेतकऱ्यांच्या टाळूवरील लोणी खाल्ले. कामगारांना उध्वस्त केले, हे सगळे पाप कुठे फेडणार आहात ? तुम्ही केस टू केस असे करीत-करीत मंत्रालयातील सहाव्या मजल्यावरुन सर्वांना अभय दिले.तुम्ही खोटी आश्वासने दिली आहेत आणि आज मी ती वाचून दाखविणार आहे.मला माननीय

. . . .4 ई-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी . . . .

राज्यमंत्री श्री.राजेश टोपेसाहेबांना सांगावयाचे आहे की, तुम्ही या भानगडीमध्ये पडू नका. तुम्ही यामध्ये कशासाठी पडता आणि आपली बेईज्जत करुन घेता.

श्री.भास्कर जाधव (खाली बसून) : मघाशी ते सभागृहामध्ये आले नव्हते, म्हणून तुम्ही भाषण सुरु करण्यास तयार नव्हतात.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचे म्हणणे बरोबर आहे. माननीय श्री.राजेश टोपे हे त्या खात्याचे राज्यमंत्री आहेत. पण सन्माननीय सदस्य श्री.भास्करराव जाधव, कोणाच्या खांद्यावर कोणाचे ओझे ? असा प्रकार झाला आहे. यांना बुडखाही मिळाला नाही, काहीच नाही. आता काय सांगणार ? तेथपर्यंत काही पोहोचलेच नाही, वरच्यावर सगळे. सभापती महोदय, दि.16-4-2007 रोजी माननीय राज्यमंत्री श्री.राजेश टोपे यांनी विधान परिषदमध्ये नगरविकास राज्यमंत्री म्हणून सभागृहामध्ये आश्वासन दिले आहे. त्यातील एक परिच्छेद वाचून दाखवितो. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की,"ज्या बंद पडलेल्या टेक्सटाईल मिलचा पुनर्विकास करीत असतो आणि ज्याठिकाणी डायव्हर्सिफाईड इंडस्ट्रीज आहेत किंवा रिलोकेट झालेल्या आहेत, त्याच ठिकाणी नोकरीच्या संदर्भात स्कील अपग्रेड करुन त्यांना नोकरीमध्ये घ्यावे अशी तरतूद सध्याच्या कायद्यामध्ये आहे. परंतु त्याठिकाणी जर कमर्शिअल कॉम्प्लेक्स झाले तरी नोकरी मिळावी अशी अपेक्षा सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केली आहे. या संदर्भात डी.सी.रुल 1958 मध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.या संदर्भात शासनाकडून जरुर पॉझिटीव्ह विचार ठेवण्यात येईल आणि त्याठिकाणी कमर्शिअल कॉम्प्लेक्स उभे राहिले तरी कामगारांच्या मुलांना नोकरी मिळावी म्हणून डी.सी.रुल 1958 मध्ये काही सुधारणा करण्याच्या दृष्टीकोनातून विचार करण्यात येईल." मग असा विचार केला आहे का ?

श्री.राजेश टोपे (खाली बसून) : विचार केला आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, तसे केले असेल तर नोटीफीकेशन दाखवा. असेल तर ते द्यावे. प्रत्यक्षात एकाही कामगाराला नोकरी मिळाली नाही. बिचारे सचिव श्री.रामानंद तिवारी रिटायर झाले.

(सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते खाली बसून बोलता)

श्री.नितीन गडकरी : हे अजून वेगळे आहे. चीफ सेक्रेटरींची कमिटी, त्याची किंमत चीफ

. . . .4ई-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी . . . .

सेक्रेटरी ठरविणार आणि 225 स्वे.फूटाचा एक गाळा 6 लाख रुपयांचा. इथे कामगारांना खावयास काही नाही आणि तो 225 स्वे.फू.चा सहा लाख रुपये किंमतीचा गाळा घेणार का ? चीफ सेक्रेटरींचे याबाबत संशोधन सुरु आहे. सन्माननीय मंत्री श्री.गणेश नाईक येथे उपस्थित नाहीत. त्यांनी फार चांगले सजेशन दिले होते. मुंबईचे कर्ज कसे फेडावयाचे ? तर मुंबई विका आणि कर्ज फेडा असे त्यांनी सांगितले. पण माननीय मंत्री महोदयांनी सुचविलेला उपाय तुम्ही ऐकला असता तर कमीतकमी शासनाचे कर्ज तरी कमी झाले असते. पण येथे भलत्याच लोकांचा फायदा होत आहे. तुमचाही फायदा होत नाही. खरा माल दुसराच खाऊन जातो. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले होते की, विचार करण्यात येईल. माननीय मंत्री महोदयांनी सदनामध्ये सांगावे की, त्यांनी आश्वासन दिल्या प्रमाणे केले आहे का ? त्यातून किती जणांना रोजगार मिळाला ?

यानंतर कु.गायकवाड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्रीमती उषा दराडे)

श्री.नितीन गडकरी..

माननीय मुख्यमंत्र्यांनी या विषयावर भाष्य करताना कामगारांना न्याय देण्याच्या संदर्भात काय सांगितले होते हे मी आणास आता वाचून दाखवितो. "91 च्या नियमाखाली जी जमीन उपलब्ध होती, ती विकसित केली आणि एच.आय.जी किंवा त्या वरच्या उत्पन्न गटातील लोकांसाठी म्हाडाने घरे बांधली आणि ती विकली. म्हाडाला जी जमीन उपलब्ध होईल त्या जमिनीपैकी निम्मी जमीन घरे बांधण्याकरिता व निम्मी जमीन ट्रान्झीट कॅम्प तयार करण्याकरिता देण्यात येईल. यासाठी 4 टक्के एफएसआय इतकी जमीन उपलब्ध करुन देण्यात येईल. या योजनेमध्ये 10 हजार घरे कामगारांसाठी उपलब्ध होतील व तेवढीचे घरे ट्रान्झीट कॅम्प साठी उपलब्ध होतील. या घरांची किंमत ठरविण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करण्यात आली असून या समितीमध्ये कामगार संघटनेचे प्रतिनिधी राहणार आहेत. ही समिती घरांच्या संदर्भात किंमत ठरवेल. ही घरे ना नफा ना तोटा या तत्वावर देण्यात येतील. ही घरे देण्यासाठी कामगारांना सबसीडी द्यावयाची आवश्यकता आहे काय हे पाहिले जाईल. ज्या गिरण्यांची जागा ताब्यात घेतलेली आहे त्या जागेवर 10 हजार घरे बांधण्यात येतील. तसेच या पुढील काळामध्ये त्या गिरण्या ताब्यात येणार आहेत त्या गिरण्यांच्या जमिनीवर सुध्दा घरे उपलब्ध बांधण्यात येतील. तेथे जास्तीत जास्त कामगारांना घरे उपलब्ध करुन देण्यात येतील"

सभापती महोदय, या आश्वासनाचे पुढे काय झाले? . मुख्य सचिवांनी या आश्वासनांची काय किंमत केली ? मी असे ऐकले आहे की, या गाळयांची किंमत 6 लाख रुपये ठरविण्यात आली आहे. उद्ध्वस्त झालेला कामगार आज खायला मोताज आहे. असा गिरणी कामगार 225 चौ. फूटाचे, 6 लाख रुपयांचे घर कसे काय घेऊ शकणार आहे ? ही आजची किंमत आहे. गिरणीची जागा केव्हा ताब्यात घेतली होती ? या गिरणी कामगारांचे पुनर्वसन आपण आधीच केले असते तर अशी वेळ आज त्यांच्यावर आलीच नसती. असा निर्णय यापूर्वीच घेतला असता तर अशी वेळच आली नसती.

सभापती महोदय. माझी आपल्याला विनंती आहे की, नगर विकास विभागाच्या सचिवांनी ॲफिडीव्हीएट केलेले आहे. आपण खूप आश्वासने दिलेली आहेत. बीपीएल कार्ड धारकांची नवीन

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी..

लिस्ट तयार करण्यात येणार आहे. त्यांना वैद्यकीय मदत देण्यात येणार आहे, इंश्यूरन्स देण्यात येणार आहे वगैरे वगैरे. याचे पुढे काय झाले ? काहीही झाले नाही.

सभापती महोदय, मी परवा कामगारांच्या एका संमेलनात गेलो होते. त्यावेळी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते श्री. प्रभाकरराव कुंटे गिरणगावात त्यांच्या भाषणात म्हणाले की," या सरकारइतके खराब सरकार मी माझ्या आयुष्यात पाहिले नाही." हे सांगताना त्यांच्या डोळयात पाणी होते. श्री. प्रभाकरराव कुंटे यांनी डोळयात पाणी आणून हे सांगितलेले आहे. माझी आपल्याला एकच विनंती आहे की, कमीत कमी टाईम बाऊंड वेळेमध्ये सर्व 60 हजार गिरणी कामगारांना शासन घरे देणार आहे काय ? सहा लाख रुपये भरुन घरे घेण्याची कामगारांची तयारीच नाही. ही धरे घेण्याकरिता शासन गिरणी कामगारांना कोणती सबसीडी देणार आहे ? कामगारांना बीपीएल कार्ड देऊन स्वस्तात धान्य पुरवठा करु असे शासनाने सांगितले होते त्याप्रमाणे त्यांना कार्ड देण्यात आलेले आहे काय ? तसेच निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची वैधानिक देणी अजूनही देण्यात आलेली नाहीत. त्यांचा भविष्य निर्वाह निधी, पेंशन देण्याकरिता कामगारांना बोलवा. ही सर्व देणी अमूक इतक्या दिवसात दिली जातील असे आश्वासन शासन देणार आहे काय ?

सभापती महोदय, गिरणी कामगारांच्या मुलांच्या रोजगाराचा प्रश्न आहे. त्यांना मॉलमध्ये नोकरी न दिल्यास मॉल पाडू असे सांगण्याची हिंमत शासनामध्ये आहे काय ? त्या मुलांना नोकऱ्या मिळवून देण्याकरिता, प्रशिक्षण देण्याकरिता शासनाने काहीही प्रयत्न केलेले नाहीत. या दुकानांमध्ये नोकरी मिळविण्यास गिरणी कामगारांची मुले लायक नाहीत असे असत्य ॲफिडिव्हिएट कोर्टात शासनाने केले. दुकांनामध्ये काम करण्याची देखील गिरणी कामगारांच्या मुलांची लायकी नाही काय ?

यानंतर श्री. बरवड..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपी नाही

श्री. नितीन गडकरी .....

या कामगारांची मुले काचेवर कपडा मारण्याच्या लायकीची नाहीत काय ? त्यांच्या मुली कपडे आणि पावडरच्या बाटल्या विकण्याऱ्या सेल्स गर्ल्स म्हणून काम करण्याच्या लायकीच्या नाहीत काय ? तेथील मोटारगाडीच्या स्टँडवर 200-200 लोक येतात त्या ठिकाणी ते तिकीट फाडावयाच्या लायकीचे नाहीत काय ? आपण कोर्टाला लिहिले की, हे त्या लायकीचे नाहीत. आपण संपूर्ण कामगारांना उद्ध्वस्त केले. त्यांना कायदेशीर जे द्यावयाचे होते तेही दिले नाही. ते त्यांना द्यावयास पाहिजे, जे कबुल करता तेही देत नाही. त्यांची घरे रस्त्यावर आली. मुले गुन्हेगार बनली. त्यांच्या मुलींच्या डोळ्यात अश्रू आहेत. त्या कामगारांच्या डोळ्यात अश्रू आहेत. त्यांच्या मुली बिचाऱ्या बारमध्ये वेटर म्हणून आणि बार गर्ल म्हणून काम करावयास गेल्या आणि पूर्ण बरबाद झाल्या. या ठिकाणी आम्ही सांगतो की, हे हे मंत्री आहेत त्यांचे वडील मिल कामगार होते. आपले इंटकचे नेते फक्त 5 टक्के आणा असे सांगतात. मिल संपली, बंद झाली, नोकरी गेली की, 5 टक्के पैसे आमच्याकडे जमा करा असे सांगतात. परवा मी माननीय मंत्रिमहोदय श्री. सतीश चतुर्वेदी यांना सांगितले. नागपूरला 50 कोटी रुपये वाटावयाचे आहेत त्याबाबत मी त्यांना सांगितले की, इंटकला पाच कोटी रुपये अजिबात द्यावयाचे नाहीत. मीच तेथील इंटकचा अध्यक्ष आहे. मी सांगितले की, हायकोर्टात प्रश्न सुरु आहे, आमच्या इंटकला काही नको. तसे पत्र मी आपल्याला देतो असे मी सांगितले. आपण बीआयआर ॲक्टमध्ये कधी बदल केला नाही. ते डायरेक्ट पैसे कापून घेतात आणि डायरेक्ट त्यांच्या अकाऊंटमध्ये पैसे जमा होतात. त्यांच्याकडे कोट्यवधी रुपये जमा होतात. आपण जाहीर करा की, मुंबईतील ज्या 61 गिरण्या बंद झाल्या त्यातून किती पैसे इंटकच्या कार्यालयात जमा झाले ? त्या पैशाचे काय झाले ? इंटकचे कार्यालय कोठे आहे ? सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांना विचारु इच्छितो की, आपल्या पक्षामध्ये काय सुरु आहे याचा विचार करावा. आपल्या संवेदनशील मनाला ते पटणार नाही. व्हीआरएसमधून पैसे काढतात. त्याशिवाय अर्ज करावयाचा नाही अशी परिस्थिती आहे. नेते करोडपती झाले. कामगार भिकारी झाले. त्यांची मुले-मुली बरबाद झाल्या. त्यांची घरे उद्ध्वस्त झाली. इंटकचे नेते श्रीमंत झाले. कामगारांचे पुत्र म्हणविणारे लोक या ॲक्टखाली लक्ष्मीदर्शन कार्यक्रमामध्ये गुंग आहेत. केस

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

टू केस सहाव्या मजल्यावर केसेस क्लिअर होत आहेत. खटाव, पटाव, जटाव सगळे खूश आहेत. मुंबई आणि दिल्लीचे त्यांना आशीर्वाद आहेत. मोठमोठे वकील त्यांच्याकरिता उभे आहेत. त्यांना पाहिजे तसे कायदे बदलले जात आहेत.. कमिट्या तयार होत आहेत. त्यांनी कायदा पाळला नाही तर त्यांच्यावर गुन्हा दाखल करत नाहीत, त्यांना कोणी सजा करत नाही. शेवटी एवढीच विनंती आहे की, झाले गेले गंगेला मिळाले. आता तरी त्या कामगारांच्या वारसांची नावे काढा. त्या वारसांना कायद्याप्रमाणे रोजगार देण्याची जबाबदारी आहे. मॉल ही कमर्शियल ॲक्टिव्हिटी आहे. ते डायव्हर्सिफिकेशन आहे. मी माननीय मंत्रिमहोदयांच्या मताशी सहमत नाही. मिलच्या जागेवर मॉल उभे करणे ही कमर्शियल डेव्हलपमेंट ॲक्टिव्हिटी आहे. आपण म्हणता त्याप्रमाणे ते कायद्यात आहे. आपण कायदा दुरुस्त करावा लागेल असे म्हणाला होता. कायदा दुरुस्त करण्याची गरज नाही. त्यांना आपण आदेश द्यावा. एवढ्या लोकांना काढले आहे त्याची यादी तयार करा. एक वेल्फेअर ऑफीसर नेमा. त्या सर्व कामगारांची जी मुले-मुली शिकलेले आहेत त्यांची कॉम्प्युटराईज्ड यादी तयार करा. या सगळ्या मिल कामगारांची बैठक बोलवा. त्यांच्या हातात यादी द्या आणि ज्या चौरस फुटाप्रमाणे डेव्हलपमेंट होत आहे त्याप्रमाणे त्यांना कोटा द्या. त्यांना सांगा की, सहा महिन्यात एवढी यादी अकोमोडेट करा नाही तर आपल्या मॉलवर मी बुलडोजर फिरवल्याशिवाय राहणार नाही. हे सांगितले तर ताबडतोब सगळ्यांना रोजगार मिळाल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे आधी त्यांना रोजगार मिळवून द्यावा. दुसरी बाब अशी की, कामगारांची जी कायदेशीर देणी आहेत ती देण्याकरिता जनता न्यायालय घ्या. त्या ठिकाणी सर्व अधिकाऱ्यांना बोलवा. आपल्या मंत्रालयातील जे झारीतील शुक्राचार्य आहेत ते फार हुशार आहेत. सकाळी मी माननीय वित्त मंत्र्यांना विचारले की, आपण हा निर्णय घेण्याच्या आधी सन्माननीय वित्त सचिव श्री. सुबोध कुमार यांचा आदेश घेतला काय ? अशी आज स्थिती आहे. माननीय मंत्रिमहोदय श्री. चंद्रकांत हांडोरे साहेब कॅबिनेटमध्ये भांडले होते. ते बरोबर भांडले होते पण आपल्या हातामध्ये काहीही नाही. माझी आपल्याला विनंती आहे की, आपण यांच्या भरवशावर राहू नका. यांचे नुसते खुलाशे आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी .....

पत्रव्यवहार चालू राहतात. श्री. चव्हाण यांना नेमले होते ते सात वर्षात कंटाळले. त्यांच्या पत्रातील शब्दन शब्द वाचा. आपण काही केले नाही. आपण खोटे ॲफिडेव्हिट केले. आपण आता जनता दरबार घ्या आणि या कामगारांची देणी 15 दिवसात त्यांना द्यायला लावा. नाही तर या मिल मालकांना, करोडपतींच्या सुपुत्रांना, या धनदांडग्यांना हातकड्या घाला, बेड्या ठोका आणि त्यांना लॉकअपमध्ये बंद करा. ते असे कसे पैसे देत नाहीत ?

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

गरीब कामगारांच्या बाजूने उभे राहणार आहात की, श्रीमंत उद्योगपतींच्या बाजूने उभे राहणार आहात ? हा कोणता समाजवाद आहे ? त्यांची देणी किती दिवसामध्ये देणार आहात ते सांगावे. कामगारांचे इएसआय हॉस्पिटल होते. त्या हॉस्पिटलसाठी याच पैशातून 5-10 कोटी रुपये द्यावेत आणि मरेपर्यंत त्यांना या हॉस्पिटलमध्ये विनामूल्य उपचार देण्यासाठी खर्च करावा. यासाठी या सर्व मॉलमधून दरवर्षी पैसे घ्यावेत. कारण हे मॉलवाले करोडपती झाले आहेत. हे लोक 1 हजार कोटी, 2 हजार कोटी, 5 हजार कोटी रुपयांचे मालक झाले आहेत. तेथील जमिनीचे इतके भाव वाढले आहेत त्याची आपण कल्पना करु शकत नाही. कामगारांना मात्र काही नाही. म्हणून त्यांच्या हॉस्पिटलचे काय करणार ते सांगावे. बी.पी.एल.ची कार्डे किती लोकांना दिली ते सांगावे. त्या कार्डावर त्यांना चांगला गहू द्यावा, लाल गहू देऊ नका. कुजका, सडका गहू त्यांना वाटू नका. चांगल्या चवीचा गहू द्यावा. दिल्लीवरुन आलेला गहू वाटू नका. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी हे देखील समर्थन करतील. शासनाने किती लोकांना बी.पी.एल.ची कार्डे दिली, किती लोकांना धान्याचे वाटप केले ते उत्तराच्या भाषणात सांगावे. आजपर्यंत दिलेल्या आश्वासनांची जंत्री आहे त्यावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सभागृहात द्यावा. काही कामगार मरण पावले, देशोधडीला लागले. त्यांची मुलंबाळं बरबाद झाले, त्यांचे संसार उद्ध्वस्त झाले, काही कामगार आपल्या गावी निघून गेले, काही जीवंत नाहीत, परिवारांना आधार देण्याचे काम करणार आहात की नाही की धनदांडग्या उद्योगपतींच्या मागे उभे राहणार आहात हा खरा प्रश्न आहे. या सर्व कामगारांना शासनाने आश्वासन दिलेले आहे. या कामगारांना रोजगार देणे, प्रशिक्षण देणे या सर्व प्रश्नांची शहानिशा करुन कार्यवाहीचा अहवाल सादर करावा, यासाठी कालबध्द कार्यक्रम ठरवावा. या गिरणी कामगारांबद्दल शासनाला खरोखरच तळमळ असेल तर हा कार्यक्रम ठराविक कालावधीत पूर्ण करुन दाखवावा अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी एका अत्यंत जिव्हाळयाच्या प्रश्नावर नियम 260 अन्वये सभागृहात चर्चा उपस्थित केलेली आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. कारण त्यांनी अतिशय चांगल्या विषयाची निवड केली आहे. हा अत्यंत महत्वाचा विषय आहे.

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी या प्रस्तावाला सुरुवात केली. त्यावेळी त्यांनी टॉवर वाचून दाखविले. हेच टॉवर त्यावेळी माननीय श्री.नारायण राणे यांनी विधानसभेत वाचून दाखविले होते. मला थोडा वेळ असे वाटले होते की, ही टॉवरची दुसरी, तिसरी आवृत्ती तर नाही ना ? सभापती महोदय, मुंबईमध्ये 1851 साली पहिली गिरणी सुरु झाली. या गिरण उद्योगाला 150 वर्षांचा इतिहास आहे. संपूर्ण वस्त्रोद्योग मुंबई शहरामध्ये होता. दिनांक 18 जानेवारी, 1982 साली स्व.दत्ता सामंत यांनी गिरण्यांचा संप पुकारला त्या दिवसापासून मुंबईतील वस्त्रोद्योग व्यवसाय नष्ट होण्यास सुरुवात झाली. मी त्यांना दोष देण्यासाठी म्हणत नाही. कामगारांच्या हक्कासंबंधी, त्यांची देणी असतील त्यासंबंधी संप करण्यात आला होता. त्या संपाचे निमित्त साधून मालकांनी गिरण्या बंद पाडण्याचा डाव साधला. काही वेळा असे होते की, पुण्य मागायला जातो आणि पाप पदरामध्ये येते की काय अशी परिस्थिती निर्माण होते. कदाचित त्यांची ही भूमिका नसावी. मुंबई शहरातील संपूर्ण वस्त्रोद्योग उद्ध्वस्त होण्याची तेथून सुरुवात झाली ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. त्यावेळी मुंबई 61-62 गिरण्या होत्या. नंतरच्या काळात 58 गिरण्या राहिल्या होत्या. त्यामध्ये 2 ते 2.5 लाख कामगार होते. या 58 पैकी 47 गिरण्या बंद पडल्या. त्यापैकी 33 गिरण्यांचा जागा विकसित करण्याचा प्रस्ताव आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी गांभीर्याने हा विषय मांडला. परंतु सभागृहाचे वातावरण गंभीर होऊ नये म्हणून त्यांनी मधून मधून विनोदाची पेरणी केली.

अशुद्धीत पत्र / शोधनेसाठी नाही

नंतर श्री.शिगम

(श्री. अरुण गुजराथी ...)

एनटीसीच्या 25 गिरण्या आहेत. या गिरण्या केन्द्र शासनाच्या आहेत. एनटीसीच्या 25 गिरण्या, एमएसटीसीची 1 गिरणी आणि खाजगी 32 गिरण्याी अशा 58 गिरण्यांचा प्रश्न आहे. एनटीसीच्या गिरण्यांना देखील महाराष्ट्र शासन सहकार्य करीत नाही ही वस्तुस्थिती आहे. 1991ची विकास नियंत्रण नियमावली आहे. त्यानंतर 2001ची विकास नियंत्रण नियमावली आहे. मी त्यावर बोलणार आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी विकास नियमातील काही तरतुदींचा उल्लेख केला. 5 हेक्टर पेक्षा जास्त. 33, 34, 33...आणि 10 हेक्टर पेक्षा जास्त 33,37, 30.. सन 2001च्या नियमावलीत यामध्ये काही फरक करण्यात आला नाही. 1991च्या नियमावलीतील 58 नियम असता तर काय झाले असते ? रिडेव्हलपमेंट, रिकंस्ट्रक्शन ऑफ टेक्स्टाईल इंडस्ट्री या सगळया गोष्टी नियम 58च्या सभोवताली फिरतात. कोठे फेरफार करावयाचा असेल तर त्यासंदर्भात नियम 37, 37(2) आहे. 1991 नंतरच्या 10 वर्षाच्या कालावधीमध्ये काही गिरण्यांच्या जमिनी आपण घेऊ शकलो नाही. मग त्या एनटीसीच्या गिरण्या असतील, एमएसटीसीच्या गिरण्या असतील किंवा खाजगी गिरण्या असतील. अनेक फेरबदल करुन प्लॅन मंजूर करुन घेतला. अंतर्गत दुरुस्ती म्हणून कमर्शियल प्लॅन मंजूर झाला. मी माननीय मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, याची प्लॅनिंग ॲथॉरिटी कोण आहे ? अंतर्गत दुरुस्तीचा प्रस्ताव महानगरपालिकेने मंजूर केला की शासनाने केला ? हा प्रस्ताव जर महानगरपालिकेने मंजूर केला असेल तर त्याबाबतीत महानगरपालिकेला दोष देता येईल. प्लॅनिंग ॲथॉरिटी ही महानगरपालिका आहे...(अडथळा) .. हा टीकेचा भाग नाही. यातून चांगले कसे निघेल हे आपण पहात आहोत. इतक्या मोठ्या प्रमाण अंतर्गत दुरुस्तीचे प्रस्ताव मंजूर करण्यात आले ते कोणी मंजूर केले ? ते आयुक्तांनी मंजूर केले की बांधकाम समितीने मंजूर केले ? त्यावेळी आपण त्यामध्ये लक्ष का घातले नाही ? हे अत्यंत महत्वाचे प्रश्न माझ्या पुढे निर्माण होत आहेत. 1991च्या नियमावलीतील नियम 58 प्रमाणे तुम्हाला 200 एकर जमीन उपलब्ध होणार होती. आता किती जमीन उपलब्ध होणार, असा प्रश्न या ठिकाणी उपस्थित करण्यात आला. आता 20 एकर जमीन उपलब्ध होत आहे. कदाचित ती 18 एकर असू शकेल किंवा 22 एकर असू शकेल. या पेक्षा जास्त जमीन

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरुण गुजराथी....)

उपलब्ध होत नाही. पण नियम 58मध्ये बदल करीत असताना दोन बाबी आपण चांगल्या आणल्या त्याबद्दल मला आपले निश्चितपणे अभिनंदन केले पाहिजे. 1991च्या नियमामध्ये जे नव्हते ते 2001च्या नियमामध्ये आपण आणले. सदर नियमामध्ये गिरणी कामगारांसाठी घरे आणि त्यांची देणी देणे बंधनकारक आहे. नियम 58मध्ये ही फार चांगली सुधारणा केली. या नियमामध्ये सुधारणा केल्यानंतर आणि या नियमाने शक्ती प्रदान केल्यानंतर त्या बाबतीतील जबाबदारी ही आपली होती. कामगारांना घरे देणे सक्तीचे झाले असेल, त्यांची देणी देणे बंधनकारक झाले असेल तर त्या संदर्भात शासनाची कारवाई काय आहे ? हा जो प्रस्ताव या ठिकाणी आणलेला आहे त्याला विरोध करणे हा माझा हेतू नाही. कामगारांचे हित कसे साधले जाईल अशा प्रकारच्या आपल्या सर्वांच्या भावना आहेत. आज गिरणी कामगारांची दुसरी-तिसरी पिढी आहे. 1982मध्ये संप झाला. 1982 ते 2007 पर्यन्त 25 वर्षे झाली. दोन पिढ्यांच्या संदर्भात आपण काय केले याचे सिंहावलोकन करण्याच्या संदर्भात देखील आजची चर्चा अत्यंत महत्वाची आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी...

दिनांक 1.1.2000 रोजी आपण जो नियम बदलला आहे त्या बदललेल्या नियमात असे म्हटले आहे की, "225 चौरस फुट क्षेत्राची सदनिका मोफत आणि उपलब्ध होणारा निधी कामगारांना देणे त्यासंदर्भात निवृत्त न्यायाधीशाची नेमणूक." मघाशी सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी त्यात नेमके इंग्रजी शब्द काय आहेत हे सांगितले. 1991 च्या नियमावलीमध्ये काय होते. "Open land and land after demolition" 2001 मध्ये काय आले ? " Open land and balance F.S.I." मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, 2001 च्या नियमावलीमध्ये आपल्याला भरपूर अधिकार मिळालेले आहेत. 1991 ची नियमावली आणि 2001 ची नियमावली माझ्या हातात आहे. त्याच्यातील (IV), (V) आणि (VI) हे जे तीन क्लॉजेस आहेत, त्याच्या माध्यमातून शासनाला संपूर्ण अधिकार प्राप्त झाले. क्लॉज (IV) मध्ये असे म्हटले आहे की,

" Where F.S.I. is in balance but open land is not available..." एफ.एस.आय आहे पण मोकळी जागा नाही."...for the purposes of column (3) and (4) of the above Table, land will be made open by demolishing the existing structures to the extent necessary and made available accordingly." किती अधिकार आपल्याला दिलेले आहेत. त्यानंतर क्लॉज (V) मध्ये असे म्हटले आहे की," Where the lands accruing as per columns (3) and (4) are, in the opinion of the Commissioner, of such small sizes that they do not admit of seperate specific uses provided for in the said columns, he may, with the prior approval of Government, earmark the said lands for use as provided in column (3)." आणि शेवटी (vi) मध्ये असे म्हटले आहे की," It shall be permissible for the owners of the land to submit a composite scheme..." मधल्या ओळी वाचत नाही "...shall be considered by the Commissioner in an integrated manner." या ठिकाणी हा प्रश्न निर्माण होतो की, हे सर्व अधिकार प्राप्त झाल्या नंतर देखील आपण काय करु शकलो आणि काय करु शकलो नाही यासंबंधीचा विचार करणे गरजेचे आहे. याच्यात केसेस देखील झालेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी आपल्या भाषणात उल्लेख केला होता. बॉम्बे एन्व्हायर्नमेंटल ग्रुप

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी .....

त्यांनी मुंबईच्या हायकोर्टामध्ये केस दाखल केली.. त्या नंतर केसचा निकाल लागला, त्याच्या विरोधात स्पेशल लिव्ह टू अपील, बॉम्बे डाईंग वर्सेस बॉम्बे एन्व्हायरनमेंट ग्रुप दाखल करण्यात आली. त्याच्यात त्यांनी उच्च न्यायालयाचा जो निर्णय होता तो रद्दबातल केला आणि जो मूळ निर्णय होता तो कायम ठेवला. नियम 58 चा, कलम 34 चा भंग करणारा नाही असे त्याचे एका ओळीत उत्तर आहे. दिनांक 14.6.06 रोजी आपण अधिसूचना काढली. नियम 58 (1)(ब) अन्वये 50 टक्के जागा गिरणीमधील कामगारांच्या गृहनिर्माणासाठी वापरा. या ठिकाणी एफ.एस.आय.चा चांगला फायदा आपण घेतला आहे. एफ.एस.आय.3.99 मिळाला. मुंबईत 4 टक्के एवढा एफ.एस.आय. कोणालाही मिळत नाही. तो एफ.एस.आय.देण्याचा आपण प्रयत्न केला. ही देखील शासनाच्या माध्यमातून चांगली गोष्ट झालेली आहे. त्या ठिकाणी 4 टक्के एफ.एस.आय. दिला. गिरण्याच्या जमिनीचे वाटप कसे होते याची सर्वांनाच माहिती आहे. 1/3 जागा महानगरपालिकेसाठी, 1/3 जागा गिरणी मालकाला त्याच्या व्यवसाय, व्यापार, उद्योग करण्यासाठी आणि 1/3 जागा म्हाडासाठी असे जमीन वाटपाचे प्रमाण ठरविलेले आहे. म्हाडाला जी 1/3 जागा दिली जाते त्या जागेचे पुन्हा दोन भाग झाले. त्यामध्ये कामगारासाठी दिलेली जागा आणि ट्रान्झीट कॅम्पसाठी दिलेली जागा असे दोन भाग आहेत. कामगारांसाठी दिलेली जागा आणि ट्रान्झीट कॅम्पसाठी दिलेली जागा यासाठी 3.99 एवढा एफ.एस.आय. दिल्यानंतरही आपण यामध्ये प्रगती करु शकलो नाही. आपल्याला यासाठी जास्तीत जास्त लक्ष देऊन गिरणी कामगारांना फायदा कसा देता येईल याचा विचार करणे अत्यंत गरजेचे आहे.

यानंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ....

जागा आयलॅन्ड सिटीमध्ये देणार की उपनगरात देणार हा देखील त्यामध्ये अत्यंत महत्वाचा भाग आहे. त्याचप्रमाणे येथील गिरण्या आणि येथील टेक्सटाईल इंडस्ट्रीने बाहेर जाऊन कोकणात, नाशिक जिल्हयात, ठाणे जिल्हयात उद्योग काढले तर जागा येथील देणार की तेथील देणार हा देखील अत्यंत महत्वाचा प्रश्न उपस्थित होतो. यासंदर्भात देखील शासनाची भूमिका महत्वाची आहे आणि ती स्पष्ट व्हावयाला पाहिजे. शासनाचे याबाबतचे धोरण स्पष्ट व्हावयाला पाहिजे. ज्या गिरण्या आयलॅन्ड सिटीमध्ये आहेत त्याच प्रिमायसेसमध्ये 1/3 जागा देण्याच्या संदर्भात जो निर्णय झालेला आहे तो भक्कम असला पाहिजे.

सभापती महोदया, नफ्यातील गिरण्या बंद झाल्या. गिरणी तोटयात असेल आणि ती विकली तर गोष्ट निराळी. गिरणी नफ्यात असताना त्या बंद केल्या. याबाबत मी सेंचुरी मिलचे उदाहरण देईन. सेंचुरी मिल नफ्यात चालली असताना कामगारांना स्वेच्छानिवृत्ती घ्यायला लावून बंद करण्यात व्यवस्थापनाला यश मिळाले. इंडस्ट्रीयल डिस्प्यूट ॲक्टच्या कलम 25(ओ) प्रमाणे नोटीस ऑफ क्लोजर देणे आवश्यक आहे. त्याशिवाय इंटेंडेड नोटीस ऑफ क्लोजर देणे आवश्यक आहे. इंडस्ट्रीयल डिस्प्यूट ॲक्टप्रमाणे नफ्यात असलेली गिरणी किंवा टेक्सटाईल मिल बंद करीत असताना ही मिल बंद होऊ देणार नाही असे मला स्वत:ला वाटते. एकेकाळी मुंबई ही मॅन्युफॅक्चरींग सिटी होती आता सर्व्हीस सेक्टर झाली आहे. गेल्या 25 वर्षात एक नवीन ट्रेंड आला आहे. मॅन्युफॅक्चरींग सिटीऐवजी सर्व्हीस सेक्टर सिटी म्हणून मुंबईची ओळख झाली आहे. मॅन्युफॅक्चरींग ॲक्टीव्हीटीज संपुष्टात याव्यात अशातला भाग नाही. परंतु या ॲक्टीव्हीटीज बंद पडल्यामुळे आज दोन ते अडीच लाख कामगार देशोधडीला लागले. त्यांना न्याय देण्याच्या संदर्भात शासनाची स्पष्ट भूमिका, धोरण आणि त्याची अंमलबजावणी करणे या महत्वाच्या गोष्टी आहेत. याठिकाणी बोलताना काही सन्माननीय सदस्यांनी कॉ.डांगे, जॉर्ज फर्नांडीस यांचा नामोल्लेख केला. गिरणगांव म्हणजे सेकंड नरीमन पॉईंट झालेले आहे. नरीमन पॉईटच्या भागामध्ये जितके टॉवर दिसणार नाहीत तितके टॉवर भायखळा, लोअर परळ, चिंचपोकळी या भागात दिसू लागले आहेत. अप्परवरळीपर्यंत टॉवर दिसत आहेत. अशा पध्दतीने टॉवर किंवा मॉल उभे रहात आहेत त्यामध्ये या गिरणी कामगारांच्या मुलांना नोकरीत घेतले जात नाही त्याबाबत शासन काय करणार आहे ? याबाबतीत सदनामध्ये तारांकित प्रश्न झाले, लक्षवेधी सूचना झाल्या, दोन-अडीच तासांची चर्चा

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ....

झाली परंतु मॉलवाल्यांनी शासनाच्या बदललेल्या नियमाप्रमाणे म्हणजे नियम 58 मध्ये दुरुस्ती केल्याप्रमाणे गिरणी कामगारांच्या मुलांना नोकरीत घेतले नाही. यासंदर्भात शासनाची ॲक्शन काय असणार आहे हे स्पष्टपणे सांगितले पाहिजे. शासन कोणती कारवाई करणार आहे हे स्पष्ट झाले पाहिजे. मॉल सुरु झाले आता त्याठिकाणी जागा नाही आणि रोजगार मिळणार नाही असे बोलून चालणार नाही. एनटीसीच्या गिरण्यांच्या संदर्भात त्यांनी स्पष्टपणे कळविले आहे की कामगारांच्या मुलांना नोकऱ्या देण्याच्या संदर्भात किंवा त्यांना प्रशिक्षण देण्याच्या संदर्भात आमची जबाबदारी नाही. मिल मालक ज्यावेळी अशा प्रकारे सांगतात त्यावेळी त्यांच्यावर ॲक्शन घेणे अत्यंत जरुरीचे आहे. शासकीय मिल असूनही एनटीसीने सांगितले की नोकऱ्या देण्याची आमची जबाबदारी नाही. याबाबतीत जास्त लक्ष घालणे आवश्यक आहे. अत्यंत महत्त्वाच्या अशा 4/5 सूचना आहेत. एक तर मिल बंद होऊ देण्याच्या संदर्भात काही कारवाई होण्याची आवश्यकता आहे. 10-12 मिल राहिल्या आहेत आणि 12-13 हजार कामगार आहेत.....

नंतर श्री. भोगले

अशुधारित प्रत / प्रारूपीय नोंदी

श्री.अरुण गुजराथी.....

त्या गिरण्या सुरु राहतील की नाही याबद्दल शंका वाटते. त्या देखील बंद होण्याच्या मार्गावर आहेत. ज्याठिकाणी 10 रुपये, 100 रुपये चौ.फूट दराने जमीन विकली जात होती तो दर प्रती चौ.फूट 1 लाख रुपयापर्यंत गेला. अशा परिस्थितीत एकही गिरणी त्याठिकाणी सुरु राहील असे वाटत नाही. केवळ मुंबईच्या गिरण्या बंद पडल्या अशातला भाग नाही. सोलापूरची तीच अवस्था, नागपूरची तीच अवस्था, धुळे असेल, अंमळनेर असेल, जळगाव असेल तीच अवस्था आहे. तेथेही याच पध्दतीने गिरण्या बंद झाल्या. प्लॉट पाडण्यात आले. ते प्लॉट विकले गेले. फक्त मुंबईच्या जमिनीला भाव मिळाला असे नाही. नागपूरची इम्प्रेस गिरणी बंद होऊ नये म्हणून मागच्या काळात प्रयत्न झाले. परंतु त्या प्रयत्नांना यश मिळू शकले नाही. या सभागृहाच्या माध्यमातून मी मंत्रीमहोदयांना विनंती करतो की, एखाद्या गिरणीचा नियमाप्रमाणे प्लॅन असेल परंतु कामगारांच्या वारसांना नोकरीवर घेतले नाही तर नवीन कायदा तयार करावा किंवा कलम 58 मध्ये आणखी आवश्यक तो बदल करावा. तो भूतलक्षी प्रभावाने लागू करावा. भूतलक्षी प्रभावाने लागू केल्यानंतर गिरणी मालक पुन्हा हायकोर्टामध्ये रिट दाखल करतील. भूतलक्षी प्रभाव कायद्यात बसत नाही म्हणून कदाचित आपल्या विरोधात निर्णय लागू शकतो. परंतु आम्ही हायकोर्टापर्यंत गेलो हे दाखवू शकतो. त्यादृष्टीने नियम करण्याची गरज आहे. एका-एका कर्मचाऱ्याच्या बदल्यात दोन-पाच लाख रुपये घेण्यात येऊन तो फंड कामगारांना देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. या संदर्भात नियम 58 मध्ये बदल करुन ज्यांनी मॉल बांधले, ज्यांचे व्यवसाय सुरु आहेत त्याठिकाणी शासनाच्या कायद्याप्रमाणे कामगारांच्या मुलांना नोकरीवर घेतले नाही, त्यांना नोकरी देण्याच्या संदर्भात निश्चितपणे विचार करावा ही माझी नम्र सूचना आहे. मध्यंतरी सन्माननीय श्री.सुशीलकुमार शिंदे हे राज्याचे मुख्यमंत्री असताना त्यांनी सांगितले होते की, बंद पडलेल्या गिरण्यातील कामगारांची घरे आम्ही उद्ध्वस्त होऊ देणार नाही, बीपीएलप्रमाणे रेशन देऊ. किती कामगारांना बीपीएलप्रमाणे रेशन देत आहात? शासनाकडे मिल व कामगारांची यादी आहे. कामगारांची कुटुंबे उद्ध्वस्त झाली. त्यांची नावे व त्यांच्या वारसांची नावे शासनाकडे उपलब्ध असतील. दोन दिवसापूर्वी लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी एका केसचा रेफरन्स दिला होता. त्यासंदर्भात मी विचार व्यक्त करतो. बीपीएल कार्डधारकांना टॅक्सी किंवा ऑटोरिक्षासाठी प्राधान्य दिले जावे. एखादा कामगार म्हणेल, मला

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी.....

स्वेच्छेने निवृत्त व्हायचे आहे, त्याला रक्कम वाढवून दिली पाहिजे. अशा अनेक बाबी कामगारांसाठी करता येतील. त्याबाबत मंत्रीमहोदयांनी विचार करणे गरजेचे आहे. ही केस गिरणी कामगार कर्मचारी आणि कल्याणकारी संघ-स्टेट ऑफ महाराष्ट्र यांच्याविरुध्द हायकोर्टात आली होती. "In the light of the above directions.." जज्जमेंट दिलेले नाही, डायरेक्शन्स आहेत. "...the Petition is disposed off with no Order as to Cost." परंतु त्यांनी काय म्हटले?. "We have heard the Counsel appearing for the Parties, the primary cause of filing of the Petition is to provide work to the textile workers and give training as contemplated under Regulation 58 of the DCR, as a result of the closure of Mills either for relocation or redevelopment and that the State is under obligation to provide or ensure that workmen are provided with employment." हा कायदा नसेल, हे जज्जमेंट नसेल, त्यांचे ऑब्जर्व्हेशन असेल, डायरेक्शन असतील तर शासनाने जे एस्क्रो अकाऊंट उघडले आहे त्यातून 1000 कोटी रुपये आतापर्यंत कामगारांना वाटप झाले व 150 ते 170 कोटी रुपये द्यायचे शिल्लक राहिले आहेत, निश्चित राहिलेले पैसे किती लवकर देता येतील या संदर्भातील विचार होणे अत्यंत गरजेचे आहे. सभागृहात होणाऱ्या महत्वाच्या विषयावरील चर्चेतून शासनाने दिशा घ्यावी अशा प्रकारची चर्चा होत आहे. मी माननीय मंत्रीमहोदयांना विनंती करतो की,.....

(नंतर श्री.खर्चे....

अशुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी.....

ह्या सर्व बाबी आपण करु शकतो. मघाशी सांगितले की, मागचे जे झाले ते जाऊ दे, पण आता पुढे काय करु शकतो यासंदर्भात विचार करुन गिरणी कामगारांना जास्तीत जास्त काय व कसे देता येईल याचा विचार करावा. गिरणी कामगारांना 60 हजार घरे आपण देण्याबाबत विचार करता पण कदाचित गिरण्यांच्या प्रिमायसेस मधील ही संख्या असावी आणि जे गिरणीच्या बाहेर राहतात, प्रिमायसेसमध्ये राहत नाहीत त्यांच्याही बाबतीत आपल्याला विचार करावा लागणार आहे. त्यांना किती पैसे द्यावे लागतील, त्याला कशी मदत करता येईल अशा सर्व बाबींचाही खुलासा आपल्या उत्तरातून करावा, अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदया, एका अत्यंत महत्वाच्या आणि जिव्हाळ्याच्या विषयावर, गिरणी कामगारांच्या विषयावर सभागृहात चर्चा उपस्थित केली आहे, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदया, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या विषयाच्या संदर्भात अतिशय व्यापक स्वरुपात आपले विचार मांडले आहेत. मी माझे विचार मांडण्यासाठी मात्र अतिशय दु:खद अंत:करणाने उभा आहे. ते यासाठी की, माझे संपूर्ण आयुष्य गिरणगावात गेले. ज्या इमारतीत मी राहतो त्या इमारतीच्या भिंतीला लागूनच गिरणीची भिंत आहे. ती म्हणजे मफतलालची "न्यू चायना मिल". त्या मिलची आणि आमची भिंत एकच आहे. चाळीमध्ये राहणारे जे रहिवाशी होते त्यातील 90 टक्के गिरणी कामगार होते. 11 वाजता गिरणीचा भोंगा वाजल्यानंतर चड्डी-बनियनवर असलेला कामगार, हातात जेवणाचे डब्बे घेऊन जेवायला जाणा-या कामगारांचे एक चित्र दिसत होते. गिरणीमध्ये दसरा अत्यंत चांगल्या प्रकारे साजरा होत होता. साच्यावर तोरणे लावली जात होती, आलेल्या पाहुण्यांचे जोरदार स्वागत होत होते, आलेल्याला हसतमुखाने कँटीनमध्ये घेऊन जाणार आणि आग्रहाने चहा व खायला घालणार, असा दिलदार गिरणी कामगार मी पाहिला आहे. सन 1960 च्या संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या वेळी आम्ही लहान होतो. मुलगा मराठी वर्तमानपत्र घेऊन आल्यानंतर पेपरची हेडलाईन ऐकण्यासाठी झुंबड उडत होती, ती सुध्दा मी पाहिली. कॉ. डांगे नाक्यावर उभे राहत होते ते सुध्दा मी पाहिले. कॉ. जी.एल.रेड्डी, कॉ.जी.एल.पाटील अशी सर्व मंडळी कम्युनिस्टांच्या प्रभावाखाली होती. त्यावेळी गिरण्यांमध्ये कम्युनिस्ट पक्षाचा जास्त प्रभाव होता. कॉ.डांगे यांच्या एका शब्दावर संपूर्ण गिरणी कामगार धावायचा. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत सर्वात जास्त कोणाचा सहभाग असेल तर तो गिरणी कामगारांचा. त्यात कोकणातील माणसाचे प्रमाण सर्वाधिक म्हटले तरी चालेल. संयुक्त महाराष्ट्राच्य चळवळीत भाग घेतांना जे हुतात्मा झाले, त्यांचे स्मारक हुतात्मा चौकात आहे त्याप्रमाणे या गिरणी कामगारांचे सुध्दा स्मारक आपण या मिलमध्ये करणार आहात की नाही ? आपण त्या ठिकाणी टेक्स्टाईल म्युझियम करायला निघाला आहात. परंतु आज आम्ही ज्यांची उद्ध्वस्त घरे पाहतो, त्यांच्यासाठी आपण काहीच करीत नाहीत. म्हणून या शासनाला जनाची नाही तर मनाची तरी लाज वाटायला पाहिजे.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत.....

असेच मी या निमित्ताने म्हणेन. सन 1851 मध्ये हा टेक्सटाईल उद्योग सुरु झाला आणि सन 1982 मध्ये जो संप झाला, त्या संपाचा एक साक्षीदार मी सुध्दा आहे. त्यावेळी हा संपूर्ण गिरणी कामगार शिवसेनेकडे आला होता. माननीय शिवसेना प्रमुखांनी गिरणी कामगारांना कामगार मैदानावर सभा घेऊन सांगितले होते की, आपण फक्त एक दिवसाचा संप करु आणि तरीही मालकाने ऐकले नाही तर पुढे काय करायचे ते पाहू. दुर्देवाने परिस्थिती असेल परंतु गिरणी कामगारांना हे भावले नाही आणि संपूर्ण गिरणी कामगार हा डॉ. दत्ता सामंत यांच्याकडे गेला. गिरणी उद्योगात मान्यताप्राप्त संघटना इंटकचीच होती, लोकमान्य डॉ. दत्ता सामंत. राजमान्य इंटक. मग चर्चा कोणाबरोबर करायची असा प्रश्न पडला. अशा प्रकारे 100 टक्के लोक संपावर गेले. तांत्रिकदृष्टया आजही हा संप मिटलेला नाही. कॉ. डांगे मला आठवतात की, एक रुपया पगारवाढ घेऊनही संप मागे घेत होते. आताच्या लोकांना मात्र ते जमणार नाही, त्यावेळचे कॉ. डांगे यांचे नेतृत्व सुध्दा तितकेच उंचीचे होते.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत....

ते उंच नव्हते परंतु त्यांचे नेतृत्व उंच होते. ज्यावेळेस अशा प्रकारचा ठरवा येतो तेव्हा माझे अंत:करण फाटून निघते. मला गिरणी कामगारांची मुले, शेजारी-पाजारी सारे दिसतात. आम्ही सर्व महानगरपालिकेच्या शाळेत जाणारी सर्व मुले दिसतात, त्यांचे उध्वस्त संसार, त्यांचे उध्वस्त चुली मला आजही दिसतात. सणासुदीला शेजार-पाजारी येणारे, तिकडचे आमच्याकडे येणारे आणि आमचे तिकडे जाणारे, आज तुम्ही काय केले म्हणून विचारणारे हे दिसतात, पाहुणा आला आणि स्वत:च्या घरात वस्तू नसेल तर पटकन शेजारी जाऊन वस्तू आणून पाहुण्यांचे पाहुणचार करणारी माणसे मला दिसतात. ही सर्व माणसं जेव्हा फाटक्या वस्त्रानिशी उभी राहतात तेव्हा अंत:करण फाटून जाते आणि आपण सदनात येऊन काय करु शकलो असं मनाला सारख वाटत राहतं. सभापती महोदय, मला माननीय नगरविकास राज्यमंत्री श्री. राजेश टोपे यांच्या बद्दल व्यक्तिशः फार आदर आहे. त्यांनी सुध्दा अशा विषयाच्या संदर्भाला उत्तरे दिलेली आहेत परंतु ही भाषणे आपण स्वत: चाळून पहा, आपण केलेल्या भाषणातून नंतर काय काय घडलं हे पाहिले तर त्यातून काहीही घडलेलं आपल्याला दिसणार नाही. आमच्या लहानपणी एक कविता होती,

उभे भवती प्रासाद गगनभेदी, पदी लोकांची होय दाट गर्दी,
प्रभा दिपांची फुले अंतराळी, दौलतीची नित चालते दिवाळी,
कोप-यात गुणगुतो अभंग, उभा केव्हांचा एक तो अपंग.

सभापती महोदय, आज तशीच परिस्थिती आहे. मॉल्समधील दौलतीची दिवाळी आम्ही पाहतो आहे. आणि कोप-यात भडंग कामगार त्या दौलतीची दिवाळी, दाढीची खुंट वाढलेले, फाटक्या वस्त्रानिशी पाहतो आहे. आपल्याला याच्या का वेदना होत नाही. लोक कल्याणकारी राज्य म्हणून आम्ही राज्यकर्ते बसतो परंतु लोकांचे कल्याण करण्यासाठी कोणताही निर्णय घेत नाही आणि लोकांचे कल्याण करण्याचा निर्णय घेतलाच तर त्याची अंमलबजावणी करीत नाही. ज्यूपिटर गिरणी मिलच्या जमिनीच्या प्रकरणाची आपल्याला माहिती आहे. हे प्रकरण नव्याने सांगण्याची आवश्यकता नाही असे वाटते. या ज्यूपिटर मिलमध्ये 44974 चौ.मीटर जागेसाठी 29903 चौ.मीटर सुरुवातीला एफएसआय दिला त्याचे 276.51 कोटी मिळाले. इंडिया बूलचे प्रकरण आपल्या लक्षात असेल, फिनिक्स मिलमध्ये सुध्दा अशाच प्रकारचा भ्रष्टाचार झालेला आहे. या दोनही ठिकाणी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत....

गिरणी कामगारांची चिंता कोणालाही पडली नाही, फक्त आम्हाला किती देता ते सांगा, आमचे टक्के पहिले बोला, मग बघू काय करायचे ते. आम्ही 1958 च्या डी.सी. रुलमध्ये कायदा केला. या डी.सी. रुलमध्ये सुरुवातीला 1/3, 1/3, 1/3, नंतर त्याला पुन्हा फाटे फोडले. हायकोर्टात जातांना रामानंद तिवारी दि ग्रेट यांनी बॅलन्स एफएसआय, बॅलन्स एफएसआय अँड ओपन स्पेस अँड ओपन लँड असा विषय त्यामध्ये घातला..या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांनी थोडासा वाकडा सुर लावला की, त्यात डेव्हलपमेंट कोणी करावयास दिली? सभापती महोदय, 50 वर्षापासून ही गिरणी मी बघतो परंतु गेल्या 50 वर्षात एक फूट सुध्दा डेव्हलपमेंट झाली नाही. न्यु चायना मिल शिवडी या ठिकाणी दोस्ती बिल्डरने प्रचंड टॉवर्स बांधले. कोठे गेला त्या ठिकाणचा कामगार ?त्या ठिकाणची 1/3 जागा ही 50फूट बाय 50 फूट जागा म्हाडाला देण्यात आलेली आहे याचा एक बोर्ड लावण्यात आलेला आहे. या जागेवर एक झोपडं सुध्दा बांधता येणार नाही एवढी जागा म्हाडाला दिलेली आहे. मिठीबाई बिल्डिंग, नांगजीरावजी बिल्डिंग या इमारतींचे कंपाऊंड वॉल कोसळले, केवळ कंपाऊंड वॉल कोसळले नाही तर त्या इमारतींच्या बाजूच्या घरांना तडे गेले. त्यामुळे आपण या दोस्ती बिल्डर्सवर काय कारवाई करणार आहात याचीही माहिती मिळण्याची आवश्यकता आहे. डीसी रुलमध्ये बदल केल्यानंतर काय मोठे घडले? गिरणीमध्ये जाण्यासाठी मध्ये असायचे ते रस्ते म्हणजे ओपन स्पेस बाकी सगळे स्ट्रक्चर्स. स्ट्रक्चर्समध्ये त्यांची जमीन राहिली. आता राहिलेल्या ओपन स्पेसमधील 1/3 जमीन पुन्हा गिरणी मालकाला देण्यात आली, उरलेले 1/3 जमीन म्हाडा आणि उरलेली 1/3 जमीन मुंबई महानगरपालिकेला देण्यात आली. अगोदर आम्हाला 200 एकर जमीन मिळणार होती. परंतु आम्ही 40 एकरावर आलो आणि 40 एकरावरुन 26 एकरावर आलो. व 26 एकरावर आल्यानंतर मग काय तुमच्या हाती राहिले? हाच मूळ विषय या चर्चेचा आहे. या विषयाच्या संदर्भात नेहमी चर्चा केली जाते.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत..

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी परवाच्या दिवशी हा भाग वाचून दाखविला होता तो मी पुन्हा आज वाचून दाखवितो. सन्माननीय सदस्य श्री.जैन यांचे नाव घेतल्यामुळे परवा तुम्हाला राग आला होता मी आता पुन्हा एकदा तुमच्या माहितीसाठी वाचून दाखवतो. 1982 साली गिरणी कामगारांचा संप झाला होता आणि चार वर्षानंतर 1986 साली ही घटना घडली होती.कै. शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री पदावरुन गेले आणि श्री.शरद पवार महाराष्ट्रात मुख्यमंत्री झाले" "टॉवर" या पुस्तकाचा मघाशी उल्लेख करण्यात आला होता. हे भाषण कोणाचे आहे ? शाहू, फुले आंबेडकर आणि गाधी विचाराने प्रेरित होऊन तुमच्याकडे आलेले रेव्हेन्यु मिनिस्टर की रिव्हेंज मिनिस्टर तुम्ही जे काही ठरवाल ते त्यांनी सभागृहात 31 मार्च 2000 रोजी सभागृहात जे वाचून दाखविले होते त्यांच्याच भाषणातील एक परिच्छेद मी वाचून दाखवतो. त्यांनी असे म्हटले की, " सन 1986 मधील काही वाक्य मी उद्धृत करु इच्छितो. मालकांच्या जमिनी विकण्यासाठी परवानगी देण्याचा विचार कोठून रुजला, कोणी मान्य केले, मालकाच्या बाजूने असे निर्णय कोणी घेतले यासंबंधी " टॉवर " या पुस्तकामध्ये संपादकाचे बादशहा कै. निळकंठ खाडीलकर यांनी लिहिले आहे ते मी वाचून दाखवितो. ज्यावेळी माननीय शंकरराव चव्हाण मुख्यमंत्री पदावरुन गेले आणि माननीय श्री.शरद पवार साहेब मुख्यमंत्री झाले त्यावेळी नवाकाळने श्री. पवार साहेबांची मुलाखत घेतली पवार साहेब मुख्यमंत्री झाल्यानंतर वेगवेगळया लिडर्सना बोलावले होते. त्यावेळी झालेल्या मुलाखतीत ते म्हणतात की, मी कशी मान्यता देऊ, पगार, जीपीएफ, आदी कायदेशीर देणी दिलीच पाहिजेत यासाठी अटी कसल्या ? श्री.पवार साहेबांनी खुणेने उपस्थित असलेल्या सचिवाना जायला सागितले व ते गेलयानंतर श्री.पवार साहेब असे म्हणाले की, गिरणी मालक कै. राजीव गांधीकडे गेले त्यांनी तुमच्या आदोलना बाबत तक्रार केली मी तुमच्या बाजूने बोललो परंतु राजीवजींनी गिरण्यांची जमीन विकण्यास परवानगी द्यावयाला सांगितली आहे. इतर नेते उघड मान्यता देणार नाहीत पण आंदोलन करणार नाहीत असे त्यांनी मान्य केले.त्यातील काही छापण्यासाठी नाही पण कोठे तरी तडजोड करणे भागच आहे. व गिरणी मालकांची जमीन ही मालकांना विकण्यास परवानगी द्यावी. ही मंजुरी 1986 साली राजीव गांधींनी मुख्यमत्र्यांना दिली होती." तेव्हा हे पातक कोणाचे आहे ते आपण पहा. त्यावेळी एका बाजूला कै. दत्ता सामंताचा भस्मासूर दुर्दैवाने उभा रहिला होता दुस-या बाजूला छुप्या वाटने हे डाव शिजले त्यामुळे गिरणी कामगार उद्ध्वस्त झाले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत ....

भोळा भाबडा, भावनाशील, संवेदनशील, सहज विचाराने वाहून जाणारा माणूस व कोठेही झोकून देणारा माणूस भुलला व उद्ध्वस्त झाला . आज त्या कामगाराची परिमस्थिती इतकी वाईट आहे की त्याच्याजवळ रहायला घर नाही व खायला अन्न नाही. आज मोजकेच गिरणी कामगार शिल्लक आहेत. मुंबईल 58 गिरण्या होत्या आणि त्यामध्ये अडीच लाख गिरणी कामगार काम करीत होते आता फक्त 50 हजार कामगार राहिले आहेत. मुंबईमध्ये अनेक क्रांत्या झाल्या होत्या. त्यावेळी आम्ही लहान होतो आणि हया सगळया क्रांत्या पाहण्याची संधी आम्हाला मिळाली. हे आमचे सद्भाग्य आहे.या सगळया क्रांत्या गिरणगावात, गिरगावात, ऑगस्ट क्रांती मैदानात झाल्या होत्या. शाळेत जात येत असतांना आम्ही या सगळया घटना डोळयांनी पहात होतो. माझे वडील, माझे भावंडे यांनी या सगळया आंदोलनात स्वत: झोकून दिले होते. कै. ना.ग.गोरे. कै.एस.एम.जोशी. कै. मधू दंडवत, कै.आचार्य अत्रे` इत्यादी नेते सगळे शिवडीत यावयाचे आचार्य अत्रे हे शिवडीतूनच निवडणुकीसाठी उभे राहिले होते. ही क्रांती अत्यंत जवळून पाहण्याची योग मला आला होता म्हणून माझे अंत:करण हेलावून जाते. कधी तरी तुमच्याही मनाला संवेदना होणार आहेत किंवा नाही ? कधी तरी तुमच्या मनाला असे वाटणार आहे काय, की आपण जे काही बोलतो त्याप्रमाणे केले पाहिजे. " बोले तैसा चाले त्याची वंदावी पावले." परंतु तुम्ही ज्याप्रमाणे बोलता त्याप्रमाणे करीत नाहीत. तेव्हा तुमच्या पावलाना काय केले पाहिजे हे आपण सांगितले पाहिजे. त्यामुळे केवळ पावलेच नव्हे तर चेहरासुध्दा माखला पाहिजे असे मला वाटते.या गिरणी मालकापैकी मी खटाव मिलच्या मालकीण बाईचे प्रकरण आपणा सर्वांना माहीत आहे त्याबद्दल मी पुन्हा उल्लेख करणार नाही. मंत्री महोदयांनी बैठक बोलावल्यानतर सुध्दा श्रीमती खटाव आल्या नाहीत. एकाही मालकाला बेडया घालण्याची शासनाला हिंमत झाली नाही. मालकांना बेडया घातल्याचे माननीय मंत्री महोदयांनी एक तरी उदाहरण मला सांगावे. यापेक्षा भयानक प्रकार म्हणजे सरकारी गिरण्यांचा आहे.त्याचा अर्धवट उल्लेख करण्यात आला आहे. सन्माननीय राज्यमंत्री श्री.टोपे यांना मी सांगू इच्छितो की, या शासनाने सरकारी गिरण्यांची जमीन त्यांना लीजवर दिलेली आहे एन.टी.सी. चे मालक तुम्हाला जुमानत नाहीत.केन्द्र सरकार तुमचे असतांनासुध्दा ते तुम्हाला धुडकावून लावतात. लीजवर दिलेल्या या जमिनीवर आता

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धीत पत्र / शीघ्रलेखीय नोंदी नाही

(**सभापतीस्थानी - माननीय सभापती**)

श्री. अरविंद सावंत ....

तेथे आता तुम्ही विकास करीत आहात, तेथे आता तुम्ही म्युझियम काढत आहात. त्याचा किती निषेध करावा तेवढा थोडाच आहे. कसले कर्माचे म्युझियम काढता आहात ? त्यापेक्षा तेथे त्या गिरणी कामगारांसाठी घरे बांधा. सभापती महोदय, मागील वेळेस याच विषयावर चर्चा करताना मंत्री महोदयांनी फिनिक्स गिरणीसंबंधात सांगितले. त्यावेळेस त्यांनी सांगितले की, या या अटींची पूर्तता केल्यानंतरच विकासकाला विकास करण्यास परवानगी देऊ. आता त्या अटी कोणत्या? तर विकासकाने कामगारांची सगळी देणी दिलीच पाहिजेत, तसेच गिरण्याच्या जागांवर ज्या गिरणी कामगारांच्या निवासी चाळी आहेत त्यांची पुनर्बांधणी विकासकाने करून दिली पाहिजे. या अटींची पूर्तता केल्यानंतरच विकासकाला सदर जमिनीचा विकास करण्याची परवानगी देण्यात येईल अशा प्रकारची डीसी रूल्स 58 मध्ये नव्याने तरतूद करण्यात आलेली आहे. हे तुमचे 18.7.2006 चे भाषण आहे. तसेच त्या गिरण्यांच्या जमिनींवर नवीन उद्योग सुरू होतील त्यात त्या गिरणी कामगारांना, त्यांच्या मुलांना नोकरीत ठेवण्याची तरतूदही करून ठेवण्यात आलेली आहे. इतकेच नाही तर पुढे तुम्ही असेही सांगितले आहे की, एखादा गिरणी कामगार स्वत: वा त्याचा मुलगादेखील त्या जमिनीवरील विकसित गाळा विकत घेऊन आपला व्यवसाय सुरू शकतो अशीही तरतूद आपण करून ठेवली आहे. डीसी रूल 58 मध्ये 2001 साली ही सुधारणा करण्यात आली त्यात कामगारांच्या हिताचे निर्णय घेण्यात आलेले आहेत असे म्हटलेत, तर मग आतापर्यंत किती गिरणी कामगार किंवा कामगारांच्या मुलांना तेथे विकसित गाळे मिळाले आहेत ? किती कामगारांना तेथे नोकऱ्या मिळाल्या आहेत याचे उत्तर आम्हाला तुमच्याकडून पाहिजे. इंडिया युनायटेड मिल किंवा एनटीसीच्या गिरण्या ज्या आहेत, त्या एनटीसीच्या गिरण्यांमध्ये आता नऊ एक हजार कामगार आहेत. त्यांच्या बाबतीत असे घडले आहे की, त्यांना एनटीसीने काही देणी दिली. परंतु 1982 साली 13 गिरण्यांची राष्ट्रीयीकरण झाले त्यानंतरची देणी एनटीसीने त्यांना दिली. परंतु राष्ट्रीयीकरण करण्यापूर्वी जी देणी देणे होती, म्हणजे पूर्वीच्या ज्या खाजगी गिरण्या होत्या त्यांची जी देणी कामगारांना देय होती त्या संदर्भात ती देणी निश्चित करण्यासाठी त्यांनी एक आयुक्त, कमिशनर ऑफ पेमेंट नेमला होता. त्या कमिशनर ऑफ पेमेंटकडून आजतागायत या कामगारांची देणी दिली गेलेली नाहीत, आपण त्याकडे किती लक्ष दिले ? ते तर सरकारी होते, ते खाजगी

..... 4पी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नाहीत. पण त्यांची देणीही आजपर्यंत येत नाहीत. त्याच्याबद्दल आपण काय केले आहे ? यदिल्ली सरकार तुम्हाला जुमानत नाही. त्यावर आपण काय कारवाई करणार आहात याचे उत्तरही मला आपल्याकडून अपेक्षित आहे. सभापती महोदय, मी फार मोठे भाषण न करता केवळ दोन तीन मुद्यांवरच विशेष भर देणार आहे.

सभापती महोदय, एका बाजूला गिरणी कामगार उद्ध्वस्त होत असताना त्याला आपण रोजगार देऊ शकला नाहीत. तुमच्या शासनाने, सचिवांनी कोर्टामध्ये प्रतिज्ञापत्र करून सांगितले की, तेथे शिकलेली मुले नाहीत. तेथील गिरणी कामगारांचा एकही मुलगा तेथील उद्योगामध्ये काम करण्यालायक नाही. मी तुम्हाला दावा करून सांगतो की, 50 हजार गिरणी कामगारांमधील किमान 25 हजार कामगारांची मुले ही पदवीधर झालेली, कोणी 12 वी पास झालेली मिळतील. सेवा क्षेत्रात 12वी पास झालेल्या लोकांना रोजगार मिळू शकतो. पण रोजगार हमी योजनेवर डल्ला मारणारे तुम्ही, तुम्हाला त्या रोजगार हमी योजनेची व्याप्ती वाढवाविशी वाटली नाही. खरे तर तुम्ही या मुलांना रोजगार हमी देऊन रोजगार देऊ शकला असता पण मुंबई शहराला रोजगार हमी योजना लागू करायची नाही. मात्र त्या योजनेतून मागेल त्याला काम आम्ही देतो असे म्हणायचे परंतु बेरोजगार गिरणी कामगाराच्या मुलांना मात्र रोजगार तुम्ही देऊ शकला नाहीत. तुम्हाला त्या कायद्याची व्याप्ती वाढवावयाची नव्हती. उलट जाणीवपूर्वक त्या योजनेचा निधी तुम्ही 2000 कोटी पर्यंत सीमित केला आणि तो सगळा निधी पश्चिम महाराष्ट्राकडे चालला आहे. तुम्हाला केव्हाही लाज वाटली नाही की, आम्ही जेवढा निधी रोजगार हमी योजनेसाठी म्हणून घेतो तेवढाही खर्च होत नाही तेव्हा या योजनेची व्याप्ती थोडी वाढवू या आणि बेरोजगारांना रोजगार देऊ या. पण त्यासाठी देखील तुम्ही प्रयत्न केले नाहीत. ती व्याप्ती वाढवून शहरातील बेरोजगारांसाठी देखील रोजगाराची हमी तुम्हाला देता आली असती. ती व्याप्ती वाढवून सुशिक्षित बेरोगारांसाठी देखील ही योजना लागू करता आली असती. पण तसे काही करण्याची तुमच्या मनातच इच्छा नाही. म्हणून हा बेरोजगार तुसाच तडफडतो आहे. सभापती महोदय, कुर्ला स्वदेशी मिलमध्ये मॉल उभा करायला गेले. तेथे धारावीतील रहिवाशांसाठी ट्रांझिट कॅम्प बांधायला गेले. तेथील गिरणी कामगारांनी आंदोलन केले. ..... सभापती महोदय, मी माझे भाषण पाच मिनिटात संपविणार आहे, कृपा करून मला आपण तेवढा वेळ द्यावा. सभागृहाची वेळ 7.00 वाजेपर्यंत आहे

..... 4पी 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सावंत ....

याची मला कल्पना आहे, पण तेवढ्यात माझे भाषण संपणार नाही, मला अजून 5 मिनिटांचा वेळ आपण द्यावा. ..

सभापती : मी सदनाला सांगू इच्छितो की, अजून या प्रस्तावावरील चर्चेमध्ये 11 वक्ते बोलणार आहेत. त्यामुळे आपणा सगळ्यांचा हा प्रयत्न असणे गरजेचे आहे की, किमान या 11 वक्त्यांची भाषणे तरी आज पूर्ण केली तरी मंत्र्यांना उत्तर देण्यासाठी आपल्याला उद्या वेळ ठरवून देता येऊ शकेल. ..

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सकाळी 10 वाजल्यापासून सभागृह सुरू आहे त्यामुळे यापेक्षा अधिक वेळ आपण वाढवू नये अशी आमची आपल्याला विनंती आहे.

सभापती : मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना सांगू इच्छितो की, ज्या ज्यावेळी आपण अशा चर्चा करतो त्या त्यावेळी आपल्या विचारांना प्राधान्य दोन्ही बाजूंनी आणि मी देखील देतो. तेव्हा माझी विनंती अशी आहे की, किमान अजून 3-4 वक्ते बोलतील या दृष्टीने सदनाच्या कामकाजाची वेळ मी 40 मिनिटांनी वाढविण्याचे ठरविले आहे.

(यानंतर श्री. सरफरे .... 4क्यू 1 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अजून 11 माननीय सदस्यांची भाषणे होणार असल्यामुळे 40 मिनिटांचा वेळ कसा पुरणार?

सभापती : मी आपणास माननीय सदस्यांची नावे वाचून दाखवितो. माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार सभागृहात उपस्थित नाहीत, माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत हे बोलणार नाहीत, माननीय सदस्य ॲड. अनिल परब हे सभागृहात उपस्थित नाहीत, माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडरंग फुंडकर बोलणार नाहीत, माननीय सदस्य श्री. विनोद तावडे उपस्थित नाहीत, माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण बोलणार आहेत, माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे बोलणार नाहीत, माननीय सदस्य श्री. राम पडांगळे उपस्थित नाहीत, माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे बोलणार आहेत, माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान उपस्थित नाहीत, माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे उपस्थित नाहीत, माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई बोलणार आहेत. तेव्हा आता माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांच्या भाषणानंतर तीन-चार माननीय सदस्यांची भाषणे होतील. त्यानंतर आजची या प्रस्तावावरील भाषणे पूर्ण होऊन उद्या सकाळच्या सत्रामध्ये मंत्रिमहोदयांचे उत्तराचे भाषण होईल. माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे..

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, कुर्ला स्वदेशी मिलच्या जमिनीवर मॉल उभा करावयास, इमारत उभी करावयास घेतली. त्याठिकाणी संक्रमण शिबिर बांधण्याकरिता म्हाडाची मंडळी गेली असतांना त्यांना विरोध करण्यात आला. त्यामुळे ते काम आता थांबले आहे. सभापती महोदय, श्रीनिवास मिलचे दोन मालक आहेत. श्री. रंगनाथ आणि श्री. रमेश सोमाणी अशी त्यांची नावे आहेत. त्यांच्यापैकी एक मालक सांगतो की, मी 75 कोटी देतो, दुसरा सांगतो मी 100 कोटी देतो, आणि वर 2 लाख रुपये देतो. त्यामुळे श्रीनिवास मिलमधील कामगारांच्या मनामध्ये गोंधळ निर्माण झाला आहे. त्यांना समजत नाही की, आपल्याला नक्की काय करावयाचे आहे?

सभापती : माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांच्या भाषणानंतर आणखी दोन माननीय सदस्यांची भाषणे होतील. आणि त्यानंतर आजचे सभागृहाचे कामकाज संपणार आहे. उद्या सकाळी एखाद-दुसऱ्या माननीय सदस्यांचे भाषण होईल. त्यानंतर मंत्रिमहोदयांचे उत्तराचे भाषण होऊन त्यानंतर नियमित कामकाज होईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, मला आपण उद्या भाषण करण्याकरिता परवानगी द्यावी अशी विनंती करतो.

सभापती : ठीक आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, श्रीनिवास मिलच्या मालकांपैकी एकाने 75 कोटी देतो असे सांगितल्यानंतर दुसऱ्या भावाने 100 कोटी देतो, त्याशिवाय प्रत्येक कामगाराला 2 लाख देऊन हजारो लोकांना नोकऱ्या देऊ असे सांगितले. तेव्हा त्या कामगारांना आपण नक्की काय देणार आहात ते सांगा. श्रीनिवास मिलमध्ये जे चालले आहे त्याकडे आपण लक्ष दिले पाहिजे. सभापती महोदय, हे गिरणी कामगार रोजगार हमी योजनेकरिता आपल्या व्यवसाय करामधून पैसे देत होते.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत . . . .

सभापती महोदय, आपण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, तुमच्या रोजगार हमी योजनेसाठी हाच गिरणी कामगार आपल्या व्यवसाय करातून पैसे देत होता. आपल्या पगारातून रक्कम कापून देत होता. तो बेरोजगार झाला, त्यावेळी त्याला मदत करण्यासाठी तुमच्याकडे दानत नाही. त्याने आपल्या पगारातून कापून दिलेल्या पैशातून रोजगार हमी योजनेमध्ये आजपर्यंत किती पैसे जमा झाले असतील ? याचा तुम्ही कधी विचार केला आहे काय ? अडीच लाख कामगार होते, मग ती संख्या 50 हजारावर आली. पण जोपर्यंत गिरण्या सुरु होत्या, तोपर्यंत त्या पगारातून व्यवसाय कर कापून घेतला जात होता. तसेच ज्या गिरण्या सुरु आहेत, तेथील कामगारांच्या पगारातून आजही व्यवसाय कर कापून घेत आहात. पण व्यवसाय करातून रोजगार हमी योजनेसाठी जो निधी जमा केला आहे, आता त्यातून यांच्यासाठी काही करु या असे तुम्हाला वाटले नाही.या कामगारांसाठी काही केले नाहीत. निदान निर्वाह भत्ता तरी द्यावा. जेव्हा नोकरी लागेल, तेव्हा लागेल. जर आपण त्यांना दीड-दोन हजार रुपये इतका निर्वाह भत्ता दिला तरी निदान त्याच्या घरी रेशन येईल. बी.पी.एल.च्या कार्डच्या बाबतीत सर्व सन्माननीय सदस्यांनी मुद्दा मांडलेला आहे, म्हणून मी तो मुद्दा पुन्हा रिपीट करीत नाही. पण तुम्ही बी.पी.एल.कार्डसंबंधात काय करणार आहात ? याचे उत्तर द्यावे.

सभापती महोदय, शेवटचा मुद्दा मांडावयाचा आहे. मघाशी मी सांगितले की, 50 हजार गिरणी कामगारांची 100 टक्के मुले 12 वी पास झालेली आहेत, ग्रॅज्युएट झालेली आहेत. तुम्ही आजपर्यंत या मुलांची यादी तयार केलेली आहे काय ? तुम्हीच सदनामध्ये असे उत्तर दिले की, आम्ही ट्रेनिंग इन्स्टीटयुट काढणार आहोत. ती ट्रेनिंग इन्स्टीटयुट सुरु झाली आहेत काय ? असेल तर किती मुलांना ट्रेनिंग देण्यात आले आहे ? तसेच किती मुलांना नोकऱ्या मिळालेल्या आहेत ? मला तुमच्याकडून या प्रश्नांची उत्तरे अपेक्षित आहेत. आता मॉल्स् उभे राहिले आहेत. म्हणून मी मघाशी सांगितले की, "उभे भवती प्रासाद गगन भेदी" लाईटस्मुळे झगमगणाऱ्या मॉल्स्कडे तो कामगार पाहतो. पण त्या मॉल्स्मध्ये गिरणी कामगाराच्या मुलाला नोकरी मिळू शकत नाही. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी काच पुसण्याच्या बाबतीत उल्लेख केला.ठीक आहे, तो उपरोधित स्वरुपाचा असेल. पण आमच्या गिरणी कामगाराचा मुलगा हलका नाही. तो सुध्दा शिकलेला आहे. त्याच्यामध्ये शिकण्याची जिद्द आहे. तुमची ट्रेनिंग इन्स्टीट्युट कुठे उघडली आहे

. . . .4 आर-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत . . . .

ते आम्हाला सांगावे. आम्ही त्याचा पत्ता शोधत जाऊ आणि तेथील शिक्षकासमोर नतमस्तक होतो, साष्टांग नमस्कार घालतो आणि त्याला सांगतो की, बाबा रे, आम्हाला शिकव. म्हणजे मग मी सरकारकडे जाईन आणि सांगेन की, मी तुमच्या ट्रेनिंग इन्स्टीटयुटमधून शिकून आलो आहे. मला नोकरी द्या रे, नोकरी द्या. आम्हाला कशाचीच लाज वाटत नाही. म्हणून शेवटी कोर्टाने सरकारच्या कानफटात मारली. दि.17 जानेवारी 2008 रोजी हाय कोर्टाने असे सांगितले की, "बंद गिरण्यातील कामगार व त्यांच्या कुटुंबातील एका सदस्याला नोकरी देण्यासाठी यासंबंधातील यादी तीन महिन्यामध्ये सादर करावी व त्या आधारे रोजगाराची समस्या सोडविण्यासाठी धोरण तयार करावे असा आदेश दिला आहे. आणखी चार दिवसांनी तीन महिने पूर्ण होतील. नोकरींसाठी पात्र व्यक्तींच्या तपशीलासह त्यांची यादी नगरविकास विभागाच्या सचिवांकडे सादर करण्यात यावी." ही यादी तयार झाली आहे काय ? ही यादी सादर केली आहे काय ? ही यादी किती जणांची आहे ? एकंदर किती मुले बेरोजगार आहेत ? यासंदर्भात आपण काय करणार आहात ते माननीय राज्यमंत्री महोदयांनी सांगावे.

सभापती महोदय, शेवटचा मुद्दा घरांच्या संबंधात आहे. याबाबतीत सांगावयाचे तर जी गिरण्यांची जागा आहे, त्यातील 1/3 जागा म्हाडाला द्यावयाची होती. त्या ठिकाणी असलेल्या चाळीमध्ये जे कामगार रहात होते, त्यांनाच जागा द्यावयाची होती . ही घरे जेमतेम 3400 आहेत. उर्वरित गिरणी कामागारांच्या बाबतीत काय करणार आहात ? रेल्वे रुळाच्या बाजूला झोपडीधारक रहातात.कोण,कुठून आले ? माहिती नाही. या, धर्मशाळा उघडी आहे, रहा, कुठेही काहीही करा. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.मुजफ्फर हुसेन देखील बोलले. सगळे या, तुम्हाला कुर्ला,चेंबूर,घाटकोपर येथे फिरवतो. तुम्हाला झोपडया उभ्या करावयाच्या आहेत, मग एक दादा देतो. झोपडया उभ्या करा. दुसऱ्या दिवशी रेशन कार्ड पाहिजे असेल तर मी मिळवून देतो, लाईट पाहिजे तर मिळवून देतो, पाणी पाहिजे तर मिळवून देतो, पोलिसांपासून तुम्हाला वाचवावयाचे असेल तर तुम्हाला संरक्षण मिळवून देतो. पण या लोकांना तुम्ही 225 स्वे.फूटाची फुकट घरे देणार आहात. या, धर्मशाळा उघडी आहे. पण ज्यांनी या मुंबईसाठी रक्त सांडले, महाराष्टासाठी रक्त सांडले, ज्यांनी या मुबईतील मराठी माणसासाठी आपले आयुष्य उध्वस्त केले, त्या गिरणी कामगारांना घरे देताना मात्र कायदा आणि त्यातील तांत्रिक बाजू सांगितली जाते. याची लाज ....

. . . .4 आर-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत . . . .

वाटली पाहिजे. हा कामगार सहा-आठ लाख रुपयांचे घर कसा घेणार ? त्याला कोण कर्ज देणार आहे ? कर्ज घेतले तर तो त्याची परतफेड कशी करणार आहे ? आज त्याची काय ऐपत आहे. आज त्याची काय क्षमता आहे ? तो कुठून पैसा कमविणार आहे ? मी याठिकाणी एन.टी.सी.च्या गिरणीच्या संदर्भात, निर्वाह भत्त्याच्या संदर्भात, रोजगाराच्या संदर्भात काही स्पेसिफिक मागण्या केलेल्या आहेत. तसेच दोस्ती बिल्डरने अनधिकृतपणे भिंत तोडली आहे त्याबाबत मुद्दा उपस्थित केला आहे. यासंदर्भातील प्रश्नांची उत्तरे माननीय मंत्री महोदयांनी द्यावी. तसेच निदान आता तरी मी एकच अपेक्षा करतो की, या विषयाच्या संदर्भातील, गिरणी कामगारांच्या संदर्भातील हे भाषण शेवटचे ठरावे, ही चर्चा शेवटची ठरावी.

यानंतर कु.गायकवाड . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ..

त्यामुळे पुढच्या वेळी आपण एखादा निर्णय घ्याल, त्यावेळी असा प्रस्ताव घेऊन या की, आम्हाला वाटले पाहिजे की कामगारांकरिता शासनाचे किती चांगले धोरण आहे. त्यावेळी आम्ही शासनाचे अभिनंदन करु. कामगारांच्या प्रश्नांकरिता ही शेवटचीच वेळ ठरावी. ज्यावेळी मुंबईमधील एकही गिरणी कामगार शिल्लक राहणार नाही की, ज्याला त्याची देणी दिलेली नाहीत, त्याच्या मुलांना नोकरी मिळालेली नाही किंवा त्याला घर दिलेले नाही. त्यावेळी आम्ही शासनाचे अभिनंदन करु. कामगारांच्या कल्याणाचे हे काम शासनाने करावे याचसाठी हा प्रस्ताव आम्ही येथे आणलेला आहे. त्याचसाठी आमचा सर्व अट्टाहास आहे. याचसाठी आम्ही छातीवर हात ठेवून मातम करीत आहोत. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीची माहिती राहू नये याकरिता मी एक खुलासा करु इच्छितो. की, सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांना सांगू इच्छितो की, मी मघाशी उपरोधिकपणे असे म्हटले होते की, कामगारांच्या मुलांची मॉल मधील काच पुसण्याच्या कामाची देखील पात्रता नाही काय ?

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, या सदनातील ज्येष्ठ नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी या ठिकाणी कामगारांचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. मी देखील कामगार वस्तीमध्ये राहणारी आहे. माझे वडील मोठया हुद्दयावर कामाला होते तरी देखील कामगारांचे काही प्रश्न मांडण्याकरिता मी येथे उभी आहे.

सभापती महोदय, आताच माझ्या पूर्व वक्त्यांनी असे सांगितले आहे की, गिरणी कामगारांच्या मुलांसाठी व गिरणी कामगारांच्या घरांसाठी ही शेवटची चर्चा ठरावी. त्यांच्या या विचारांना मी येथे दुजोरा देऊन काही गोष्टी मांडण्याचा मी प्रयत्न कर इच्छिते. 1972 सालापासून मी कामगारांच्या चळवळीमध्ये वावरत आहे. कामगारांच्या चळवळींना मदत करीत आहे. गोदरेज कामगारांची चळवळ असो किंवा कोणत्याही गिरणी कामगारांची चळवळ असो डॉ. दत्ता सामंत यांना भस्मासूर म्हणणाऱ्या मंडळींनी जरा स्वत:कडे देखील वळून बघितले पाहिजे. कामगारांच्या चळवळी मोडून काढण्याचे काम या शहरातील किती पक्षांनी केले आहे. यातून हे सर्व रामायण उभे राहिले आहे असे माझे मत आहे. माझी आपल्याला एवढीच विनंती आहे की, कामगारांच्या नावाने कोणीही येऊन गळा काढण्याचा प्रयत्न करु नये. 1995 साली महाराष्ट्र शासनाने गिरणी कामगारांना मोफत घरे देण्यात येतील अशी घोषणा केली होती. या संदर्भात मी असे सांगू इच्छिते की, गिरणी कामगारांची चळवळ अजून संपलेली नाही व ती चळवळ संपणार देखील नाही. गिरणी कामगारांनीच या मुंबई शहराला चेहरा मोहरा दिलेला आहे. मुंबईला मोठे करण्याचे काम त्यांनी केले आहे.

सभापती महोदय, पूर्वी मुंबई शहराची तुलना मँचेस्टर शहराशी केली जात असे. त्याच मुंबई शहरामध्ये गिरणी कामगारांना उद्ध्वस्त करण्याचे काम काही उजव्या पक्षाने केलेले आहे. भांडवलदारांचे बगलबच्चे करणारे काही पक्षातील लोक आहेत. त्यातूनच हे सर्व रामायण उभे राहिलेले आहे. माझी विनंती आहे की, 1995 पूवीच्या झोपडपट्टी धारकांना घरे देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्याचप्रमाणे साधारण 55 हजार कामगारांना देखील घरे देण्याचा निर्णय शासनाने घेतला पाहिजे. नगर विकास विभागासंदर्भात मला फारशी माहिती नाही व मी त्या विभागाची मंत्री देखील नाही. ज्या ज्या वेळी मुंबई महानगरपालिकेमध्ये गिरणी कामगारांच्या जागेवर मॉल बांधण्याचा किंवा बिल्डींग उभारण्याचा प्रश्न उपस्थित करण्यात आला त्या त्या वेळी

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबई महानगरपालिकेमध्ये या प्रस्तावास विरोध करण्याचे काम मी केलेले आहे. ही कामगारांची जागा आहे. कामगारांची वसाहत तेथे आहे. म्हणून माझी मागणी आहे की, या कामगारांना देखील आपण मोफत घरे मिळवून द्यावीत. कामगारांचे प्रश्न सोडविण्याकरिता मला माझ्या पक्षाने विधानपरिषदेमध्ये निवडून पाठविलेले आहे.

सभापती महोदय, काँग्रेस पक्षाचे नेते माननीय कै. राजीव गांधी यांनी कामगारांच्या विरोधात कोणतीही भूमिका घेतलेली नाही. असा विचार त्यांनी कधीही केलेला नाही. मी आपणास सांगू इच्छिते की, 1996 पासून सन 2004 पर्यंत केंद्रामध्ये कोणत्या पक्षाचे सरकार होते हे देखील आता तपासून पाहण्याची वेळ आलेली आहे. गिरणी कामगारांचे अहित त्यामध्ये दडलेले होते. यातूनच हे सर्व रामायण उभे राहिलेले आहे. ही मुले तेथे नोकरी करण्याच्या लायकीची नाहीत असे कोर्टामध्ये असत्य ॲफिडिव्हीएट केले.

यानंतर श्री.बरवड..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई ....

सभापती महोदय, हे सर्व करीत असताना हे दोन प्रश्न तसेच गिरणी कामगारांचे जे आंदोलन आहे त्याबद्दल आपल्या दालनामध्ये आमच्या परळ लालबागच्या बांधवांना बोलवून घ्या. मॉल कोणी उभे केले ? त्यांचे अंतस्थ मालक कोण आहेत ? मोठमोठ्या इमारती कोणाच्या आहेत याबद्दलची चर्चा माझ्यासारख्या कार्यकर्तीला या ठिकाणी करावयास लावू नका. ज्यावेळेला आपण एक बोट समोर करतो त्यावेळी चार बोटे आपल्याकडे असतात याचा देखील विचार व्हावा असे मी आपल्याला नम्रपणे सांगते. आपल्या दालनामध्ये आपण एकदा सगळ्या प्रश्नांची बैठक बोलवावी. कारण आपण या सगळ्यांमध्ये एका वेगळ्या अर्थाने या कामगारांना पाहिले आणि त्यांना आपण न्याय देण्याचा प्रयत्न केला आणि त्यातूनच आपण पुढे आमच्या सारख्या लोकांना या ठिकाणी आणलेले आहे. आपण आपल्या दालनामध्ये बैठक घेऊन महाराष्ट्र सरकारमार्फत याबाबतीत निर्णय घ्यावा अशी नम्रपणे विनंती करुन मी माझे भाषण संपवते.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, काल या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी बोलल्यानंतर तसेच सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी बोलल्यानंतर एवढ्याकरिताच आनंद व्यक्त केला की, ही चर्चा जरी विरोधी पक्षानी उपस्थित केली असली तरी ज्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी बोलले त्यावेळी मला खूप बरे वाटले. मी सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना म्हणालो की, आज आपण ही चर्चा सर्व सभागृहाची केली आहे आता ही चर्चा विरोधी पक्षाची किंवा सत्ताधारी पक्षाची राहिली नसून सर्व सदनाची चर्चा झाली आहे. त्यामुळे आम्ही कोणी एकमेकांची उणीदुणी काढत नाही. आम्ही आपल्या पक्षाला काही बोलत नाही. मी सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांना एवढेच सांगेन की, आम्ही ऊर बडवून घेण्याकरिता चर्चा उपस्थित केलेली नाही. आमचे हे दायित्व आहे. मी मुंबईचा महापौर असताना ज्यावेळी श्री. दत्ता इस्वलकर यांनी संप केला आणि ते उपोषणाला बसले होते त्यावेळी श्री. सुधाकरराव नाईक मुख्यमंत्री होते. त्यावेळी मी श्री. सुधाकरराव नाईक यांच्याकडे गेलो आणि त्यांना सांगितले की मी मुंबईचा महापौर आहे, माझी विनंती आहे की, गिरणी कामगारांचे नेते उपोषणाला बसले आहेत. ते स्वत: माझ्याबरोबर आले. तेव्हापासून श्री. दत्ता इस्वलकर यांचे नेतृत्व निर्माण झाले. मुख्यमंत्री असताना श्री. सुधाकरराव नाईक स्वत: आले आणि दत्ता इस्वलकर यांना भेटले. ते त्या फुटपाथवर बसले. तिथून गिरणी कामगारांच्या चर्चेला सुरुवात झाली. आम्ही या ठिकाणी आपल्याइतकेच प्रामाणिकपणे उभे आहोत. आपण सर्वच प्रामाणिक आहोत. या चर्चेचा सूर कोणीही कृपाकरुन बदलवू नका. या गिरणी कामगारांबद्दल माननीय सभापती महोदय आपल्याही भावना आहेत. त्या भावनेसह या चर्चेचा सूर बदलता कामा नये. आपण एकमेकांवर चिखलफेक करावयास नको. आपण कामगारांबद्दल बोलावे. मॉल कोणाचे आहेत त्याबद्दल आपण बोलावे अशी आमची अपेक्षा आहे. त्याबद्दल आम्हाला आनंद होईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/

श्री. मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) सभापती महोदय, अतिशय चांगली चर्चा या ठिकाणी माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी उपस्थित केलेली आहे. आमचे नेते सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी हा विषय विस्तृतपणे मांडला आहे. मी स्वत: गिरणी कामगार महिलेचा मुलगा आहे. माझ्या आईने स्वत: न्यू सिटी मिल जी परवा बंद पडली त्या मिलमध्ये 32 वर्षे काम केलेले आहे. त्या कामगार भागामध्ये मी वाढलेलो आहे. आताच आम्ही लॉबीमध्ये बोलत असताना सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांना म्हणालो की, श्रमिकांचे जीवन उद्ध्वस्त करुन टाकले आहे. मी लालबागला डॉ. आंबेडकर रोडवर व्होल्टासच्या बाजूला रंगारी बदक चाळीत राहतो. त्या ठिकाणी उंच उंच टॉवर्स उभे राहिलेले आहेत. बाजूला गिरणी कामगारांचे जीवन उद्ध्वस्त झाले आहे. त्या ठिकाणी असलेला दत्ताराम लाड मार्ग, त्या ठिकाणी असलेली कोंबडी गल्ली, पलीकडे भायखळा, वरळी, शिवडी हा भाग नुसता उद्ध्वस्त झालेला आहे. सभापती महोदय, एक काळ असा होता की, त्या भागात सांस्कृतिक जीवनाचे एक वैभव होते. आषाढी एकादशी आली की, टाळ मृदंगाचा गजर करीत वडाळ्याच्या विठ्ठल मंदिराकडे लोक चालत जात असत. त्या ठिकाणी गोविंदाचे उत्सव होत असत. त्या ठिकाणी कबड्डीचे सामने, खो-खोचे सामने होत असत. नारळी पौर्णिमेला आपले दारिद्र्य बाजूला ठेऊन जणू काही मी अतिशय मोठा वैभवसंपन्न राजा किंवा सम्राट आहे अशा भावनेने गिरणी कामगाराच्या एका हातात खाली नारळ आणि वर दुसरा नारळ अशा प्रकारे त्या ठिकाणी नारळाचे उत्सव चालत असत. या गिरणी कामगारांनी मुंबई घडवली आहे. आमच्या सर्वसामान्य माणसांचे, मराठी माणसांचे जीवनच उद्ध्वस्त होणार आहे. या ठिकाणी अनेकांनी अनेक उपाय सुचवले आहेत. या ठिकाणी अनेक पुस्तकांचा उल्लेख करण्यात आला. मी पुस्तकांचा उल्लेख करत नाही. "आठवणी महाराष्ट्र जन्माच्या" हे श्री. दिनू रणदिवे यांनी अतिशय चांगले पुस्तक लिहिलेले आहे. गिरणी कामगारांनी काय काय केले ? महाराष्ट्रामध्ये आणि या मुंबईमध्ये गिरणी कामगारांनी हे वैभव निर्माण केले आहे. सकाळी साडेसहा वाजता गिरणीचा भोंगा वाजला की, त्या ठिकाणी गिरणी कामगार आपल्या गिरण्यांकडे धावत सुटावयाचे. पावणेसात वाजता एक भोंगा आणि सात वाजता एक भोंगा व्हावयाचा. वैभवसंपन्न असा हा गिरण्यांचा काळ होता. या ठिकाणी अडीच लाख गिरणी कामगार होते. मी राजकीय अभिनिवेशाने बोलत नाही. स्व. दत्ता सामंत हे कामगारांचे नेते होते.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण....

त्यावेळी त्यांनी चांगल्या भावनेने संप केला असेल, स्व.डांगे यांनी सुध्दा चांगल्या भावनेने संप केला असेल. पण स्व.डांगे असे म्हणत असत की, आम्हाला 100 रुपये वाढ पाहिजे असेल तर मी 1000 रुपये मागत असे. मग 50 रुपयांवर तडजोड झाली की संप मागे घेत असे. नेता हा संयमी असावा लागतो. नेता या संयत असावा लागतो. परिस्थितीचे भान राखणारा असावा लागतो. एखाद्याचे जीवन उभे करण्यासाठी चळवळ उभी करतो त्या चळवळीतून उभे असलेले जीवन उद्ध्वस्त तर होणार नाही ना याची नेत्याने काळजी घेतली पाहिजे. पण त्या संपामुळे गिरणी मालकांना गिरण्या बंद करण्याचे फार मोठे कारण मिळाले. कामगारांनी किती चळवळी केल्या ? 1908 साली लोकमान्य टिळकांना 6 वर्षांची काळयापाण्याची शिक्षा झाली त्यावेळी मुंबई शहरामध्ये गिरणी कामगारांनी 6 दिवसांचा संप केला. त्यानंतर 1930-32 साली गिरणी कामगारांनी स्व.डांगे यांच्या नेतृत्वाखाली 6 महिने संप केला. 1937 साली त्यावेळच्या काँग्रेस मंत्रिमंडळाने कामगारांच्या विरोधात कायदा केला. त्यावेळी नव्याने सत्तेवर आलेल्या काँग्रेसच्या मंत्रिमंडळाने कामगारांवर निर्बंध आणणारे विधेयक आणले त्या काळया कायद्याला विरोध करण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि उषाताईंच्या नेतृत्वाखाली गिरणी कामगारांनी संप केला. पूर्वी बिटिया नावाची मिल होती, आता त्या मिलला मुंबई गिरणी म्हणतात. मी गिरणी कामगारांच्या भागातील असल्यामुळे मला माहीत आहे. त्या मिलमध्ये 1936 साली डांगे यांच्या पत्नीने गिरणीच्या मॅनेजरला घेराव घातला होता. त्या काळामध्ये घेराव हा प्रकार होता. 1946 साली नेव्हीचे बंड झाले होते. बेलॉर्ड पियरला सर्व सैनिकांना ब्रिटिशांनी घेराव घातला होता. त्यावेळी लालबाग, परळ, चिंचपोकळी या भागामधून कामगार महिला त्यांना भाजीपोळी देण्यासाठी जात असत. त्यासाठी त्यांनी लाठयाकाठया खाल्ल्या होत्या. 1955 साली संयुक्त महाराष्ट्राची चळवळ झाली. 2.5 लाख गिरणी कामगारांनी या मुंबईत संयुक्त महाराष्ट्राची चळवळ धगधगती ठेवली. त्या चळवळीत 105 हुतात्मे झाले. त्यावेळी स्व.मोरारजी देसाई हे मुख्यमंत्री होते. बी.सी.कांबळे यांनी सभागृहात एकाकी लढा दिला होता. त्यांनी या 105 हुतात्म्यांची नावे सांगावीत अशी मागणी केली होती. पण स्व.मोरारजी देसाई नावे सांगण्यास तयार नव्हते.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

श्री.मधुकर चव्हाण....

बी.सी.कांबळे यांनी 6-7 तास तडाखेबंद भाषण केले होते. त्याचे प्रोसिडिंग काढून पहावे. त्यानंतर स्व.मोरारजी देसाई यांनी कोण म्हणतो 105 हुतात्मे असे सांगून केवळ 76 हुतात्म्यांची नावे सांगितली. त्या 76 हुतात्म्यांमध्ये 23 गिरणी कामगार होते. मी राजकीय अभिनिवेषाने कधी बोलत नाही. 1955 साली महाराष्ट्रात मंगल कलश आणला. त्यांच्याबद्दल महाराष्ट्रातील सर्व लोकांना अभिमान आहे. त्यांना भले महाराष्ट्रापेक्षा पं.नेहरु मोठे वाटत असतील. पण शिवाजी महाराजांना लुटारु म्हणणा-या पं.नेहरुंना प्रतापगडावर येऊन नतमस्तक व्हावे लागले. महाराष्ट्र स्वतंत्र झाला. पण त्यासाठी उभारलेल्या लढयात गिरणी कामगारांनी आपले रक्त सांडले होते. म्हणून शिवाजी महाराजाच्या पुतळयाचे उद्घाटन करण्यासाठी स्व.नेहरु प्रतापगडावर आले होते. स्व.मोरारजी देसाई यांनी 105 हुतात्म्यांऐवजी 76 लोकांची यादी दिली तरी माझ्या माहितीप्रमाणे त्यात 37-38 गिरणी कामगार होते.

सभापती महोदय, आज महागाईच्या निर्देशांकाप्रमाणे सर्वांना महागाई भत्ता मिळतो. गिरणी कामगारांबद्दल दिनू रणदिवे यांनी सुंदर वाक्य लिहिले आहे. "मुंबईच्या श्रमिकांना महागाईच्या निर्देशांकाप्रमाणे महागाई भत्ता गिरणी कामगारांनी मिळवून दिला. त्यासाठी त्यांनी 1940 साली 40 दिवस संप केला आणि किंमतीच्या निर्देशांकाप्रमाणे महागाई भत्ता हे तत्व मंजूर करुन घेतले. गिरणी कामगारांप्रमाणे महागाई भत्ता आता सर्व श्रमिकांना मिळतो. मोठा पगार मिळवणा-या पांढरपेशांची मागणी असते. गिरणी कामगारांनी त्यांच्या वेतनात मोठीच भर टाकली." पुढे दिनू रणदिवे यांनी लिहिले वाक्य मनाला वेदना होणारे लिहिले आहे. "परंतु सा-या श्रमिकांनी एकजूट करुन संकटात सापडलेल्या गिरणी कामगारांना संरक्षण दिले नाही. त्यासाठी बँकेचे कर्मचारी पुढे आले नाहीत, एलआयसीचे कर्मचारी आले नाहीत, लठ्ठ पगार घेणारे एअर इंडियाचे कर्मचारी पुढे आले नाहीत. या गिरणी कामगारांनी एकाकीपणे लढा दिला." सभापती महोदय, आज भारतमाता चित्रपटगृहाबाहेर मॉल उभा रहात आहे. त्याच्या समोरच्या फुटपाथवर गिरणी कामगाराची पत्नी गेली 19 वर्षे बटाटा वडा विकत आहे.

नंतर श्री.शिगम

अशोधित प्रत / अशुद्धीपत्रक नाही

(श्री. मधुकर चव्हाण....)

सभापती महोदय मी भावनाप्रधान भाषण करीत नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी या गिरण्यांच्या संदर्भात एक स्मारक म्हणून टेक्स्टाईल म्युझियम करण्यात येणार आहे असे सांगितले. या म्युझियममध्ये हा गिरणी कामगार कसा उद्ध्वस्त झाला, त्याचे संपूर्ण जीवन कसे उद्ध्वस्त झाले हे दाखविणार आहात काय ? जे 23 गिरणी कामगार संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये हुतात्मे झाले हे त्या म्युझियममध्ये दाखविणार आहात काय ? मोरारजी मिल 1984मध्ये बंद पडल्यानंतर त्या मिल मधील एक गिरणी कामगार गेली 19-20 वर्षे रस्त्यावर बटाटा वडा विकून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करीत आहेत हे त्या म्युझियममध्ये दाखविणार आहात काय ? मिल बंद पडली म्हणून आपला संपूर्ण संसार विकून मुला-बाळांना गावी घेऊन जाऊन तेथे मोलमजुरी करीत असलेला गिरणी कामगार तुम्ही त्या म्युझियममध्ये दाखविणार आहात काय ? उभ्या तारुण्यामध्ये आपल्या मनाच्या सर्व वेदना दाबून वखवखणा-या नजरांनी बघणा-यांच्या समोर नाचणा-या गिरणी कामगाराच्या मुलीचे दु:ख, तिच्या वेदना तुम्ही त्या एक्झिबिशनमध्ये दाखविणार आहात काय ? 10 बाय 10 च्या खोलीमध्ये राहाणारी ही माणसे. त्यावेळी गिरणी मधील परमनंट कामगाराला जातू म्हटले जायचे आणि तो आला नाही तर त्याच्या बदली काम करणा-याला बदली कामगार म्हटले जायचे. सकाळी 7.00च्या भोंग्याला गिरणी सुरु व्हायची. एखादा जातू कामगार सकाळी 7.00वाजता कामावर आला नाही तर बदली कामगाराला बदली मिळायची आणि ती बदली मिळाली नाही तर त्याला दुस-या पाळीपर्यन्त म्हणजे दुपारी 3.00 वाजेपर्यनत बदली मिळेल या आशेवर उन्हामध्ये उभे रहावे लागत होते. त्याच्यासाठी तेथे बसण्याची वगैरे सोय नव्हती. मुंबई महानगरपालिकेच्या सभागृहामध्ये काही लोक त्यावेळी असेही बोलले की, मुंबई तुमची आणि भांडी घासा आमची. मी त्या महान नगरसेवकाचे नाव घेत नाही. त्यावेळी आम्ही मुंबई महानगरपालिकेमध्ये आवाज देखील उठविला होता. सभापती महोदय, त्या माणासाची बत्तीशी एवढी खरी ठरली की खरोखरच या गिरणी कामगारांच्या मुलांवर भांडी घासण्याची पाळी आली. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी विस्तृत भाषण केले 58 गिरण्यांची 200 एकर जमीन ताब्यात यावयास पाहिजे होती. परंतु त्या ऐवजी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर चव्हाण...)

फक्त 32 एकर जमीन तुमच्या ताब्यात आली. तुम्ही गिरणी कामगारांसाठी 6 हजार घरे बांधण्याचे जाहीर केले. माननीय मंत्री महोदयांनी सांगावे की, भायखळा येथील मुंबई महानगरपालिकेच्या बिल्डिंग ॲण्ड प्रपोझल डिपार्टमेंटने तुमच्याकडे एक तरी प्रपोझल पाठविलेले आहे काय ? या गिरणी कामगारांसाठी जी 6 हजार घरे बांधण्यात येणार आहेत त्या 6 हजार घरांचे प्लॅन, एस्टिमेट, आर्किटेक्ट याचा आराखडा तुमच्याकडे पाठविलेला आहे काय ? 55 हजार गिरणी कामगारांना घरे मिळतील असे तुम्ही जाहीर केले. मग आता त्यांना कोठली घरे देणार ? परळमध्ये 15 एकर जागेवर टेक्स्टाईल म्युझियम उभारण्यासाठी जागा घेण्याची प्रक्रिया सुरु केलेली आहे. घरातील माणूस मेल्यानंतर त्याच्या स्मरणार्थ जसे एखादे स्मारक तयार केले जाते त्याप्रमाणे हे टेक्स्टाईल म्युझियम उभारण्यात येणार आहे काय ? अशा प्रकारचे स्मारक बघताना आनंद होत नाही तर माझा मुलगा, माझे वडील गेले म्हणून त्याठिकाणी अश्रू ढाळले जातात. हे टेक्स्टाईल म्युझियम अश्रू ढाळण्यासाठी करणार आहात काय ? या गिरणी कामगारांना टाटाने कसे लुटले, बिर्लाने कसे लुटले, त्यांचे जीवन कसे उद्ध्वस्त केले, 10 बाय 10 च्या खोलीमध्ये राहून शिक्षण घेणा-या मुलाच्या हातामध्ये माती कशी आली हे त्या म्युझियममध्ये तुम्ही दाखविणार आहात काय ? गिरणी कामगारांच्या घरादारावर गाढवाचे नांगर फिरविण्याचे एवढे पाप या धनिकांनी केलेले आहे की, आयुष्यभर ते गंगेच्या पाण्यात उभे राहिले तरी त्यांचे हे पाप धुतले जाणार नाही. या गिरणी मालकांनी अनेक चुका केलेल्या आहेत. आम्ही तुम्हाला अतिरिक्त जमीन देतो असे या मालकांनी सांगितले. पण ही जमीन कुठे देणार ?

...नंतर श्री. गिते...

अशुद्धीत प्रत/शीघ्रलेखापाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

आम्ही ती जमीन मुंबईच्या बाहेर देतो. गिरणी मालकांनी आणखी चलाखी केली. उदाहरणादाखल सांगतो की, समजा आम्ही दहा गिरणी मालक आहोत आणि 100 एकर जमीन सगळयांनी मिळून त्यांना द्यावयाची आहे. ते सांगतात की, आम्ही तुम्हाला एकत्रित 100 एकर जमीन मुंबईच्या बाहेर देतो. यासंदर्भात मला अशी माहिती मिळाली आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी त्या गोष्टीस स्टे दिला आहे. त्यांना सांगितले आहे की, आम्ही तुमचे ऐकणार नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी स्टे दिला आहे. परंतु तो स्टे कशासाठी असतो हे मला माहिती आहे. Stay means wait for a particular moment as soon as wait is over the stay will be vacated. गिरणी कामगारांसाठी मुंबईतच जागा द्यावी असे तुम्ही गिरणी मालकांना सांगणार आहात काय ? गिरणी मालकांचे ऐकून तुम्ही गिरणी कामगारांना मुंबईच्या बाहेर नेणार आहात काय ? गिरणी कामगार हे मुंबईचा वैभव होते. ज्या जमिनीवर गिरण्या होत्या त्याच ठिकाणी गिरणी कामगारांना घरे बांधून देण्याचा कायदा शासनाने केला पाहिजे. 'Nothing doing' आम्हाला ठामपणे सांगा की, आम्ही अशा प्रकारचा कायदा करणार आहोत. बाहेरची एक इंच देखील जमीन आम्ही घेणार नाही.

सभापती महोदय, माननीय श्री. गणेश नाईक हे कामगार मंत्री आहेत. व्यक्तिगत बाबींच्या संदर्भात मला काही बोलावयाचे नाही. 24 वर्ष बंद असलेल्या श्रीनिवास मिलमधील कामगारांच्या बाबतीत मी काहीही करु शकत नाही असे त्यांनी या ठिकाणी मोठया फुशारकीने सांगितले. सत्ता तुमच्या हातात आहे. पूर्वी राजाला राज्याभिषेक करताना बोलावयाचे "हो दंडास्मि" आणि मग राजदंड त्याला दाखवून म्हणायचे की, "अहमं दंडास्मि". राजा तुला दंड कोण करील. हाच राजदंड तुला शिक्षा करील. या राजदंडामध्ये इतके सामर्थ्य आहे की, तुम्ही कितीही बलशाली शक्तीला नमवू शकता. 'हो दंडास्मि' म्हणजे कोण मला शिक्षा करु शकतो ? त्या ठिकाणी हा कायदा तुला शिक्षा करु शकतो. तुम्ही आम्हाला या ठिकाणी सांगता की, आम्ही काही करु शकत नाही. मी काय सांगतो ते माननीय नगरविकास राज्यमंत्री महोदयांनी लिहून घ्यावे. श्रीनिवास मिल, स्वदेश मिल, ब्रॅडबरी मिल, मफतलाल मिल या गिरण्या आजही बंद आहेत. त्या गिरणीतील कामगारांना शासनाने एक छदाम देखील पैसे दिलेले नाहीत. तेथील गिरणी कामगार कॉम्पेन्सेशन मिळेपर्यंत दरमहा 1000 रुपये मागत आहेत. हे शासन तेवढी मदत देखील त्यांना करु शकत नाही. या गिरणी मालकांनी आणखी एक चलाखी केली आहे ती म्हणजे ज्युपीटर मिलच्या जागेस

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

1.33 एफ.एस.आय. घेतला आणि 44974 मीटर जागेसाठी 39930 चौरस मीटर इतका एफ.एस.आय. मंजूर करण्यात आला. त्यासाठी इंडिया बूल यांनी 276 कोटी रुपये एवढेच पैसे भरले. या ठिकाणी जवळपास 3 हजार कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला. त्यानी शासनाला सांगितले की, मी त्या जागेवर गिरणी कामगारांसाठी घरे बांधून देईन. त्या जमिनीवर त्याने दुप्पट म्हणजे 2.66 एवढा एफ.एस.आय. घेतला. त्या गिरणीच्या जागेवर हॉटेल, टेनिस कोर्ट, क्लब हाऊस बांधले जाणार आहे. तसेच 446 वाहने उभी राहू शकतील अशी इमारत त्या ठिकाणी पार्किंगसाठी बांधली जाणार आहे. आमचा कोठला सावंत, आमचा कोठला चव्हाण, आमचा कोठला दळवी, आमचा कोठला राणे, आमचा कोठला तावडे हे गिरणी कामगारांचे वंशज तेथे कार घेऊन जाणार आहेत काय ? ही सर्व व्यवस्था श्रीमंत लोकांसाठी करण्यात येत आहे. या गोष्टी गिरणी कामगारांसाठी चालल्या आहेत काय ? या गोष्टीचा खुलासा होणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, मी एक गोष्ट सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, 29 गिरणी मालकांनी त्यांच्या जमिनीच्या बाबतीत कमर्शियल वापरासाठी परवानगी द्यावी म्हणून शासनाकडे अर्ज केलेला आहे. तुम्ही त्या गिरणी मालकांना अजून नाही असे म्हटलेले नाही. या 29 गिरणी मालकांनी 22 एकर जमिनी कामगारांसाठी देण्याचे कबूल केले. प्रत्यक्षात त्या ठिकाणी शासनास 46 एकर जमीन मिळावयास पाहिजे. परंतु रघुवंशी मिलच्या मालकाने शासनास सांगितले की, तुम्हाला मी एक इंच देखील जमीन देणार नाही. त्याने शासनाला लेखी लिहून दिले आहे. रघुवंशी, फिनिक्स, कमला, रुबी या गिरण्यांच्या मालकांनी शासनास स्पष्टपणे लिहून दिले आहे हे खरे आहे किंवा नाही यासंबंधीची माहिती या ठिकाणी द्यावी. चार मिलच्या मालकांनी तुम्हाला लिहून दिले आहे. 29 गिरणी मालकांनी कमर्शियल कॉम्प्लेक्स बांधण्यासाठी शासनाकडे प्रपोजल्स पाठविले आहेत. ते प्रपोजल्स नगरविकास विभागाने 9 एप्रिल, 2008 पर्यंत का धुडकावून लावले नाहीत ? ती फाईल या टेबलावरुन त्या टेबलावर फिरत आहे. तुम्ही त्यांना स्पष्ट पणे सांगा की, It is not within the frame आम्ही तुम्हाला ही जमीन कमर्शियल वापरासाठी देऊ शकत नाही, जोपर्यंत गिरणी कामगारांच्या घरांचे प्रपोजल्स देत नाहीत तो पर्यंत तुम्हाला आम्ही परवानगी देणार नाही असे त्यांना सांगितले पाहिजे. मुंबईच्या, महाराष्ट्राच्या वैभवामध्ये अडीच लाख गिरणी कामगारांनी आपल्या श्रमाने, आपल्या परिश्रमाने भर घातली. त्यांनी आपल्या आयुष्याची होळी केली. 1936 साली गिरणी कामगाराचा पगार 25 रुपये होता....

....यानंतर श्री.कानडे...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण...

डांगेंचे आणि आमचे मतभेद असतील Yes we hate their ideology परंतु डांगेंनी अतिशय योजनापूर्वक संप चालविला. गिरणी कामगारांना 1960-65, 1970 मध्ये 12 महिन्यांचे काम आणि 13 महिन्यांचा बोनस मिळू लागला. आमची आई बोनस घ्यायला गेली त्यावेळी अर्धेअधिक पैसे रस्त्यावरच गिरणीच्या दरवाज्याजवळ कर्ज वाटण्यासाठी जायचे. परंतु बाजूला कुठे जिलबी खायला घ्यायची. गिरणी कामगारांनी आयुष्यामध्ये कधी करंजी, लाडू हे वर्षभर पाहिले नाहीत. दिवाळी असेल तर आदल्यादिवशी बोनस मिळायचा आणि मग एकाच कढईतील तेलामध्ये आधी करंज्या तळायच्या, मग शंकरपाळे तळायचे मग चकली तळायची आणि मग शेवटी ते तेल श्रावण महिन्यात अळूवडी तळण्यासाठी डब्यात ठेवले जायचे. इतके दारिद्रय गिरणी कामगारांनी भोगल आहे आणि त्या दारिद्रयातून मी गेलो आहे. दिवाळी-दसरा आम्ही त्याच वेळी पाहिला. आज लग्नसमारंभामध्ये नवरा-नवरी आग्रहाने वाढतात आणि मग ते सगळ अन्न उकिरडयावर फेकतात आणि ते अन्न एकाच वेळी भिकाऱ्याचे मूल आणि कुत्र खात असत. ते लाडू सुध्दा गिरणी कामगारांच्या मुलांच्या पदरात फक्त बोनस मिळाला तर मिळायचे. त्यांचे वैभवाचे भात कधी खायचो तर 10 तारखेला पगार झाल्यावर 20 तारखेपर्यंत. कारण 20 तारखेला पगार संपायचा. 20 तारखेनंतर घरी उसळ आणायची, त्यात पाणी आणि मीठ घालायच आणि दोन भावंडांनी दोन ताटामध्ये भातात घालून ते यथेच्छ ज्याप्रमाणे पुरणपोळी खातात तसे खायच. पण त्याही वेळेला आम्ही सुखात होतो. कारण तो श्रमाचा पैसा होता. गिरणी कामगार म्हणजे एक वैभव होत. गणपती उत्सव, कबड्डी उत्सव, नवरात्र उत्सव, आटयापाटया, होळी अस हे सगळ सांस्कृतिक जीवन संपवून तुम्ही हे सुरु केल. मघाशी तुम्ही हसलात. पण लालबाग, परळमधील सगळी हॉटेल्स गेली आणि त्याठिकाणी डान्सबार आले. तुम्ही खरे सांगत आहात की काळाचौकीच्या नाक्यावर सरदार हॉटेल समोर पूर्वी त्याठिकाणी विठ्ठल हॉटेल होते तेथे आता गोल्डन डान्स ॲन्ड क्लब असा बार आलेला आहे. बाजूला त्याठिकाणी लाड मास्तरांची हिंदमाता व्यायामशाळा आहे. तेथे व्यायाम करायचा आणि आपल उभ तारुण्य दारुच्या बाटलीत क्लबमध्ये घालवायच. ही संस्कृती शासन निर्माण करणार आहे काय ?

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ....

म्हणून सभापती महोदय, माझी मागणी आहे की, तुम्ही याबाबत योजना आखा. ठीक आहे आता गिरण्या बंद पडल्या आहेत. कालाय: तस्मै नम: परंतु काळाला आपल्याला पाहिजे तसे ओढून आणून ज्या जनतेने डोक्यावर सत्तेचा मुकुट दिला आहे त्यांचे अश्रू पुसण्यासाठी सत्तेचा उपयोग करणार की धनिकांनी पसरलेल्या नोटांवरुन तुम्ही चालत जाणार याचा विचार करा. नाहीतर नोटांवरुन चालण्याचा मार्ग तुम्हांला नरकाकडे नेईल परंतु नियमाचा आधार घेऊन गिरणी कामगारांचे अश्रू पुसण्यासाठी कायद्याचा उपयोग केलात तर देव तुम्हांला स्वर्गातल्या दारामध्ये तुमचे स्वागत करायला उभा असेल. ये तू किती पुण्यवान माणूस आहेस ! तेव्हा नोटांच्या गालिचावरुन चालत जायच की काय करायचे ते आता शासनाने ठरवावे. कुणी सत्तेचा मुकुट घेऊन आईच्या पोटी जन्माला येत नाही. सत्ता मिळते ती परमेश्वराच्या कृपेने, कार्यकर्त्यांच्या परिश्रमातून, आईवडिलांच्या पुण्याईने, स्वत:च्या कर्तृत्वाने या सर्वांमधून सत्ता मिळते. पण सत्ता मिळाल्यानंतर सामान्य माणसाचे दु:ख हे आपले दु:ख समजले पाहिजे. म्हणून अडीच लाख कामगारांच्या मुलांचे भवितव्य तरी चांगले होईल आणि पुढच्या पिढयांचे सांस्कृतिक जीवन जे तिथे जगले, राहिले तिथे उभ राहील म्हणजे त्यांच्या मुलांना नोकऱ्या, त्यांची देणी त्यांना घरे देण्यासाठी कायद्याचे कठोर पालन करा असे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो. नमस्कार.

सभापती : सभागृहासमोर सध्या चर्चेला असणारा नियम 260 अन्वये जो प्रस्ताव आहे त्या प्रस्तावावरील उर्वरित चर्चा आणि उत्तर दिनांक 10 एप्रिल, 2008 रोजी सकाळी 10.00 ते 12.00 या विशेष बैठकीत घेण्यात येईल. त्याचप्रमाणे उद्या सभागृहाची नियमित बैठक 12.15 वा. सुरु होईल. या बैठकीत अन्य औपचारिक कामकाजाव्यतिरिक्त पणन विधेयक तसेच विरोधी पक्षाचा प्रस्ताव घेण्यात येईल.

सभा□हापुढील □म□ज संपलेले आहे. सभा□हाची बैठ□ आता स्थ□□त होऊ□ उद्या गुरुवार, दि□□ 10 एप्रिल, 2008 रोजी स□ळी 10.00 वाजता पु□ भरेल.

(सभा□हाची बैठ□ सायंकाळी 7 वाजू□ 39 मि□□टां□□ गुरुवार, दि□□ 10 एप्रिल 2008 रोजीच्या स□ळी 10.00 वाजेपर्य□त स्थ□□त झाली)

अशुद्धीत पत्र / शुद्धीपत्र नाही